बक्षीस व लायब्ररीकरितां मंजूर केलेलें

# श्रीदत्तभार्गव-संवाद

लेखक—वा. भा. जोशी

किंमत एक रुपया

6308

ॐ

हरितायन ऋषिप्रणीत

# श्रीदत्तभार्गवसंवाद.

( त्रिपुरारहस्य-ज्ञानखंड या मूळ संस्कृत ग्रंथावरून )

लेखक

बाळकृष्ण भाऊ जोशी, पुणें.

आवृत्ति १ री, एप्रील १९२४.

किंमत १ रुपया.

Ptinted and published by Achyut Chintaman
Bhat in his Yashawant press,
Shanwar Peth, poona.

# आरंभींचें मंगल!

जो सर्व जीवांच्या हृदयांत 'अहं' या रूपानें नित्य स्फुरत आहे, जाणिवेच्या रूपानें अधिष्ठित झाला आहे आणि आनंदाच्या रूपानें प्रत्ययास येत आहे; तसेंच जो जडचेतनादि नाना आकार धारण करून मी तूं तो इत्यादि रूपांनीं विकास पावला आहे, आणि नानाविध द्वंद्वें स्वस्वरूपींच कल्पून द्वैतविलासाची क्रीडा करीत आहे, असा जो आत्मस्वरूप

## हृदयस्थ राम

कीं, जो तत्त्वदृष्टीनें आकाशासारखा सर्वतः एकीएक धनदाट भरला असतांहि केवळ भक्तिसुखासाठीं वेगळेपणा स्वीकारून आपआपणाशीं देवभक्तांच्या क्रीडा चालवितो, त्या शुद्ध चिन्मय परमात्मस्वरूपाला, कार्योचित मीपणाचा आश्रय घेऊन, ही ग्रंथरूप कृति, एक सुंदर पुष्प म्हणून समर्पण करितों.

—लेखक

# लेखनाचा योग.

लोकमान्य टिळक यांचें गीतारहस्य प्रसिद्ध झाल्याबरोबर विद्वान् मंडळींत चोहोंकडे एक मोठाच वाद उत्पन्न झाला. भगवद्गीतेचें प्रतिपाद्य काय, या संबंधांत पुष्कळांचीं पुष्कळ मतें झालीं असून, त्याच्याच अनुषंगानें, 'ज्ञानी पुरुषानें लोकसंग्रहाचीं कर्में करावीं किंवा इच्छेस येईल तसें रहावें' हाहि एक प्रश्न उपस्थित झाला आहे. यासंबंधानें रहस्यकारांनीं प्रगट केलेल्या मताबद्दल कित्येक लोकांना संशय वाटत आहे. अशा स्थितींत हा मूळ संस्कृत ग्रंथ प्रसंगवशात् वाचनांत आला; व त्यांत या विषयाचें विवेचन मोठ्या मार्मिकपणानें आणि चिकित्सक बुद्धीला मान्य होण्याजोगी सुंदर उपपत्ति दाखवून केलेलें पाहून मनाला मोठें समाधान वाटलें. आणि प्रतुस्त वादांत निर्णय करण्याचे कामीं विचारी लोकांस ही मीमांसा पुष्कळ उपयुक्त होईल, असें वाटून मूळांतील विषय मराठींत लिहून काढून ग्रंथरूपानें महाराष्ट्रापुढें आणावा अशी इच्छा उत्पन्न झाली. तीच इच्छा आज या दृश्य रूपास येत आहे.

आतां वरील विषयाबरोबर दुसऱ्याहि तात्त्विक व धार्मिक शेंकडों गोष्टींचा विचार या ग्रंथांत झालेला आहे. त्यामुळें तत्त्वजिज्ञासु मुमुक्षुजनांना हा ग्रंथ फारच उपयोगाचा झालेला आहे. तर—यावरून ग्रंथाचें सामान्य स्वरूप कळून येईलच. विशेष स्वरूप पहावयाचें असल्यास ग्रंथ पुढेंच असल्यामुळें अंतःप्रवेश करावा इतकेंच येथें सुचविणें बरें.

—लेखक.

# अनुक्रमणिका.


| | | | | |
|---|---|---|---|---|
| | अंतःप्रवेश .... | .... | .... | १ |
| प्रक. १ लें | पर्वतावर सुचलेले विचार. | .... | .... | ५ |
| प्रक. २ रें | सद्गुरूंची भेट. | .... | .... | १२ |
| प्रक. ३ रें | हेमचूड आणि हेमलेखा. | .... | .... | २५ |
| प्रक. ४ थें | पतिपत्नींचा वाद. | .... | .... | २७ |
| प्रक. ५ वें | चमत्कारिक गोष्ट. | .... | .... | ३८ |
| प्रक. ६ वें | विश्वास पाहिजे. | .... | .... | ५३ |
| प्रक. ७ वें | ईश्वर नाहीं काय ! | .... | .... | ६० |
| प्रक. ८ वें | कोड्याचा उलगडा. | .... | .... | ७१ |
| प्रक. ९ वें | पाहिजे तें मिळालें. | .... | .... | ७५ |
| प्र. १० वें | सारेच ज्ञानी ! .... | .... | .... | ८८ |
| प्र. ११ वें | जगताची मीमांसा. | .... | .... | ९५ |
| प्र. १२ वें | टेंकडीच्या पोटांत ! | .... | .... | १०५ |
| प्र. १३ वें | विलक्षण स्वप्न. | .... | .... | ११५ |
| प्र. १४ वें | संकल्पाचें सामर्थ्य. | .... | .... | १२५ |
| प्र. १५ वें | समुद्रास्तृप्यन्तु ! | .... | .... | १३६ |
| प्र. १६ वें | निद्रा म्हणजेच ब्रह्म ! | .... | .... | १४७ |
| प्र. १७ वें | जनकाचा स्वानुभव. | .... | .... | १५७ |
| प्र. १८ वें | सारेंच पटत नाहीं ! | .... | .... | १७० |
| प्र. १९ वें | विचित्र ज्ञानी ! | .... | .... | १९० |
| प्र. २० वें | देवीचा अवतार. | .... | .... | २०२ |
| प्र. २१ वें | ब्रम्हराक्षसाची भेट. | .... | .... | २१५ |
| प्र. २२ वें | सारांश काय ? | .... | .... | २२८ |

# अन्तःप्रवेश.

श्रोते पुसती कोण ग्रंथ, काय बोलिलें जी येथ,
श्रवण केलियानें प्राप्त, काय आहे? ॥ —रामदास.

ग्रंथ हातीं येतांच त्याच्या वाचनास आरंभ करण्यापूर्वी वाचकांच्या मनांत असा प्रश्न सहज उत्पन्न होतो कीं, हा काय ग्रंथ आहे?—आणि तो वाचून आपणास लाभ काय? आणि हाच विचार प्रस्तुत ग्रंथ पाहिल्याबरोबरहि येईल. वाचक म्हणतील कीं, ही काय कादंबरी आहे?—किंवा एखादें मनोरंजक गोष्टीचें पुस्तक आहे? तर या प्रश्नावर वाचकांस एवढेंच सुचवावयाचें कीं, हा श्रीगुरु दत्तात्रेय आणि भार्गव ( म्हणजे परशुराम ) यांचा संवाद आहे. प्रत्यक्ष श्रीगुरु सांगत आहेत, आणि बुद्धिमान् परशुराम तत्त्वजिज्ञासेनें तें सर्व मन देऊन श्रवण करीत आहे. तर असा उत्कृष्ट योग असतांना त्यांच्या सन्निध राहून चाललेला प्रकार स्वस्थपणें अवलोकन करण्यास आपणांस काय हरकत आहे? दुसऱ्या एखाद्या संभाषणप्रसंगीं श्रवणास सिद्ध होतांना आपण पाहिजे तर विचार करावा; परंतु गुरूंचे गुरु आणि शिक्षकांचे शिक्षक श्रीदत्तात्रेय भाषण करीत असतां, तें काय आहे? आणि त्यापासून लाभ काय? असा विचार आपण कशास मनांत येऊं द्यावा? ज्याला कोणावरहि विश्वास टाकवत नाहीं, त्यानें सुद्धां श्रीदत्तात्रेयांवर खुशाल विश्वास टाकावा! आणि वाचक हो! अशा प्रकारें प्रथमतःच आपलें अंतकरण उदार करून आपण जर या ग्रंथाच्या आंत प्रवेश कराल, तर आपणांस केवढा तरी लाभ

होईल! त्याचा प्रत्यक्ष अनुभव या ग्रंथाच्या पार निघून गेल्यावर जेव्हां आपणांस येईल तेव्हां येथील हें प्रास्ताविक वर्णन आपणांस फार अपुरें वाटेल. पहा कीं, या ग्रंथांत आपणांस पाहिजे असल्यास कादंबरी आहे, मनोरंजक गोष्टी आहेत, देवादिकांच्या पौराणिक कथा हव्या असल्यास आहेत; आणखी यांत ही एक गोष्ट विशेष आहे कीं– आपण मनोरंजक गोष्टींच्या वाचनापेक्षां वरिष्ठ प्रतीच्या वाचनाच्या अभिरुचीस पोंचले असाल, तर आपणांला उपयुक्त, किंबहुना चित्ताकर्षक होतील असे मनन करण्याजोगे विषय तर यांत पदोपदीं भरले आहेत! इंग्रजी शिक्षणानें कांहीं विशेष संस्कार झाले असल्यामुळें, किंवा स्वभावतःच बुद्धि तीव्र असल्यामुळें आपणांस जर धर्मासंबंधीं चिकित्सकपणा प्राप्त झाला असेल, तर हा ग्रंथ आपल्या बुद्धीला निःसंशय शांति देण्यास कारणीभूत होईल. वाचून पहा, आणि मग या विधानाची सत्यता ठरवा. परमेश्वराकडे आपला ओढा असेल, तर हा ग्रंथ आपणांस अमृततुल्यच वाटेल. कारण– धर्मसंबधानें सांगितलेल्या विविध आचारांचा उपयोग काय? चित्त-शुद्धि म्हणजे काय? जगांतील पदार्थापासून प्राप्त होणारें सुख खरोखर आहे किंवा आभासात्मक आहे? सद्गुरूंची अपेक्षा काय आहे? ईश्वर आहेच कशावरून? त्याचें वास्तविक स्वरूप काय? तो प्रत्यक्ष भेटतो कसा? तो भेटल्यानें चिरंतनसुख प्राप्त होण्याचा संभव काय? आत्मसाक्षात्कार म्हणजे काय? वेदान्तवादी जगताला स्वप्न ह्मणतात याचा अर्थ काय? हें जगत् कोणीं उत्पन्न केलें? केव्हां केलें? कशापासून केलें? कां केलें? आत्मज्ञान हा रूक्ष विषय आहे किंवा खरोखरच

त्यांत काहीं आनंदाचा अनुभव संभवनीय आहे? ब्रह्मज्ञान हा विषय केवळ वादविवादाचा आहे किंवा त्याचा व्यवहारांत काहीं उपयोग आहे? कर्मनिष्ठा खरी कीं ज्ञाननिष्ठा खरी? प्रारब्धावर देह टाकावयाचा म्हणजे काय? ज्ञानी कोण? आणि त्यानें लोकसंग्रहाचीं कर्में करावीं किंवा अरण्यांत भटकावें? तसेंच जगाला खोटें ह्मणावयाचें व व्यवहार करावयाचा याचा अर्थ काय? अशा तऱ्हेचे, विचारी मनुष्यापुढें उभे राहणारे प्रश्न आपल्या मनांत जर कधीं उद्भवले असले, तर त्या सर्वांना या ग्रंथांत श्रीदत्तात्रेयांच्या मुखांतून मोठीं मार्मिक आणि सयुक्तिक उत्तरें मिळालीं आहेत. तीं वाचून आपलें मन आश्चर्यभरित होईल! अथवा—आपण असल्या प्रश्नांच्या भरीस न पडतां या बाह्य जगाला कंटाळून जाऊन ईश्वरभक्तींत गढून गेलां असाल तर—तरीहि हा ग्रंथ आपणांस अतिशय जिवलग मित्र वाटेल. हा आपणांस उपासना कशी करावी तें सांगेल. उपासनेचा मार्ग चालतांना वाटेंत कोणकोणते व कसकसे अनुभव येतात तें दाखवून देईल; आणि आपल्या सात्विक व शुद्ध बुद्धीला खेळत खेळत स्वस्वरूपाच्या आनंदांत नेऊन बसवील!

यासाठीं प्रिय वाचक हो! अधिक विचारांत न शिरतां निश्चय करून आपण ग्रंथवाचनास आरंभ करावा. वाचते वेळीं एवढेंच ध्यानांत ठेवावयाचें कीं, एखादें विधान सकृद्दर्शनीं आकलन झालें नाहीं, तर बुजून न जातां, श्रीगुरूंच्या कृपेनें त्याचा आशय पुढें ध्यानांत येईल असा विश्वास धरून, तसेंच वाचन पुढें चालवावें. म्हणजे दयाळू श्रीगुरुनाथ आपल्या हृदयांत शिरून, अर्थ ध्यानांत

उतरण्यासाठीं आपल्या बुद्धीवरील मल दूर करितील. हा पुढें अनुभव येईलच, सध्यांपुरता या लेखकाचा विश्वास धरावा. आणि अशाच रीतीनें आपल्या शंका किंवा आक्षेप व ग्रंथांतील प्रतिपादन यांचा मेळ घालीत ग्रंथाच्या अखेरीपर्यंत प्रवास करावा. नंतर पुनः एक वेळ मननाला संगतीला घेऊन सर्व विषयांवर सूक्ष्म व विवेकशील दृष्टि फिरवावी. इतकें झाल्यानंतर ' हा काय ग्रंथ आहे ? व तो वाचून आपणास लाभ काय ? ' हे आपले प्रश्न आपोआपच मावळतील. किंबहुना, त्या प्रश्नांचीं उत्तरें परम आनंदाच्या रूपानें आपल्या हृदयांत वास्तव्यच करूं लागतील ! मग तीं उत्तरें शब्दांनीं कोणी देऊं लागला तर त्या पाचोळ्याकडे आपण दृष्टि तरी फिरवाल काय ?

तर असल्या या परम आनंदसमुद्रांत प्रवेश करण्यास श्रीगुरु दत्तात्रेय आपणांस बुद्धि देवोत, व आपणांला प्रेमानें बरोबर घेऊन ग्रंथाच्या पार पोंचवोत, एवढी मंगल आशा त्या श्रीगुरूंच्या चरणीं प्रगट करून हें लेखन पुरें करितों.

यशवंत छापखाना
शनवार पेठ, पुणें.

आपला सर्वांचा एक मित्र
**बाळकृष्ण भाऊ जोशी.**

ॐ

# श्रीदत्तभार्गवसंवाद.

## प्रकरण १ लें.

## पर्वतावर सुचलेले विचार.

कर्तव्यतैव दुःखानां परमं दुःखमुच्यते ॥
तत्सत्त्वे तु कथं तेस्तो दुःखाभावः सुखं च वा ॥ ४२ ॥

ब्रह्मानंद हें जिचें स्वरूप आहे, व जी अमर्याद शुद्ध चैतन्यरूप असून, जगद्रूप अद्भुत चित्र, जी स्वतः आरसा होऊन प्रतिबिंबरूपानें दाखविते, त्या त्रिपुरादेवीला नमस्कार असो.

हांरितायन म्हणतातः—नारदा, हें त्रिपुरादेवीचें माहात्म्य तूं चांगलें लक्ष देऊन ऐकलेंस ना? कारण माहात्म्य श्रवण करणें हें मोक्षाचें मुख्य साधनच आहे. तर आतां ज्ञानखंड तुला सांगतों. तें फार मौजेचें आहे. त्याचें नीट श्रवण होईल तर मनुष्याला दुःख

---

* हा कथाभाग हारितायन ऋषींनीं नारदास सांगितलेला आहे. ज्यांना पुरुषांना चिरंतन व अनायास अशा आनंदपदाचा नित्य अनुभव असल्यामुळें जगांतील साधारण जनसमूह सुखलालसेनें इतस्ततः धावत असलेला पाहून खेद वाटतो; व कांहीं तरी उपायानें हे लोक सुखांत राहावे, असा प्रयत्न करण्याची बुद्धि जागृत होते. अशा बुद्धीनें हारितायन ऋषींनीं त्रिपुरारहस्य ग्रंथ तयार केला. ह्यांत पहिल्या माहात्म्यखंडांत त्रिपुरादेवीचा महिमा वर्णन केला असून, त्याच्या श्रवणादिकांनीं ज्यांना ज्ञानविचाराचा अधिकार प्राप्त झाला आहे, अशा जिज्ञासु जनांकरितां हें ज्ञानखंड आरंभिलें आहे.

म्हणून कसें तें लागणारच नाहीं. हा भाग वैदिक, वैष्णव, शैव, शाक्त, पाशुपत इत्यादि पंथांचा चांगला शोध करून मग ठरविलेला आहे. याच्याइतकें बुद्धीला पटण्याजोगें दुसरें शास्त्रच नाहीं. हें श्रीगुरु दत्तात्रेयांनीं परशुरामाला सांगितलें असून, अनुभवाच्या गोष्टी आणि सयुक्तिक विचारपद्धति यांनीं हें फार सुंदर झालें आहे. ह्यामुळें याच्या योगानेंहि जर एखाद्याला स्वरूपज्ञान होणार नसेल, तर तो दुर्दैवी पुरुष शुद्ध पाषाणच म्हटला पाहिजे. असो, तर तो विषय या ज्ञानखंडाच्या रूपानें तुला सांगतों. पण नारदा, मजपासून कांहीं श्रवण करण्याचें तूंहि ज्याअर्थीं मनांत आणिलें आहेस, त्यावरून मला वाटतें कीं, खरोखर संतांचें चरित्र मोठें अलौकिक असतें. अथवा, अशी कृपा करणें हा संतांचाः अगदीं सहजस्वभावच होय. कस्तूरी नासिकेला स्वभावतःच संतुष्ट करिते. असो.

आतांपर्यंत दत्तात्रेयांकडून परशुरामानें त्रिपुरा देवीचें माहात्म्य श्रवण केलें. तें ऐकल्यामुळें त्याच्या शुद्ध अंतःकरणाला प्रेमाची भरती येऊन तो कांहीं वेळ अगदीं निश्चल झाला. त्याचे डोळे आनंदानें भरून आले, आंगावर रोमांच उभे राहिले व अंतःकरणांत हर्ष तर अगदीं दाटून गेला! मग थोड्या वेळानें सावध होऊन त्यानें दत्तात्रेयांना वंदन केलें. आनंदातिरेकानें कंठ भरून आल्यामुळें वाणी साफ उमटत नव्हती, अशा अवस्थेंत तो म्हणालाः—“ महाराज! आपल्या कृपेनें आज मी धन्य झालों! साक्षात् शिवस्वरूप करुणासागर गुरु दत्तात्रेय संतुष्ट झाल्यावर प्रत्यक्ष ब्रह्मपदहि तुच्छ आहे, असें मला वाटतें. ज्यांच्या संतोषामुळें प्रत्यक्ष काळ देखील जिवाचा जिवलग

होतो, तो महेश्वर गुरु आज मजवर अनायासें कृपाळू झाला! म्हणून महाराज! आपल्या कृपेमुळें मला माझें सर्व प्राप्य मिळाल्यासारखेंच झालें आहे. तर एवढें जिचें माहात्म्य आहे त्या देवीची उपासना करण्याची पद्धति आज मला समजावून सांगावी."

अशी प्रार्थना केल्यानंतर, आतां परशुराम हा उपासना करण्याला योग्य झाला आहे असें श्रीदत्तात्रेयांच्या लक्षांत आलें. तेव्हां, 'ईश्वरसेवेंतच आपलें खरें कल्याण आहे' अशी परशुरामाची श्रद्धा झालेली पाहून व त्याचें अंतःकरणहि प्रेमळ पाहून उपासनेचा सर्व क्रम त्यांनीं त्याला समजावून दिला. परशुरामानेंहि- तीं सर्व कर्मे वगैरे ध्यानांत घेऊन, पुढें अभ्यास करण्यासाठीं एकान्तांत जाण्याबद्दल श्रीगुरूंची अनुज्ञा घेतली, व तो दूर असलेल्या महेंद्र नांवाच्या एका पर्वतावर गेला. तेथें जातांच आपल्या मनाला ज्यायोगें आल्हाद वाटेल असें एक वसतिस्थान तयार करून लागलीच त्यानें आपल्या उपासनेस आरंभ केला. त्रिपुरा देवीच्या मूर्तीचें ध्यान, जप, पूजा, नित्यनेम अखंड चालवीत राहून तेथें त्यानें एकंदर बारा वर्षें काढलीं! उपासना प्रेमपूर्वक चालविली असल्यामुळें बारा वर्षें गेलीं असें त्याच्या ध्यानांतहि आलें नाहीं. असो; त्यानंतर तो एकदां सहज स्वस्थपणें बसला असतां त्याच्या मनांत एक विचार आला. तो स्वतःशीं म्हणालाः—"पूर्वीं संवर्त ऋषींची माझी गांठ पडली असतां मीं त्यांना विचारलेली ती गोष्ट अद्यापिहि मला समजली नाहींच! मध्यंतरीं मी ती मुळींच विसरलों होतों, पण त्रिपुरामाहात्म्य श्रवण केल्यावर श्रीगुरूंना मीं तें सृष्टिनिरूपणप्रसंगानें पुनः विचारलें. परंतु

संवर्त ऋषींच्या त्या भाषणाचा अर्थ अद्यापहि कांहीं माझ्या ध्यानांत आला नाहीं. त्यावर श्रीगुरूंनीं कटकृदाख्यान सांगून 'हा विषय प्रस्तुत नको' म्हणून म्हटल्यानें तो मुद्दा तसाच राहिला. पण खरोखर या जगद्व्यवहाराचें स्वरूप वस्तुतः काय आहे बरें? एवढें मोठें हें विश्व उत्पन्न झालें कसें? हें चाललें आहे तरी कोणीकडे? आणि हें मुक्काम कोठें करणार आहे? पाहिलें तर या जगांत एक काडीही स्थिर नाहीं, दर क्षणीं त्यांत पालट होत आहे; पण सर्व जगद्व्यवहार स्थिर किंवा कायमचा दिसतो आहे! हें असें कसें? या चमत्कारिक व्यवहारामध्यें मला विचार असा कोठेंच आढळत नाहीं! आंधळे जसे एकामागून एक जातात, त्याप्रमाणें हे सारे लोक वागत असलेले उघड दिसतात. याला माझें स्वतःचेंच उदाहरण पुरण्याजोगें आहे! माझ्या बाळपणीं काय काय घडलें, तें मला आठवत नाहीं; तरी पण कुमार-अवस्थेंत माझी वागण्याची तऱ्हा एक प्रकारची व तरुणपणची दुसऱ्याच प्रकारची! हल्लींचा माझा व्यवसाय तर त्याहूनहि निराळा! पण या सर्वांपासून मला फळ काय मिळालें तेंच समजत नाहीं. जो जो पुरुष ज्या ज्या वेळेला जो जो उद्योग करितो तो तो नीट विचार करून, बरोबर फळ मिळावें म्हणून करितो. पण इतकें करूनहि आजवर कोणाला काय मिळालें आहे? कोण सुखी झाला आहे? फळ मिळालें, असें लोक म्हणतात खरें; पण तो एक वेडेपणाच आहे. मी त्याला फळच म्हणत नाहीं. कारण कीं, लोक पुनः तो उद्योग करण्यास धावतच असतात! तर मला सांगा कीं, एकदां फळ मिळाल्यावर आणखी पुनः फळाची इच्छा कशी

व्हावी? पण हे लोक तर सारखे, फलेच्छेनें उद्योग करीतच आहेत! फळ तर त्यालाच म्हणावें, कीं ज्यानें दुःखाचा नाश होतो किंवा सुख तरी प्राप्त होतें. परंतु 'मला अमुक कर्तव्य केलें पाहिजे' असा कर्तव्यशेष जोंवर आहे तोंवर दुःख संपणें नाहीं, व सुख होणें नाहीं! कर्तव्याचें ओझें हेंच सर्व दुःखांचें दुःख आहे. तें असेपर्यंत दुःखाभाव व सुखप्राप्ति हीं होणार कशीं? सर्व अंग होरपळून गेलें आहे आणि पायांवर चंदनाचा लेप लावीत आहेत; असाच, कर्तव्य-शेष असतांना सुखी होण्याचा प्रकार होय! अथवा, बाण लागून लागून काळीज अगदीं फाटून गेलें आहे आणि अप्सरा आलिंगन देत आहेत; हाच प्रकार, कर्तव्यशेष असतांना सुख मिळविणाऱ्या मनुष्याचा होय. क्षयानें मरणाचे पंथास लागला आहे आणि संगीत ऐकविण्याचा प्रयत्न चालला आहे; असाच मासला या कर्तव्य मस्तकावर घेऊन सुखी होणाऱ्या पुरुषाचा होय! खरे सुखी असे जगांत तेच, कीं ज्यांना कांहीं कर्तव्य राहिलें नाहीं; व म्हणून जे पूर्ण तृप्त व अंतर्बाह्य शांत झाले आहेत. अहो! 'मला हें कर्तव्य केलें पाहिजे' असें मनांत वागवीत असूनहि कोणाला कोठें सुख होणें शक्य असेल, तर सूळावर दिलेल्या मनुष्यालाहि गंधपुष्पांपासून सुख मिळेल! अहो, या शेंकडों कर्तव्यांनीं अगदीं व्यापून गेलेला पुरुषहि ज्या अर्थीं सुखाची आशा धरीत राहतो, त्या अर्थीं हा मोठा चम-त्कार आहे! या अविचाराचें माहात्म्य किती वर्णन करावें कीं, कोट्यवधि कर्तव्यांच्या पर्वताखालीं चुरडून गेलेले लोकहि आपणांस सुखी समजत आहेत! सार्वभौम राजाचा जसा सारखा उद्योग चालू

आहे, तसाच अगदीं भिकाऱ्याचाहि चालला आहे! तसतशीं वेगळीं फळेंहि मिळवितात आणि आपल्याला मोठे धन्य समजतात! आणि मीहि परिणामाकडे मुळींच न पाहतां या सर्वांच्या या विचारशून्य परिपाठीप्रमाणें, आंधळ्यामागून आंधळा जावा तसा, अगदीं नीट चाललों आहें! तर आतां हें गतानुगतिकत्व पुरे; गुरूंच्याकडे जावें. या संशयसमुद्रांतून पार जाण्याला श्रीगुरूंच्या बोधनौकेचा आधार घेतला पाहिजे, म्हणजे मला याचा उलगडा होईल."

याप्रमाणें विचार झाल्याबरोबर विलंब न लावितां परशुराम श्रीगुरूंची भेट घेण्याकरितां त्या महेंद्र पर्वतावरून निघाला, तो गंधमादन पर्वतावर आला. तेथें आसनावर श्रीगुरूंची तेजस्वी मूर्ति बसलेली त्यानें अवलोकन केली. तेव्हां पुढें होऊन दोन्ही हातांनीं दोन्ही चरण धरून त्यानें पायांवर डोकें ठेविलें व साष्टांग वंदन केलें. हा सर्व प्रकार पाहून श्रीगुरूंचें अंतःकरण प्रसन्न झालें, व त्याला प्रेमानें आशीर्वाद देऊन 'वत्सा, ऊठ' म्हणून उठवून ते म्हणाले:—"वत्सा! पुष्कळ दिवसांनीं ही तुझी गांठ पडली. तुझी प्रकृति वगैरे नीट आहे ना? सांग बरें!" तेव्हां परशुराम उठून गुरूंनीं दाखविलेल्या समोरच्या आसनावर बसला, व सुप्रसन्न मुखानें हात जोडून म्हणाला:— "श्रीगुरुदेवा! आपल्या अमृतकर अशा कृपेच्या आसऱ्यास राहणाऱ्या मला दैववशात् प्राप्त होणाऱ्या रोगादिकांनीं काय होणार आहे? आपल्या कृपेनें मिळालेल्या आत्मामृताच्या करंड्यांत मी राहत असल्यामुळें व्याधिरूप प्रखर सूर्याचाही ताप मला झाला नाहीं. महाराज! आंतून आणि बाहेरून आपल्या कृपेनें मला आनंदित करून टाकलें

आहे. फक्त महाराजांच्या चरणांचें सान्निध्य नाहीं हाच एक रोग, त्यावांचून मला कांहीं रोग नव्हता. तेव्हां येथें येऊन श्रीगुरूंच्या दर्शनानें मी आतां पूर्ण बरा झालों आहें. एक गोष्ट मात्र मनांत पुष्कळ दिवस घोळत आहे. पुष्कळ दिवसांचा संशय आहे. आपण परवानगी दिली तर तें सर्व आपल्याला विचारावयाचें मनांत आहे."

हें परशुरामाचें भाषण ऐकून दयाळू श्रीगुरूंना फार आनंद झाला आणि ते प्रेमानें परशुरामास म्हणाले, "परशुरामा! विचार; तुझा पुष्कळ दिवसांचा संशय मला एकदां सांग. तुझें प्रेम पाहून मला फार आनंद वाटतो. तर सांग, म्हणजे मी तुझें समाधान करतों."

---

## प्रकरण २ रें,

# सद्‌गुरूंची भेट.

विचारः सुखवृक्षस्य बीजमंकुरशक्तिकम् ॥
विराजते विचारेण पुरुषः सर्वतोऽधिकः ॥ ५५ ॥

श्रीगुरूनीं प्रश्न विचारण्याला अनुमोदन दिल्यानंतर परशुरामानें विनयानें व आदरानें बोलण्यास आरंभ केला. तो म्हणालाः—" महाराज! पुष्कळ दिवस झाले; एकदां प्रसंगवशात् सर्व क्षत्रियजातीचा मला फार क्रोध आला होता. त्या वेळीं क्रोधाच्या आवेशांत मीं सर्व क्षत्रियवंश, पोरेंबाळें, किंबहुना गरोदर स्त्रियासुद्धां ठार केल्या. चुकून सुद्धां कोणी राहूं नये, म्हणून मीं एकवीस वेळा निःक्षत्रिय पृथ्वी केली. क्षत्रियांच्या रक्तानें तळीं भरलीं व त्यायोगें पितरांचें तर्पण केलें! इतकें झाल्यावर मी स्वस्थ होतों. त्यानंतर अयोध्येला रामराजा राज्य करीत असल्याचें कळलें. त्याबरोबर त्याची चीड येऊन मी गर्वानें त्याजवर चालून गेलों. परंतु त्या एकानें माझा गर्व जिरवून मला पराजित केलें, आणि मी ब्राह्मण म्हणून केवळ दया करून मला जिवानिशीं सोडलें. महाराज! तो दिवस माझ्या फार स्मरणांत राहिला आहे. पराभव झाल्यामुळें त्या दिवशीं माझ्या मनाला खेद उत्पन्न झाला. वाटेनें परत येतांना मला फार पश्चात्ताप झाला; अतिशयच हळहळ वाटली. शेवटीं अकस्मात् वाटेंत संवर्त अवधूत हे भेटले. खरोखर सज्जन हे किती लपून राहतात? भस्माखालीं झांकून गेलेल्या अग्नीप्रमाणें ते लवकर ओळखितां येत नाहींत. त्याप्रमाणें त्यांचें

स्वरूप ध्यानांत येण्याला मला पुष्कळ आयास पडले. परंतु त्या सर्वांगशीतल पुण्यपुरुषाचे संगतीनें मला फार शांति प्राप्त झाली. त्यांच्या स्थितीसंबंधीं मीं त्यांस विचारलें, तेव्हां त्यांनीं जें उत्तर दिलें तें फार मधुर होतें. त्यांनीं सर्व गोष्टींचा निष्कर्ष काढून सार तेवढें सांगितलें. परंतु रंकाला जसें राजाचें पद दुर्लभ, त्याप्रमाणें मला तें कांहीं नीटसें लाभलें नाहीं. म्हणून मीं तें समजून सांगण्याबद्दल त्यांची पुनः प्रार्थना केली. त्यावर त्यांनीं मला आपलें नांव सुचविलें. त्यामुळें मी आपल्या चरणांकडे आलों आहें. मी आपणांकडून पूर्वीं त्रिपुरादेवीचें भक्तिपर वर्णन श्रवण केलेलें आहे; व उपासना चालवून मीं त्या देवीला आपल्या हृदयांत धारण केलें आहे. परंतु अद्यापिहि संवर्त मुनींनीं सांगितलेला तो विषय मला आकलन होत नाहीं. तर पुढेंहि अशीच उपासना चालवीत मी किती काळ राहणार? व यापासून लाभ काय? म्हणून महाराज! संवर्तांच्या ज्ञानअवस्थेसंबंधीं मला बोध करावा. ज्ञानावांचून पुरुषाला कृतकृत्यता प्राप्त होणें नाहीं. त्याची ओळख नाहीं, तोंवर कांहींहि कर्म करणें तो पोरखेळ होय असें मी समजतों. मीं आजवर पुष्कळ कर्में केलीं; पुष्कळ यज्ञ केले; यज्ञांत मोठमोठाल्या दक्षिणा दिल्या. पुष्कळ अन्नसंतर्पण करून इंद्रादि देवांचें यजन केलें. परंतु संवर्तांची भेट झाल्यावर, या सर्व गोष्टींचीं फळें मर्यादित, क्षणभंगुर आहेत, असें मला कळून आलें; व क्षणिक सुख तेंच दुःख असें मी समजतों. सुखाचा अभाव हेंच दुःख नसून थोडें सुख तेंसुद्धां दुःखच होय. कारण त्या सुखाच्या समाप्तीनंतर निश्चयानें अधिक दुःख प्राप्त होतें. इतकेंच होऊन राहत नसून

आणखीहि एक भीति यांत आहे. ती ही कीं, या सुखभोगादिकांनीं मृत्यूला अधिक साह्यच होतें. व तें न व्हावें असा तर कांहीं उपाय दिसत नाहीं! उपासनेचाहि असाच प्रकार आहे. उपासना सर्व मानसिक अतएव काल्पनिक असल्यामुळें तोहि एक पोरखेळच होतो. आपण ज्या तऱ्हेनें उपासना करण्यास सांगितलें, त्या तऱ्हेनें उपासना करितां येते; त्याहून निराळ्या तऱ्हेनेंहि करितां येते. कर्मानुष्ठानाप्रमाणें ती नियमानें करितां येते व वृत्तीच्या उल्हासाप्रमाणें अनियमितहि होते. दोन्ही प्रकारचे शास्त्राधार आहेत. शिवाय उपास्यभेदाप्रमाणें त्याचे विधिहि भिन्नभिन्न होतात. सारांश, यज्ञाप्रमाणेंच हा सर्व प्रकार असल्यामुळें यायोगें सत्य म्हणजे शाश्वत फळ मिळणें शक्य नाहीं. शिवाय, काल्पनिक गोष्टींपासून शाश्वत फल मिळावें तरी कसें? आतां 'जीवमान आहे तोंवर कर्तव्य करावें, त्याच्या शेवटाकडे पाहूं नये' असेंहि शास्त्रांत कोठें कोठें म्हटलें आहे, हें खरें; परंतु भगवान् संवर्ताची स्थिति कांहीं निराळीच मला दिसून आली. तो महात्मा सर्वांगशीतल असून कर्तव्याच्या व्यापाच्या विषज्वाळांतून पूर्णपणें निसटलेला होता. तो अगदीं निर्भयतेच्या मार्गाला लागलेला असून, हा सर्व लोकव्यवहार त्याला हास्यास्पद वाटत होता. वणवा पेटलेल्या अरण्यांतहि पाण्यांत बसलेल्या गजाप्रमाणें त्याची अवस्था होती. सर्व-कर्तव्य-मुक्ततेच्या अमृताचें सेवन करून तो आनंदित झाला होता. त्याला ही अवस्था कशानें प्राप्त झाली होती? महाराज! हें सर्व आपण मला कृपा करून सांगा. या कर्तव्यरूपी काळसर्पापासून मला सोडवा!"

याप्रमाणें भाषण करून परशुरामानें श्रीगुरूंच्या पायांवर एकवार मस्तक लवविलें. तेव्हां श्रीगुरूंनीं परशुराम ज्ञानाला अधिकारी झाला आहे असें पाहून स्वाभाविक दयेनें भरून येऊन बोलण्यास आरंभ केला. ते म्हणाले:– " परशुरामा! तुला अशी बुद्धि प्राप्त झाली आहे, तेव्हां तुझी धन्य आहे. ही बुद्धि म्हणजे समुद्रांत बुडणाऱ्याला मिळालेली नौकाच होय. उपासनादि कर्मांच्या योगानें ज्या पुण्यवानाला असा सुविचार प्राप्त झाला आहे, तोच पुरुष आपल्याला परम पावन पदावर नेऊन बसवील. ही सर्वांच्या हृदयाकाशस्वरूप असणारी त्रिपुरादेवी आपल्या अनन्यभक्ताच्या हृदयांत जेव्हां उपासनावशात् विकास पावते, तेव्हां ती त्याला या मृत्यूच्या भयंकर जाळ्यांतून तत्काळ सोडविते. या कर्तव्यवेताळाची पुरुषाला जोंपर्यंत अतिशय भीति वाटूं लागलेली नसते, तोंपर्यंत त्याला सुख प्राप्त होत नाहीं. कर्तव्यरूप काळसर्पानें दंश केलेल्या पुरुषांना कल्याण कसें प्राप्त होणार? कर्तव्याचें विष लागून हें सर्व जगत् मूर्च्छित झालें आहे, आंधळें झालें आहे. आत्महिताचे खरे मार्ग त्याला ओळखत नसल्यामुळें तें भलत्याच वाटेनें जात असून पुनः पुनः मोहांत पडत आहे! याप्रमाणें कर्तव्याच्या विषानें मूर्च्छित झालेले हे लोक अनादिकालापासून जणूं भयंकर विषसागरांत पचत आहेत! उदाहरणार्थ एक गोष्ट तुला सांगतों.

पहा कीं, एकदां कांहीं प्रवासी फिरतां फिरतां विंध्याद्रीवर येऊन पोंचले. त्या वेळीं ते क्षुधेनें व्याकुळ झाल्यामुळें इकडे तिकडे फळें शोधूं लागले. तेव्हां कुचल्याचीं फळें त्यांना आढळलीं. परंतु

आकाराच्या सारखेपणावरून तींच काजूचीं फळें समजून त्यांनीं सेवन केलीं. क्षुधेच्या भरांत रुचीकडेहि त्यांचें लक्ष गेलें नाहीं. परंतु थोड्याच वेळांत कुचल्याचें विष अंगांत भरून अंगाचा दाह होऊं लागला. तेव्हां हा काजूच्या फळांचाच परिणाम आहे असें समजून तो विषाचा दाह शमन होण्यासाठीं ते उपाय शोधूं लागले. पुढें धोतऱ्याचें बीं त्यांस आढळून आलें. मग तेंच लिंबू आहे अशा भ्रमानें त्या सर्वांनीं भक्षण केलें. त्यामुळें ते अधिकच भ्रमले आणि नीट मार्ग सोडून सैरावैरा फिरूं लागले. त्या अरण्यांत झाडी फार दाट असल्यामुळें सूर्याचा प्रकाश आंत येण्याला मुळींच वाव नव्हता. त्यामुळें ते वरचेवर खांचखळग्यांत पडूं लागले. सर्वांगावर कांट्यांचे ओरखडे पडूं लागून सर्व हातांला, पायांला आणि मांड्यांना तर रक्तच निघालें. पुढें त्यांनीं परस्परांना ढकलण्यास सुरवात केली. होतां होतां भांडणें सुरू होऊन काठ्या, दगड व बुक्क्या यांच्या योगानें त्यांच्यांत परस्पर मारामारी चालू झाली. थोड्याच वेळांत त्यांचीं सर्व अंगें जखमांनीं भरून गेलीं. शेवटीं त्यांना एक गांव आढळलें. सायंकाळच्या वेळीं ते त्या गांवाच्या वेशीपर्यंत पोंचले व वेशीच्या दरवाजांतून आंत शिरूं लागले. त्यावरोबर द्वारपाळांनीं पुढें होऊन त्यांस आंत जाण्यास अटकाव केला. तेव्हां या मूर्खांना, आपण कोठें आहोंत व प्रसंग काय आहे याचें कांहीं भान न राहून यांनीं तेथेंच लठ्ठालठ्ठीला सुरवात केली! त्याचा परिणाम असा झाला कीं, द्वारपालांनीं त्यांना मनमुराद मार दिला. तेव्हां अर्थात् मार असह्य होतांच वाट सांपडेल तिकडे ते पळूं लागले. मग कित्येक

त्या शहराच्या आसपासच्या खंदकांत पडले; त्यांचा सुसरींनीं समाचार घेतला, कोणी खड्ड्यांत अडकले. कोणी विहिरींत पडून प्राणास मुकले; व बाकी उरले ते कसाबसा जीव घेऊन पळाले!

सारांश, या मूर्खांच्यासारखे हे सर्व लोक आपल्या कल्याणाच्या इच्छेनेंच कर्तव्याचें विष पिऊन मूर्छित झाले आहेत व मोहानें आंधळे होऊन आपणहून आपला नाश करून घेत आहेत! अरेरे! म्हणून परशुरामा! तुझ्या अंतःकरणांत हा विचार उत्पन्न झाला आहे, त्या अर्थी तूं धन्य आहेस. विचार हेंच सर्वांचें मूळ असून ब्रह्मपदाच्या गच्चीवर जाण्यालाहि ही पहिली पायरी आहे. सुविचारावाचून कल्याण कोणाचेंहि कसें होणार? अविचार हेंच मोठें मरण आहे. या अविचारानेंच सर्व लोक ठार झाले आहेत. विचार करणाराचाच सर्वदा जय होतो, व त्यालाच सर्व इष्ट प्राप्त होतें. दैत्य व राक्षस यांचा अविचारानेंच नाश झाला, व चांगल्या विचाराच्या योगानेंच देवांना सर्व सुख प्राप्त झालें. श्रीविष्णूच्या साहाय्यानें ते आपल्या शत्रूंना जिंकतात; तेंहि सुविचारामुळेंच. सुविचार हेंच सुखवृक्षाचें बीज आहे. यापासूनच सुखाचे अंकुर फुटतात. पुरुष विचारानेंच सर्वांत अधिक शोभतो. विचारानेंच ब्रह्मदेव महत्पदास चढला, व विचारानेंच श्रीहरीची सर्वत्र पूजा होत आहे. विचारानेंच श्रीशंकर हे सर्वज्ञ व महेश्वर झाले आहेत. श्रीराम बुद्धिमान् खरा, पण तोहि अविचारानेंच मृगाला शोधण्याच्या भरीस पडून मोठ्या संकटांत सांपडला; व विचाराच्याच योगानें समुद्र उल्लंघन करून राक्षसांनीं भरलेल्या लंकेवर चालून गेला. अविचारानेंच ब्रह्मदेवानें मूर्खपणा

करून व अभिमानास पेटून आपलें एक मस्तक उडवून घेतलें. अविचारानेंच महादेवानें राक्षसास वर दिला; व आपल्यावर भस्म होण्याची पाळी आली तेव्हां आपणच भिऊन पळूं लागला. हरीनेंहि अविचारानेंच पूर्वीं भृगुऋषींच्या स्त्रीस शापून ठार केलें, व आपणांवर महत्संकट ओढून घेतलें. हेचसे काय, दुसरे कोणीहि—देव, असुर, राक्षस, मनुष्य, पशु—सारे अविचारानेंच संकटांत पडतात. परशुरामा, विचार ज्यांना केव्हांहि सोडून जात नाहीं, तेच धीर व तेच महात्मे होत. त्यांना निरंतर वंदन असो. या अविचारामुळेंच लोक नव्हे तें कर्तव्य डोक्यावर घेऊन नाचतात. पण तेच विचार करतील तर त्यामुळेंच ते अनंत संकटांपासून मुक्त होतील. सारांश, लोकांना विचार हें फार उपयुक्त साधन मिळालेलें आहे. आतां, अविचार आहे तोंवर विचार कोठून येणार? कारण, प्रखर उन्हानें तापून गेलेल्या वाळूच्या मैदानांत गार पाणी मिळण्याचा संभव काय? तेव्हां अविचाररूप अग्नीच्या ज्वाळा चोहोंकडे पसरल्या असतां विचाराचा शीतल स्पर्श, कांहीं उपाय शोधल्यावांचून प्राप्त होणें शक्य नाहीं. आणि तो उपायहि एकच आहे व तो सर्वांत श्रेष्ठ आहे. तो म्हणजे सर्वांच्या अंतर्यामीं निवास करणाऱ्या श्रीत्रिपुरा देवीची खरी कृपा! अविचारानेंच अंध बनलेल्या लोकांचें घोर अज्ञानतम नष्ट करणारा व मोक्षप्राप्तीचें उत्कृष्ट साधन असलेला विचाररूपी सूर्य तिच्या कृपेवांचून कोणाला तरी कसा प्राप्त होणार? आणि तिची कृपा करून घेण्याचा उपाय म्हणजे भक्तीनें तिची सेवा करणें, हा आहे. तिची चांगली सेवा झाली व त्यायोगें ती साधकावर संतुष्ट झाली, म्हणजे

अंतःकरणांत विचाराच्या रूपानें सूर्याप्रमाणें तीच उदय पावते. यासाठीं या सर्वांतर्यामी, चिन्मय, शिव व स्वात्मस्वरूप श्रीत्रिपुरा महेश्वरीला भजावें. उपासनाक्रम सद्गुरूंपासून समजावून घ्यावा. मनांत कोणचीहि कामना ठेवूं नये. ही आराधना करतांनाहि मूळांत प्रेम आणि विश्वास पाहिजे. त्यासाठीं प्रथम माहात्म्य नीट श्रवण करावें. ह्मणूनच परशुरामा! मीं तुला प्रथम तिचें माहात्म्य सांगितलें. त्यामुळें तूं आज मोक्षदायक अशा या मंगल विचाराला प्राप्त झाला आहेस. तेव्हां आतां तुला कांहीं भय नाहीं. विचाराचा उदय होईपर्यंतच मोठें भय असतें. अविचारानें ग्रस्त झालेल्यालाच पावलोपावलीं भय असतें. अरे! सन्निपात झालेल्या मनुष्याला औषध देऊनहि काय, शरीरगत धातू शुद्ध केले नाहींत तोंवर मृत्यूचें भय आहेच. हा थोर विचार प्राप्त झाला कीं मनुष्याच्या जीविताचें सार्थक झालें. असला चांगला जन्म मिळूनहि पुरुषाला जर सुविचार प्राप्त झाला नाहीं, तर तो जन्मरूप वृक्ष वांझाच गेला म्हणावयाचा! ज्यांत विचार चालू आहे तोच जन्मवृक्ष सफल म्हणावा. विचार न करणारे लोक ते कूपमंडूकासारखेच होत. कूपांत जन्मलेला बेडूक जसा शुभहि पाहात नाहीं व अशुभहि पाहात नाहीं व जन्मला तसाच मरण पावतो, त्याप्रमाणेंच हे ब्रह्मांडकूपांत जन्मलेले लोकहि व्यर्थ होत. कारण तेहि आपलें हित कशांत व अहित कशांत, हें जाणत नाहींत व वरचेवर उत्पन्न होऊन वरचेवर मरण पावतात. पुत्रवित्तादि दुःखाला सुख समजतात, व भक्तिवैराग्यादि सुखाच्या ठिकाणीं दुःखाचा निश्चय करतात; आणि अविचाराच्या प्रभावानें संसाररूप अग्नीवर शिजत अस-

तात! दुःखांत तडफडत असतात, परंतु तें सोडीत म्हणून नाहींत! शेंकडों लाथा खाऊनहि गाढव जसा गाढवीची पाठ घेतोच, तसे हे संसाराच्या मागें लागतात. परशुरामा! तूं मात्र आज विचारी होऊन दुःखाच्या परतीराला निघालास!"

## प्रकरण ३ रें,

# हेमचूड आणि हेमलेखा.

हेमलेखां राजपुत्री भोगेष्वनतिकामिनीम् ॥
उदासीनां सदा दृष्ट्वा पप्रच्छ रहसि कचित् ॥ ४९ ॥

श्रीदत्तात्रेयांचें हें भाषण परशुरामानें फार प्रेमानें ऐकून घेतलें आणि त्यावर पुन्हा एक विनयपूर्वक प्रश्न केला. तो म्हणालाः—भगवन्! आपण सांगितलें तसाच प्रकार आहे खरा. अविचारानेंच सर्व लोकांचा खरोखर मोठा घात केला आहे. विचारानेंच हित होतें. आणि तो प्राप्त होण्याला परंपरेनें माहात्म्य श्रवण करणें हा उपाय आहे, हेंहि मला कळलें. परन्तु त्यावरहि मला एक मोठा संशय आहे. तो हा कीं, तें श्रवणच कसें घडावें? त्याला उपाय काय आहे? तें आपोआप होईल म्हणावें, तर तसें सर्वांनाच आजवर कां झालें नाहीं? अथवा मलाहि इतके दिवस श्रवणाची इच्छा कां झाली नाहीं? व माझ्यापेक्षांहि ज्यांना अधिक दुःख झालें आहे, जे पदोपदीं आघात सहन करीत आहेत, त्यांना हें श्रवणरूप साधन प्राप्त झाल्याचें कोठें दिसत नाहीं, तें कां? हा विषय कृपा करून मला समजावून सांगा.

याप्रमाणें परशुरामानें प्रश्न केल्यावर दयानिधि दत्तात्रेयांना आनंद झाला. ते म्हणालेः—परशुरामा! ऐक, मोक्षाचें अगदीं मूळ कारण सांगतों. संतांशीं सहवास हें अगदीं सर्व दुःखांचें निरसन करणारें आदिकारण आहे. परमार्थाचें फळ प्राप्त होण्यास सत्संग हें बीज

आहे. तुला महात्म्या संवर्ताची संगति घडल्यामुळेंच ही मोक्षफळ देणारी अवस्था प्राप्त झाली आहे. सारांश, संतांशीं परिचय झाला असतां तेच परम सुख दाखवून देतात. सत्संगावांचून खरें कल्याण कोणाचें आणि केव्हां झालें आहे ? आणि व्यवहारहि असाच आहे कीं. जो जशी संगति करतो, तसेंच त्याला फळ मिळतें. यासंबंधांत परशुरामा ! तुला एक कथा सांगतों. पूर्वी दशार्ण देशाचा मुक्तापीड म्हणून राजा होता. त्याला हेमचूड व मणिचूड म्हणून दोन मुलगे होते. ते दोघेहि सुंदर, गुणवान व सर्व विद्यांमध्यें निष्णात होते. त्यांना एकदां मृगया करण्याची इच्छा झाली. तेव्हां आपापलें धनुष्यबाण घेऊन व कांहीं सैन्य बरोबर घेऊन ते, सह्याद्रीवरील एका भयकारक अरण्यांत शिरले. तेथें त्यांनीं आपल्या शरसंधान करण्याच्या चातुर्यानें पुष्कळ सिंह, वाघ, लांडगे, अस्वलें, हरिणें वगैरेंना ठार केलें. परन्तु इतकें होत आहे तों मोठा प्रचंड वारा सुटला. वाळू व खडे यांचा वर्षाव होऊं लागला. धुळीनें आकाश भरून जाऊन अमावास्येच्या रात्रीची स्थिति झाली. तेव्हां तेथें पुरुष, झाड किंवा दगड कांहींच ओळखूं येइनासें झालें. मग उंचसखल कोठून दिसणार ? याप्रमाणें सर्व पर्वत अंधकारानें व्यापून गेला असतां खडे व वाळू यांचा मार बसल्यानें सर्व सेना सैरावैरा पळून गेली. कोणीं झाडाचा बुंधा धरला, कोणी दरडीला बिलगले, तर कोणीं गुहा गांठली ! घोड्यावर बसलेले राजपुत्रहि पळून दूर गेले. त्यांत हेमचूडाला एक तपस्व्याचा आश्रम लागला. केळीं व खजूर वगैरे झाडांची त्याच्या भोंवतीं गर्दी असल्यामुळें तो फार सुंदर दिसत

होता. त्या ठिकाणीं एक सुंदर आणि तेजस्वी कन्यका त्यानें पाहिली. तापलेल्या सुवर्णाप्रमाणें तिची अंगकांति शोभत होती. लक्ष्मीसारखें तिचें स्वरूप पाहून राजपुत्र किंचित् स्मित करून तिला म्हणाला:—"हे कमलानने ! तूं कोण आहेस ? या निर्जन व भयंकर अरण्यांत तूं निर्धास्त कशी राहिलीस ? तूं कोणाची ? व तूं एकटीच आहेस किंवा तुजबरोबर दुसरें कोणी आहे ?" असें विचारल्यावर ती शुद्धान्तःकरणाची कन्या म्हणाली:— "राजपुत्र ! आंत या व ह्या आसनावर बसा. अतिथींचा सत्कार करणें हा आम्हां तपस्व्यांचा धर्म आहे. मेघांच्या प्रचंड वावटळीनें आपण श्रमलेले दिसतां; तर त्या खर्जूरवृक्षास घोडा बांधून एथें बसून कांहींशी विश्रांति घ्या. नंतर माझें वृत्त आपणांला कळेल."

नंतर राजपुत्रानें त्याप्रमाणें केल्यावर तिनें त्याला उपहाराला कांहीं फळें व पाणी आणून दिलें. राजपुत्रानें त्यांचें सेवन केलें. त्यानंतर, त्याचा सर्व शीण गेला आहे असें पाहून, ती कन्या मधासारख्या गोड शब्दांनीं त्याला म्हणाली:—"राजपुत्र ! व्याघ्रपाद नांवाचे शिवभक्ति करणारे मुनि आहेत. त्यांनीं आपल्या तपोबलानें सर्व स्वर्ग जिंकले आहेत. शिवाय ते ब्रह्मज्ञानी असल्यामुळें दुसरे थोरथोर मुनिहि त्यांना फारच मान देतात. त्यांची मी धर्मकन्या आहें. माझें नांव हेमलेखा. विद्युत्प्रभा म्हणून एक सर्वांगसुंदर विद्याधरी एकदां या वेणानदींत स्नान करण्यासाठीं आली होती. त्याच वेळीं वंग देशचा राजा सुषेण तेथें आला, व त्यानें त्या सुंदरीस नदींत स्नान करीत असतांना पाहिलें. त्या वेळीं तिच्या अंगावरील विरल

मध्यांतून तिचे स्तन त्याच्या दृष्टीस पडून तो कामपीडित झाला. तेव्हां त्यानें तिची प्रार्थना केली. तीहि याच्या सौंदर्यानें मोहित झाल्यामुळें त्याचें म्हणणें तिनें मान्य केलें व त्यास भोग दिला. इतकें झाल्यावर तो राजा आपल्या नगरीस गेला. त्या वेळीं तिला गर्भ राहिला. परंतु असा दोष घडल्यामुळें पतीच्या भयानें गर्भाला तेथेंच टाकून ती निघून गेली. त्या वेळीं त्या राजर्षीच्या अमोघ वीर्यामुळें मी जन्मास आलें. पुढें संध्योपासनेसाठीं आल्यावर व्याघ्रपादांनीं मला पाहिलें. तेव्हां त्यांस दया येऊन त्यांनीं मला आश्रमांत आणिलें व आजवर आईप्रमाणें पालन केलें. धर्मानें पालन करणारासहि पिता म्हणतात. म्हणून मी त्यांची धर्मकन्या आहें. त्यांची सेवा करीत येथें राहतें. त्यांच्या सामर्थ्यामुळें मला येथें कसलेंहि भय नाहीं. राक्षसांना किंवा देवांना दुष्टबुद्धीनें येथें प्रवेशच करितां येत नाहीं. कोणी करील तर त्याचा नाश होईल. ही माझी कथा मीं सांगितली. आतां, राजपुत्र! आपण थोडे थांबा. माझे वडील आतांच येतील. त्यांना नमस्कार करून आपली हकीकत सांगा, आणि आपलें इच्छित पूर्ण करून घेऊन पहाटेच्या वेळेला जाण्यास निघा." हेमलेखेचें हें भाषण ऐकल्यानंतर तिच्याशीं कांहीं बोलण्याचें राजपुत्राच्या मनांत आलें; परंतु धैर्य होईना, यामुळें तो कांहींसा गोंधळल्यासारखा झाला. तेव्हां राजपुत्र कामवश झाला आहे असें ओळखून ती चतुर कन्या म्हणाली:—"राजपुत्र! थोडा धीर धरा. माझे वडील इतक्यांत येतील. ते येतांच आपली आकांक्षा पूर्ण करून घ्या." इतकें ती सांगत आहे तोंच व्याघ्रपाद मुनि वनांतून पत्रपुष्पादिक घेऊन आले. त्याबरोबर राजपुत्र

उठला व त्यानें मुनींना नमस्कार करून आपण कोण हें त्यांना कळविलें. नंतर तो त्यांची अनुज्ञा घेऊन जागेवर बसला. तेव्हां राजपुत्र कामानें व्याकुल झाला आहे हें योगदृष्टीनें जाणून व हा योग बरा आहे असें पाहून मुनीनें त्याला हेमलेखा अर्पण केली. राजपुत्रासहि ती प्राप्त होतांच संतोष झाला, व तो तिला घेऊन आपल्या नगरीं आला. तेथें येतांच त्याचा पिता राजा मुक्ताचूड यासहि मोठा संतोष होऊन त्यानें त्यांचें मोठ्या समारंभानें लग्न केलें.

लग्न झाल्यानंतर राजपुत्र हेमचूड आपल्या या चतुर व सुंदर पत्नीबरोबर राजवाड्यांतील गच्च्या, उपवनें, नदीतीर इत्यादि स्थळीं विहार करूं लागला. परंतु आपली स्त्री हेमलेखा सुखभोगांविषयीं निरिच्छ व उदासीन आहे, असें लवकरच त्याला दिसून आलें. तेव्हां एकदां एकान्तांत असतांना तो तिला म्हणालाः—"प्रिये! मी तुजवर प्रेम करीत असतांहि तुझें मजवर प्रेम कां बरें नाहीं? तुझें स्मित मोठें मनोहर आहे; परंतु सखे! विषयांची तुला आवड कशी नाहीं? माझ्या या सुखसोयी तुझ्या मनासच येत नाहींत कीं काय? पण हें तरी कसें व्हावें? कारण अगदीं उत्तम उत्तम विषयांवरहि तुझ्या मनाचा ओढा दिसत नाहीं! तूं अशी अरसिक असल्यानें तुझ्या संगतीनें मला सुख कसें होणार? माझें लक्ष सारखें तुजवर असूनही तुझें लक्ष दुसऱ्याच कोठें तरी आहे, असें दिसतें. मी तुजशीं बोलूं लागलों तर तूं तें ऐकूनहि घेत नाहींस. मी पुष्कळ वेळ तुझ्या मंदिरांत येऊन तुझ्या कंठाला आलिंगन देऊन बसलों असतांहि "नाथ, केव्हां येणें झालें?" म्हणून प्रश्न करितेस; जणुं तुला कांहींच

माहीत नाहीं ! सुंदर व दुर्लभ अशाहि उपभोग्य वस्तूंवर तुझें मन बसतच नाहीं; किंबहुना त्यांजबद्दल तूं यत्किंचिताहे आस्था दाखवीत नाहींस ! हें असें कां बरें ? मी जवळ नसलों कीं, तूं डोळे मिटून बसलेली असतेस, असें, मी जेव्हां जेव्हां तुझ्याजवळ येतों तेव्हां तेव्हां पाहतों. अशा प्रकारें तूं विषयोपभोगाला विन्मुख असल्यामुळें लाकडांच्या बाहुलीप्रमाणें तुझ्या संगतीनें मला सुख तें काय लाभणार ? आणि तुला सोडून मला अन्य कांहींच बरें वाटत नाहीं. कमळ ज्याप्रमाणें चंद्रिकेला सर्वथा अनुसरतें, त्याप्रमाणें मी तुला अनुसरून वागत आहें. तर तुझें मन संसारसुखाला इतकें कां विटलें आहे तें मला सांग. प्राणापेक्षांहि तूं मला आवडती आहेस; तर तुला माझी शपथ आहे, दोन शब्द सांगून तूं माझ्या मनाचें समाधान कर."

---

## प्रकरण ४ थें,

# पति-पत्नींचा वाद.

किं स्यात्प्रियतमं लोके किं नु स्यादप्रियं खलु ॥
नैतज्जानामि तत्त्वं मे वक्तुमर्हसि तत्त्वतः ॥ ४ ॥

याप्रमाणें पतीचें भाषण ऐकून त्या शुद्ध बालेनें किंचित् स्मित केलें; आणि युक्तिवादानें त्याला तत्त्वबोध करण्याच्या हेतूनें ती म्हणालीः—" राजपुत्र! सांगतें, ऐका. माझें तुमच्या ठिकाणीं प्रेम नाहीं असें नाहीं; पण मी एका मोठ्या विचारांत सारखी गुंतल्यें आहे. या जगांत मनुष्याला प्रिय वस्तु कोणती असते व अप्रिय कोणती होते, हा तो विचार असून माझ्या बुद्धीला कांहीं याचा उलगडा होत नाहीं. पुष्कळ दिवस मी याचें चिंतन करीत आहें, परंतु माझ्या स्त्रीस्वभावामुळें तें मला कांहीं समजत नाहीं. तात्त्विक दृष्टीनें आपण याचा विचार करून मला सांगा बरें!"

हा प्रश्न ऐकतांच हेमचूडाला हंसू आलें. तो म्हणालाः—

"खरोखर, स्त्रिया बुद्धीनें मूढ असतात, ही गोष्ट खरी आहे; यांत कांहीं संशय राहिला नाहीं. कारण प्रिय आणि अप्रिय हें पशुपक्षी व कीटक यांना सुद्धा समजतें. प्रिय वस्तूच्या ठिकाणीं प्रवृत्त होणें व अप्रिय वस्तूपासून निवृत्त असणें हा प्रकार त्यांच्यांत स्पष्टच दिसून येतो यांत मोठासा विचार तो काय? ज्यापासून सुख होतें तें प्रिय व ज्यापासून दुःख होतें तें अप्रिय. प्रिये! यांत एवढें अडण्याजोगें तें काय आहे? आणि नेहमीं तूं विचार तो काय करतेस?"

पतीचें भाषण ऐकून हेमलेखा पुनः म्हणाली:-" स्त्रिया मूढ असतात व त्यांच्या ठिकाणीं प्रौढ विचार असत नाहींत, हें खरें; पण आपण चांगले विचारी आहांत, तर माझी समजूत घालून द्या. आपण माझी समज पाडलीत, म्हणजे मी हा विचार सोडून देतें, आणि नेहमीं आपल्याबरोबर उपभोग भोगण्यास सिद्ध राहतें. राजन्! ज्यापासून सुख होईल तें प्रिय व दुःख होईल तें अप्रिय, असें आपण सूक्ष्म विचार करून सांगितलें खरें; पण जर एकच पदार्थ स्थळ व प्रसंग बदलल्याबरोबर सुख व दुःख दोन्ही उत्पन्न करतो, तर सुखाचें व दुःखाचें निश्चयात्मक स्थान कोठें राहिलें? उदाहरणार्थ, अग्नि घ्या, हा निरनिराळ्या वेळीं निरनिराळें फळ देतो; निरनिराळ्या स्थानीं निरनिराळे परिणाम करितो; व निरनिराळ्या आकाराचा असतांना निरनिराळा उपयोगास येतो. हिंवाळ्यांत फार उपयुक्त असणारा अग्नि उन्हाळ्यात अतिशय त्याज्य वाटतो, म्हणजे देशभेदानें प्रिय-अप्रिय झाला. शिवाय शीत प्रकृतीच्या लोकांना तो मानवतो, पण उष्ण प्रकृतीच्या लोकांस मानवत नाहीं. त्याचप्रमाणें थोडा असतां एक प्रकार, तर पुष्कळ असतांना दुसराच प्रकार. हीच स्थिति द्रव्याची, स्त्रियांची, मुलांची व राज्याची आहे. आसो आपलेच मुक्ताचूडमहाराज पहा. संतति, संपत्ति, स्त्रिया, सर्व कांहीं त्यांना आहे; मग नित्य दुःख कां पावतात? व दुसरे लोक सुखानें कसे नांदतात? आतां हे जे सुखदायक विषयभोग आहेत, तेहि अमर्याद नाहींत, थोडेच आहेत म्हणून म्हणाल, तर तसे ते सर्वच्या सर्व कोणाला कधीं तरी प्राप्त झाले आहेत काय? बरं, थोडे विषय

लागल्यावर थोडें तरी सुख होईल म्हणावें, तर त्यावर माझें असें म्हणणें आहे कीं, तें मुळीं सुखच नव्हे; कारण त्यांत दुःख मिश्र झालेलें असतें. दुःख दोन प्रकारचें आहे; एक मानसिक व दुसरें शारीरिक. इच्छा उद्भवून होणारें आंतील दुःख तें मानसिक; रोगादिकांनीं होणारें बाहेरील दुःख तें शारीरिक. त्यांत मानसिक दुःख मोठें आहे. त्यानेंच सर्व जग ग्रासून टाकिलें आहे. दुःखरूप वृक्षाचें वांछा हेंच मोठें जोमदार बीज आहे. याच्याच योगानें स्वर्गांतले इंद्रादिक देवसुद्धां दास्य पत्करून सासले राबत आहेत. राजपुत्र! इच्छा शिल्लक असतांना जें सुख होईल तें दुःखच आहे असें नाहीं काय? तें सुख कीटकांनाहि संभवतें. परंतु कृमिकीटादि तिर्यक् जंतूंच्या वासनाच थोड्या असल्यामुळें त्यांना होणारें सुख एकवेळ असो, पण शेंकडों इच्छा करणाऱ्या या मनुष्यांचें सुख तें सुख कसलें? नाना वासनांनीं भरलेला मनुष्य जर कांहीं थोडीशी गोष्ट प्राप्त होऊन सुखी होत असेल, तर मग सुखी नाहीं म्हणावा कोण, तें सांग? सर्व अंग अग्नीनें भाजून गेल्यावर चंदनाच्या एका सूक्ष्म बिंदूनें जर देह शीतल होईल, तर तोहि सुखी होईल! स्त्रीला मात्र आलिंगन दिल्यानें पुरुषाला सुख होतें म्हणतात, पण तेथेंहि अंग अवघडून जाणें, हें दुःखच आहे. कामविकाराच्या आवेशानें सर्वांगाच शीण होतो; व कामभोगानंतर जे श्रम वाटतात, ते व ओझें वाहणाऱ्या पशूचे श्रम दोन्ही सारखेच. तेव्हां नाथ! त्याला आपण सौख्य कसें समजतां, तें समजत नाहीं! स्त्रीच्या संगतीनें जें स्पर्शसुख आपल्याला मिळतें, तेंच कुत्र्याला मिळत नाहीं काय? आतां

स्त्रीचे सौंदर्यापासून आपणांला जर त्यापेक्षां अधिक सुख होतें म्हणावें, तर स्वप्नांतल्या स्त्रीसंभोगासारखीच ती एक भावना आहे; त्यांत अधिक कांहीं नाहीं. राजपुत्र ! यावर एक उदाहरण सांगतें:—

एक राजपुत्र मदनाहूनहि सुंदर होता. त्याला एक अत्यंत मनोहर सुकुमार स्त्री प्राप्त झाली. तेव्हां तो तिजवर अतिशय आसक्त झाल. परंतु तिचें मन त्या राजपुत्राच्या एका सेवकावर जडलें होतें. त्यामुळें त्या सेवकानें कपट करून त्या राजपुत्राला ठकविलें. तो मोहित व्हावा म्हणून त्याला त्यानें अतिशय मदिरा पाजावी, नंतर तो धुंद झाला असें पाहून त्याजकडे एक कुरूपशी दासी पाठवून देऊन त्या राजपुत्राच्या सर्वलोकसुंदर स्त्रीला यथेच्छ उपभोगावें, असा क्रम त्यानें चालविला. इकडे मद्यपानानें धुंद झाल्यावर तो राजपुत्र त्या दासीशीं रममाण होऊनच स्वतःला धन्य समजत असे. त्याला वाटे कीं, असल्या त्रैलोक्यसुंदर प्राणप्रियेचा मी नित्य उपभोग घेतों, त्या अर्थीं माझ्याइतका धन्य कोणीच नाहीं ! याप्रमाणें पुष्कळ दिवस गेले. पुढें एकदां दैवयोगानें असें झालें कीं, तो सेवक राजपुत्राजवळ मद्य ठेवून स्वतः कांहीं अगत्याच्या कामाकरितां निघून गेला. आणि कर्मधर्मसंयोगानें राजपुत्रानेंहि त्या वेळीं अतिशय मद्यपान केलें नाहीं, बेताचेंच केलें. नंतर नित्याप्रमाणें रतिसुखाला उत्सुक होऊन तो आपल्या विलासमंदिरांत गेला. विलासाचे पुष्कळ पदार्थ भरलेले असल्यामुळें तें मंदिर फार मनोहर होतें. तेथें जाऊन त्यानें कामवेगाला वश होऊन पलंगावर असलेल्या त्या दासीचा अत्यंत आनंदानें उपभोग घेतला. पण रतिविलासाअंतीं त्या कुरूप

दासीसंबंधानें त्याला शंका उत्पन्न झाली. आपण फसलों हें त्याच्या ध्यानांत आलें, आणि हें कसें झालें म्हणून तो विचार करूं लागला. 'ती माझी स्त्री कोठें आहे?' म्हणून त्यानें त्या दासीला प्रश्न केला. तेव्हां राजपुत्र सावध असलेला पाहून ती दासी अगदीं भिऊन जाऊन थरथर कांपूं लागली; त्याशीं कांहींच बोलेना. तेव्हां हा सर्व आपल्या फसवणुकीच्या कपटाचा प्रकार राजपुत्राच्या ध्यानांत आला व त्याचे डोळे क्रोधानें लाल होऊन गेले! तत्काळ त्यानें एका हातानें त्या दासीची वेणी धरून दुसऱ्या हातानें तरवार उपसली; आणि तिला दरडावून तो ह्मणाला:—"बोल, काय हकीगत आहे ती? अगदीं खरी सांग, नाहीं तर एक क्षणभरहि तूं आतां वांचत नाहींस! बोल लवकर!" हें राजपुत्राचें भाषण ऐकून ती दासी अगदीं घाबरून गेली, आणि आपले प्राण वांचण्यासाठीं तिनें पुष्कळ दिवसांपासून चालत असलेला तो सर्व प्रकार जशाचा तसा त्यास सांगितला; आणि त्या सेवकाशीं त्याची स्त्री रममाण झाली असतां तिनें त्याला दाखवून दिली. तेथें जमिनीवर एक सतरंजी टाकली होती. त्या सेवकाचें तें कृष्णवर्ण शरीर, पिंगट डोळे, धुळीनें सर्व अंग भरलेलें, रूक्ष व किळस येण्याजोगें तोंड, असें असूनहि त्याच्या पट्टराणीनें मोठ्या प्रेमानें त्याला आलिंगन दिलें होतें. रतिभोगानें ती अगदीं थकून गेली होती व निद्रेमुळें दोघांचेंहि भान नाहींसें झालें होतें. हा सर्व बीभत्स प्रकार अवलोकन करून राजपुत्रहि क्षणभर आपलें भान विसरला! पण थोड्या वेळानें सावध होऊन तो आपणाशींच बोलूं लागला:—

हेमलेखा पुढें म्हणाली:—"नाथ, तो काय म्हणूं लागला तें ऐका. तो म्हणाला:—अरेरे! मज अनार्याला धिक्कार असो! मी मद्यानें मोहित होऊन अत्यंत मूर्ख बनलों. जे अशा स्त्रियांच्या ठिकाणीं प्रेम करतात ते मूर्ख होत. त्या अधम पुरुषांना धिक्कार असो. वृक्षांवरील सळुंख्यांप्रमाणें असणाऱ्या या स्त्रिया कोणालाहि असूं नयेत! या स्त्रियांच्या प्रेमावर जो विश्वास ठेवितो, तो एक वनमर्दभच होय. कारण शरदृतूमधील मेघांची स्थिति जशी क्षणिक व तीहि अस्थिर असते; त्याप्रमाणेंच किंबहुना त्याहूनहि या स्त्रियांचें चरित्र अत्यंत चंचल व सूक्ष्म आहे. या स्त्रियांचा स्वभाव मला इतके दिवस कळूं नये अं! ही माझी स्त्री, मी तिजवर सर्वभावानें आसक्त असतांहि मला सोडून माझ्या सेवकाशीं रममाण झाली! आंतून दुसऱ्यावर आसक्त असूनहि तें आपलें प्रेम गुप्त ठेवून माझ्यावर हिनें बाह्यतः प्रेम दाखविलें, आणि मी मदिरापानानें मूढ बनून, तिचें हें कपट मुळींच न ओळखून, ही अगदीं छायेप्रमाणें मला अनुसरून वागते असें समजून, तिजवर खुशाल विश्वास ठेवला! अरेरे! या घाणेरड्या दासीशीं रममाण होऊन मी चांगलाच फसला गेलों! अहो, काय हा करंटा व कुरूप चाकर व काय हा त्याचा देह! असें काय सौंदर्य याच्या ठिकाणीं हिनें पाहिलें तरी? आणि सर्वांचे डोळे ज्याच्यावर लागून राहावे असें माझें सौंदर्य असून व मी हिजवर अतिशय प्रेम करीत असूनहि ही काय म्हणून मला सोडून याला वश झाली?"

याप्रमाणें पुष्कळ विलाप करतांना त्या राजपुत्रास अत्यंत विरक्तावस्था प्राप्त झाली, आणि सर्वसंगपरित्याग करून तो शेवटीं अरण्यांत

निघून गेला! तेव्हां नाथ! सौंदर्य ही एक मनानें केलेली कल्पना आहे हें उघड आहे. माझ्या ठिकाणीं आपल्याला जें सौंदर्याचें व रतिभोगाचें अतिशय सुःख प्राप्त होतें, तितकेंच किंबहुना त्याहूनहि विशेष सुख कुरूप अशा स्त्रियांच्या ठिकाणींहि पुरुष मिळवितात. हा विषय मी आतां आपल्याला अगदीं पटवून देतें, आपण एकाग्र मनानें श्रवण मात्र करा. स्त्री जी पाहण्यांत येते तो तिचा बाह्य आकार झाला. परन्तु संकल्परूपानें चित्ताच्या ठिकाणीं तिचें कांहीं-एक प्रतिबिंब उमटतें. तेथें ती सुंदर आहे असें चित्र काढलें जातें. असें वरचेवर होऊं लागलें म्हणजे तिच्या संभोगाची इच्छा उद्भूत होऊन पुरुष कामानें क्षुब्ध होऊन जातो. तेव्हां त्याला रतिसुख अनुभवास येतें. मनाला क्षुब्धता मुळींच झाली नाहीं तर, स्त्री सुंदर असूनहि रतीचें सुख अनुभवास येत नाहीं. ही क्षुब्धता उत्पन्न होण्याला मुख्य कारण स्त्रीचें सौंदर्य चित्तांत पुनः पुनः उमटणें हेंच आहे. यामुळेंच, अगदीं लहान मुलें व चित्तैक्याचा अभ्यास करणारे योगी यांना असा क्षोभ कधीं होत नाहीं. म्हणून त्यांना स्त्रीचें सुख भासत नाहीं. तेव्हां स्त्री सुंदर असो कीं दुसरी कशी असो; तिच्या ठिकाणीं जो जो रतिसुख प्राप्त करून घेतो, तो तो आपल्या मनः-पटावर आधीं ती सुंदरी आहे असें चित्र उमटवून, मग घेतो. ज्यांच्या शरीराची स्थिति अगदीं किळस येण्याजोगी आहे, अशाहि स्त्रिया तरुणांशीं रममाण होत असतात, हें तर त्यांस होणाऱ्या संत-तीवरून सहज सिद्ध होतें. त्या कुरूप आहेत असें मनानें घेतल्या-वर, अथवा त्यांच्या सौंदर्याचा मनावर ठसाच उमटला नाहीं तर,

त्यांच्या ठिकाणीं पुरुषांना रतिसुख कसें प्राप्त होईल ? आणि असे विरुद्ध भाव उमटणें कांहीं अशक्य नाहीं. कामी पुरुषांच्या या मनोभ्रष्टतेसंबंधीं किती म्हणून सांगावें ? —कीं, या मूर्खांना नितंब व योनि असल्या तुच्छ भागांवरहि सर्वांत अधिक सौंदर्य भासत असतें ! मलमूत्रादिकानीं भरलेलें जें अंग त्याच्या ठिकाणीं जर सौंदर्य आहे असें यांना वाटतें, तर मग त्यांस दुसऱ्या कोठें सौंदर्य भासणार नाहीं, सांगा बरें ? तेव्हां प्राणनाथ ! सौंदर्य हें अशा प्रकारचें आहे हें पाहून ठेवा. तशी भावना केल्यावांचून कोठेंहि वस्तु सुखदायक अशी वाटणार नाहीं. मधाच्या ठिकाणीं असणाऱ्या माधुर्याप्रमाणें सौंदर्य हें जर निसर्गतःच संभवत असतें, तर तें लहान मुलांच्या अनुभवाला आलें नसतें काय ? सांगा. भिन्नभिन्न देशांत भिन्नभिन्न आकृतीचे लोक आढळतात. कोणाला पाय एक, तर कोणाला डोळा एक; कोणाचे कान गाढवासारखे तर कोणाचें तोंड घोड्यासारखें; कोणाचे कान लांब तर कोणाच्या दाढा नांगरासारख्या तोंडाबाहेर आलेल्या; कोणाला नाकच नाहीं, तर कोणाचें नाक मोठेंच आहे; कोणाच्या अंगावर केसांचें जाळें, तर कोणाच्या मुळीं आंगावर केसच नाहीं; कोणाचे केस पिंगट, कोणाचे पांढरे, कोणाला मुळींच नाहींत, तर कोणाचे भारीच जाड आहेत ! कोणी कोड उठलेले, कोणी कावळ्यासारखे काळे, तर कोणी पिंगट रंगाचे व कोणी तांबूस अंगाचे. सारांश, अशा तऱ्हेचे अनेकविध लोक आपापल्या जातीच्या स्त्रीपुत्रांच्या ठिकाणीं राजपुत्र ! तुमच्याप्रमाणेंच प्रेमसुखाचा अनुभव घेत असतात. शिवाय नाथ ! सुखाला

साधनीभूत असणाऱ्या सर्व वस्तूंमध्यें जें स्त्रीशरीर अगदीं मुख्य आहे, जें सर्वांना प्रिय वाटतें, व ज्याच्यावर मोठे शहाणे देखील मोहित होतात, तें हें स्त्रीशरीर—अथवा स्त्रियांना अत्यंत प्रिय व सुंदर भासणारें हें पुरुषशरीर—वस्तुतः कसें आहे याचा आपण सूक्ष्म बुद्धीनें विचार करा बरें! तें मांसानें लेपटलें आहे, रक्तानें भरलेलें आहे, शिरांनीं बांधलें आहे व त्वचेनें वेष्टिलें आहे! आंत हाडांचा सांपळा आहे व बाहेरून बारीक लंव लाविली आहे. कफपित्तांनीं तें व्यापून गेलें आहे, मलमूत्रांनीं लिडबिडलें आहे! तेव्हां शुक्रशोणितांनीं बनलेल्या व मूत्रद्वारें बाहेर पडलेल्या या अमंगळ देहालाहि प्रिय मानलें जातें हा केवढा चमत्कार आहे? अशा अत्यंत किळसवाण्या देहावर जे प्रेम करितात त्यांच्यांत व विष्ठेतील कीटकांमध्यें कोणते अंतर आहे सांगा पाहूं? यासाठीं हे राजपुत्र! आपल्याला जें हें शरीर अत्यंत प्रिय वाटतें त्यांतील त्वचारक्तादिकांची वेगवेगळी स्थिति विचारानें ध्यानांत घ्या. असाच प्रकार दुसऱ्या देखील भोग्य वस्तूंचा. गोड, आंबट इत्यादि जे भोजनांतील षड्रस आहेत, त्यांचा काय परिणाम होतो याच्याविषयीं जरा सूक्ष्मदृष्टीनें आपण विचार करा. कांहींही भक्षण करा, त्याची परिणामीं विष्ठाच व्हावयाची, हा सर्वांचा अनुभव आहे. तेव्हां राजपुत्र! असा प्रकार जगांत स्पष्ट दिसत असल्यामुळें, आतां प्रिय कोणतें व अप्रिय कोणतें हें मला आपण सांगा पाहूं!"

हेमलेखेचें वरील अपूर्व भाषण ऐकून हेमचूडाला मोठा विस्मय वाटला! त्यानें पुनः आपल्याशींच त्या भाषणाचा चांगला विचार

केला. तेव्हां भोग्य पदार्थांची किळस येऊन त्याला खरें वैराग्य प्राप्त झालें. त्यामुळें त्यानें त्या आपल्या प्रियेला क्रमानें पुढील विषया-संबंधीं अनेक प्रश्न करून शेवटीं त्यानें आत्मस्वरूपाची ओळख करून घेतली. आणि केवल चैतन्य अशी जी आत्मस्वरूप त्रिपुरा देवी तिचें ज्ञान करून घेऊन तो ज्ञानी झाला. सर्व वस्तुमात्र त्याला आत्मस्वरूप भासूं लागलें, व तो जीवन्मुक्ताच्या अवस्थेस पोंचला. पुढें त्याचा बंधु मणिचूड यानेंहि त्याजपासून आत्मस्वरूप जाणून घेतलें. राजा मुक्ताचूड यानें आपल्या मुलापासून व त्याच्या राणीनें आपली सून जी हेमलेखा तिजपासून ज्ञान करून घेतलें. क्रमाक्रमानें राजाचे मंत्री व नगरांतील लोकहि ज्ञानी झाले. शेवटीं त्या गांवांत ब्रह्मज्ञान नाहीं असा कोणीच राहिला नाहीं! संसारांत गोंवणाऱ्या कामक्रोधादि वासना कोठेंच दिसेनाशा झाल्या व तें विशाल नगर ब्रह्मपुरीप्रमाणें जगांत चांगल्या उच्च स्थितीला प्राप्त झालें. त्या नग-रांत पिंजऱ्यांतून पोपट व मैना असा पाठ करीत असत कीं,

श्लोक ( इंद्रवज्रा )

चैतन्य आत्मा जन हो भजा रे,
वर्जूनियां चेत्य पदार्थ सारे;
तें चैत्यही याविण अन्य नाहीं,
हें दर्पणींचें प्रतिबिंब पाहीं. १
जें चेत्य, चैतन्यचि तें; तसाच–
मी; स्थूलसूक्ष्मादिक तेंच साच.
सर्वांस चैतन्यचि भासवीतें,

त्याचें स्वयें भान सदैव होतें. २
यालागिं चैतन्याचि एक सेवा,
ज्याचा असे आश्रय सर्व भावां;
सांडोनि सारा श्रम दूर वेगीं,
साधा अहो ! चिन्मय दृष्टिलागीं. ३

असा पोपटांचा पाठ चालला असतां एकदां वामदेवादिक कांहीं ब्रह्मनिष्ठ मंडळीनें तो श्रवण केला; व त्यांनीं त्या नगराला एक नवें नांव ठेविलें. ते म्हणाले "ज्या अर्थीं येथील पक्ष्यादि तिर्यक् जंतुहि ब्रम्हविद्येच्या गोष्टी बोलतात, त्या अर्थीं हें नगर 'विद्यानगर' या नांवानें जगांत प्रसिद्धीस येईल."

अद्यापहि तें नगर त्याच नांवानें प्रसिद्ध आहे. तेव्हां परशुरामा ! सर्व कल्याणाचा उदय होण्याला सज्जनांशीं सहवास हें मूळ आहे. त्या हेमलेखेच्या संगतीनेंच सर्वांना ज्ञान प्राप्त झालें. त्या अर्थीं मोक्षाचें मूळ कारण सत्संग हेंच आहे हें तूं चांगलें लक्षांत ठेव.

---

## प्रकरण ५ वें,
# चमत्कारिक गोष्ट.

पुरा मे जननी कांचित्क्रीडनाय सखीं ददौ ॥
सा स्वभावसती कांचिदसतीमनुसंगता ॥ ३१ ॥

याप्रमाणें श्रीदत्तात्रेयांच्या तोंडून सज्जनांच्या सहवासाचा परिणाम ऐकून परशुरामाला मोठा आनंद वाटला, व आणखी कांहीं विचारावें असें मनांत आणून तो म्हणालाः—"भगवन्! सर्व कल्याणाचें साधन सत्संगति आहे, म्हणून आपण सांगितलें तें अगदीं खरें आहे. कारण तें आपण माझ्या प्रत्यक्ष अनुभवाला आणून दिलें! जो जशी संगति करितो, तसेंच त्याला फळ मिळतें. हेमलेखा ही स्त्री असूनहि तिच्या संगतीनें त्या सर्वांना महत्फल प्राप्त झालें! पण महाराज, मला पुढें आणखी ऐकण्याची इच्छा आहे. हेमलेखेनें आपल्या पतीला कसकसा बोध केला तें कृपा करून मला सविस्तर सांगा."

परशुरामानें असा प्रश्न केल्यावर श्रीगुरु म्हणालेः—परशुरामा! ऐक; ती सर्व परम पावन कथा तुला सांगतों. 'विषय हे प्रिय म्हणतां येत नाहींत,' अशा आशयाचें पत्नीचें भाषण ऐकून राजपुत्राला विषयाची नीरसता कळून येऊन तो त्यांसंबंधीं उदास होऊन नेहमीं खिन्न राहूं लागला. कारण विषयवासनांचे संस्कार पुष्कळ दिवसांचे असल्यामुळें त्यांचा त्याला त्यागहि करितां येईना व सहसा उपभोगहि घेववेना. स्त्रीनें एक वेळ निरुत्तर केल्यामुळें तिला विचारावयाचीहि त्यास लाज वाटूं लागली. अशा प्रकारें काळजींतच त्याचे

कित्येक दिवस गेले. विषय प्राप्त झाले असतां हेमलेखेनें सांगितलेल्या विचारांची आठवण होई; परंतु वासनावश होऊन तो त्यांचें सेवन करी आणि मागाहून झाल्या प्रकाराबद्दल आपणाला धिक्कारी! संस्कारप्राबल्यामुळें विषयाकडे तो ओढला जाई, परंतु विषयांना पाहतांच स्त्रीनें दाखविलेले दोष मनांत येऊन त्याचें अंतःकरण दुःखानें भरून येऊन तो क्षणोक्षणीं उदास होऊन बसे. याप्रमाणें त्याचें चित्त मागेंपुढें मागेंपुढें झोके खाऊं लागलें. खाणेंपिणें, वस्त्रेंभूषणें, सुंदर स्त्रिया किंवा नाना तऱ्हेचीं वाहनें, तसेंच बरोबरीची मंडळी किंवा अगदीं जिवलग मित्र, कोणापासून त्याला सुख वाटेनासें झालें. घरदार बुडालेल्याप्रमाणें तो सारखा खेद करीत बसे. कारण वासनांच्या प्राबल्यानें त्यांचा त्याला त्याग होईना व दोषदृष्टि लाभल्यामुळें भोगहि होईना.

याप्रमाणें खिन्नतेनें राजपुत्राचें मुख सुकून गेलेलें पाहून एकदां एकांतांत असतां हेमलेखा त्याला म्हणाली:—"प्राणनाथ! आपण पूर्वीप्रमाणें आतां आनंदी कां दिसत नाहीं? नेहमीं दुःखी असतां! अशी आपली अवस्था कोठून बरें झाली? आपल्याला कांहीं होत तर नाहीं ना? विषयसुखें उपभोगतांना रोगांची भीति असते, असें वृद्ध सांगत असतात. वात, पित्त व कफ या त्रिदोषांनीं बनलेल्या या शरीरांत त्यांच्या वैषम्यावस्थेंत उत्पन्न होणारे रोग बहुधा सर्व शरीरास व्यापून राहिले आहेत. अशा अव्यक्त दशेंत हें दोषांचें वैषम्य कांहीं नष्ट करितां येत नाहीं. अनेक कारणांनीं दोष विषम होतात. अन्नानें, वस्त्रानें, बोलण्यानें, कांहीं पाहिल्यानें, कांहीं पदार्थांचा स्पर्श

झाल्यानें, कालविशेषानें, स्थलविशेषानें, आणि कांहीं प्रकारच्या उद्योगांपासूनही शरीरांत दोषांचें वैषम्य उत्पन्न होतें. यामुळें तें मुळींच ओळखतां येत नाहीं. असें असल्यामुळें बाह्य लक्षणांची चिकित्सा करावी लागते. दोषांचें वैषम्य जर नसेल तर चिकित्सा करण्याचें कारण पडतें ना."

हें ऐकून राजपुत्र हेमलेखेला म्हणालाः--" प्रिये ! मी माझ्या दुःखाचें कारण सांगतों. तुझ्या उपदेशाचाच हा परिणाम आहे. पूर्वीं ज्या गोष्टी मला सुखकारक होत, त्या सर्व आतां नष्ट झाल्या ! हल्लीं मला सुखदायक असें कांहींच आढळत नाहीं. राजानें पुष्कळ पदार्थ सेवनासाठीं दिले असले, तरी ते जसे वध्य पुरुषाला सुखवीत नाहींत, त्याप्रमाणें व त्याच कारणानें मला या वस्तूंपासून सुख होत नाहीं. मी विषयांचा उपभोग घेतों तो वेठीस धरावें त्याप्रमाणें वासनावश होऊन घेतों, हौसेनें नव्हे. तेव्हां प्रिये ! काय केलें म्हणजे मी सुखी होईन तें मी तुला विचारीत आहें; तूं सांग."

याप्रमाणें राजपुत्रानें विचारल्यावर हेमलेखा आपल्याशींच म्हणालीः- खरोखर माझें भाषण ऐकून यांना वैराग्य उत्पन्न झालें आहे. आणि ज्या अर्थीं यांची अशी अवस्था झाली आहे, त्या अर्थीं मोक्षप्राप्तीचें बीज यांच्या ठिकाणीं आहे खास. कां कीं, ज्यांना मोक्ष होण्याचा संभव नसतो, ते लोक अशा वक्तृत्वानें एका अणूइतकेहि कधीं बदलत नाहींत. पुष्कळ दिवस परमेश्वराची आराधना केल्यामुळें ज्याला स्वात्मदेव प्रसन्न झाला आहे, त्यालाच अशी अवस्था प्राप्त होते. असा विचार करून ती बुद्धिमती व ज्ञानी स्त्री पतीला बोध कर-

ण्याला तयार झाली. व आपली विद्वत्ता त्याला कळूं न देतां निराळ्याच स्वरूपानें त्यास म्हणाली:-

नाथ! माझी एक पूर्वींची हकीकत ऐका. पूर्वीं एकदां माझ्या मातेनें मला खेळण्यासाठीं म्हणून एक मैत्रीण दिली. ती स्वभावतः शुद्ध होती. परन्तु पुढें ती कोणा एका असत्स्वभावी स्त्रीच्या संगतीला लागली. ती स्त्री अगदीं नवीन आणि आश्चर्यकारक सृष्टि उत्पन्न करून दाखवील, अशी सामर्थ्यवती होती. तिनें माझ्या मातेला न कळत माझ्या मैत्रिणीशीं संगति धरली. त्या स्त्रीची सारी वागणूक असत्याची असे. पण तिचा माझ्या मैत्रिणीशीं स्नेह, आणि ती मैत्रीण मला प्राणाहून फार आवडती; त्यामुळें साहजिकच मी तिच्या तंत्रानें वागूं लागलें. मी आपल्या मैत्रिणीला सोडून क्षणभरहि कधीं कोठें रहात नसे. तिनें आपल्या निर्मळ स्वभावानें मला अगदीं वश करून घेतलें होतें. त्यामुळें निरंतर तिच्या संगतींत राहून माझाहि स्वभाव तिच्याशीं अगदीं मिळून गेला. पुढें एकदां या माझ्या मैत्रिणीला त्या विचित्र व दुष्ट स्वभावाच्या नाटकी स्त्रीनें खोटीच लालूच दाखवून आपल्या मुलाच्या स्वाधीन केली. तिचा तो मुलगा अत्यंत मूढ असे. त्याचे डोळे

१. येथें माता म्हणजे शुद्धस्वरूप चिति; मैत्रीण म्हणजे बुद्धि; मी म्हणजें जीवस्वरूप चिति; व खेळणें म्हणजे जीवानें बुद्धिसंगतीनें सुखदुःखांचे अनुभव घेणें; असा गूढार्थ घ्यावयाचा आहे. २. शुद्ध बुद्धीला अविद्येची संगति लागली. ३. म्हणजे जीवचिति बुद्धिसंगानें अविद्यावश झाली. ४. कारण शुद्धचैतन्याचें बुद्धांत पडलेलें प्रतिबिंब म्हणजेच जीव; मग तो बुद्धीस सोडून कसा राहणार? ५ म्हणजे अविद्येचा पुत्र मोह. अविद्येमुळें बुद्धि त्याच्या स्वाधीन झाली.

मद्यपानानें नेहमींच चढलेले असत. तो माझ्यासमक्ष त्या मैत्रिणीला बलात्कारानें भोगीत असे. या नित्याच्या त्रासानें तिचें सर्वांग पीडित झालें. तरी तिनें माझा त्याग केला नाहीं. त्यामुळें एकदां तर मलाहि त्याचा स्पर्श झाला. असो. याप्रमाणें कांहीं काल गेल्यानंतर त्या दोघांना एक मुलगा झाला[1]. त्याचा आकार हुबेहूब आपल्या बापासारखा होता[2]. तो तरुण झाला[3] तसा अतिशय चंचळ निपजला. त्यास बापापासून[4] मूढपणा प्राप्त झाला; आणि आजीपासून[5] अनेक चमत्कारिक प्रकार आरोआपच उत्पन्न करण्याचें सामर्थ्य त्यास प्राप्त झालें[6]. पुढें या अस्थिर नांवाच्या मुलाला त्याच्या मूढ नांवाच्या पित्यानें व शून्य नांवाच्या त्याच्या आजीनें[7] चांगला शिकवून सर्व गोष्टींत प्रवीण केला. तेव्हां त्यानें अत्यंत वेगाची व अप्रतिबद्ध गति संपादन केली[8]. सारांश, प्राणनाथ! माझी ती सखी जन्मापासून शुद्ध स्वभावाची व सती असूनहि त्या असती स्त्रीच्या संगतीनें अत्यंत मलिन अवस्थेस प्राप्त झाली[9], आणि चिरकाल संगति झाल्यामुळें माझ्या त्या सखीचें आपल्या प्रियावर व पुत्रावर

---

१. जीवाची बुद्धि मोहवश झाली, व त्यापासून मन उत्पन्न झालें. मन हें संकल्पविकल्पात्मक असतें; तेव्हां, शुद्ध बुद्धीला संकल्पविकल्पांचा अडा नसतो, तो मोहाच्या संगतीनें उत्पन्न होतो, असें समजावें. २. मोहाचें किंवा मनाचें दोघांचें स्वरूप सारखेंच असत आहे, असा अर्थ. ३. तरुण म्हणजे व्यवहार चालविणारा. मनच सर्व व्यवहार चालवितें. ४. म्हणजे मोहापासून ५ अविद्येपासून. ६. कारण, अविद्यादि याच प्रकारें जगत् उत्पन्न करिते. मनाचें मनोराज्य व स्वप्न पाहणें यासारखाच हा प्रकार आहे ७. त्या असत्स्वभावी स्त्रीला—अविद्येला—सत्ताच नसल्यामुळें तिला शून्य म्हटलें. ८. मन हें सर्वांत चंचल आहेच. ९. म्हणजे शुद्ध बुद्धि अविद्यावशात् पूर्ण मूढ झाली, असा अर्थ.

अतिशय प्रेम बसून क्रमाक्रमानें तिचें मजवरचें प्रेम कमी झालें. परन्तु मी स्वभावाची सरल असल्यामुळें लागलीच तिची संगति सोडण्याला तयार झालें नाहीं; सर्वथा तिच्याबरोबरच राहिलें व तिला अनुसरून वागलें. पुढें त्या माझ्या सखीचा प्रिय पति जो मूढ तो तिला भोगतां भोगतां एकदां तर मलाच ओढून मजवर बलात्कार करण्याला तयार झाला! पण मी स्वभावतःच शुद्ध असल्यामुळें त्याला मुळींच वश झालें नाहीं. इतकें झालें तरी लोकांमध्यें, हा मूढ मला यथेच्छ उपभोगितो, अशी माझी अपकीर्ति शेवटीं झालीच. असो, राजकुमार! पुढें ही माझी मैत्रीण आपल्या मुलाला माझ्यापाशीं ठेवून स्वतः आपल्या प्रियाच्या संगतींत अगदीं पूर्ण गढून गेली. त्यानंतर तो अस्थिर नांवाचा मुलगा माझ्यापाशीं चांगला वाढून पुष्ट झाला. तो वयांत आल्यावर आपल्या आजीच्या अनुमतीनें त्यानें एका स्त्रीस वरिलें. तिचें नाव चपला. ती क्षणोक्षणीं आपल्या पतीला आवडेलसें भिन्नभिन्न मनोहर रूप धारण करी. स्वतः अस्थिर हाहि एका क्षणांत कोटयवधि योजनें चालून जाई, व तसाच परत येई; त्यास विसावा कधींच मिळत नव्हता. अस्थिर हा जेव्हां जेव्हां जेथें जाण्याचें मनांत आणी, तेव्हां तेव्हां त्याला हवें तें रूप धारण करून ही चपलाहि तेथें जाऊन आपल्या पतीला रमवीत असे. याप्रमाणें ती चपला आपल्या अस्थिर पती-

---

१. म्हणजे बुद्धीला जीवचैतन्याचें विस्मरण होऊन मन व मोह याहून अन्य कांहींच भासेनासें झालें.

२. म्हणजे मनाला कल्पना ही साह्य झाली असा अर्थ.

बरोबर नांदत असतां तिला एकदम पांच पुत्र झाले. ते मातृपितृपरायणे होते. त्या पांचहि जणांस माझ्या सखीनें माझ्याच स्वाधीन केलें. सखीवरील प्रेमामुळें मीं त्यांना चांगलें वाढविलें. पुढें या चपलेच्या पांचहि मुलांनीं आपणाला वेगळीं वेगळीं, चमत्कारिक व विस्तृत अशीं मंदिरें तयार केलीं. नंतर त्यांनीं आपले आईच्या जिवावर चांगली पुष्टि मिळवून आपल्या बापाला—अस्थिराला—आपल्या स्वाधीन करून घेतलें. ते त्याला क्षणोक्षणीं आपल्या स्थानाप्रत घेऊन जाऊं लागले. एकदां अस्थिर हा आपल्या ज्येष्ठ मुलाच्याकडे गेला असतां त्यानें तेथें अनेक मधुर स्वर श्रवण केले. सुंदर गायन व वादन ऐकिलें. वेदांतील मंत्र व ऋचा ऐकल्या. दुसरींहि कांहीं शास्त्रें, इतिहास, दागिन्यांचे झणत्कार, भृंगांचा गुंजारव, कोकिळांचें पंचमांतील गायन इत्यादि पुष्कळ मनोहर ध्वनि त्यानें त्या आपल्या पुत्राच्या सांगण्यावरून श्रवण केले. त्यामुळें तो खुष होऊन त्याच्या अगदीं वचनांत वागूं लागला. बाप स्वाधीन झालासें पाहून त्याच्या त्या पुत्रानें दुसराच प्रकार केला. त्याला नावडणारे, कर्णकटु व भयंकर शब्द त्यानें त्याला ऐकविले. सिंहांच्या गर्जना, मेघांचा गडगडाट, विजेचा घोष, इत्यादि प्रकारचे ब्रम्हांडकटाह फोडणारे व ऐकतांच गर्भगळित करणारे असले भयं-

१ हीं पांच ज्ञानेंद्रियें होत. हा मनाचाच विस्तार आहे.

२. कारण, यांच्यायोगें कल्पना वाढत जाऊन मनाची पुष्टि करतात.

३. म्हणजे पांच इंद्रियांनीं शरीरांतील पांच अवयवांवर आपलें ठाणें दिलें.

४. मनाला इंद्रियांनीं स्ववश केलें, असा अर्थ.

कर ध्वनि ऐकण्याची वेळ त्यानें आणली. हें सर्व पाहून तो अस्थिर चकित झाला! म्हणून तो एका बाजूस वळतो आहे तों तिकडे कोणी रडत आहेत, कोणी विलाप करीत आहेत, तर कोणी दुःख करीत आहेत, असा विचित्र प्रकार त्यास आढळला! दुसऱ्या मुलानें एकदां त्याला आपल्याकडे नेलें. तेव्हां तेथें त्याला मृदु असे स्पर्श व तशींच चांगलीं आसनें त्याला मिळालीं. तशाच शय्या व वस्त्रें हींहि कांहीं मऊ तर कांहीं कठीण, कांहीं शीतल तर कांहीं उष्ण अशीं अनेक प्रकारचीं त्यानें अनुभविलीं. त्यांत सुखकारक सेवन करितांना त्याला आनंद झाला, तशीं नसतांना दुःख झालें. पुढें तो तिसऱ्या पुत्राकडे गेला. तेथें त्यानें अनेक तऱ्हेचे आकार व वर्ण पाहिले. तांबडे, पांढरे, पिवळे, निळे, हिरवे, धुरकट, पिंगट इत्यादि अनेक रंग व स्थूल, कृश, लहान, मोठे, लांबट, वाटोळे, सुंदर, भयकारक, बीभत्स, तेजोमय, उग्र, काळोखाचे, इत्यादि अनेक आकार त्यानें पाहिले. तो हे देखावे पहात आहे तों त्यास त्याच्या चवथ्या मुलानें आपल्या विचित्र स्थानाकडे नेलें. तेथें त्याला अनेक फलपुष्पें प्राप्त झालीं. अमृतासारखीं गोड, मधुर, आंबट अशीं कांहीं पेयें आणि दुसरे कित्येक लेह्य, चोष्य व भक्ष्य पदार्थ यांचें त्यानें सेवन केलें. त्यांत कांहीं पदार्थ कडू, तिखट, जळजळणारे, खारट व अनेक मिश्र रुचींचे आणि चमत्कारिक प्रकाराचेहि होते. हें होत आहे इतक्यांत शेवटच्या मुलानें त्यास आपल्या चमत्कारिक सदनाकडे ओढून नेलें. तेथें सुवासिक पुष्पें-फळें त्यास मिळालीं. निरनिराळ्या औषधींचे वास, कांहीं सुगंध तर दुर्गंध, कांहींचे कोमल वास तर

कांहींचे उग्र वास, कांहीं मोहविणारे, कांहीं तरतरी आणणारे, तर कांहीं मूर्च्छा आणणारे इत्यादि अनेक विचित्र गंध त्यानें तेथें अनुभविले. याप्रमाणें नेहमीं एकाच्या मंदिरांतून दुसऱ्यांत व दुसऱ्यांतून तिसऱ्यांत असें त्यानें जात येत असावें. मग कधीं सुखकारक विषयांत रमावें, प्रतिकूल वाटल्यास दुःख करावें; याप्रमाणें त्याचा नित्यक्रम चालू झाला. तीं सर्व मुलेंहि फार पितृवत्सल असल्यामुळें आपल्या पित्याला बरोबर घेतल्यावांचून कोणताहि मौजेचा विषय असला तरी त्याला कधीं शिवत सुद्धां नसत. परन्तु अस्थिर हा या मुलांच्याकडे निरनिराळे विषय सेवन करून तेवढ्यानेंच तृप्त न होतां अनेक विषय चोरून घरीं घेऊन येई आणि एकांतांत आपल्या स्त्रीला घेऊन सेवन करीं. तेथें अर्थातच मुलें कोणी नसत.[1]

याप्रमाणें कांहीं दिवस चालल्यानंतर एकदां प्रसंगवशात् त्या चपलेची भगिनी तेथें प्राप्त झाली. तिचें नांव महाशना.[2] ती मोठी खादाड असे. हा अस्थिर तिच्या मनांत भरून तिनें त्याला वरिलें. लागलीच अस्थिराचें तिजवर फारच प्रेम जडलें. तो तिजवर अतिशय आसक्त होऊन, तिच्या सुखासाठीं निरनिराळे विषय संपादन करण्याच्या सारखा उद्योगाला लागला. त्यानें पुष्कळ संपादून आणलें, तरी ही खादाड बया तें सर्व क्षणांत चट्ट करून पुनः भूक लागली म्हणून पतीला कामाला जुंपावयाला तयार! तोहि आपला तें द्रव्य[3]

---

१. येथें स्वप्नादिक मानसिक विषयभोग समजावा. कारण, त्या वेळीं इंद्रियें नसतात. २. म्हणजे विषयभोग वाढल्यामुळें चित्तांत आशा उत्पन्न झाली. ही कल्पनेची–चपलेची–भगिनी. ३. विषयरूप द्रव्य.

मिळवून आणण्याला नेहमीं तयार असे. तो व त्याचे पांचहि मुलगे यांनीं आणखी मिळवून आणिलें तरी तें गिळून टाकून पुनः दुसऱ्या क्षणीं ही त्याची नवी पत्नी भुकेनें कासावीस होई, आणि मुलांना व पतीला द्रव्य घेऊन येण्यास पाठवी. असें होतां होतां तिला कालें-करून दोन मुलगे झाले. त्यांत एकाचें नांव ज्वालामुखी व दुसऱ्याचें निंद्यवृत्त. ते त्यांच्या मातेला फार आवडत. त्यामुळें असें होई कीं, एखादे वेळीं अस्थिर हा प्रेमाच्या भरांत त्या महाशनेला आलिंगन देऊं लागला, कीं या ज्वालामुखीच्या ज्वालांच्या योगें त्याचें सर्व अंग भाजून जाऊन तो अगदीं गाढ मूर्च्छा येऊन पडे. कदाचित् आवडत्या निंद्यवृत्ताची गांठ पडली म्हणजे सर्व जगांत छीथू होऊन तो मेल्याहून मेला होऊन जाई. अशा प्रकारें अस्थिर हा जेव्हां दुःखांत अगदीं व्यापून गेला, तेव्हां, माझ्या मैत्रिणीचें आपल्या पुत्रावर म्हणजे—अस्थिरावर फार प्रेम असल्यामुळें, त्याच्या संगतीनें तिलाहि दुःख झालें. तिच्या नातवांपैकीं एकानें—निंद्यवृत्तानें—तिला मिठी मारून तिची सर्वत्र निंदा करून टाकली व दुसऱ्यानें—ज्वालामुखीनें—आलिंगन देऊन होरपळून मेल्यासारखी करून टाकली! आणि या एवढ्या गर्दींत तिच्या नेहमीं संगतीनें असणारी मी तर लुप्तच होऊन गेलें. अशा रीतीनें सखीच्या दुःखानें मी पुष्कळ वर्षें दुःख भोगिलें. महाशनेला वरल्यापासून अस्थिर हा तर परतंत्रच झाला. पुढें एकदां कांहीं कर्मवशात् अस्थिराला एक नगर प्राप्त झालें. त्याला दहा दर-

१. हे क्रमानें काम व लोभ घ्यावयाचे. २. मनोबुद्धींचें ऐक्य असल्यामुळें मनाबरोबर बुद्धिहि दुःखी झाली, हा भाव. ३. शरीर.

वाजे होते. तेथें तो महाशनेला घेऊन आपली माता व पांच आणि दोन मुलगे यांसह राहूं लागला. तो सुखाची इच्छा करी, परंतु रात्रंदिवस त्याला दुःखच भोगावें लागे. कारण दोघांपैकीं एक मुलगा अंगाचा दाह करी, तर दुसरा अन्न घालवी! त्याची स्त्री महाशना ही तर त्याला दरक्षणीं खेंचीतच होती. शिवाय चपलेच्या पांच मुलांकडे त्याचें जाणेंयेणें सारखें चालूच होतें. या सर्व कारणांमुळें त्याला कष्ट पडत, व सुख तर कधींच मिळत नसे. आपल्या मुलाचें हें दुःख पाहून माझी मैत्रीण तर दुःखानें मूर्च्छित होऊन गेली. महाशना व तिचे ज्वालामुख व निंद्यवृत्त हे दोघे मुलगे यांचें त्या शून्याख्य सास्वेनें व मूढनामक श्वशुरानें चांगलें पोषण केलें. या महाशनेचें आपल्या सवतीशीं चांगलें जमे; आणि तिनें अस्थिराला वश करून घतलेंच होतें. मी सखीच्या लोभामुळें तेथेंच राही. पण सखीच्या दुःखानें मी हतप्रायच होऊन गेलें होतें.

हेमलेखा पुढें म्हणतेः—राजकुमार, ऐका. मी जर त्यांजपाशीं नसलें तर तेथें कांहींच घडून येत नसे. मींच त्या सर्वांचें रक्षण केलें. सखीच्या संगतीचा असा परिणाम झाला कीं, शून्याख्येच्या संगतीनें मी शून्य झालें; मूढाच्यायोगें मूढ, अस्थिराच्यायोगें अस्थिर, चपलेच्या योगानें चंचल, ज्वालामुखीच्यामुळें ज्वालामय व निंद्यवृत्ताच्या योगें निंद्यवृत्त झालें. मी जर सखीला सोडून देईन तर ती क्षणांत नष्ट होईल, अशी तिची अवस्था होती. अशांच्या संगतींत राहिल्यानें साधारण लोक तर मला व्यभिचारिणीच म्हणूं लागले. मी निर्मळ आहें, हें

१. अविद्येनें व मोहानें असा अर्थ. २. कल्पना ही सवत.

ज्ञात्यांनीं मात्र ओळखलें होतें. माझी माता महासती अत्यंत शुद्ध व असंग असून आकाशाहून विस्तीर्ण व परमाणूहून सूक्ष्म होती. तिला सर्व कांहीं समजे, पण तिला कांहींच कळत नसे; सर्व कांहीं ती करी, परंतु तिला कांहीं करतां येत नसे; ती सर्वांना आधार असून कोणालाहि आधार होत नसे; सर्व तिच्या आश्रयाला असून तिच्या कोणीच आश्रयास नसे. ती सर्व रूपें घेई, परंतु तिला रूपच नव्हतें; ती सर्वांशीं मिसळून असे, पण कोणाशींच संगति करीत नसे. ती सर्वत्र भासमान होणारी असून कोणाला व कोठेंही समजून येत नसे. ती अतिशय आनंदी पण आनंदशून्य असून तिला आईबाप कोणी नव्हतें. मात्र मजप्रमाणें तिला दुसऱ्या असंख्य मुली मात्र होत्या. समुद्रावर जसे तरंग त्याप्रमाणें अगणित भगिनी मला होत्या. प्राणनाथ, त्या सर्वांचें वर्तन मजसारखेंच असे. मी मोठी मांत्रिक असल्यामुळें इतक्या सखीजनांच्या सहवासांत असूनहि मी आपल्या मातेप्रमाणेंच स्वरूपतः शुद्ध राहिलें. असो.

त्या नगरांत असतांना माझ्या सखीचा मुलगा अस्थिर हा अतिशय श्रांत झाला असतां आपल्या मातेच्या मांडीवर पडून स्वस्थ झोंप घेत असे. तो निजला कीं त्याचे मुलगे वगैरे सर्वच झोंपीं जात. कोणीच जागृत राहात नसे. तेव्हां अस्थिराचा प्रचार[1] नांवाचा एक मित्र त्या पुरीचें रक्षण करी. पूर्वांगच्या दोन[2] दारांनीं त्याचा व्यवहार चाले. अस्थिर व त्याची माता या दोघीहि जेव्हां झोंपी जात,

---

१. हा प्रचार म्हणजे प्राणवायु. झोंपेंत मन लीन झाल्यावरहि तो चालू राहतो.

२. दोन नाकपुड्या.

SURESH V. RANADE PERSONAL LIBRARY
५०
6308



तेव्हां रात्रींची असत्स्वभावाची वृद्ध सासू त्या सर्वांवर आच्छादन घालून त्यांचें त्यांच्या मुलांसह संरक्षण करीत राही. याप्रमाणें हीं सारीं झोंपीं गेल्यानंतर मी आपले मातेकडे जांई व मातेनें मला पोटाशीं घेतल्यावर मी पूर्ण आनंदास प्राप्त होई. पुनः ते सर्व जागृत झाल्यानंतर मी त्यांचें पूर्वींप्रमाणेंच अनुसरण करीं. अस्थिराचा प्रचार नांवाचा मित्र तो अस्थिरासुद्धां सर्वांचें नेहमीं पोषण करी. तो एकच असतांहि पांच दहा प्रकारचा होऊन सर्व नगराला व नगरवासीयांना व्यापून राही व सर्वांशीं मिळून वागे. माळेंत गोंवलेले मणी जसे सूत्र नसलें तर वेगवेगळे होतात, त्याचप्रमाणें हा प्र जशीं लागून नसला कीं ते सर्व नष्ट होत. तोच माझी सर्वांशीं गति करी; आणि त्याला त्या नगराचा सूत्रधारपणा मींच दिला होता. तो प्रचार एक नगर जीर्ण झालें तर लागलीच त्या सर्वांना दुसऱ्या नगरांत घेऊन जांई, याप्रमाणें या प्रचाराच्या संगतीनें अस्थिर हा पुष्कळ निरनिराळ्या व विचित्र देशांचा राजा झाला. पहा कीं, हा अस्थिर सतीच्या पोटीं जन्मला; महाबळ असा प्रचार, त्याचा त्याला आश्रय मिळाला; प्रत्यक्ष मीं त्याला वाढविलें; इतकें असूनहि त्याच्या नशिबाला दुःखच आलें! कारण उघडच आहे कीं, त्याचा चपला, महाशना अशा स्त्रियांशीं समागम; ज्वालामुख, निंद्यवृत्त असल्या

---

१. झोपेंत मन व बुद्धि यांवर अविद्येचें आच्छादन असतें.

२. झोपेंत जीवाची शुद्धस्वरूपीं व स्थिति होत असते.

३. प्राणवायूच्या योगानेंच सर्व क्रिया चालतात.

४. वासनांसह प्राण हा मनाला निरनिराळी योनि प्राप्त करून देतो, असा भाव.

मुलांचा सहवास; आणि दुसऱ्या पांच मुलांची नित्य ओढ! त्यामुळें सहजच त्याला महाक्लेश झाले; सुखाचा लेशहि मिळाला नाहीं! त्याला कधीं त्याचे पांच पुत्र इकडेतिकडे फिरवीत; क्वचित् त्याची स्त्री चपला त्याला चाळवी, त्यामुळें तो खिन्न होऊन बसे; कधीं महाशनेचें पोट भरण्यासाठीं त्याला धडपड करावी लागे; कधीं ज्वालामुखाची भेट झाली असतां पायापासून मस्तकापर्यंत दाह होऊन तो मूर्च्छित पडे व त्याला उपाय काय करावा तेंहि त्याला कळत नसे. कधीं निंद्यवृत्त आढळला तर जगांत निंदा व फजिती पावून आपणाला मृततुल्य समजून तो दुःख करी. याप्रमाणें दुष्ट पत्नी व दुष्ट पुत्र यांनीं युक्त, मोहवश, दुष्ट कुलांत जन्मलेला, पत्नीपुत्रांनीं गांजून गेलेला, पण त्यांच्याच कलाप्रमाणें वागणारा असा हा अस्थिर अनेक प्रकारच्या लहानथोर चमत्कारिक नगरांतून फिरत राहिला.[1] कधीं भयंकर अरण्यांत, कधीं हिंस्त्र पश्वादिकांनीं भरलेल्या प्रदेशांत, कधीं अतिशय तप्त भागांत, कधीं थंड देशांत, कधीं अज्ञानपूर्ण स्थानीं, कधीं दुर्गंधीनें भरलेल्या ठिकाणीं, तर कधीं गाढ अंधारांत, अशा तऱ्हेनें तो अनेक देश फिरला, आणि या मूर्खाच्या संगतीनें, कारण नव्हतें तरी माझी सखी स्वभावसती[2] ही दुःखित झाली. तिच्याच संगतीनें प्राणणाथ, मीहि अत्यंत मोहित होऊन तिच्या येवढ्या कुटुंबाचा सांभाळ करीत राहिलें! परंतु दुःसंगतीपासून कधीं कोणाला सुख झालें आहे? उन्हाळ्यांत अफाट वाळवंटांत जाऊन कोणाची तहान भागणार आहे? अस्तु.

---

१. अनेक योनि फिरला. २. शुद्ध बुद्धि.

प्राणनाथ ! याप्रमाणें पुष्कळ दिवस निघून गेले. तेव्हां एकदां माझी सखी अतिशय खिन्न होऊन एकान्त साधून मजकडे आली.[1] आणि माझ्यापासून एक उपाय[2] संपादन करून तिनें एका बुद्धिमान पतीला वरिलें.[3] नंतर अस्थिराला जिंकलें.[4] त्याच्या मुलांत कोणाला ठार केलें, व कोणाला बांधून घातलें.[5] आणि शेवटीं माझ्या साह्यानें माझ्या मातेचें अंतःपुर गांठून माझ्या मातेला घट्ट मिठी मारली ![6] तेव्हां शेवटीं ती निर्मलस्वभावाची माझी सखी सहज स्वाभाविक आनंदांत निमग्न झाली. यासाठीं प्रिया ! आपणहि आपल्या सखीच्या दुर्वृत्त मुलाला[7] स्वाधीन करून घेऊन मातेची[8] भेट करून घ्या, आणि नित्य सुख मिळवा. प्राणनाथ ! मीं हें स्वतः अनुभविलेलें सुखाचें स्थान आपणांला सांगितलें आहे."

———

१. स्वरूपाचें भान झालें. २. वैराग्य हा उपाय. ३. विवेक प्राप्त झाला. ४. मन स्वाधीन केलें. ५. पंचेंद्रियें आकळलीं. ६. शुद्ध चित्स्वरूपांत बुद्धि लीन झाली. ७. मनास. ८. शुद्ध चितीची—चैतन्याची.

## प्रकरण ६ वें,

# विश्वास पाहिजे.

आप्तेष्वश्रद्धिनं मूढं जहाति श्रीः सुखं यशः ॥
स भवेत्सर्वतो हीनो यः श्रद्धारहितो नरः ॥ १४ ॥

आपल्या पत्नीचें हें भाषण ऐकून राजपुत्र हेमचूडाला फार आश्चर्य वाटलें, व हंसूहि आलें. हेमलेखा ज्ञानी स्त्री आहे असें त्याला मुळींच वाटलें नाहीं. तेव्हां तो तिला म्हणाला, "प्रिये! तूं सांगितलेंस ती गोष्ट अशक्य आहे, असें मला वाटतें. किंबहुना तुझ्या म्हणण्याला कांहींच आधार नाहीं, असें मी खास जाणतों. पहा कीं, तूं विद्याधरीच्या पोटीं जन्मलीस; अरण्यांत तुला एका ऋषीनें वाढविलें; व आतांच कोठें तूं वयांत येत आहेस. तुला तारुण्याचा भरहि अद्याप प्राप्त झाला नाहीं, आणि तूं हजारों वर्षांच्या म्हातारीसारख्या गोष्टी सांगतेस! खरोखर भुतानें पछाडलेल्या मनुष्याप्रमाणें तुझें बोलणें आहे. कशास कांहीं मेळ तरी? असें हें तुझें भाषण मी खरें समजेन काय? नाहींतर ती तुझी सखी कोठें आहे तें सांग. तिनें बांधलेले ते मुलगे कोठें आहेत? तीं नगरें कोणत्या प्रदेशांत आहेत तो खुलासा कर. पण असूं दे, तें कांहीं कां असेना? माझी सखी कोठें आहे तेवढें मला सांग. कारण मला माझ्या मातेनें कोणी सखी दिलेलीच नाहीं. पाहिजे तर माझी माता अंतःपुरांत आहे, तिला विचारून ये. हिच्याशिवाय माझ्या पित्याला दुसरी स्त्रीहि नाहीं. तेव्हां ती सखी व तो तिचा पुत्र हे आहेत तरी कोठें? सांग, उशीर

कशाला? प्रिये! मी तर समजतों कीं, तुझें भाषण वंध्येच्या मुलासारखें अघटित आहे! नाटकामध्यें जसा एखादा विदूषक सांगू लागतो कीं, एक होता वंध्येचा मुलगा; तो एकदां एका महारथाच्या प्रतिबिंबावर जाऊन बसला. नंतर त्यानें शिंपीवर रुप्याचा आरोप करून त्याचे अलंकार घडवून आपल्या अंगावर घातले. पुढें त्यानें मनुष्याच्या शिंगांचीं आयुधें घेऊन गगनरूप अरण्यांत एक युद्ध केलें. त्यांत भविष्यकालच्या राजाला ठार करून ढगांमध्यें भासमान होणारें शहर जिंकलें. आणि आतां तो मृगजलामध्यें स्वप्नांतील स्त्रियांबरोबर क्रीडा करीत आहे! तर या गोष्टीप्रमाणें प्रिये! हें तुझें सर्व भाषण अगदीं विसंगत आहे!"

हें बोलणें ऐकून ती चतुर स्त्री पुन्हा म्हणाली:—"प्राणनाथ! मीं आपणांला सांगितलें तें असें विसंगत कसें असेल? मजसारखीचें भाषण निराधार केव्हांहि असणार नाहीं. तपस्व्यांच्या कुळांत व सत्यशीलांच्या ठिकाणीं पुण्याच्या क्षय करणारी मिथ्या वाणी म्हणजे कोड भरलेल्या पुरुषाच्या ठिकाणीं सौंदर्य याप्रमाणेंच ती अशक्य आहे. तर ती येथें कोठून आणि कशी संभवणार? जिज्ञासु पुरुषाला जो मनुष्य भलत्याच गोष्टीकडे वळवितो, त्याला त्या असत्यदोषामुळें सुखकर होणारा श्रेष्ठ किंवा कनिष्ठ असा कोणताच लोक प्राप्त होत नाहीं. राजपुत्र! व्यवहारांत ज्याला तिमिररोग झाला आहे त्याला, आंत अंजन न घालतां केवळ अंजनाच्या शब्दसमूहानें शुद्ध दृष्टि प्राप्त होत नाहीं. म्हणूनच जिज्ञासूला अर्थशून्य शब्द सुजन सांगत नाहींत. पण अज्ञानाला हितचिंतकानें सांगितलेली गोष्टहि

खोटी वाटते. परंतु प्राणनाथ! मी आपली प्रिया आणि आपण जिज्ञासु, असें असतांना आपणांला मी विसंगत कसें बरें सांगेन? अथवा प्राणनाथ! माझें भाषण असत्य वाटत असेल तर आपण सूक्ष्म बुद्धीनें विचार करावा. व्यवहारामध्यें ज्ञाते पुरुष एका अंशाचें परीक्षण करून एकंदर प्रकार जाणतात. तेव्हां आपणांला माझें एक पूर्वीचें उदाहरण माहीतच आहे, तेंच आपण नीट पहा. आपणांला पूर्वीं हे सर्वच विषय सुखकर होत होते. पण मीं बोलल्यापासून अलीकडे ते कांहीं सुखदायक होत नाहींत. परन्तु तेच हल्लीं इतरांना सख देतच आहेत! तर याच अनुभवावरून आपण माझ्या म्हणण्याची सत्यासत्यता ठरवा.

राजन्! मी आतां आपणाला सांगतें तें अगदीं सरळ व शुद्ध भावानें ऐका. सज्जनांच्या शब्दांवर अविश्वास हा मोठा शत्रु आहे. श्रद्धा नामक प्रेमळ माता आपल्याला शरण असलेल्या बालकाला सर्व कुतर्कांपासून अगदीं सुरक्षित ठेविते. आप्तांवर श्रद्धा न ठेवणाऱ्या मूर्खाला लक्ष्मी, कीर्ति आणि सुख हीं सोडून जातात. श्रद्धाशून्य पुरुष सर्व प्रकारें हीनदीन होतो. श्रद्धा ही साऱ्या जगाला आधार आहे; किंबहुना श्रद्धा हेंच सर्वांचें जीवन आहे. मातेच्या ठिकाणीं विश्वास न ठेवील तर बालक कसें वांचेल? विश्वासच वाटत नसेल तर पुरुषाला स्त्रीच्या ठिकाणीं सुख काय मिळणार? मुलावर विश्वास नसेल तर वृद्धाला प्रेम कोठून येणार? श्रद्धा नसेल तर शेतकरी जमिनीची नांगरणी तरी कशी करील? धान्य पेरण्यास किंवा सांठवून ठेवण्यास सुद्धां श्रद्धेवांचून मनुष्य प्रवृत्त होणें शक्य नाहीं. सारीच श्रद्धा ढासळली तर जगाचा व्यवहारच नष्ट होईल!

नाथ! यावर आपण कदाचित् म्हणाल कीं, "सर्व लोकप्रवृत्ति प्रत्यक्ष मिळणाऱ्या फलावर आहे, केवळ श्रद्धेवर नाहीं." तर —प्रत्यक्ष फळ मिळेल ही भावना तरी कशी राहणार? कारण फळ मिळावयाचें तें सुद्धां भविष्यकाळीं; सद्यःकाळीं नव्हे. तेव्हां या मताचा आश्रय करणें ह्मणजे श्रद्धेचाच आश्रय करणें होय. म्हणून श्रद्धा नसेल तर लोकव्यवहारच थांबेल, हें सिद्ध होतें. खरोखर श्रद्धेवांचून श्वासहि टाकतां येणार नाहीं. तेव्हां राजकुमार! आपण दृढ श्रद्धा प्राप्त करून घ्या आणि आत्यंतिक सुख संपादन करा!"

इतकें सांगून हेमलेखा शेवटीं म्हणाली—"प्राणनाथ, वाइटाच्या ठिकाणीं श्रद्धा ठेवूं नये असें आपलें म्हणणें असेल, तर असें म्हणण्याकडे जी आपली प्रवृत्ति होत आहे ती सुद्धां श्रद्धेमुळेंच नव्हे काय? नाहीं तर ती कशानें होत आहे?"

हा हेमलेखेचा प्रश्न ऐकून हेमचूड ह्मणालाः—"परंतु प्रिये! सरसहा श्रद्धा ठेवावी असें जर तुझें ह्मणणें असेल, तर मला एक शंका आहे. कारण कीं, श्रद्धा सज्जनांवरच ठेवावी; ह्मणजे त्यायोगानें कल्याण होतें. हितेच्छु पुरुषांनीं अन्यथा श्रद्धा ठेवूं नये. नाहीं तर, मासे जसे बाहेरून सरळ दिसणाऱ्या पण आंत वांकविलेल्या व पीठ लाविलेल्या तीक्ष्ण गळावर विश्वासून नाश पावतात, तसा नाश होण्याची वेळ येईल! तेव्हा सज्जनांवर श्रद्धा ठेवावी, दुर्जनांवर ठेवूं नये. दुर्जनांवर विश्वास ठेवून ज्यांचा नाश झाला आहे आणि सज्जनांवर विश्वास ठेवल्यामुळें ज्याचें कल्याण झालें आहे त्यांचें उदाहरण ह्या ह्मणण्याला पुरें आहे. सारांश, अनुभव घेऊन

श्रद्धा ठेवावी, त्यावांचून श्रद्धा ठेवणें योग्य नाहीं, असें उघड होतें. असें असतां तुझें वरील विधान कसें संभवतें ?"

याप्रमाणें हेमचूडानें विचारल्यावर हेमलेखा पुनः म्हणते:—"ऐका सांगतें. वरील विधान कसें संभवतें तें सांगतें. नाथ, हा चांगला व हा वाईट असा निश्चय आपण ठरवितां, तो तरी कशाच्या आधारावर? 'कांहीं प्रमाणांनीं तीं लक्षणें जाणतां येतात,' असें म्हणत असाल, तर ज्याला श्रद्धा नाहीं त्याला कोणतें प्रमाण उपयोगीं पडेल, हें प्रथम सांगा पाहूं? दुसरीं कोणचींहि प्रमाणें त्याला मुळींच पटणार नाहींत. सारांश, सर्व लोक श्रद्धेच्या आधारानें वागत आहेत, हीच गोष्ट सिद्ध होते. हेंच मी आपणांला सुलभ करून सांगतें, आपण नीट ऐका. श्रद्धा सोडून असंभाव्य तर्क केले, अथवा तर्क मुळींच चालविले नाहींत, तर उभयपक्षींहि पुरुषाचें इहलोकीं किंवा परलोकीं हित होणें शक्य नाहीं. त्यामध्यें कदाचित् कालेंकरून दुसऱ्याला कांहीं श्रेय पदरांत पडेल, परंतु असंभाव्य तर्क करणाऱ्या पहिल्यास मात्र कांहींच लाभ व्हावयाचा नाहीं. याला एक उदाहरण सांगतें, ऐका:——

पूर्वीं सह्याद्रीकडे गोदावरीच्या कांठीं कौशिक ऋषि रहात होता. तो फार शांत व सद्बुद्धीचा होता. या दृश्य जगताचें मर्म त्याला कळलें होतें. त्याच्या संगतीला त्याचे पुष्कळ शिष्य असत. ते एकदां आपल्या गुरूच्या पश्चात् या जगाच्या स्वरूपाचा निर्णय करावा म्हणून एकत्र झाले व प्रत्येकजण आपापल्या बुद्धीनुसार मत प्रतिपादन करूं लागला. तेव्हां तेथें शुंग नांवाचा एक मोठा शहाणा

पुढें झाला; आणि त्यानें आपल्या बुद्धिमत्तेच्या जोरावर सर्वांचीं मतें खोडून काढलीं. त्याची शास्त्रावर श्रद्धाच नव्हती, त्यामुळें त्याची बुद्धि असून नाहींशी झाल्यासारखीच होती. पण तो वादविवादांत पंडित होता. 'प्रमाणांनीं जें सिद्ध होईल तें सत्य,' असें त्या वेळीं सर्वांचें म्हणणें होतें. परंतु हा केवळ तर्कवादी—असंभाव्य तर्क करणारा,—त्यामुळें त्यानें त्या वेळीं सर्वांसच कुंठित केलें. तो म्हणाला,

"अहो! माझें म्हणणें ऐका. 'प्रमाणांनीं सिद्ध होईल तें सत्य' असें जें तुमचें म्हणणें आहे, तें सिद्धच होत नाहीं. कारण सिद्ध करणारें प्रमाण जर सदोष असेल तर तें असत्य ठरेल. यासाठीं प्रथम प्रमाण शुद्ध असल्याचा निश्चय झाला पाहिजे. असा निश्चय व्हावयाला दुसरीं प्रमाणें पाहिजेत. मग तेथेंहि पुनः हाच प्रश्न, कीं तीं शुद्ध आहेत कीं नाहींत? म्हणजे असा हा विचार जाणार कोठवर? तेव्हां येथें ही अशी अनवस्था प्राप्त होते; यामुळें कांहींच सिद्ध करितां येत नाहीं. सारांश—प्रमाता, प्रमेय व प्रमाण हीं निश्चित होतच नाहींत. तेव्हां हा जो सर्व आभास भासत आहे तो शून्यावर उभारला आहे.—आणि तें शून्य तर शून्यच आहे. कारण तें प्रमाणाला विषय होणारें नाहीं. तस्मात् हें शून्य आहे, दुसरें कांहीं नाहीं, असा याचा निर्णय लागतो." असें हें शुंगाचें भाषण ऐकल्यावर त्यांत जे बुद्धीनें मंद होते त्यांनीं त्या आभासात्मक तत्वाची कास धरली, आणि ते शून्यवादी बनले. सर्वच शून्य मानणारे ते स्वस्वरूपानंदाला अंतरले; अर्थातच विनाशाला पोंचले! परंतु त्यांत जे विचारी होते त्यांनीं तें शुंगाचें मत कौशिक ऋषींच्या पुढें काढलें. तेव्हां कौशि-

कानें नंतर त्यांचें चांगलें समाधान केलें. यासाठीं राजपुत्र! हा असंभाव्य तर्क अगदीं पूर्णपणें सोडून देऊन शास्त्राच्या आधारानें तर्क करावा, व आपलें कल्याण करून घ्यावें, हेंच योग्य आहे."

याप्रमाणें प्रियेनें अत्यंत धीरानें उत्तर दिल्यावर हेमचूड अतिशय विस्मित होऊन त्या विशाल बुद्धीच्या स्त्रीला म्हणालाः—

"अहाहा! प्रिये! तुझें एवढें अगाध ज्ञान मला पूर्वीं ओळखलें नाहीं! तुझी धन्य आहे! आणि तुझी मला संगति मिळाली त्या अर्थीं मीहि धन्य आहें! श्रद्धेनेंच सर्व कल्याण होतें असें तूं सांगितलेंस, तें मला पटलें. पण आतां तें घडावें कसें तें सांग. श्रद्धा कोठें ठेवावी आणि कोठें ठेवूं नये? शास्त्रें अनंत आहेत, व त्यांचा अर्थहि परस्परांशीं विरुद्ध आहे. शिवाय, त्यांवरील आचार्यांचीं मतें निराळीं व व्याख्या करणारांचीं मतें निराळीं! आणि स्वतःची बुद्धि पहावी तर ती अस्थिर. तेव्हां घ्यावें कोणतें व घेऊं नये कोणतें? ज्याला जें रुचतें तें सत्य व दुसरें सर्व अनिश्चित व हानिकर, असेंच तो ठरवितो. असा प्रकार असल्यामुळें येथें कोणीहि शेवट गांठीत नाहीं. जो शून्यतत्त्व आहे म्हणून सांगतो, तो दुसऱ्या अशून्यवाद्यांना दोष देतो. आणि अशालाहि शास्त्राचा आधार मिळत असल्यामुळें तें तरी अश्रद्धेय कसें म्हणावें? यासाठीं प्रिये! याचा तूं विचार केला नसशील असें नाहीं; तर हें सर्व मला नीट सांग."

---

## प्रकरण ७ वें,

# ईश्वर नाहीं काय ?

एवं सत्तर्कागमाभ्यां जगदेतत् सकर्तृकम् ॥
स कर्ता लौकिकेभ्यस्तु कर्तृभ्यः स्याद्विलक्षणः ॥ ४१ ॥

हेमलेखेला तिच्या प्रियकरानें याप्रमाणें विचारल्यावर, ती सर्व जगताचें स्वरूप बरोबर ओळखणारी ज्ञानी स्त्री त्याला म्हणाली:—

प्रियकरा, सांगतें तें आपण चित्त स्थिर करून व आदरानें ऐकावें. मन हें मर्कटाप्रमाणें सदा चंचल असतें. या मनामुळेंच सर्व-साधारण लोक मोठ्या अनर्थांत सांपडले आहेत. सर्व दुःखांचें कारण हेंच चंचल मन आहे, असें दिसून येतें. कारण सुषुप्तीमध्यें मन चलनहीन असतां सुख प्राप्त होत असतें. यासाठीं मी आपणांस सांगतें हें आपण मन स्थिर करून श्रवण करावें. ऐकतांना अनास्था केली, तर तें ऐकून न ऐकल्यासारखेंच होतें. चित्रांत काढलेल्या वृक्षाप्रमाणेंच तेंहि फलरहित होतें. निराधार तर्क करण्याचा हानि-कर मार्ग सोडून सुविचाराचा आश्रय केल्यानें लोकांना त्याचें चांगलें फळ तत्काळ प्राप्त होतें. तेव्हां सयुक्तिक विचारपद्धतीचा आश्रय करून एकनिष्ठपणें साधन चालवावें. अशा विचारानें प्राप्त होणारी श्रद्धाच पुरुषाला फळ मिळवून देते. यासाठीं स्वैर तर्क करणें सोडून प्रियकरा, आपण विचार करा. सर्व जगाची प्रवृत्ति श्रद्धेमुळेंच सफळ होत आहे. सुविचारानें योग्य काळ ओळखूनच शेतकरी जमीन नांगरतो. वितंडवाद सोडून सरळ विचारानें आणि

श्रद्धेनेंच सोनें, रुपें, रत्नें, औषधें यांचीं स्वरूपें निश्चित होतात. सारांश, सरळ विचार व श्रद्धा यांच्या योगानें स्वहिताचा निश्चय ठरवून साधनासाठीं चांगला प्रयत्न करावा. पूर्वीं सांगितलेल्या शुंगा-प्रमाणें केवळ तर्कटी होऊन प्रयत्न करणें सोडून देऊं नये. श्रद्धेनें प्रयत्न करणारा कधींहि वायां जात नाहीं. जोरदार प्रयत्न केल्या-वर फळ कसें प्राप्त होणार नाहीं ? पौरुषाच्या योगानेंच शेतकऱ्यांना धान्य मिळतें, व्यापाऱ्यांना द्रव्य प्राप्त होतें, आणि राजांना राज-वैभव लाभतें. सर्व सुखाचा आधार अशी जी विद्या ती ब्राह्मणांच्या हातीं येते, शूद्रांना सेवा घडते, देवांना अमृत मिळतें, तपस्व्यांना पुण्यलोक प्राप्त होतात, अथवा आणखी कोणाला कांहीं मिळतें, हें सर्व पौरुष कर्मामुळेंच होय. श्रद्धाशून्य व यथेच्छ तर्क करणाऱ्या पुरुषाला कधीं व कोणतें थोडेंसें तरी फल प्राप्त झालें आहे, तें विचार करून सांगा पाहूं ? त्या अर्थीं, एखादे वेळीं फळ मिळालें नाहीं म्हणून ज्याची श्रद्धा उडून जाते, तो करंटा पुरुष स्वतःचा शत्रुच समजला पाहिजे. यासाठीं श्रद्धा आणि प्रामाणिक विचार यांनीं वृद्धिंगत होणारा पौरुष प्रयत्न स्वीकारून, मोक्षाचें मुख्यतम साधन असेल त्याची पाठ धरावी. मोक्षाचीं साधनेंहि नानाप्रकारचीं आढळतात. तेव्हां त्यांत जें आचरल्यानें, केलें तें सर्व सफल होईल, असलें मुख्यतम साधन नेहमीं साधावें. निष्काम भावनेनें केलेलें सर्व पदरांत पडतें. यासाठीं प्रामाणिक विचार व अनुभव यांयोगें तें साधन ठरवून दृढतेनें सुरू करावें.

प्रियकरा ! चांगलें मन देऊन ऐकावें. ज्याच्या प्राप्तीपासून पुनः

दुःख करण्याचा प्रसंगच येणार नाहीं, त्यालाच परम श्रेय म्हणावें. आणि सूक्ष्म विचार केला तर या दृश्य जगांत जिथें तिथें दुःखच चोहोंकडे दिसून येतें. त्यामुळें जें दुःखमिश्रित आहे, तें परम श्रेय नव्हेच नव्हे. संपत्ति, स्त्रीपुत्र, राज्य, खजिना, सैन्य, नांवलौकिक, विद्वत्ता, बुद्धिमत्ता, पाणीदार डोळे, भव्य शरीर, किंवा अंगाचा कोमलपणा, हीं सर्व काळसर्पाच्या मुखांत सांपडलीं आहेत, क्षणिक आहेत. या सर्वांत दुःखाचा अंकुर उत्पन्न करणारें सूक्ष्म बीज आहे. मग तीं परम श्रेय कसें प्राप्त करून देतील? परम कल्याणाचें मुख्य साधन तें निराळेंच आहे. धनादिक विषय उपयुक्त आहेत, असें वाटणें हा शुद्ध भ्रम आहे. तो मोहामुळें होतो. सर्व जगाचा कर्ता जो परमेश्वर तो मोहाविणारा आहे. त्यापासूनच सर्व मोहित झाले आहेत. एखादा मांत्रिकहि आपल्या थोडचाशा विद्येच्या बळावर लोकांना भ्रम उत्पन्न करितो. आतां त्याची ती विद्या मर्यादित असल्यामुळें, तो सर्वांना मोहित करीत नाहीं, थोड्यांना करितो. परंतु या अल्पविद्य मायाव्यापासूनहि लोकांना सुटका करून घेतां येत नाहीं, मग महामायावी अशा या महादेवापासून कोण सुटूं शकेल? या मांत्रिकाच्या अल्पमायेला उल्लंघिण्यासाठीं तशीच प्रतिविद्या जो संपादन करतो, तोच त्या मांत्रिकाच्या गौडबंगालापासून आपली सुटका करून घेऊन स्वस्थपणा अनुभवितो. परंतु ती विद्या सुद्धां त्या मांत्रिकाची संगति केल्यावांचून—त्याची कृपा संपादिल्यावांचून जर कधींच प्राप्त होत नाहीं, तर या महामायावी ईश्वराला प्रसन्न केल्यावांचून या जगद्रूप महामोहाचें उल्लंघन कसें होईल? यासाठीं

सर्वभावेंकरून आपण त्यालाच शरण जावें. जो त्याला चांगल्या रीतीनें प्रसन्न करून घेईल, त्याला त्याच्या कृपेनें महाविद्या प्राप्त होईल, व त्यायोगें तो या महामायेच्या मोहांतून पार पडेल. या परम कल्याणाच्या प्राप्तीसाठीं दुसरेहि कित्येक मार्ग सांगितलेले आहेत खरे; परंतु परमेश्वराच्या कृपेवांचून ते सर्व व्यर्थ आहेत. यासाठीं हें सर्व विश्व चालविणाऱ्या त्या परमेश्वराची पहिल्यानें आराधना करावी; म्हणजे तो या मोहाच्या निरासासाठीं योग्य तीं सर्व साधनें प्राप्त करून देईल.

आतां प्रियकरा ! ‘ तो आहेच कशावरून ?’ म्हणून आपण संशय घ्याल. तर पहा कीं, हें जगद्रूप कार्य प्रत्यक्ष झाल्याचें दिसून येत आहे. पृथ्वी, आप इ॰ भूतांची उत्पत्ति होत असतां कोणास प्रत्यक्ष दिसत नाहीं हें खरें; परंतु ते सर्व सावयव पदार्थ आहेत. त्यामुळें तें कोणाचें तरी कार्यच असलें पाहिजे. अशा प्रकारें सयुक्तिक अनुमानावरून आणि पुष्कळ शास्त्रांनीं या गोष्टीला बळकटी दिली आहे तिजवरून, या जगाला कोणी एक कर्ता आहे, आणि तो सर्वसाधारण कार्यकर्त्यांहून अगदीं वेगळ्या प्रकारचा आहे, असें निश्चयानें ठरतें. जरी कोणत्या एका शास्त्रानें ‘हें जग कोणा कर्त्यावांचून, आपोआपच झालें आहे,’ असें म्हटलें आहे, तरी विचारानें सयुक्तिक ठरलेल्या दुसऱ्या अनेक शास्त्रांनीं तें म्हणणें चांगलें खोडून काढलें आहे. केवळ प्रत्यक्ष प्रमाणाचाच विचार करून, “ आत्माच नाहीं ” म्हणून सिद्ध करणें हाच ज्या शास्त्राचा परमपुरुषार्थ तें शास्त्र खरोखर शास्त्र नसून शास्त्राचा केवळ आभास होय; थोरांनीं त्याकडे

लक्ष देणेंच योग्य नाहीं. केवळ शुष्क तर्कानें भरलेलें तें शास्त्र त्याज्यच होय. दुसरेहि कोणी ह्मणतात कीं, ' हें सनातन जगत् कोणीं उत्पन्न केलेंच असलें तरी तें ज्ञानपूर्वक केलें नाहीं; तें निसर्गनियमानें अर्थात् जड तत्त्वांपासूनच बनलें आहे." पण हेंहि ह्मणणें असमंजसपणाचें आहे. क्रिया ही बुद्धिपूर्वकच होत असते. त्यावांचून ती होतांना कोठेंच आढळत नाहीं. शिवाय पुष्कळ शास्त्रांवरून पाहतांहि याचा कर्ता बुद्धियुक्त असला पाहिजे असेंच ठरतें. तसेंच कोणतेंहि कार्य आधीं विचारांत आलें व मग कृतींत उतरलें, असेंच सर्वत्र आढळून येतें. सारांश, याप्रमाणें सयुक्तिक तर्क व शास्त्रें यांचे योगानें या जगाला कर्ता कोणी आहेच असें ठरतें. तो कर्ता व्यवहारांतील कर्त्यांहून कांहीं निराळा असला पाहिजे. कां कीं, त्याचें कार्यच जर आकलन होत नाहीं तर तोहि अचिंत्य अशा अनंत शक्तीचा असला पाहिजे. कार्यालाच जर कांहीं मर्यादितपणा आढळत नाहीं, तर त्या कर्त्याचें सामर्थ्यहि मर्यादेबाहेर असलें पाहिजे. अर्थात् तो आपणास शरण आलेल्यांचा उद्धार करण्यास अगदीं पूर्ण समर्थ असलाच पाहिजे. म्हणून राजपुत्र ! त्यालाच सर्वभावानें निरंतर शरण जावें. तुम्हांला विश्वास येण्यासाठीं एक दृष्टान्त सांगतें. पहा कीं, ज्याचें ऐश्वर्य अल्प-मर्यादित आहे त्यालाहि जर खऱ्या प्रेमभावानें प्रसन्न करून घेतलें, तर तोहि आपल्या आश्रिताच्या हिताच्या इच्छेनें अगत्यानें झटतो व त्याचे मनोरथ पुरवितो; तर सर्व त्रैलोक्याचा अधिपति भक्तजन-वत्सल भगवान् ज्यानें खरोखरच प्रसन्न करून घेतला, त्याला त्याचें इच्छित तो कसा देणार नाहीं ? लौकिकांतील ऐश्वर्यवान् पुरुष हे

अनियमित, अगत्यशून्य, निष्ठुर व कृतघ्नहि असतात. परंतु परमेश्वर दयेचा सागर आहे, केलेलें जाणणारा आहे, व निश्चितपणें फळ देणारा आहे. असें नसतें तर या जगांत तो सर्वांना वंद्य कसा झाला असता? अथवा ही जगद्यात्रा तरी व्यवस्थितपणें कशी चालूं शकली असती? अहो! राजा अव्यवस्थित असला तर त्याचें सर्व राज्य लयास जातें, हें जर स्पष्ट दिसून येतें, तर हा दयासिंधु भगवान् सुव्यवस्थितच असला पाहिजे असें नाहीं काय? यासाठीं राजकुमार, विलंब न लावितां सर्वभावानें अगदीं तत्पर होऊन त्यालाच शरण जा. तोच तुम्हांला तुमच्या परमकल्याणस्थानास नेऊन पोंचवील.

राजन्! या परमात्म्याच्या उपासनेचे पुष्कळ प्रकार आहेत. संकट आल्यामुळें किंवा कांहीं लाभ व्हावा म्हणून उपासना चाल-लेल्या पुष्कळ आढळतात, परंतु निष्काम उपासना मात्र क्वचितच आढळते. परंतु निष्काम उपासना तीच खरी उपासना. संकट प्राप्त झालें म्हणून परमेश्वराची उपासना आरंभिली असतां परमेश्वर कदा-चित् दयाळू होऊन त्याला संकटांतून सोडविल, अथवा कदाचित् उपासना अपुरी म्हणून उपेक्षाहि करील; हें तर सर्वांनीं पाहिलेंच आहे. याचप्रमाणें, कांहीं लाभ व्हावा म्हणून ईश्वरोपासना चाल-विणारांनाहि मिळणारें फळ अनियमित व स्वल्पच मिळतें. परंतु निष्काम उपासनेचा परिणाम असा होतो कीं, उपासकाचा शुद्धभाव कांहीं काळानें ओळखल्यानंतर लोकांतील प्रभुसुद्धां—ते अव्यवस्थित असले तरी आपल्या सेवकाच्या अगदीं अधीन होतात. होतात. येथें त्यांना त्याचा शुद्धभाव ओळखण्यास फार काळ तरी लागतो; पण

हा सर्वेश्वर भगवान् सर्वांच्या हृदयांचाच स्वामी असल्यामुळें सर्वच गोष्टी तत्काळ जाणतो, व तत्काल फल देतो. व्यसनार्ताला किंवा लाभेच्छूला दोघांनाहि त्यांचें इछित त्यांस प्राप्त करून देण्यासाठीं परमेश्वर आपल्या नियतीच्या साह्यानें त्यांच्या पूर्व कर्मास अनुसरून फळ देत असतो; पण निष्काम उपासक आपल्याला अगदीं एकनिष्ठेनें व सर्वभावेंकरून शरण असलेला पाहून परमेश्वर त्याच्या योगक्षेमाचा* भार आपणावर घेतो व उपासकाच्या पूर्व कर्मांची अपेक्षा न धरितां व नियतीचीहि पर्वा न करतां त्याला मोक्षाचें साधन सिद्ध करून देऊन लागलीच फळास आणितो; आणि हेंच त्याचें महेश्वरत्व व हेंच त्याचें महत्स्वातंत्र्य ! पूर्व कर्म काय किंवा नियति काय, ईश्वराला विमुख असणाऱ्यावर चालणार. ईश्वराच्या निष्काम व एकनिष्ठ भक्तावर त्यांचा अमल होत नाहीं. परमेश्वर आपल्या भक्ताचें पूर्वकर्म व नियति यांचें उल्लंघन करितो, ही गोष्ट ईश्वरभक्त मार्कंडेयाच्या आख्यानांत सर्वांना समजलीच आहे. प्राणनाथ ! याची उपपत्ति हवी तर सांगतें ऐका. वस्तुतः जरी प्रारब्ध किंवा नियति ही अनुल्लंघनीय आहे, तरी प्रारब्धाची ही अभेद्यता प्रयत्न न करणाऱ्यांना आहे. म्हणूनच प्रयत्नानें प्राणायामाचा अभ्यास चालविणाऱ्या योग्यांना त्यांचें प्रारब्ध दुःखाचा स्पर्श कर-

---

* येथें 'योगक्षेमाचा भार' म्हणजे 'भक्ताच्या निर्वाहाची सोय करणें' असाच अर्थ बहुतेक लोक घेऊन चालतात. परंतु परमेश्वर अशी भक्ताच्या देहसंरक्षणाची काळजी वाहतो, असें सर्व भगवद्भक्तांच्या उदाहरणांवरून निश्चयात्मक म्हणतां येत नाहीं. यामुळें 'योगक्षेमाचा भार' म्हणजे उपासकाची त्याच्या उपासनामार्गांत 'स्थिति आणि प्रगति' असाच अर्थ घेतला पाहिजे.

विण्याला समर्थ असत नाहीं. जे प्रयत्नास पारखे असतात ते प्रारब्धरूप भुजंगाच्या तोंडांत सांपडतात. हा सुद्धां नियतीचाच संकल्प आहे; व अनुभवहि असाच आहे. नियति ही ईश्वराची शक्ति आहे. केवळ संकल्प हेंच तिचें स्वरूप होय. आणि परमेश्वर हा सत्यसंकल्प असल्यामुळेंच ही नियति जीवांना अनुल्लंघनीय झाली आहे. अशी ही अकुंठित असतांहि ती ईश्वरभक्ताच्या ठिकाणीं कुंठित होते. तेव्हां प्रियकरा ! कुतर्काच्या भरीस न पडतां आपण त्या महेश्वराला शरण जा. निष्काम भावनेच्या योगानें तो आपणांला आपल्या कल्याणस्थानीं पोंचवील. सुखाच्या शिखरावर जाण्याची हीच पहिली पायरी आहे ! हें सोडून दुसऱ्या मार्गांत जाऊन एवढें सुद्धां फळ मिळण्याचा संभव नाहीं. ”

दत्तात्रेय ह्मणतात, परशुरामा ! याप्रमाणें प्रियेचें भाषण ऐकून हेमचूड अतिशय आनंदित झाला. नंतर पुनः ह्मणाला “ प्रिये ! आतां मी ज्याला शरण जावें त्या परमेश्वराचें स्वरूप काय, तें मला सांग. या सर्वांचा कर्ता, अत्यंत स्वतंत्र आणि ज्याच्या बळावर हें सर्व जग चालतें त्याचें नांव काय ? त्याला कोणी विष्णु म्हणतात, कोणी शिव म्हणतात, कोणी गणपति म्हणतात. तसेंच कोणी सूर्य, कोणी नृसिंह, कोणी बुद्ध, सुगत, अर्हत्, तर कोणी वासुदेव, कोणी प्राण, कोणी चंद्र, कोणी अग्नि, आणि कोणी तर कर्म, प्रधान, अणु इत्यादि पुष्कळच नांवें देतात. याप्रमाणें जगाच्या कारणाला निरनिराळ्या मतांनीं विविधता आलेली आहे. तेव्हां या सर्वांतून ईश्वरभावना कोणाच्या ठिकाणीं करावी तें सांग. तुला माहीत नाहीं असें तर

कांहींच नाहीं, हें खास. कारण तो भगवान व्याघ्रपाद मुनि प्रत्यक्ष ब्रम्हदर्शी होता; म्हणूनच तूं स्त्री असूनहि तुझ्या अंगीं एवढें ज्ञान चमकत आहे. आणि प्रिये ! तुझें भाषणहि मला फार गोड लागत असून माझी श्रद्धाहि तुजवर बसली आहे; शिवाय तुझें मजवर प्रेमहि आहे. तेव्हां तें मला तूं समजावून दे. ”

राजपुत्रानें असें विचारल्यावर हेमलेखेलाहि आनंद झाला. नंतर ती म्हणाली:—प्राणनाथ! ईश्वरस्वरूपाचा निर्णय मी आपणांला स्पष्ट सांगतें, ऐका. हें सर्व जगदाडंबर उत्पन्न करणारा व पुनः लीन करणारा तो ईश्वर. तोच विष्णु, तोच शंकर, तोच ब्रह्मदेव, तोच सूर्य व तोच चंद्र होय. सर्व लोक अशा अनेक प्रकारांनीं त्याचेंच निरूपण करितात. पण वस्तुतः तो शिवहि नव्हे, विष्णुहि नव्हे, ब्रम्हदेवाहि नव्हे, किंवा दुसराही कोणी नव्हे. हाच विषय आपणांस फोडून सांगतें, चित्त अगदीं एकाग्र करून ऐका. जे शैव आहेत ते पंचमुखी व त्रिनेत्र अशा शंकराला कर्ता समजतात. याप्रमाणें नाना मतवादी आपापल्या भावनेप्रमाणें बोलतात. परंतु हे भेद सोडून सामान्य अनुमानानें पाहतां तो कर्ता घटादिकांच्या कर्त्याप्रमाणें चेतन व देहधारी असला पाहिजे, असें प्रथम अनुमित करण्यास अडचण नाहीं. व्यवहारांतसुद्धां एखाद्या वस्तूचा कर्ता चेतन व शरीरी असतो असें आढळतें. अशरीर व अचेतन कर्ता कोठेंच आढळत नाहीं. आतां या दोहोंमध्यें कर्तृत्व हें मुख्यतः चेतनाला संभवतें. कारण, स्वप्नामध्यें जीव हा आपलें स्थूल शरीर टाकून चैतन्ययुक्त देहानें आपल्याला हवे तसे सर्व पदार्थ उत्पन्न करितो, हा सर्वांचाच

अनुभव आहे. त्यावरून पाहतां कार्य करणाऱ्या चिदात्म्याचें, शरीर हें एक साधन आहे, असें म्हणावें लागतें. आतां जीवांना अशा साधनाची अपेक्षा असणार; कारण त्यांचें स्वातंत्र्य मर्यादित असतें. परंतु जगत्कर्ता परमेश्वर पूर्ण स्वतंत्र असल्यामुळें कोणत्याच साधनाची अपेक्षा न धरितां संपूर्ण जगत् उत्पन्न करितो, हें अगदीं सुयुक्तिक आहे. तेव्हा त्याला शरीर नाहीं हें मुख्यतः ठरलें. कारण, असें नसेल तर लौकिक कर्त्याप्रमाणें त्यालाहि सामग्रीची जरूरी लागूं लागेल, आणि मग देश, काल इत्यादि सामग्री घेऊन त्यायोगानें जगद्रचना करणारा तो परमेश्वर एक साधारण जीवच होऊन त्याच्या पूर्णैश्वर्याचा विघात होईल! कारण जगदुत्पत्तीच्या पूर्वी त्याला कांहीं साधनें जरूर असतील, तर त्यांचा तो कर्ता नव्हे असें होत असल्यामुळें त्याचें सर्वकर्तृत्वहि नाश पावेल, हें उघड आहे. तेव्हां परमेश्वर स्थूल देहादींची अपेक्षा न धरितां जगत् उत्पन्न करितो,—त्याला स्थूल शरीर वस्तुतः नाहीं,—असें सिद्ध झालें. आतां प्रियकरा! या परमेश्वराच्या देहशून्य सूक्ष्मरूपाच्या ठिकाणीं स्थूल बुद्धीच्या लोकांची मति चालत नाहीं. त्यामुळें ते भक्ति करितांना त्या परमेश्वराचें स्वबुद्ध्यनुसार निरनिराळ्या प्रकारें ध्यान करितात. त्यामुळें हा भक्तचिंतामणि भक्तांसाठीं तशीं तशीं अनेक रूपें स्वतः धारण करितो. सारांश, परमात्मा हा शुद्ध चेतन असून परम चैतन्य हाच त्याचा देह आहे; हीच त्याची महासत्ता आहे. हीच महास्वामिनी परमेश्वरी देवी त्रिपुरा आहे. तिच्याच ठिकाणीं वस्तुतः एकरूप असणारें हें जगत् नानारूप भासतें. हें सर्व चराचर जगत् आर-

शांत भासणाऱ्या नगराप्रमाणें असल्यामुळें शुद्ध चिद्रूपच आहे. अर्थात् उत्तम व अधम ही भावनाच व्यर्थ आहे. याशिवाय परमेश्वराचें दुसरें जें देहधारी स्थूलरूप मानितात, त्याला कांहीं प्राधान्य नाहीं. असें असल्यामुळें शहाण्यानें देहरहित पररूपाचीच उपासना करावी. हें सामर्थ्यच नसेल तर मात्र आपल्या बुद्धीला रुचेल असें साकार रूप ध्यावें. नंतर त्याची निष्काम उपासना चालवावी. म्हणजे अतिशय श्रेष्ठ प्रकारचें परम कल्याण त्यास प्राप्त होतें. राजपुत्र! उपासनेवांचून दुसऱ्या मार्गांत कोट्यवधि जन्म घालवूनहि कांहीं सार्थक होणार नाहीं."

---

## प्रकरण ८ वें,

# कोड्याचा उलगडा.

परा चितिर्मे जननी सखी बुद्धिर्मता मम ॥
अविद्या त्वसती प्रोक्ता यया बुद्धिः सुसंगता ॥ २६ ॥

याप्रमाणें आपल्या प्रियेचें भाषण ऐकून हेमचूडाला परमेश्वराच्या स्वरूपाचा निर्णय पूर्णपणें समजून आला. हेमलेखेच्या वाक्यांवरून तुर्य चैतन्यस्वरूपाबद्दल त्याच्या मनाला विश्वास उत्पन्न झाला. महेश्वरी त्रिपुरा देवी हें त्याचेंच सगुण रूप आहे, हेंहि त्याला ओळखलें व तीच सर्वांत श्रेष्ठ आहे असें ध्यानांत येतांच तो त्या महेश्वरीच्या भावनेनें भरून गेला! पुढें त्यानें अत्यंत एकनिष्ठेनें व दृढनिश्चयानें तिची उपासना चालविली. याप्रमाणें उपासनेचा अभ्यास तीव्रपणें चालू असतां कांहीं महिने लोटले. तेव्हां परमेश्वरी त्रिपुरा त्याच्या हृदयांत प्रसन्न झाली व त्यायोगें त्याचें चित्त विषयांवरून अगदीं उडून जाऊन विचारांत निमग्न होऊन गेलें. परमेश्वराच्या कृपेवांचून अशी दुर्लभ स्थिति मिळत नसते. कारण चित्त विचारांत लागून जाणें हेंच मोक्षाचें मुख्य कारण आहे. परशुरामा! जोंपर्यंत चित्त विचारतत्पर होत नाहीं, तोंवर अन्य शेंकडों उपाय योजूनहि परम कल्याणाची प्राप्ति होणें नाहीं. असो, तर याप्रमाणें त्याचें चित्त विचारांत गढून गेलें असतां एके दिवशीं एकांतांत त्याची व त्याच्या प्रियेची भेट झाली. आपल्या मंदिराकडे आपला प्रियकर येत आहे असें दुरून पाहतांच हेमलेखा उठली व तिनें त्याला घेऊन येऊन

चांगल्या आसनावर बसविलें. नंतर योग्य उपचारांनीं त्याचा चांगला सत्कार करून अमृताच्या झऱ्यासारखें मधुर व तात्त्विक भाषण करण्यास तिनें आरंभ केला.

ती म्हणाली:—"जिवाच्या जिवलगा! पुष्कळ दिवसांनीं आपण भेटलांत! आपली शरीरप्रकृति चांगली आहे ना? किंवा नाहीं? मला सांगा. कारण इतक्या अवधींत आपण माझी आठवणहि कशी केली नाहीं! मला न भेटतां व मजशीं न बोलतां एक तासभरहि आपला कधीं जात नसे; आणि आज हें कसें झालें? मला वाटतें, आपण माझी अनुमति न घेतां स्वप्नांत सुद्धां एखादी गोष्ट केली नसेल, मग जागृतींत कोठून होणार? असें असतां हा काय प्रकार झाला तो समजत नाहीं! एकच रात्र मजवांचून युगाएवढी वाटावयाची, त्या आपण एवढ्या रात्री एकाकी कशा बरें घालविल्या?"

असें बोलून तिनें त्याला मिठी मारली; आणि ती क्षणभर अगदीं खिन्न होऊन गेली. पण या वेळीं हेमचूडाला प्रियेच्या आलिंगनानें थोडासा सुद्धां विकार उत्पन्न झाला नाहीं. तो उलट तिला म्हणाला:- "प्रिये, मला असा तूं मोह घालूं नकोस! मीं तुला आतां पूर्णपणें ओळखिली आहे. तुला खेद करण्याचें कांहींच कारण नाहीं. तूं ब्रह्मज्ञानी, अर्थात् मोठी धैर्यशालिनी आहेस; तुला असला मोह कसा स्पर्श करील? सध्यां मी तुला कांहीं विचारावयाला आलों आहें. तें काय तें तुला सांगतों ऐक. पूर्वीं जी तूं आपली कथा सांगितलीस, तिची नीट फोड करून मला सांग. तूं जी आई सांगितलीस ती कोण? सखी कोणती? तिचा पति तो कोण? तसेच तिचे ते मुलगे

वगैरे कोण? मला हें नीट समजावून सांग. तें मला चांगलेंसें समजलें नाहीं व तें तूं खोटें सांगितलें असेंहि आतां वाटत नाहीं. तर तूं तो खरोखर अन्योक्तीनें बोध केला आहेस. तेव्हां त्याचा खुलासा नीट करून दे, म्हणजे तें स्पष्ट माझ्या ध्यानांत येईल. माझें तुजवर अतिशय प्रेम जडलें आहे; माझ्या अंतःकरणांतील एवढा संशय प्रिये, तूं दूर कर."

असें हेमलेखेला विचारतांच हेमलेखेचे नेत्र व मुख अगदीं सुप्रसन्न झालें. तिच्या मनांत आलें कीं, हा आपला पति परमेश्वराच्या कृपेनें विषयांपासून पूर्ण विमुख झाला आहे. याचें चित्त शुद्ध झालें आहे. माहेश्वरी चिच्छक्तीनें याला आपलासा केला आहे. सारांश, याचें पूर्व पुण्य फलास आलें असल्यामुळें प्रबोधाची वेळ प्राप्त झाली आहे. तेव्हां आपण याला बोध करावा. असा विचार करून ती म्हणाली:—"प्राणनाथ! परमेश्वरकृपेनें आज आपणांला महाभाग्य प्राप्त झालें आहे! एरवीं असें विषयवैराग्य कोणालाच झालेलें आढळत नाहीं. परमेश्वरी प्रसाद झाल्याचें भोगवैराग्य हेंच प्रथम लक्षण समजावें.—आणि मनाची विचार-उन्मुखता हें दुसरें लक्षण होय. असो. तर आतां आपणांला मी माझी हकीकत स्पष्ट करून सांगतें. परा चिति ही माझी आई; आणि माझी सखी म्हणजे बुद्धि. ही बुद्धि जिच्या संगतीला लागली ती असती अविद्या. अविद्येचें चमत्कारिक सामर्थ्य तर जगांत स्पष्टच दिसून येतें. रज्जूच्या ठिकाणीं सर्पाचा आभास दाखवून तीच मोठी भीति उत्पन्न करिते. तिचा मुलगा म्हणजे महामोह. त्याचा मुलगा तें मन. त्याची स्त्री कल्पना. त्याला

जे पांच मुलगे झाले तीं पंच ज्ञानेंद्रियें. त्यांचीं स्थानें म्हणजे शरीरांतील त्यांचे गोलक. विषयांच्या सेवनानेंच मनाचे संस्कार बनत असतात. हीच मुलांनीं बापाला दिलेला पुष्टि. स्वप्न पाहणें हाच त्या मनानें चोरून घेतलेला भोग. कल्पनेची अत्यंत खादाड बहीण आशा ही होय. तिचे दोघे मुलगे म्हणून सांगितले, ते काम आणि क्रोध. माझें गांव म्हणजे शरीर. मजजवळचा जो महामंत्र म्हणून ह्मटला तो स्वस्वरूपाचें वारंवार होणारें स्फुरण. मनाचा प्रिय मित्र प्रचार म्हणून ह्मटला तो प्राण. अरण्य ह्मणून म्हटलें तो नरक. माझा बुद्धीशीं समागम म्हणजे चित्स्वरूपांत बुद्धीचा प्रवेश किंवा समाधि म्हणावयाचा. आणि प्रियकरा! माझ्या मातेच्या स्थानाची प्राप्ति म्हणजे मोक्ष. ही माझी हकीकत मीं सांगितली. प्रियकरा! याप्रमाणें सर्व विचार नीट समजावून घेऊन आपण परम पद प्राप्त करून घ्या म्हणजे झालें."

---

## प्रकरण ९ वें,

# पाहिजे तें मिळालें !

इत्युक्तः प्रियया हेमचूड आलक्ष्य तं पदम् ॥
चिरं विश्रांतिमालभ्य बहिर्विस्मरणं ययौ ॥ १०० ॥

याप्रमाणें हेमलेखेनें सांगितलेलें ऐकून हेमचूड अतिशय विस्मित झाला. आनंदानें त्याची वाणी अगदीं सद्गदित झाली. नंतर थोड्या वेळानें तो म्हणालाः—" प्रिये ! तुझी धन्य आहे, तूं अतिशय निपुण आहेस ! तूं सर्व आत्मस्थिति गोष्टीच्या रूपानें रचून सांगितलीस, तेव्हां तुझ्या या ज्ञानाची थोरवी मी किती वर्णन करूं ? अशा तऱ्हेची ही तुझी कथा मला प्रथम मुळींच कळली नाहीं. परंतु तुझ्या सांगण्यामुळें आतां तीच अगदीं स्पष्ट समजली. मला तिचें स्मरण होत आहे—अनुभव येतो आहे. अहाहा ! हा लोकव्यवहार किती अद्भुत आहे ? असो. पण प्रिये ! ती परा चिति कोण ? ती आपली माता कशी ? तिच्यापासून आपला जन्म कसा झाला ? आम्ही आहोंत कोण ? व आमचें स्वरूप तरी काय, हें मला सांग बरें !"

परशुरामा ! असें विचारल्यावर हेमलेखा पतीला म्हणाली, " प्राणनाथ ! हा विषय फार गूढ आहे. मी समजावून सांगतें; मात्र आपण फार जपून श्रवण करावें. प्रथम आपली बुद्धि अति शुद्ध करा, व तिच्या योगानें आपण आपल्या आत्म्याच्या स्वरूपाचा नीट विचार करा. नाथ ! तें आत्मतत्व दिसण्याजोगें नाहीं किंवा सांगण्याजोगेंहि नाहीं; तेव्हां मीं तें कसें निरूपण करावें ? अशा त्या स्वात्मस्वरूपाचें

आपणांस ज्ञान होईल तर आपण आपल्या मातेला ओळखाल. पण प्रियकरा! या स्वरूपाच्या ठिकाणीं कोणाचा उपदेशच चालत नाहीं. यासाठीं कोणा उपदेशकाची अपेक्षा न करितां शुद्ध बुद्धीच्या आश्रयानें स्वतःच आपण आपल्या स्वस्वरूपाचा शोध करा. देवादिकांपासून अगदीं क्षुद्र जंतूंपर्यंत प्रत्येकाला तें आत्मत्वानें भासत आहे; परंतु आकारानें मात्र दृश्य होत नाहीं. कोणतेंहि प्रमाण त्याला दाखवितां येत नाहीं, तरी तें सर्वांना, सर्व काळीं व सर्व ठिकाणीं अनुभवास मात्र येत आहे. त्याचें निरूपण अंशतः तरी कोण, कसा, केव्हां व कोठें करूं शकेल? नाथ! समजा, आतांच कोणीं म्हटलें कीं, माझा डोळा मला दाखव; तर येथें डोळा दाखविण्याचे कामीं जसा कोणा गुरूचा उपयोग नाहीं, कारण मोठा कुशल उपदेशक असला तरी तो डोळा कसा दाखविणार? —तेव्हां उपदेशकाचा उपयोग फक्त उपाय—मार्ग—दाखविण्यापुरताच आहे. यासाठीं मी आपणांला आत्मतत्व ओळखण्याचा फक्त मार्ग दाखवितें. आपण मन एकाग्र करून ऐका म्हणजे झालें. तो मार्ग असा कीं, आपणांला जें जें कांहीं माझें ह्मणून अनुभवास येत आहे, त्याहून वेगळें—अर्थात् ज्याला ‘माझें’ असें म्हणतां येणार नाहीं तें—तें तुमचें स्वरूप होय. एकान्तांत जाऊन नीट विचार करा. ज्याला ज्याला म्हणून ‘माझें’ असें म्हणतां येईल त्या सर्वांचा त्याग करून त्याहून भिन्न असलेल्या स्वस्वरूपाला चांगलें शोधून पहा. उदाहरणार्थ,—आपणांला मी भासतें, ती ‘माझी ही प्रिया’ अशी भासतें ना? अर्थात् माझ्या ठिकाणीं आत्मता संभवत नाहीं. संबंधवशात् मी आपणांला आत्मीय आहे, पण मी कांहीं

आपली स्वरूपभूत होत नाहीं. याप्रमाणें सर्व 'मम' भाव दूर करून शेवटीं ज्याचा त्याग करितां येत नाहीं अशा स्वस्वरूपाचा शोध घ्या व परम कल्याणाला पोंचा."

प्रियेनें इतकें सांगिल्यावर राजपुत्र हेमचूड तत्काळ उठला आणि इकडे तिकडे कांहीं न करतां चटकन घोड्यावर स्वार होऊन नगराच्या बाहेर आला. आणि आपल्या रम्य उद्यानांत शिरून त्याच्या अंतःप्रदेशीं असलेल्या स्फटिकाच्या मंदिराच्या उंच गच्चीवर चढून गेला. सेवकजनांना खालींच राहूं देऊन त्यानें द्वारपाळांना सक्त ताकीद देऊन ठेविली कीं, "मी एकांतांत विचार करीत बसत आहें. एथें कोणी प्रवेश करतां कामा नये. महाराज असोत, प्रधानमंडळी असोत किंवा आणखी कोणी असो; माझ्या परवानगीवांचून कोणालाहि येथें येऊं देऊं नका." असें सांगून तो त्या मंदिराच्या अगदीं नवव्या मजल्यावर गेला. तेथून खिडक्यांवाटे बाहेर पाहिलें तर सर्व दूरदूरचीं ठिकाणें दृष्टीस पडत, इतकें तें स्थान उंच होतें. तेथें एकांत साधून मऊ वस्त्राचें आसन घालून त्यानें आपलें चित्त अत्यंत शांत केलें, व तो विचार करूं लागला–

तो म्हणाला, "खरोखर हे सर्व लोक कसे बरे इतके मूढ झाले आहेत? यांत एकजण सुद्धां आपण कोण हें लेशमात्र सुद्धां जाणत नाहीं! आणि प्रत्येक जण अपणाकरितां म्हणून तर नानाप्रकारचे उद्योग करीत आहे! कोणी शास्त्रांचा पाठ करीत आहेत, कोणी वेद-वेदांगें घोकीत आहेत, कोणी द्रव्यसंपादन करीत आहेत, तर कोणी राज्यें चालवीत आहेत. दुसरे कोणी आपल्या शत्रूबरोबर युद्ध

करीत आहेत आणि कित्येक विषयभोग भोगण्यामध्यें तर अगदीं गढून गेले आहेत. हे सारे प्रकार आपणासाठीं म्हणून चालले आहेत, परंतु ते आपण कोण आणि कसे आहोंत, हें कोणीच ओळखीत नाहींत! काय हा भ्रमिष्टपणा! असो. मीहि आजपर्यंत स्वतः कोण हें न जाणतां कित्येक गोष्टी केल्या. पण तें सर्व स्वप्नाप्रमाणें निष्फल झालें. तर आतां मी स्वरूपाचाच विचार करतों. तेव्हां आतां हें राजमंदिर, हें धान्यादिक किंवा हें सारें राज्य, खजिन्यांतील संपत्ति, सुंदर स्त्रिया, हत्ती, घोडे इत्यादि यांतून कोणीसुद्धां माझें स्वरूप नव्हे हें अगदीं उघड आहे. कारण त्यांना ' मी ' असें म्हणतांच येत नाहीं. ते सर्व ' माझे ' ठरत आहेत. त्या अर्थीं मी ह्मणजे खरोखर हा देहच असलों पाहिजे. क्षत्रियाच्या पोटीं जन्मलेला, गौरवर्णाचा हा देह ह्मणजेच मी, यांत कांहीं शंका नाहीं. पण अरे, मजप्रमाणेंच हे लोकही आपापल्या देहांलाच मी समजतात! याप्रमाणें शंकित होऊन तो राजकुमार देहासंबंधीं आणखी विचार करूं लागला. शेवटीं त्यानें देहाला मी म्हणण्याचें खंडन करण्यालाच सुरुवात केली.

तो ह्मणाला " अहो! हा देह तर ' माझा ' म्हटला जातो! मग तो माझें स्वरूप कसा होणार? रक्तमांसाच्या या गोळ्यामध्यें प्रत्येक क्षणीं पालट होत आहे? यामुळें कालगतीनें यांतील एकूणएक कण नष्ट होऊन पुनः दुसरे कण यांत सांठून राहतात. याप्रमाणें बालपणींचे सर्व परमाणु तरुणपणापर्यंत लयास गेले; व असेंच सारखें चालू आहे; परंतु मी तर बालपणींहि आहे. व आजहि आहे. तेव्हां परमाणूंचा राशि जो देह तो मी कसा होईन? तसेंच मी

स्वप्नादि अवस्थांमध्यें असतों व हा देह काष्ठपाषाणांप्रमाणें कोठें तरी पडून राहतो. अर्थात् स्वप्न पाहणारा मी या देहाहून भिन्न आहें, हें उघड होतें. तसेंच 'देहच मी' म्हणावें तर झोपेंत तो मी आंथरुणावर पडलेला असतोंच. मग मला जवळपास कोणी आहे अथवा नाहीं हें कां कळत नाहीं? त्या अर्थी हें जाणणारा मी कोठें अन्यत्र असतों, असें म्हणावें लागतें. अथवा मी असतों हेंच कशावरून? छे, मी असतों हेंच खरें; कारण मी नसतों म्हणावें तर 'झोंप झाली' हा अनुभव मला कसा यावा? आणि तसा अनुभव येतो हें उघड आहे. मला जाणतां येतें हेंहि निर्विवाद आहे. कारण मी जर कांहींच न जाणणारा, अर्थात् जड असेन, तर मग स्वस्वरूपाचा विचार तरी कोण आणि कसा करणार? अर्थात् देहच मी हा विचार चुकीचा दिसतो. मी देह नव्हें, दुसराच कोणी आहे. मग या शरीराच्या आंत असणारा व त्याला चाळविणारा प्राणवायु तो मी असेन काय? हो! पण छे! तोहि कांहीं जाणण्यास समर्थ नाहीं. कारण झोंपेंत तो वाहत असूनहि आसपास काय चाललें आहे, याचें ज्ञान होत नाहीं. तर मन म्हणजे मी असेन कदाचित्. पण मन म्हणजे तरी काय आहे? अनेक वृत्ति मिळून मन होतें. मग त्यांतलि कोणती वृत्ति म्हणजे मी? शरीरांतील जसे परमाणु, तशाच मनाच्या वृत्ति; जातात व येतात. त्यांत कायमचें कोण आहे? तर मग मी म्हणजे कोण समजावा? हाच प्रकार बुद्धीचा. निश्चय हें तिचें स्वरूप. परन्तु निश्चय हाहि एक जातो, दुसरा येतो. आणि मी तर सदैव आहेंच. मी कधीं नाहीं असें तर केव्हांच होत नाहीं.

मग हा नेहमीं असणारा आणि जाणणारा मी आहे तरी कोण? आणि कसा आहे? शिवाय प्रियेच्या म्हणण्याप्रमाणें प्राण, मन, बुद्धि यांना 'मी' हा शब्द न लागतां 'माझे' शब्द लागतो. तेव्हां देहापासून बुद्धीपर्यंत सर्वांहून मी कोणी वेगळा आहे हें निःसंशय ठरलें. आणि मी म्हणजे सर्वदा जाणीवरूपानें आहे, यांत कांहीं शंका नाहीं! असा सर्वदा अनुभवास येणारा मी कोणत्या साधनानें अनुभवास येतो तें कांहीं मला स्पष्ट समजत नाहीं. पण हें मला कां बरें कळूं नये? जगामध्यें घटादिक वस्तु अनुभवास येतात त्या नेत्रें-द्रियामुळें येतात; त्यावांचून येत नाहींत. प्राण हा स्पर्शेंद्रियानें कळतो. मन आहे ही गोष्ट त्याला होणाऱ्या ज्ञानामुळें कळते. त्याच कारणानें बुद्धिहि ओळखितां येते. पण मी स्वतः कशामुळें अनुभवास येतों तें कळत नाहीं. आतां मला वाटतें कीं, या इतरांच्या भानामुळें मज आत्म्याचें भान होत नसावें. मग असें असेल तर, —हो! मी आतां या नाना पदार्थांचा संकल्पच सोडून देतों. म्हणजे मला माझ्या स्वरूपाचा स्पष्ट अनुभव येईल असा संभव आहे."

याप्रमाणें निश्चय करून त्यानें मनानें सर्व संकल्पांचा त्याग केला. त्या वेळीं एकाग्रतेंत गाढ अंधकार त्याच्या अनुभवास आला. तेव्हां हेंच आपलें स्वरूप असें वाटून त्याला अतिशय आनंद झाला. मग पुनः एकदां स्वरूपाचा अनुभव घेण्याचें त्याचे मनांत आलें. तेव्हां हठयोगानें त्यानें आपलें चंचल मन निरुद्ध केलें. त्याबरोबर एक दिव्य आणि अद्भुत तेज त्याच्या अनुभवास आलें. तें क्षणभर पाहून तो जागृत झाला, व हा काय प्रकार आहे म्हणून विस्मित

होऊन असा विचार करूं लागला कीं, अहो! स्वस्वरूपच असें अनेक प्रकारें कसें भासतें! पण पुनः पाहूं या एकदां. असें म्हणून त्यानें पुनः मन निरुद्ध केलें. तों तें पुष्कळ वेळ निद्रेंतच लीन होऊन गेलें. आणि तेवढ्यांत त्यानें एक विचित्र देखाव्याचें स्वप्न पाहिलें. थोड्या वेळांत सावध झाल्यावर या सर्व प्रकारामुळें त्याला मोठीच चिंता उत्पन्न झाली. तो म्हणूं लागला कीं, "निद्रेनें व्याप्त होऊन मीं हीं स्वप्नें कसलीं पाहिलीं? तो अंधकार व तें तेज पाहिलें तेंहि स्वप्नच होय! व स्वप्न म्हणजे मनाचाच विलास! तेव्हां हा प्रकार कसा टाळावा?" त्यानंतर पुनः एकदां निग्रह करून पहावें असा दृढ-निश्चय करून त्यानें चित्त पुनः एकाग्र केलें. तेव्हां तें किंचित् स्थिर झालें; त्या वेळीं त्याला आनंदाच्या समुद्रांत बुडून गेल्यासारखा अनुभव आला! पुनः चित्ताच्या चाळवणीमुळें लगेच तो सावध झाला. मग मनाशीं विचार करूं लागला कीं, "हें काय मला स्वप्न पडलें? कीं कांहीं चित्तभ्रम झाला? किंवा हा सर्व प्रकार खराच आहे? मला मोठा चमत्कार वाटतो! मी कोणत्याच विषयाचा अनुभव तर घेतला नाहीं, मग मला सुख कसें वाटलें? अहो! या सुखाच्या लेशाचीहि सर दुसऱ्या कशाला यावयाची नाहीं! मी झोंपेप्रमाणें अंतर्बाह्य विसरून गेलों असतां हें सुख तेथें कोठून आलें? सुख होण्याचें कारण तर कांहींच सांपडत नाहीं, मग तें व्हावें कसें? आत्म्याच्या शोधासाठीं तर मी प्रवृत्त झालों, परंतु तो प्राप्त झालाच नाहीं, आणि कांहीं निरनिराळेच प्रकार मला दिसून आले! हें काय असावें? मग काय प्रकाश हा आत्मा? कीं अंधकार हा आत्मा? किंवा सुख

हा आत्मा ? कीं दुसराच कोणी आत्मा आहे ? किंवा हीं सर्वच स्वरूपें आत्म्याचीं आहेत ? छे ! याचा निर्णय होत नाहीं. तर आतां हें आपल्या चतुर प्रियेला विचारावें म्हणजे बरें."

याप्रमाणें निश्चय होतांच राजपुत्रानें द्वारपाळाला बोलाविलें, व हेमलेखेला आपणाकडे घेऊन येण्याचा त्यास हुकूम केला. थोडयाच वेळांत, द्वारपाळानें सांगितलेल्या निरोपावरून, ती ज्ञानमनोहर रमणी त्या स्थानीं प्राप्त झाली. तो तेथें राजपुत्र हेमचूड शांत चित्तानें एका आसनावर स्थिर होऊन बसलेला तिच्या दृष्टीस पडला. त्या वेळीं त्याचा श्वासोच्छ्वास अगदीं संथपणें चालला होता. चित्त चलनरहित झालें होतें. सर्व इंद्रियगणाचाहि उपसंहार झाला होता. हें पाहून ती अगदीं जवळ जाऊन त्याच्याच आसनावर बसली. ती जवळ येऊन बसतांच त्यानें डोळे उघडले, तों शेजारीं हेमलेखा बसलेली त्यास दिसून आली. दृष्टादृष्ट होतांच हेमलेखेनें प्रेमानें त्याला आलिंगन दिलें, आणि ती अमृतासारख्या मधुर वाणीनें म्हणाली:—

"प्राणनाथ, आपण कां बरें बोलावणें केलेंत ? आपली प्रकृति ठीक आहे ना ?"

याप्रमाणें प्रियेनें विचारल्यावर राजपुत्र हेमचूड म्हणाला, "प्रिये ! तुझ्या सांगण्याप्रमाणें मी आत्मस्वरूपाचें दर्शन घ्यावें म्हणून या एकांतांत येऊन बसलों व अगदीं तन्मय होऊन गेलों. परंतु मला कांहीं निरनिराळेच चमत्कार दृष्टीस पडले. ते काय ? प्रथम माझा असा विचार झाला कीं, आत्मा हा सर्वदा प्राप्तच असणार; शिवाय तो नित्य प्रकाशमान आहे. तेव्हां तो स्पष्टपणें अनुभवाला जो येत

नाहीं, तो दुसऱ्या अनात्मवस्तूंच्या अनुभवामुळें येत नसावा. व असें समजून मी बाह्य व आंतर सर्व भास निरुद्ध करून चित्त स्थिर केलें. पण इतकें करून मला कांहींच समजलें नाहीं! प्रथम मीं तेथें अंधकार पाहिला; एकदां प्रकाश पाहिला; एकदां एक स्वप्नच पाहिलें. एकदां तर तेथें मला अगदीं महासुख प्राप्त झालें! तेव्हां प्रिये, हें काय झालें तें मला सांग. आत्म्याचें हेंच स्वरूप आहे किंवा कांहीं निराळेंच आहे? चांगलें खुलासेवार सांग, म्हणजे मला तो आत्मा नीट ओळखितां येईल."

असें विचारल्यानंतर ती ब्रह्मज्ञानी स्त्री हेमलेखा म्हणाली- "प्राणनाथ! नीटपणें सांगतें, आपण अगदीं एकाग्रतेनें श्रवण करा. आपण बाह्यनिरोध करण्याचा जो प्रयत्न केलात, तो फार चांगला केलात. सर्व आत्मवेत्त्यांना तो फार पसंत आहे. त्यावांचून कोठेंच कोणाला स्वरूपदर्शन झालेलें नाहीं. पण प्रियकरा, हा बाह्यनिरोध कांहीं आत्म्याच्या प्राप्तीचें कारण म्हणतां येत नाहीं. कारण आत्मा हा प्राप्तच आहे. तो प्राप्त व्हावयाचा असेल तर तो आत्मा कसला? आणि जो आत्माच आहे तो प्राप्त होणार कोठून? आत्मा सर्वथा अप्राप्य आहे; त्याची प्राप्ति संभवत नाहीं. जें प्राप्त झालें नाहीं, त्याची प्राप्ति होऊं शकते; प्राप्ताचीच प्राप्ति ती पुनः कशी व्हावयाची? आणि म्हणूनच आत्म्याची प्राप्ति अशक्य आहे. मनाचा निरोध हा त्याच्या प्राप्तीसाठीं मुळींच नव्हे. याला असें उदाहरण पहा कीं, एखादी वस्तु अंधारानें दिसेनाशी होते. मग दिवा वगैरेच्या निमित्तानें त्या अंधाराचें निवारण केल्यावर तीच वस्तु पुनः नव्याने-

माणें आपणांला प्राप्त होते. अथवा–कोणाचें चित्त ठिकाणावर नसलें म्हणजे कोठें तरी ठेवलेल्या सुवर्णाचें त्याला विस्मरण होतें. मग मनांतले अन्य विचार दूर करून अगदीं लक्ष देऊन स्मरण केल्यावर तें नष्ट झालेलें सुवर्ण जसें त्याला पुनः प्राप्त होतें, तसेंच हें आहे. अन्य विचार दूर करणें हा वस्तुतः पाहतां सुवर्ण प्राप्त होण्याचा उपाय नव्हे, त्याचप्रमाणें बाह्य पदार्थांचा निरोध करणें हें कांहीं आत्मप्राप्तीचें मूळ कारण नव्हे. असो; आतां आपणांला आत्मा ओळखतां आला नाहीं, याचें कारण तो आपणांस सांपडला नाहीं हें नव्हे; तर तो आपणांला परिचित नव्हता, इतकेंच. म्हणजे जसा कोणी मनुष्य रात्रीचा राजाच्या सभेंत गेला, तेथें त्यानें सर्व सभासद पाहिले, लावलेले दिवे पाहिले, परंतु प्रकाश म्हणजे काय एवढें माहीत नसल्यामुळें त्या सभेंत उजेड कसा पडतो हें कांहीं त्यास उलगडलें नाहीं. तसा आपला प्रकार झाला. तर प्रियकरा, ऐका; मी सांगतें. निरोध केल्यानंतर आपण अंधकार पाहिलात ना? तर तो अंधकार पाहण्यापूर्वीं आणि निरोधानंतर मध्यकाळीं जी कांहीं आपली अवस्था होती, तिचीच सदोदित भावना धरा, म्हणजे झालें. तेंच तुमचें स्वरूप होय. तोच परमानंददायक भाव होय. त्याच स्थानीं सर्व बहिर्मुख लोक महामोहानें ग्रस्त होऊन जातात. शोध करून थकतात, परंतु स्वतः त्या पदाला पोंचत नाहींत! जगावर पुष्कळ शास्त्रवेत्ते आहेत, बुद्धिमान् आहेत, तर्कनिपुण आहेत, परंतु या स्वरूपाचें ज्ञान नसल्यामुळें ते सर्व रात्रंदिवस दुःख भोगीत आहेत! शब्दांचा अर्थ करण्याची कला आल्यानें तें परम पद प्राप्त

होत नाहीं. अथवा कोणी पंडित त्याचा शोध करीत आहे, किंवा त्यासंबंधानें विचार करीत आहे, तर तोंवर त्याला तें पद प्राप्त झालें नाहीं, असें समजावें. कारण तें कांहीं ग्राह्य आहे असें नाहीं. कोठें दूर जाऊन तें मिळण्याजोगें नाहीं. बसल्या जागींच तें सदोदित प्राप्त आहे. तें विचारानें समजेल असें नसून विचार चालू नसतांनाच तें प्रकाशित होतें. किंबहुना, तें त्या दोन्ही अवस्थांत स्वरूपानें स्थितच आहे. धावण्यानें जशी मस्तकाची छाया हातीं लागत नाहीं, त्याप्रमाणें एखाद्या क्रियेच्या योगानें तें मिळणारें नव्हे. ज्याप्रमाणें एखादें बालक जवळच्या आरशांत पडलेलीं हजारों प्रतिबिंबें पाहतें, परंतु आरसा मात्र पाहूं शकत नाहीं, त्याप्रमाणें हे सर्व लोक आत्मस्वरूप महा आदर्शाच्या ठिकाणीं प्रतिबिंबित झालेलें जगच्चित्र अवलोकन करीत असून, केवळ ओळख नसल्यामुळेंच त्या आत्म्याला मात्र जाणत नाहींत! जसा कोणी मनुष्य आकाशाची ओळख नसल्यामुळें आकाशांतच असणारे हे जगत्पदार्थ प्रत्यक्ष पाहतो, परंतु आकाश काय तें जाणत नाहीं, तसा हा आत्मस्वरूपाचा प्रकार आहे. तेव्हां प्रियकरा! आपण अत्यंत सूक्ष्मदृष्टीनें विचार करा. हें सर्व दृश्य जगत् ज्ञान आणि ज्ञेय या दोनच प्रकारांनीं बनलें आहे. त्या दोहोंमध्यें ज्ञान म्हणजे जाणीव हें स्वतःसिद्ध आहे. तें नसेल तर मग कांहींच नाहीं. सर्व प्रमाणांना तेंच आधारभूत आहे. अर्थात् तें स्वयमेव आहे. त्याला अन्य प्रमाण म्हणून नाहीं. आणि त्याला प्रमाणांची अपेक्षा नसल्यामुळेंच तें सर्वादिसिद्ध आहे. अमुक एक साधन आणि तें त्याची सिद्धि करितें, अशा प्रकारची त्याची सिद्धि नाहीं. यावर

" मग तें ज्ञान आहेच कशावरून ? " असें आपण म्हणाल, तर—ज्ञानच वस्तुतः नसेल तर मग त्यावर आक्षेप तरी कसचा व उत्तर तरी कसचें ? दोन्ही नाहींत. अर्थात् तो आक्षेप संभवत नाहीं. तेव्हां त्याचा अभाव होणें शक्यच नाहीं. एखाद्या मोठ्या आरशाच्या भिंगाप्रमाणें त्याचें स्वरूप आहे. दर्पणांतील प्रतिबिंबाप्रमाणें त्याच्यावरच हें सर्व जग भासमान होतें. अमुक देश व अमुक काल, अशी त्याला मर्यादाच बसत नाहीं. देश व काल हीं दोन्हीहि त्याच्याच आंत भासमान होणारीं असल्यामुळें त्यांची त्याला मर्यादा कशी बसणार ? त्याला ज्ञान असें ह्मणण्यामुळें जो मर्यादितपणा येत आहे, तो, आकाशांतील वस्तूंनीं आकाशाला व्यापावें, त्याप्रमाणें आभास होय, वस्तुतः नव्हे. प्रियकरा ! असें हें आपलें स्वरूप आहे. आपण सूक्ष्म बुद्धीनें ध्यानांत घ्या. त्याच सर्वसामान्य ज्ञानावर—चैतन्यावर— हें जगत् विराजत आहे. त्याच्याशीं एकरूपतेचा अनुभव घेऊन तो अनुभव सहजसिद्ध झाला म्हणजे पुरुषाला सर्व जगत्कर्तृत्व प्राप्त होतें. प्रियकरा ! त्याला शोधण्याचें स्थान आतां सांगतें, म्हणजे तें पद आपणांस प्राप्त होईल. ( १ ) निद्रा व जागृति यांच्या मध्य अवस्थेमध्यें, अथवा ( २ ) एक वस्तूचा आकार सोडून चित्त दुसऱ्या पदार्थावर जाण्याचा आधीं, अथवा ( ३ ) हृदयांतून निघालेली वृत्ति पदार्थावर पोंचावयाची आहे तों, जी स्थिति असते ती आपण सूक्ष्म बुद्धीनें ध्यानांत घ्या. हेंच परमपद व हेंच आत्मस्वरूप. हें प्राप्त झालें असतां पुनः म्हणून मोहित व्हावें लागत नाहीं. याच्या अज्ञानाच्या योगानेंच हें जगत् एवढें विस्तृत झालें आहे. प्राणनाथ !

त्या आत्मस्वरूपाच्या ठिकाणीं रूप नाहीं, रस नाहीं, गंध नाहीं, स्पर्श नाहीं, शब्दहि नाहीं. तेथें दुःख नाहीं व सुख नाहीं. तें आत्मस्वरूप ग्राह्यहि नव्हे व ग्राहकहि नव्हे. तेंच या सर्वांला आधार आहे; तेंच हीं सर्व रूपें नटतें; अथवा त्याच्या ठिकाणीं ही सर्वता मुळींच नाहीं असेंहि म्हणतां येतें. हाच सर्वेश्वर होय. हाच विष्णु, हाच शंकर व हाच ब्रम्हदेव. चित्ताला किंचित् स्थिर करून, केवल सद्रूप आत्म्यानेंच आत्म्याला पहा. चित्त दृश्यावरून काढून अंतर्मुख करून, 'आंता मी पाहतों' हाहि अभिनिवेश अंधाप्रमाणें सोडून, अगदीं निश्चल होऊन, पाहणें व न पाहणें या दोन्ही भावना विसरून, मग जे कोणी असाल ते आपण आहांत. यासाठीं विलंब न लावितां त्याच अवस्थेचें आपण सेवन करा."

हेमलेखेनें याप्रमाणें सांगितल्यावर थोड्या विचारानेंच तें आत्मपद हेमचूडाच्या अनुभवास आलें. त्याबरोबर त्याला निर्विकल्पसमाधि प्राप्त होऊन देहाचें व बाह्य जगाचें त्याला पूर्ण विस्मरण झालें!

---

## प्रकरण १० वें,

# सारेच ज्ञानी!

एवं तत्र नरा नार्यो दासा दास्यो नटा विटाः ॥
सर्वे वेदितवेद्यास्ते विशालनगरेऽभवन् ॥ ५९ ॥

यानंतर, आपल्या प्रियकराला परमात्मास्थिति प्राप्त झाली आहे असें पाहून हेमलेखेनें त्याच्या समाधीचा भंग न करितां त्याला त्या स्थितींत तसेंच राहूं दिलें. नंतर एका मुहूर्तानें तो सावध झाला व डोळे उघडून त्यानें आपली स्त्री आणि हें बाह्य जगत् अवलोकन केलें. परंतु तत्काळ त्याला त्या समाधींत राहण्याची इच्छा होऊन तो त्वरेनें डोळे मिटून घेऊं लागला. तो अशी तयारी करीत आहे तोंच ती सुधामधुरभाषिणी हेमलेखा प्रियकराचा हात आपल्या हातीं घेऊन म्हणाली:—"महाराज! आपण काय बेत केला आहे, तो मला समजत नाहीं! सांगा बरें! डोळे झांकून किंवा उघडे करून आपणाला कोणता लाभ किंवा हानि व्हावयाची आहे? डोळे उघडल्यानें काय नाहींसें होतें व ते झांकले म्हणजे काय प्राप्त होतें? प्रियकरा! आपली काय भावना ती मला ऐकायची आहे."

याप्रमाणें हेमलेखेनें विचारलें, त्या वेळीं राजपुत्र हेमचूड मदानें मत्त झाल्याप्रमाणें आळसला असून बोलण्याला अगदीं कंटाळला होता. तरी त्या आळसाच्या भरांतच तो म्हणाला:—"प्रिये! पुष्कळ दीर्घ कालानें मला आज हें अत्यंत विश्रांतीचें स्थान प्राप्त झालें. दुःखानें भरलेल्या या बाह्य रुक्ष जगांत विसाव्याची जागा

आहे कोठें? चोयट्या चोखण्यासारखा हा बाह्य व्यवहार, मला वाटतें आतां पुरे झाला! दुर्दैवानें आंधळ्याप्रमाणें मला हें आत्मथितीचें सुंदर सुख आजपर्यंत प्राप्त झालें नव्हतें. आणि जसा एखादा मनुष्य आपल्या घरचा द्रव्याचा ठेवा न जाणतां भिक्षा मागत फिरतो, त्याप्रमाणें मी स्वसुखाचा सागर न ओळखतां, दुःखसमुदायानें भरून गेलेलें विषयसुखच श्रेष्ठ समजून राहिलों. विजेप्रमाणें क्षणांत विनाश पावणारें तें सुख मला स्थिर आहेसें वाटलें व अशाच्या मागें लागल्यामुळें मला फार दुःख भोगावीं लागलीं! स्वस्थपणा मुळींच मिळाला नाहीं. अरेरे! या लोकांना सुख आणि दुःख यांचें विचारपूर्वक ज्ञान झालेलें नाहीं! सुखाची इच्छा करितात आणि मूर्खासारखे सदैव दुःखाचे ढीगच्या ढीग जमा करून ठेवतात. तेव्हां प्रिये! प्रयत्न करावा आणि दुःख भोगावें हें आतां पुरे झालें. मजवर तूं कृपा कर, मी तुला हात जोडून प्रार्थना करितों. सुखमय आत्मस्थानीं चिरकालिक विश्रांति घेण्याची मला आतां उत्कंठा झाली आहे. व प्रिये! अरेरे! तूं सुद्धां दुर्दैवीच आहेस. तूं हें परम पद जाणत असूनहि ती विश्रांति सोडून वेडेपणानें दुःखासाठीं कां धडपडतेस?"

असें त्यानें म्हटल्यावर ती चतुर स्त्री किंचित् स्मित करून पुनः आपल्या प्रियकराला म्हणालीः—" प्राणनाथ! मला खेद वाटतो कीं, आपण तें परम पावन पद जाणलें नाहीं! जेथें गेल्यानंतर अंतःकरण निखालस खुलें होतें आणि पुनः मोह म्हणून होत नाहीं, तें स्थान आपणांला, पृथ्वीवरच्या मनुष्याला जसें आकाश, त्याप्रमाणें अद्याप पुष्कळ दूर आहे. आपण जें कांहीं चांगलें जाणलेंत तें न जाणल्या-

सारखेंच झालें! प्रियकरा, डोळे झांकून किंवा उघडून तें स्थळ पाहतां येतें काय? एखादि कृति करून अथवा ती करण्याचें टाळून तें पद कोणालाच प्राप्त होत नाहीं. एखादे ठिकाणीं जाण्याचें बंद करून अथवा दुसऱ्या कोठें जाऊन तें स्थान सांपडत नाहीं! डोळे झांकले, किंवा एखादी क्रिया केली, अथवा कोठें जावें लागलें, आणि मग जर कांहीं प्राप्त झालें तर तें पूर्ण कसें ह्मणतां येईल हें सांगा बरें? तांदुळाच्या चार दाण्यांएवढा जिचा आकार, ती पापणी उघडण्याबरोबर जर तें अंतर्धान पावतें, तर तें खासेंच पूर्ण पद ह्मणावयाचें! वाहवा! राजकुमार, केवढा हा मोह? काय आश्चर्य सांगावें? अहो! कोट्यवधि ब्रह्मांडांच्या ओळी जेथें एका कोपऱ्यांत पडून राहिल्या आहेत, तें स्वस्वरूप बोटाएवढ्या पापणीच्या उघडण्याबरोबर लुप्त होतें काय? राजन्, आपणांला मी हें सर्वांचें अगदीं सार सांगतें, आपण नीट ऐका:—जोंवर हृदयग्रंथि फुटल्या नाहींत तोंवर सुख प्राप्त होत नाहीं. या हृदयग्रंथि कोट्यवधि असून त्या मोहनामक दोरीवर दिलेल्या आहेत. स्वरूपाचें अज्ञान ही ती मोहरज्जु व तिच्यावर विपरीतभ्रमात्मक ग्रंथि पुष्कळ आहेत. त्यांत, 'देहादिकांच्या ठिकाणीं आत्मत्व असल्याचा निश्चय होणें' ही मुख्य—पहिली—ग्रंथि. तिच्याच योगानें हा संसार एवढा अवाढव्य व अनिवार झाला आहे. तशीच 'केवळ भासमात्रक जगताच्या ठिकाणीं आत्मा नाहीं' असा निश्चय होणें, ही दुसरी ग्रंथि होय. याचप्रमाणें जीव व ईश्वर हे निराळे, किंवा जीव परस्पर निरनिराळे इत्यादि निश्चय या सर्व ग्रंथिच होत. हें स्वरूपाचें अज्ञान अनादि कालापा-

नसू उत्पन्न झालें असून पुनः तें दुमडून ग्रंथिरूपाला आलें आहे. त्यामुळेंच पुरुष बद्ध झाला आहे. त्या ग्रंथि उलगडल्या म्हणजे बंधापासून मुक्ति होते. तेव्हा आपण जें डोळें झांकून तें पद प्राप्त करूं इच्छितां तें पुष्कळ झालें. तें पद, तें आपलें निजरूप म्हणजे सर्व आकारांचा निरास केल्यावर उरणारी शुद्ध संवित् तेंच तें होय. तेंच या सर्व संसाराचें चित्र दाखविणारें, आरशाचें मोठें भिंग होय. तेव्हां तें आतां केव्हां कोणत्या रूपांत नाहीं तें मला दाखवा बरें? ती आत्मसंवित् जर अमुक काळीं अमुक ठिकाणीं अमुक रूपानें नाहीं, असें आपण म्हणाल, तर तो देश आणि तो काल हींच वंध्यापुत्राप्रमाणें मिथ्या ठरतात! आदर्शावांचून जसें प्रतिबिंब संभवत नाहीं, तसेंच हेंहि असंभाव्य होय. सारांश, त्या संवित्पदाच्या अभावीं कोठेंच कांहीं नाहींसें होतें. तेव्हां तें आपल्या आपल्या डोळे उघडण्यानें कसें लुप्त होणार? जोंपर्यंत 'मी तें जाणतों' अशी बळकट गांठ हृदयांत आहे, तोंवर तें पद प्राप्त झालेंच नाहीं, हेंच खरें; अथवा जर प्राप्त झालें असेल तर तें तें नव्हे. डोळे झांकून किंवा उघडून जें पद प्राप्त झालें आहे असें आपण समजतां, तें पूर्णपद नव्हे; कारण आपण त्याला कालक्रियादिकांची मर्यादा घालतां! अहो राजपुत्र! ही कालाग्नीसारखी तेजस्वी महा संवित् कोठें नाहीं पहा बरें? नाना कल्पनारूपी इंधनराशीला ही संवित् अग्निप्रमाणें आत्मरूप करून टाकते. तें परम पद जाणल्यानंतर मग नेत्रोन्मीलनादि कोणतेंच कर्तव्य आपल्याला राहणार नाहीं. 'मी मनाचा निरोध करून तें पाहतों' ही हृदयांतील ग्रंथि आपण

सोडून द्या. हें जगत् आत्मरूप नाहीं, दुसरेंच कांहीं आहे, हीहि दृढग्रंथि आपण निर्मूळ करा. आणि चोहोंकडे अखंड आनंदानें दाटून राहिलेलें आत्मरूप पहा. दर्पणांतील प्रतिबिंबाप्रमाणें सर्व लोक आत्मस्वरूपावर भासतात, हें पाहूं लागा; व ' मी सर्वत्र आत्मरूप पाहतों ' ही भावनाहि पुनः न करितां सामान्य चैतन्याशीं मिळून जाऊन स्वरूपांत स्वस्थ असा."

याप्रमाणें प्रियेचें भाषण ऐकल्यानंतर हेमचूडाचें अंतःकरण अगदीं गार झालें. त्याची सर्व भ्रांति दूर झाली व पूर्ण आत्मस्वरूप ह्मणजे काय हें त्याला कळलें. क्रमानें पूर्ण तद्रूपता प्राप्त होऊन त्याला स्थैर्य प्राप्त झालें. त्यानंतर त्यानें पृथ्वीवर राहून हेमलेखादि स्त्रीजनां-बरोबर पुष्कळ विहार केले. मोठें विस्तृत राज्य चालविलें. प्रसंगीं रणांत जाऊन शत्रूंनाहि जिंकलें. नाना शास्त्रांचें श्रवण केलें. तीं लोकांना ऐकविण्याची व्यवथा केली. द्रव्यसंचय केला. अश्वमेध, राजसूय इत्यादि प्रमुख यज्ञ केले. याप्रकारें तो दोन अयुत वर्षें जीव-न्मुक्त अवस्थेचा अनुभव घेत राहिला. पुढें हेमचूड जीवन्मुक्तदशेंत विहार करितांना पाहून राजा मुक्ताचूड आणि त्याचा बंधु मणिचूड यांच्याहि मनांत एकदां विचार उत्पन्न झाला कीं, हा पूर्वीप्रमाणें हल्लीं कां बरें दिसत नाहीं ? सुखामध्यें अतिशय आनंदत नाहीं; दुःखामध्यें उदास होत नाहीं; आणि लाभ हानि, शत्रु-मित्र इत्यादि याला सारखेच वाटतात ! तर हें कशामुळें घडून आलें ? नाटकां-तील पात्राप्रमाणें हा राजकारणहि केवळ लीलेनें पाहतो ! मदानें सदोदित गुंगल्यासारखा तर दिसतो ! मन कोठें तरी दुसरीकडे

गेल्यासारखें सदोदित भासतें. पण कार्य तर सर्व करितो! तर हें कशानें व्हावें? असा विचार आल्यावर त्या दोघांनीं एकातांत त्याची भेट घेऊन, 'हेमचूडा! तुला ही स्थिति कशानें प्राप्त झाली?' असा प्रश्न केला. तेव्हां हेमचूडानें क्रमानें त्या दोघांना आत्मस्थितीचें मर्म समजावून सांगितलें. नंतर हेमचूडानें बोध केल्यामुळें ते दोघे—पिता मुक्ताचूड व बंधु मणिचूड—परम पद प्राप्त करून घेऊन जीवन्मुक्त स्थितीस पोंचले. पुढें प्रधानमंडळीनेंहि राजापासून जगाचें गूढ समजावून घेऊन आत्मतत्वाचा विचार केला. तेव्हां तेहि ज्ञानी झाले. याप्रमाणें त्या विशालनगरांत परस्परापासून उपदेश घेऊन क्रमाक्रमानें सर्वांनींच तें तत्त्व जाणलें. तेथील पुरुष, स्त्रिया, मुलें, वृद्ध, दास, दासी, किंबहुना गुराखीसुद्धां ज्ञानी झाले! सर्वांचा देहाहंभाव पूर्ण गळाला! कोणाचाहि काम, क्रोध किंवा लोभ मर्यादेबाहेर म्हणून राहिला नाहीं; सर्व लोक कामक्रोधांना जिंकून व्यवहार करूं लागले. परब्रह्माच्या गोष्टी सांगून माता मुलांना खेळवूं लागल्या. दासदासी ब्रह्मविचाराच्या कथा परस्परांमध्यें बोलत स्वामिसेवा करूं लागल्या. नट तात्त्विक कथाप्रसंगांनीं भरलेलीं नाटकें लिहूं लागले. गवई लोक ब्रह्मबोधाच्या विवेकवार्तांचीं गाणीं गाऊं लागले. विदूषक होते ते लोकव्यवहाराचा उपहास करूं लागले. आणि परतत्त्वाच्या विचारांनीं व उदाहरणांनीं सुंदर झालेलीं शास्त्रें शास्त्री लोक शिष्यांना पढवूं लागले. अशा प्रकारें तेथें पुरुषस्त्रिया, चाकरलोक, नाटकी, शिपाई, सरदार, मुत्सद्दी, कारागीर, वेश्या सारे लोक ब्रह्मज्ञानी झाले. व त्यांचा व्यवहार प्राक्तन संस्कारवशात् चालूं लागला. घडली

गोष्ट ती शुभ किंवा अशुभ यासंबंधीं कोणी आठवणसुद्धां ठेवीत नसत. आणि होणाऱ्या गोष्टीपासून आनंद होईल किंवा दुःख होईल याकडे लक्ष देत नसत. फक्त सद्यःकालीं हंसावें, आनंद करावा; अथवा प्रसंगवशात् खेद करावा किंवा रागवावेंहि. अशा प्रकारें मधमाशीप्रमाणें सर्व लोक नित्य व्यवहार करूं लागले.

दत्तात्रेय पुढें सांगतात, परशुरामा! तेथील पोपटहि पिंजऱ्यांतून ब्रम्हविद्येचा उपदेश करीत; व प्रसंगवशात् सनकादिकांनीं त्यांचे ते शब्द ऐकून त्या नगरास 'विद्यानगर' ह्मणून नांव दिलें, हें तुला पूर्वीं सांगितलेंच आहे.[1]

याप्रमाणें तेथें पूर्वीं हेमलेखेनें बोध केलेला राजा हेमचूड जीवन्मुक्त तत्त्ववेत्ता होऊन गेला. सारांश,—परम कल्याणाचें पहिलें साधन सत्संग हें आहे. म्हणून ज्याला परमकल्याणाची इच्छा असेल, त्यानें संतांचा सहवास धरावा.

---

१. प्रकरण ४, पृष्ठ ३६।३७ पहा.

## प्रकरण ११ वें,

# जगताची मीमांसा.

स्वतो न भासते क्वापि भासते चित्समाश्रयात् ।
अतो जगत् स्यादादर्शप्रतिबिंबसुसंमितम् ॥ ६१ ॥

याप्रमाणें हेमचूडाची अद्भुत हकीकत ऐकून झाल्यानंतर परशुरामाला कांहीं संशय उत्पन्न झाला. तेव्हां तो श्रीगुरूस म्हणालाः— "भगवान्! सद्गुरो! आपण हें मोठें अद्भुत ह्मणून जें ज्ञान सांगितलें, तें मला वाटतें मोठें चमत्कारिक किंबहुना सर्वतोपरी अशक्य आहे! कारण कीं, हें दृश्य विश्व आपण म्हटलें तसें केवळ चैतन्यस्वरूपच कसें असणार? तें तसें आहे हें प्रत्यक्ष पाहतां येण्याजोगें नसल्यामुळें केवळ श्रद्धा ठेवून मानण्यापलीकडे दुसरा उपाय दिसत नाहीं. कारण चेत्य पदार्थांपासून चैतन्य वेगळ्या रीतीनें केव्हांच अनुभवास येणारें नाहीं! तेव्हां हें मुळींच जमत नाहीं; मग तें मनाला कसें पटणार? तेव्हां कृपाळूपणानें मनापासून मला हें आपण समजावून द्या; मी संशयित झालों आहें."

असा प्रश्न विचारल्यावर श्रीदत्तात्रेय परशुरामास ह्मणाले, "परशुरामा ऐक! तुला दृश्याचें तत्त्व नीट समजावून सांगतों. हें सर्व दृश्य केवळ दृङ्मात्र आहे, दुसरें कांहीं नाहीं. याला मी उपपत्ति सांगतों, तूं अगदीं एकाग्र चित्तानें ऐक. हें दृश्य जगत् हें एक कार्य आहे. कारण याची उत्पत्ति होतांना आढळून येते. उत्पत्ति म्हणजे नवीनपणानें भासणें. याप्रमाणें पाहतां प्रत्येक क्षणाला जगत् नूतन-

रूपानें भासमान होत आहे. कोणी ह्मणतात, जग हें प्रत्येक क्षणीं पालटणारें पण नदीप्रमाणें प्रवाहरूपानें नित्य आहे. दुसरे कोणी म्हणतात, स्थावर आणि जंगम पदार्थांच्या समुदायानें तें बनलें आहे. पण कांहींहि असलें तरी तें उत्पन्न झालें आहे, हें निश्चित आहे. आतां तें कारणावांचून आपोआपच—स्वभावतःच उत्पन्न झालें आहे असें म्हणणें योग्य होत नाहीं; कारण मग आपोआपच उत्पन्न व्हावयाचें तर कुंभ हा कुंभच कां व्हावा? वस्त्रच कां होऊं नये? म्हणजे ही शिस्त आपोआप कशी राहते? आणि तशी ती न राहिल्यास व्यवहार कसा चालणार! शिवाय कार्य व कारण यांचे संबंधहि सर्वत्र असे निश्चित आढळतात कीं, योग्य सामग्री असली कीं कार्य उद्भवतें, तींत कांहीं उणें पडल्यास तें होत नाहीं. त्या अर्थी स्वभावतः जगत् उत्पन्न होणें संभवनीय नाहीं. आणखी असें पहा कीं, जें कार्य जसें कारण्यास जावें तें तसें सफल होतें, असाहि अनुभव आहे. तेव्हां अशा प्रकारचें जगत् आपोआप झालें, असें कसें म्हणावें? आतां जरी जगाचें कारण दिसून येत नाहीं; तरी तेवढ्यावरून त्याला कारण नाहींच असें कांहीं म्हणतां येत नाहीं. कारण, पुष्कळ बाबतींत जो न्याय लागू होतो तो येथेंहि पत्करणें योग्य आहे. म्हणजे ज्या अर्थीं पुष्कळ वेळां कार्याच्या मूळाशीं कारण आहे असें आढळतें, त्या अर्थीं कोठें तें दिसलें नाहीं, तरी तें असावें, असेंच मानिलें पाहिजे. एरवीं सर्व लोकांच्या चाललेल्या व्यवहारास विरोध येईल. तेव्हां साऱ्याच गोष्टी सकारण आहेत. आणि याचसाठीं कांहीं कार्य करावयाचें असल्यास लोक त्याचीं साधनें जमवूं लागतात. सर्वत्र

असेंच नित्य आढळतें. तेव्हां जगत् आपोआप उत्पन्न झालें हें म्हणणें संभवत नाहीं. दुसरे कोणी म्हणतात, "हें जगद्रूप कार्य अव्यक्त अशा जड परमाणूंनीं बनलें आहे." परन्तु जगत् हें व्यक्त, अतएव त्यांशीं अत्यंत भिन्न रूपाचें, आणि नाशानंतर मुळींच नसणारें, असें असतांहि त्या अव्यक्त व जड परमाणूंच्या योगेंच तें उत्पन्न होतें म्हणावें, तर असत् व सत् यांचें ऐक्य होणें हें परस्परविरोधात्मक नाहीं काय? एकच वस्तु काळीं आहे व काळीं नाहीं, असें केव्हांहि होणार नाहीं. प्रकाश आहे तोच अंधार आहे, असें होणें हें विरुद्ध आहे. यामुळें या मतावर 'विरुद्ध धर्मांचा एकावरच आरोप करणें' या स्वरूपाचा संकरनामक दोष येतो. आतां ईश्वरेच्छादि कारणें मानावीं, तर शंका अशी कीं, केवळ इच्छेनें—म्हणजे कृतीवांचून—मूळ परमाणूंत गति कशी उत्पन्न व्हावी? पुन्हा, गुणसाम्यात्मक प्रकृतीपासून जगत् उत्पन्न झालें असें म्हणावें, तर तेंहि असंभवनीय. कारण प्रकृतीच्या गुणांत वैषम्य होण्याचें कारण तरी आधीं सांपडलें पाहिजे ना? तसेंच पुनः तिच्यांत साम्य होण्यालाहि कारण पाहिजे. पण असें एकहि कारण नाहीं. जर प्रकृतीला चेतनाचें अधिष्ठान मानलें नाहीं, तर हें जगत्कार्य उत्पन्न व्हावें कसें? असें झाल्याचें उदाहरणहि आढळत नाहीं. सारांश, या जगत्कार्याला कारण कांहीं सांपडत नाहीं. तेव्हां अशा अदृष्ट विषयामध्यें निर्णय करण्यासाठीं वेदांचाच आधार घेतला पाहिजे.—दुसरें प्रमाण ससंगत होत नाहीं. कारण प्रमाता जो जीव तो स्वतः अपूर्ण; त्यामुळें योग्य असें प्रमाण संभवणार कसें? शिवाय, सामान्य अनु-

मानानें पाहतांहि कर्त्यावांचून कार्य झाल्याचें बहुधा कोठें आढळून येत नसल्यामुळें जगताला कर्ता हा असलाच पाहिजे. आणि तो चेतनाहि असला पाहिजे. तसेंच, कार्य अलौकिक असल्यामुळें त्याचा कर्ता तरी साधारण कसा असेल? म्हणून तो विलक्षण शक्तीचा असला पाहिजे. या पूर्णस्वरूप ईश्वराचें तत्त्व ओळखण्याला वेदांचेंच सर्वांत श्रेष्ठ व निर्बाध प्रमाण आहे. त्या वेदांत म्हटलें आहे कीं, सृष्टीच्या पूर्वीं एक पूर्ण स्वतंत्र असा महेश्वर होता. त्याजवळ कांहीं सामग्री नसूनहि, त्यानें आपल्या स्वातंत्र्याच्या जोरावर स्वस्वरूपभूत पटावर जगद्रूप चित्र आपल्या विलासासाठीं भासमान केलें. ज्याप्रमाणें स्वप्नांत अथवा मनोराज्यांत कोणी पुरुष स्वतः कल्पनेनें देह निर्माण करून त्यालाच मी म्हणून त्याच्या योगें व्यवहार करीत राहतो, त्याप्रमाणें हा महेश्वर हें स्थूल जगत् उत्पन्न करून त्यावर मी असा भाव ठेवितो. आणि परशुरामा! जसा हा तुझा देह स्वप्नादिकांत लुप्त होत असल्यामुळें तो तुझें वास्तव स्वरूप होत नाहीं, त्याप्रमाणें प्रलयकाळीं जगाचा लोप होत असल्यामुळें जगत् हा त्याचा देह होत नाहीं. तसेंच, तूं जसा देहादिकांहून भिन्न, केवळ चिन्मय आहेस, तसाच हा देव जगद्रहित, केवळ चैतन्यस्वरूप असून निर्विकार आहे. त्यानें आपल्याच ठिकाणीं हें जगद्रूप चित्र उघड केलें आहे. त्याहून अन्य कोणी कोठेंच नसल्यामुळें हें चित्र दुसऱ्या कशावर उमटूं शकेल? चैतन्यावांचून केव्हां, कोठें व काय असणें शक्य आहे? जेथें चैतन्य नाहीं असें म्हणावें तो देशच सिद्ध होत नाहीं. परन्तु चैतन्यच नाहीं म्हणून

म्हणावें, तर तें दुसऱ्या कशानें सिद्ध होणार? सारांश, चैतन्य हीच जगाचा ग्रास करणारी परिपूर्ण व अंतिम महासत्ता आहे. समुद्रावांचून जसे तरंग किंवा सूर्यावांचून जसें त्याचें तेज असूं शकत नाहीं, त्याप्रमाणें संविद्रूप आत्म्यावेगळी जगाला सत्ता नाहीं. सारांश, सृष्टीच्या आरंभीं एक शुद्ध चैतन्यरूप महादेव मात्र होता, त्यापासून हें चराचर जगत् उत्पन्न झालें; तें त्याजवर राहतें व त्याच्याच ठिकाणीं शेवटीं लयास जातें, असा वेदांचा आशय आहे. येथें संशय घेणेंच योग्य नाहीं. कारण असें कीं, ज्या गोष्टी प्रत्यक्ष अनुभवास येण्याजोग्या नाहींत, त्यासंबंधांत वेद हेंच प्रमाण निराबाध मानणें भाग आहे. आणि ते वेद सांगतात—'हा देव जगदुत्पत्तीच्या पूर्वीं सर्वसाधनविरहित असून त्यानें हें सर्व जगत् उत्पन्न केलें. हा महेश्वर पूर्ण, शुद्ध व अत्यंत स्वतंत्र असल्यामुळें त्यानें स्वात्मचैतन्यभिंतीवर अखिल जगद्रूप चित्र प्रगट केलें आहे.' त्याशिवाय दुसऱ्या कोणाच्या आधारावर तें राहात आहे असें संभवत नाहीं. कारण हा ईश्वर परिपूर्ण भरला असल्यामुळें त्याशिवाय दुसरी जागाच नाहीं. त्यामुळें अन्य स्थानीं जगताची स्थिति सिद्ध होत नाहीं. तेव्हां आदर्शावरील प्रतिबिंबाप्रमाणें हें सर्व जगत् त्या परमेश्वराच्या स्वरूपावरच प्रगट झालें आहे, हेंच म्हणणें समंजस होय. जगदुत्पत्तीला कारण असणारा हा देव, योग्यानें संकल्पानें रचिलेल्या नगराप्रमाणें जगद्रूप क्रिया प्रगट करितो, हेंच मत सुसंमत आहे. परशुरामा! संकल्पानें रचिलेल्या तुझ्या स्वप्नादि सृष्टीमध्यें अनेक जीव, जड पदार्थ व दुसरे कित्येक प्रकार असतां, ती मनांतूनच उत्पन्न होते, मनांतच राहते व

308

शेवटीं मनांतच लय पावते, हें तर तुला माहीत आहे ना ? सारांश, जशी ती केवळ मनोमय असते, त्याचप्रमाणें परमेश्वरापासून हें जगत् केवळ मनोमय उत्पन्न होतें. तो परमेश्वर केवळ चैतन्यमात्रस्वरूप आहे. चैतन्य हीच सर्वसाक्षिणी त्रिपुरा देवी. तिच्याच ठिकाणीं अनंत तऱ्हेच्या शक्ति एकवटल्या आहेत. तीच सर्वमर्यादाशून्य अर्थात् पूर्ण व्यापक आहे. व्यवहारांत मर्यादा दोन प्रकारची असते; देशाची व कालाची. त्यांत देश हा आकारात्मक व काल हा क्रियात्मक असतो. पण आकार किंवा क्रिया दोन्ही चैतन्याच्या आश्रयानेंच राहणारीं असल्यामुळें त्यांयोगें चैतन्यालाच मर्यादा कशी बसणार ! चैतन्य म्हणजे ज्ञानकला—जाणणें—हें कोणत्या जागीं व कोणत्या वेळीं नाहीं ? अथवा जाणणेंच जिथें नाहीं तें आहे कसें ? पदार्थाचें असणें हें तरी प्रकाशित झालें पाहिजे. अर्थात् अस्तिता हाच प्रकाश आणि प्रकाश हेंच चैतन्य होय. शिवाय प्रकाश म्हणजे भान,—जाणणें. हें स्वयंसिद्ध असल्यामुळें प्रकाशच मुख्य होय. जड वस्तु याचे संगतीनेंच प्रकाशित होतात; स्वतः प्रकाशित होत नाहींत. परंतु शुद्ध चैतन्य दुसऱ्याच्या साह्यावांचून आपल्याच ठिकाणीं प्रकाशतें. आतां जर प्रकाशित न होतांहि पदार्थाला अस्तित्व आहे असें म्हणशील, तर मग आहे आणि नाहीं यांची व्यवहारांत कांहींच शिस्त राहणार नाहीं ! जें नाहीं तेंहि आहेच म्हणावें लागेल. तेव्हां अस्तित्व हा चैतन्याचाच प्रकाश आहे. जसें आदर्शाचें अस्तित्व हेंच प्रतिबिंबाचें अस्तित्व, त्याप्रमाणें चैतन्य हेंच जगताचें अस्तित्व. व म्हणून सर्व जग चैतन्यच आहे. त्यांत विशिष्ट आकार भासतात हें खरें; पण ते या चैतन्याच्या

अंगभूत घनतेमुळें व निर्मलपणामुळें भासतात; त्या आकारांच्या स्वतंत्र सत्तेमुळें नव्हेत. पदार्थाच्या अंगचें काठिण्य व निर्मलत्व यांच्या योगानेंच कोठेंहि प्रतिबिंब भासत असतें. व ते धर्म जसे अधिकउणे असतील, त्या मानानें तें प्रतिबिंब स्पष्ट किंवा अस्पष्ट उमटतें. आरशांत हे दोन्ही धर्म असल्यामुळें त्यांत प्रतिबिंब स्पष्ट उमटतें. पाण्यांत निर्मळपणा असतो, परंतु काठिण्य कमी असल्यामुळें तें तितकें अस्पष्ट उमटतें. आकाशांत निर्मळपणा आहे, परंतु काठिण्य मुळींच नसल्यामुळें प्रतिबिंब उमटत नाहीं, हें सर्वांच्या अनुभवाचेंच आहे. आतां, आदर्श जड आहे, व तो स्वतंत्रहि नाहीं, यामुळें त्यावर प्रतिबिंब पडण्यास बाह्य अन्य बिंबाची अपेक्षा लागते, पण चैतन्य हें पूर्ण स्वतंत्र असल्यामुळें याला तीहि लागत नाहीं. शिवाय चैतन्याचे ठिकाणीं कोणताच मळ नसल्यामुळें निर्मळपणा हा स्वतःसिद्धच आहे. मळ दुसऱ्या पदार्थाचा लागणार, पण चैतन्य हें एकटेंएक व अखंडित असल्यामुळें चित्स्वरूपावर मळच संभवत नाहीं. किंबहुना या त्याच्या सर्वव्यापित्वामुळें त्याची शुद्धता सर्वांत अधिक आहे. आतां जें स्वतः भासमान होत नाहीं, दुसऱ्याच्या अनुषंगानें भासमान होतें, त्यालाच प्रतिबिंब असें म्हणतात; आणि जगत् हें याच प्रकारचें आहे हें सर्वांना माहीतच आहे; कारण तें स्वतः केव्हांच भासमान होत नाहीं;—चैतन्याच्या, ज्ञानकलेच्या, जाणिवेच्या आश्रयावरच तें भासतें. तेव्हां जगत् हेंहि आदर्शांतील प्रतिबिंबाच्या तुलनेचें आहे हें उघड होतें. तसेंच चैतन्य हें आदर्शासारखें आहे; कारण त्यांतहि निरनिराळे अनेक विचित्र भाव भासमान होत असतांहि त्यांना भासमान करणारें तें आदर्शा-

प्रमाणें लेशभरहि आपल्या स्वरूपापासून च्युत होत नाहीं;–म्हणजे पुनः प्रतिबिंब घेण्यास सिद्ध असतें. तसेंच आदर्शांतील प्रतिबिंबें जशीं आदर्शाहून वेगळीं नाहींत, त्याप्रमाणें चिदात्म्यावरील प्रतिबिंबेंहि चिद्रूपाहून वेगळीं अर्थातच नाहींत. आदर्शातील प्रतिबिंब दुसऱ्या बिंबामुळें पडतें, तर चैतन्यावरील हें जगद्रूप प्रतिबिंब चैतन्याच्या स्वातंत्र्यामुळें पडतें. परशुरामा! तूंहि चेतन आहेस, तूं स्वतः अनुभव घेऊन पहा. स्वतःच्या संकल्पबळानें, आपल्याच ठिकाणीं, कोणत्याहि बिंबावांचून व अन्य कोणत्याहि निमित्तावांचून नाना पदार्थांचे भाव प्रतिबिंबित होतातना? आणि हें संकल्पाचें बळ म्हणजेच स्वातंत्र्याचें स्थूलस्वरूप. निःसंकल्प अवस्थेमध्यें हेंच चैतन्य अगदीं स्वच्छ रूपानें असतें. याप्रमाणें शुद्धैकस्वरूप चैतन्याचे ठिकाणी असणारें महत्स्वातंत्र्यच जगताच्या उत्पत्तीच्या अगोदर संकल्पस्वरूपाला येऊन त्यामुळेंच प्रतिबिंबात्मक जगत् भासित झालें आहे. संकल्पाच्या दृढतेमुळें हें चिरस्थायी भासूं लागलें आहे. तें सर्वांना सारखेंच भासतें, तेंहि त्या सर्वेश्वराच्या पूर्ण स्वातंत्र्यामुळेंच होय. इतरांचें म्हणजे जीवांचें स्वातंत्र्य मर्यादित असल्यामुळें त्यांचें मनोमय जगत् त्या एकेकाच्याच प्रत्ययास येतें. तेंच जीवांचें अपूर्णत्व अभ्यासवशात् मणि, मंत्र, औषधि इत्यादिकांच्या योगानें जसजसें हटत जातें, तसतसें त्यांचें संकल्पाचें सामर्थ्यहि वाढतें. उदाहरणार्थ–परशुरामा, इंद्रजालविद्या तूं आपल्या ध्यानांत आण. तीमध्यें वस्तुतः कांहीं सामग्री नसतांहि केवळ संकल्पवशात् सृष्टि भासविली जाते. ती सर्वांना सारखीच प्रत्ययास येते, स्थिर असते, व तींत खऱ्याप्रमाणें पुनः व्यवहारहि घडतो. शेवटीं

पहावें तों ती आपल्याच जागीं लय पावते. हें जगतहि तसेंच प्रत्ययास येतें. अथवा दुसरें उदाहरण—योग्यांची मनःसृष्टि पहा. ती ते स्वसंकल्पाच्या बळावर स्पष्टपणें अन्यांच्या अनुभवास आणितात. ती पुष्कळ चिरस्थायी असते. आतां योग्यांचेंहि सामर्थ्य परिमितच असल्यानें त्यांची सृष्टि बाह्य पदार्थावर उभारली जाते. पण चैतन्यनाथ परमात्मा अपरिमित समर्थ असल्यामुळें त्याची सृष्टि त्याच्या स्वस्वरूपांतच प्रगट होते. सारांश, प्रतिबिंबाला जसें आदर्शाच्या स्वरूपावेगळें अस्तित्व नाहीं, त्याप्रमाणें चैतन्यावांचून जगताला अस्तित्व नाहीं. याच विचारांच्या योगानें जगत् हें मिथ्या आहे, असें ठरतें. सत्य असतें तें आपला स्वभाव सोडीत नाहीं, असत्य असेल तेंच आपल्या स्वरूपाचा त्याग करितें. पहा कीं परशुरामा! हें जगत् अतिशय चंचल म्हणजे क्षणिक आहे. यासाठीं आरसा व त्यांतील प्रतिबिंब यांच्याचप्रमाणें तूं या जगताच्या स्वरूपाचा नीट विचार कर. आदर्श हा अचल असतो, प्रतिबिंबें हीं चल असतात. त्याप्रमाणें जगत् हें चल आहे व त्याला आधार असणारें चैतन्य हें स्थिर आहे. जगतांतील कोणत्याहि अवस्थेचा विचार केला असतां ती कालगतीनें बदलतेंच, परन्तु एके काळींहि एकाच रूपानें सर्वत्र राहत नाहीं. जगांतील सर्व भाव अनिश्चित आहेत. पहा कीं, सूर्याचा प्रकाश हा सर्व पदार्थांना प्रकाशित करतो; परन्तु हा मानवांचा विचार झाला. उलूकादिक दिवांध आहेत त्यांस तो उलट अंधकारच वाटतो. तेव्हां हा प्रकाश व हा अंधार असें विचारपूर्वक निवडतां येत नाहीं. असेंच विष. तें कोणाला विष आहे तर दुसऱ्या

कोणाला—त्यांत निपजणाऱ्या कीटकांना—तेंच जीवन आहे. भिंत ही मनुष्यांना जाण्यास अटकाव करणारी आहे, पण तीच गुह्यकादि योग्यांना अटकाव करूं शकत नाहीं. जो काळ अथवा प्रदेश मनुष्यांनीं फार विस्तृत म्हणून मानलेला असतो, तोच देवांना अथवा योग्यांना त्याच्या उलट अनुभवास येत असतो. तेव्हां आरशांत दृश्य होणाऱ्या प्रदेशाचा दूरपणा जसा केवळ आदर्शमात्रच असल्यामुळें व्यर्थ होतो, टिकत नाहीं, तद्वत् या जगाचें स्वरूपहि विचारपूर्वक पाहतां टिकत नाहीं. म्हणूनच सर्वाश्रयभूत जें चैतन्य त्यावांचून सत्य असें कांहींच नाहीं. जें कांहीं आहे म्हणून भासत आहे तें सर्व शुद्ध चैतन्य आहे.

याप्रमाणें परशुरामा ! हें जगत् केवळ चैतन्यस्वरूप आहे, दुसरें कांहीं एक नाहीं, हा विषय तुला तुझ्या प्रश्नाप्रमाणें स्पष्ट करून सांगितला आहे.

## प्रकरण १२ वें,

# टेकडीच्या पोटांत !

निर्माय भावनायोगाल्लोकमस्मिन् महाश्मनि ॥
समुद्रवलयां पृथ्वीं शास्ति नित्यं सुतस्त्वयम् ॥ ६४ ॥

श्रीदत्तात्रेयांच्या तोंडून याप्रमाणें जगताचें तात्त्विक स्वरूप ऐकून झाल्यावर परशुरामाचें अंतःकरण पुनः आणखी संशयानें गढूळ केलें. तो म्हणाला "भगवन्! जगतासंबंधीं आपण सांगितलेला विचार मीं ऐकला. आपलें म्हणणें बरोबर आहे; त्यांत कांहीं दोष दिसत नाहीं. तरी पण भगवन्! हें सर्व जगत् खरें आहेसें कां बरें भासतें? तसेंच दुसऱ्या बुद्धिमान् पुरुषांनीं तें खरेंच आहे, असें कसें ठरविलें? जगत् सत्य नाहीं असें मी आपणांकडून ऐकलें, तरीहि तें पुनः खरेंसें भासतें तें कशामुळें ? गुरुनाथ! हा माझा संशय नष्ट करा."

परशुरामानें असें विचारतांच सद्गुरु श्रीदत्तात्रेय म्हणाले, परशुरामा! या भ्रमाचें कारण सांगतों, ऐक. तें फार पुरातन आहे. सत्य वस्तु अशी असेल तशी ग्रहण न करितां ती कांहीं भलत्याच तऱ्हेची आहे असें समजून त्याचीच दृढ भावना करणें हें या भ्रमाचें मूळ आहे. पहा कीं, जीव हा आपलें शुद्ध स्वरूप विसरून देहालाच मी ह्मणूं लागतो. परंतु वास्तविक पाहतां मांस, रक्त आणि हाडें हीं कोणीकडे व अत्यंत निर्मल चिदात्मा कोणीकडे? परंतु केवळ दृढ भावना केल्यामुळेंच आत्मा देहरूप होतो. किंबहुना, आत्मा केवळ चैतन्यरूप आहे असें समजलें तरी पुनः देहभ्रम होतो! याच प्रकारें

केवळ दृढ भावनावशात् जगत् हें सत्य भासतें. त्याच्या उलट, जगत् हें मिथ्या आहे, अशी भावना केली म्हणजे हा भ्रम निवृत्त होतो. जो जशी भावना करितो त्याला तसतसें जगत् भासतें. याच संबंधांत तुला मी एक पूर्वीचा वृत्तांत सांगतों, ऐक.

बंगाल देशांत सुंदरपुर म्हणून एक सुप्रसिद्ध शहर होतें. तेथें पूर्वी सुषेण नांवाचा एक प्रख्यात राजा होता. तो मोठा बुद्धिमान् होता. त्याचा महासेन नांवाचा एक धाकटा भाऊ होता. राजा सुषेण यानें एकदां अश्वमेध यज्ञानें परमेश्वराचें पूजन केलें. त्या प्रसंगीं त्यानें यज्ञाचा घोडा सोडला; व त्यामागून त्याचे संरक्षणास त्याचे मोठे बलशाली व पराक्रमी असे पुत्र मोठी सेना घेऊन निघाले. तेव्हां मार्गांत अश्वाला अडविण्यास आलेल्या सर्वांना स्वसामर्थ्यानें जिंकून ते पराक्रमी राजपुत्र त्या अश्वाबरोबर इरावतीच्या तीरीं पोंचले. तेथें त्यांनीं तपोनिधि राजर्षि तंगण याला पाहिलें. परन्तु आपल्या पराक्रमाच्या गर्वांत त्याची कांहीं परवा न करितां, त्याला न भेटतांच, ते तसेच पुढें निघून गेले. तेव्हां त्या तंगणाचा मुलगा आपल्या पित्याची यांनीं अवज्ञा केल्याचें पाहून रागावला, व त्यानें पुढें होऊन, यज्ञाचा घोडा अडवून धरून पित्याची अवज्ञा केल्या-बद्दल त्यांची पुष्कळ निर्भर्त्सना केली. तेव्हां राजपुत्रांनीं त्याला चारी बाजूनें आपल्या सैन्यानें वेढिलें. त्याबरोबर तंगणाचा पुत्र त्या घोड्याला घेऊन ते राजपुत्र पाहात असतांनाच समोर असलेल्या एका टेकडीच्या पोटांत शिरला. तेव्हां राजकुमारांनीं शस्त्रांचा विल-क्षण मारा करून ती टेकडी फोडून काढली. टेकडी फुटतांच तो

तंगणसुत मोठें सैन्य घेऊन बाहेर निघाला व राजकुमारांशीं त्यानें युद्ध केलें. त्यांत त्यानें त्यांचें सैन्य ठार करून राजपुत्रांना पराभूत केलें. आणि त्यांना बांधून घेऊन तो पुनः त्या टेकडींत शिरला. इतका प्रकार होतांच राहिलेल्या लोकांनीं राजाला जाऊन ही साद्यंत हकीकत कळविली. ती वार्ता ऐकून राजा सुषेण याला मोठें आश्चर्य वाटलें. तो तत्काळ आपल्या बंधूला ह्मणला, "वत्सा! हा तंगणमुनि जेथें राहतो त्या प्रदेशास तूं ताबडतोब जा. या तपस्व्यांचें सामर्थ्य फार थोर असतें. मनुष्यें अथवा देव त्यांना जिंकूं शकत नाहींत. म्हणून त्या मुनीला तूं सुप्रसन्न करून घे, व मुलें आणि यज्ञाचा घोडा घेऊन लागलींच परत ये. हा वसंतकाळ यज्ञकार्याला उचित आहे. तो तसाच निघून जाऊं नये हें बरें. पण तपस्व्यांच्यापुढें आपण गर्व करून उपयोग नाहीं. ते क्रुद्ध झाले तर एका क्षणांत जग जाळून भस्म करतील. यासाठीं त्यांना प्रसन्न करूनच तूं आपला कार्यभाग उरकून घे."

ही राजाची आज्ञा होतांच महासेन तेथून निघाला, तो त्या तंगणमुनीच्या आश्रमास येऊन पोंचला. त्या वेळीं तो मुनि समाधिस्थ झाला होता. त्याचें शरीर बहुतेक वाळून लाकडासारखें झालेलें होतें. मन व सर्व इंद्रियें शान्त झालीं होतीं. त्याचा अहंभाव निर्विकल्प दशेच्या अपार समुद्रांत लय पावला होता. त्याला पाहतांच महासेनानें आदरानें साष्टांग नमस्कार केला व हात जोडून नाना प्रकारें स्तुति करून त्या मुनीश्वराला संतुष्ट करण्याचा प्रयत्न चालविला. याप्रमाणें स्तुति करीत त्याचे तीन दिवस गेले. तेव्हां

पित्याच्या स्तवनानें संतुष्ट होऊन त्याचा मुलगा बाहेर आला, व महासेनाला ह्मणाला, "राजा! तुझें स्तवन पाहून मला फार संतोष झाला. तुझा काय मनोरथ आहे तो सांग, मी तो लागलींच पुरवितों. या महामुनीचा मी पुत्र आहें. माझ्या पित्याची भाषण करण्याची वेळ अद्याप झालेली नाहीं. याचें अंतःकरण समाधींत लीन झालें आहे व हा बारा वर्षांनीं समाधींतून उठणार आहे. त्यांत पांच वर्षें झालीं, व सात राहिलीं आहेत. हा त्याचा पूर्वींचाच संकेत झालेला आहे. तेव्हां आमच्यापासून तुला काय मिळवावयाचें आहे, तें मला सांग. मी तें करीन. मी लहान मूल आहे, असें तूं समजूं नकोस. मी आपल्या पित्याच्या बरोबरीचा तपस्वी आहें. तपस्वी योगी पुरुषांना जगांत अशक्य असें कांहीं नाहीं."

असें मुनिकुमाराचें भाषण ऐकून महासेन यानें त्याला साष्टांग नमस्कार केला, व हात जोडून तो ह्मणाला.—"मुनिपुत्रा! तुझा पिता समाधींतून जागृत होऊन त्याच्याशीं संभाषण व्हावें, हीच मला फार इच्छा आहे. तेव्हां मजवर कृपा करून खरोखर माझें इच्छित तुला पुरवावयाचें असेल, तर एवढी गोष्ट मला साधून दे." याप्रमाणें राजाचें भाषण ऐकतांच तो मुनिपुत्र पुनः ह्मणाला, "राजा! ही तुझी इच्छा पूर्ण होणें निखालस अशक्य. तरी पण तुला एकदां करतों म्हणून विश्वास दिल्यावर पुनः नाहीं कसें म्हणावें? तर तूं आतां थोडा वेळ थांब व माझें योगमार्गांतील अद्भुत सामर्थ्य पहा. हा माझा पिता, सध्यां परमपावनपदीं विश्रांति घेत आहे. याला बाह्य प्रयत्नांनीं जागृत करण्यास कोणी समर्थ

नाहीं. तेव्हां सूक्ष्म योगमार्गानें जाऊन मी आतां याला सावध करितों, पहा!" याप्रमाणें बोलून त्यानें आसन करून सर्व इंद्रियें पूर्णपणें संनिरुद्ध केलीं. व प्राणवायूच्या ठिकाणीं अपानवायूचा संयोग करून मुख्य प्राणानें तो बाहेर पडला, आणि आपल्या पित्याच्या शरीरांत शिरला. नंतर तेथें त्याच्या लीन झालेल्या मनाला हालवून सावध करून तो लागलीच फिरून आपल्या देहांत आला. इतक्यांत तो मुनि जागृत झाला. पाहतो तों पुढें राजा मोठ्या लीनतेनें स्तुति करीत उभा आहे. तेव्हां त्याचा मनोरथ काय आहे, तें त्यानें योगदृष्टीनें पाहिलें. मग त्यानें केलेलें स्तवन इ० सर्व प्रकार ध्यानांत येऊन त्याच्या मनाला संतोष झाला. मग त्यानें आपल्या मुलाला बोलावून शांतपणें सांगितलें कीं, "बाळ, असें पुनः करूं नये. क्रोध हा तपाला घातक आहे. शिवाय राजानें लोकांचें संरक्षण केलें—सुव्यवस्था ठेविली—तरच तप निर्विघ्नपणें सिद्धीस जातें. म्हणून राजाच्या कार्यांत विघ्न आणणें हें योग्य नाहीं. हा दैत्यांचा स्वभाव आहे, तो मुनींचा धर्म नव्हे. तेव्हां मनांतील राग घालवून तो घोडा आणि ते राजपुत्रहि चटकन् याला देऊन टाक. याला जाऊं दे लवकर, नाहीं तर यज्ञाची वेळ निघून जाईल." याप्रमाणें पित्यानें सांगतांच त्या मुनिपुत्राचा क्रोध मावळला व त्यानें तत्क्षणींच त्या टेकडींत प्रवेश करून तो घोडा व ते सर्व राजपुत्र महासेनाला मोठ्या प्रीतीनें आणून दिले. तेव्हां तो घोडा व ते राजपुत्र यांना गांवाकडे रवाना करून, आश्चर्यचकित झालेल्या महासेनानें त्या मुनींना साष्टांग नमस्कार घालून आणि हात जोडून

प्रसन्न केलें. नंतर तो म्हणाला:—" भगवन्! या टेकडीच्या गर्भांत हे माझ्या बंधूचे मुलगे व तो घोडा हे कसे राहिले? मला हें समजून घेण्याची इच्छा आहे. आपण मला सांगा."

याप्रमाणें राजानें विचारल्यावर तो तरुण मुनि त्याला म्हणाला:— " राजा! सांगतों, ऐक. पूर्वी मी राजा होतों. मोठें विस्तृत राज्य पुष्कळ वर्षें मीं चालविलें. नंतर एकदां परमेश्वराच्या कृपेनें तुर्यात्मक अधीश्वर चित्स्वरूपाचें मला ज्ञान झालें. तेव्हां पुढें हा सर्व लोकव्यवहार मला तुच्छ वाटून मी त्याला कंटाळलों व राज्य मुलांच्या स्वाधीन करून या वनांत येऊन राहिलों. माझी स्त्रीहि मजबरोबर आली. तेव्हां-पासून तपश्चर्या करीत करीत माझीं येथें अर्बुद संवत्सरें गेलीं. माझी सेवा करून माझी स्त्रीहि पूर्ण स्थितीला पोंचली. पुढें एकदां भविष्यकालीन नियतीच्या अकल्प्य प्रभावामुळें माझ्या स्त्रीला समाधींत असतांनाच अकस्मात् कामेच्छा उत्पन्न झाली. तेव्हां ती कामाकुल होऊन मजकडे आली. तों मी समाधीमध्यें स्थिर चित्त करून बसलों होतों. ती तर कामानें फारच व्याकुल झाली. अशा स्थितींत तिनें माझ्या संभोगाची भावना केली. आणि दृढ भावना-वशात् तिचा मजशीं संभोग होऊन तिला गर्भ राहिला. पुढें तिला हा मुलगा झाला. तो होतांच तिनें त्याला माझ्या मांडीवर ठेवून मला समाधींतून जागृत केलें; व तिला काय वाटलें कोण जाणे, तिनें आपला देह पंचभूतांशीं मिळविला व ती स्वस्वरूपांत लीन झाली. मग मला जेव्हां माझ्या मांडीवर तो मुलगा दिसला, आणि ही कैवल्यस्थानीं गेल्याचें लक्षांत आलें, तेव्हां मला त्याची दया

आली. मग मीं त्याला वाढविलें. पुढें एकदां प्रसंगवशात् मीं पूर्वीं राज्य चालविलें असल्याचें त्यानें मजकडून ऐकलें व त्याला राज्य चालविण्याची इच्छा झाली. तेव्हां त्यानें माझी प्रार्थना केली. त्यानंतर त्यानें माझ्या उपदेशापासून उत्कृष्ट योगसिद्धि प्राप्त करून घेतली. त्यामुळें केवळ भावनाबलानें यानें या टेकडींत एक जगत् निर्माण करून त्यांतील सर्व प्रदेशाचा राज्यकारभार चालविला आहे. त्याच राज्यांत त्यानें तो घोडा व ते राजाचे कुमार बंधांत घालून ठेविले होते."

हें भाषण ऐकून महासेन म्हणाला, "हें मोठें आश्चर्य आहे. पण भगवन्! मला तो प्रदेश पाहण्याची इच्छा आहे. तर कृपा करून दाखवा बरें." अशी प्रार्थना केल्यावर "वत्सा! याला याच्या इच्छेप्रमाणें तुझा राज्यविस्तार दाखव." असें त्या मुनीनें आपल्या पुत्रास सांगितलें, आणि आपण स्वतः समाधींत प्रविष्ट झाला. नंतर तंगणमुनीचा पुत्र त्या राजाला घेऊन त्या टेकडीजवळ आला व त्यानें स्वतः आंत प्रवेश केला. परंतु राजाला तसें शिरण्याचें साधेना. तेव्हां त्यानें मुनिपुत्रास हाक मारली. तोहि आंतून त्याला बोलावूं लागला. शेवटीं राजाला आंत येतां येत नाहीं हें पाहून तो मुनिपुत्र बाहेर येऊन त्या राजाला म्हणाला, "राजा, तूं योगाभ्यासी नाहींस! तेव्हां तुला यांत शिरणें अशक्य आहे खरें. योगज्ञानावांचून ही टेकडी कोणालाहि घनरूप—स्थूलरूपच होणार. पण पित्याच्या आज्ञेला मला मान द्यावयाचा आहे, त्यामुळें तुला आंत नेणें मला अवश्य आहे. तर राजा, आतां तूं हा आपला देह या जमिनीवरील

गवताच्या खांचेंत ठेवून दे; आणि केवळ लिंगदेह घेऊन मजबरोबर आंत प्रवेश कर." यावर राजा म्हणाला, "मुनिपुत्रा ! देहांतून बाहेर निघण्यास मला सामर्थ्य नाहीं. देह कसा टाकावयाचा ? देह टाकणें म्हणजे मरणें नव्हे काय ?"

तेव्हां मुनिपुत्र हंसून म्हणाला, "अरे ! योगाची यास ओळखच नाहीं ! तर आतां असूं दे, तूं डोळे मीट." असें म्हणून त्यानें डोळे मिटतांच योगसामर्थ्यानें मुनिपुत्रानें त्याच्या शरीरांत प्रवेश केला. मग प्रथम त्याचा लिंगदेह काढून घेऊन स्थूल शरीर त्या खांचेंत नेऊन ठेवलें. नंतर त्या लिंगदेहाला घेऊन त्या टेकडींत त्यानें प्रवेश केला. या वेळीं राजा मुळींच सावध नव्हता. त्याचें स्थूल शरीर टेकडीबाहेर राहिल्यामुळें मुनिपुत्रानें त्याला स्वसंकल्पानें निर्माण केलेलें दुसरें एक शरीर देऊन त्यांत त्याला प्रविष्ट करवून नंतर त्यास जागृत केलें. तो जागा होऊन पाहतो तों एका महा आकाशांत मुनिपुत्र आपल्याला घेऊन वेगानें चालला आहे ! त्या वेळीं वर, खालीं व बाजूलाहि तें भयंकर व अमर्याद आकाश पसरलेलें पाहून तो भ्याला व मुनिपुत्रास म्हणूं लागला, "मुनिपुत्रा ! मला येथें आतां सोडून देऊं नको बरें ! या अंतरालांत मला तूं सोडून दिल्यास मी पडेन आणि माझा चुराडा होऊन जाईल !"

राजा असा घाबरलेला पाहून मुनिपुत्रास हंसूं आलें. तो राजाला म्हणाला, "राजा ! तूं भिऊं नको. मी तुला सोडीत नाहीं. धीर धर आणि टेकडीच्या पोटांत मीं निर्माण केलेला हा सर्व प्रदेश पहा." तेव्हां राजाला धीर आला व तो पाहूं लागला. तों तेथें त्यास

खालीं दूरवर सर्व आकाश दाट अंधारानें व्यापून गेलेलें दिसून आलें. त्यांत नक्षत्रें तेवढीं भासत होतीं. त्यांतून पुढें जातां जातां त्यास नंतर चंद्रमंडळ आढळलें. तेथें येतांच तो थंडीनें गारठून गेला. पण त्या मुनिपुत्रानें त्याचा बचाव केला. पुढें तो सूर्यमंडळास पोंचला तों त्याच्या धगीनें तो होरपळूं लागला. तेव्हां मुनिपुत्रानें योगसामर्थ्यानें त्याला थंडावा आणला. नंतर तसेंच पुढें जाऊन कांहीं वेळानें ते दोघे मेरूच्या शिखरावर उतरले. नंतर मुनिपुत्रानें दाखविल्याप्रमाणें राजा तेथील सर्व प्रकार पाहूं लागला. दूरचें सर्व कांहीं पाहतां यावें, म्हणून मुनिपुत्रानें त्याला तशी सूक्ष्म आणि व्यापक दृष्टि दिली. तिच्या योगानें त्यानें लोकालोक पर्वताच्या ओळी पसरलेल्या पाहिल्या. त्यांच्या पलीकडे दाट अंधार पसरला असून अलीकडे सुवर्णाची जमीन होती. तसेंच तेथें कित्येक समुद्र, नद्यानीं व पर्वतांनीं भरलेलीं सप्तद्वीपें, सर्व भुवनें, इंद्रादि देव, दैत्य, मनुष्यें, राक्षस, यक्ष, किंपुरुष इ॰ सर्व प्रकार त्या राजाला आढळून आले. याचप्रमाणें तेथें सत्यलोक, वैकुंठ, कैलास इ॰ स्थानेंहि असून त्यांवर मुनिपुत्र स्वतःच विधि, विष्णु आणि शिव या तीन नांवानीं पृथक् रूपें धारण करून निवास करीत असल्याचें त्यानें पाहिलें. शिवाय तोच मुनिपुत्र आपलें रूप बदलून भूमीचें सार्वभौमत्व स्वीकारून सर्व लोकांचें शासन करीत आहे असेंहि तेथें त्याच्या अनुभवास आलें.

मुनिपुत्राचें असें हें अद्भुत योगसामर्थ्य अवलोकन करून राजाला फारच विस्मय वाटला. तेव्हां त्याला मुनिपुत्र म्हणाला, "महासेना! हा नूतन प्रदेश पाहतांपाहतां आपलीं एकंदर किती वर्षें

गेलीं, तुला माहित आहे काय? एकंदर बारा अर्बुद वर्षें गेलीं! आणि येथें तर एकच दिवस झाला आहे! चल, आपण त्या भूप्रदेशास— जेथें माझा पिता आहे, तेथें जाऊन पाहूं."

असें म्हणून त्या मुनिपुत्रानें राजाला बरोबर घेऊन आकाशांत उड्डान केलें, आणि तो पूर्वीप्रमाणें बाहेर आला.

---

## प्रकरण १३ वें,
## विलक्षण स्वप्न !

तस्मादिदं दृश्यजालं स्वाप्नदृश्यसमं स्थितम् ॥
दीर्घकालोऽपि हि स्वप्ने भासते निर्विशेषतः ॥ ७७

टेकडींतून बाहेर पडण्याचे वेळीं त्या राजाला निद्रित करून त्याचा संस्कारमात्रस्वरूप असा लिंगदेह घेऊन मुनिपुत्र बाहेर आला व त्यानें तो त्या पूर्व शरीरांत घातला. आणि मग त्याला सावध करून उठविलें. महासेन सावध झाला तों त्याला हा बाह्य भूप्रदेश, तेथील भूमि, झाडें, माणसें, ओढे, तलाव इत्यादि सर्व प्रकार अगदीं नवीन असे दृष्टीस पडले. तेव्हां तो अत्यंत आश्चर्यचकित होऊन त्या मुनिपुत्रास म्हणाला, "महात्मन्! हा कोणता प्रदेश आपण मला दाखविला ? पूर्वीं पाहिला त्याहून हा वेगळा आहे. हा काय चमत्कार आहे ?"

तेव्हां मुनिपुत्र म्हणाला—राजा, आपण पूर्वीं जेथें राहत होतों तोच हा प्रदेश. दीर्घ काल गेल्यामुळें याचें स्वरूप बदललें आहे. टेकडींतील प्रदेशांत जो आपला एक दिवस गेला, तेवढ्याच काळांत येथें बारा अर्बुदें लोटलीं. म्हणून याचें रूपांतर झालें. वागण्याची पद्धति आणि बोलण्याची भाषा दोन्ही पालटलीं आहेत. काळगतीनें लोकस्थिति अशीच बदलत असते. मी तर पुष्कळ वेळां हा प्रकार पाहिला आहे. हा पहा माझा सामर्थ्यवान् पिता येथें समाधि लावून बसला आहे. याच स्थानीं तूं पूर्वीं माझ्या पित्याची स्तुति केलीस,

ही ती टेकडी पहा. हींतच मी तुला माझी वेगळी सृष्टि दाखविली. या वेळेपर्यंत तुझ्या बंधूच्या वंशांत हजारों पुरुष होऊन गेले. बंगाल्यांत तुझें सुंदर म्हणून जें नगर होतें, त्या जागीं हल्लीं श्वापदांनीं भरलेलें अरण्य पसरलें आहे. तुझ्या बंधूच्या वंशांत सध्यां वीरबाहु राजा असून तो मालव देशांत क्षिप्रा नदीच्या काठीं विशाल नामक नगरांत राज्य करीत आहे. व तुझ्या वंशांतील सुशर्मा म्हणून एक पुरुष द्राविडामध्यें राजा झाला आहे. ताम्रपर्णी नदीच्या काठीं वर्धननामक नगर त्याची राजधानी आहे. राजा, अशा प्रकारें लोकस्थितीचें परिवर्तन सदोदित होत असतें. अल्प कालामध्येंच हें नवीन जग निर्माण झालें आहे. पुढेंहि असाच कांहीं काळ लोटल्यानंतर हे पर्वत, नद्या, तलाव आणि भूप्रदेश सर्व पालटून जाणार आहे. अशीच जगाची रहाटी आहे. कालगतीमुळें पर्वताच्या जागीं खोल दरी होते व खोल जागीं पर्वत उत्पन्न होतात; शुष्क व निर्जल प्रदेश पाण्यानें भरून जातात व डोंगराळ प्रदेशाचीं वाळवंटें बनतात; दगडासारखी कठीण जमीन अतिशय मऊ बनते, व मऊ असते ती कठीण होते; उखर जमीन सुपीक होते व पिकाऊ जमिनीचें माळरान बनतें; रत्नांचे खडे होतात व खडे तींच रत्नें होतात; खारें पाणी तें गोड होतें व गोड तें खारें होतें. कदाचित् मनुष्यांची वस्ती वाढते, कदाचित् पशूंची संख्या वाढते आणि कदाचित् कृमिकीटकांचीच गर्दी उसळते. याप्रमाणें हें जग कालवशात् भिन्नरूपानें परिणाम पावतें. तेव्हां हाच आमचा पूर्वींचा प्रदेश या रूपाला आलेला आहे, हें तूं नीट ध्यानांत घे."

हें मुनिपुत्राचें भाषण श्रवण केल्यानंतर तो महासेन राजा अत्यंत शोकाकुल झाला. थोड्याच वेळांत त्याला मूर्च्छा येऊन तो भूमीवर पडला. तेव्हां मुनिपुत्रानें त्याला धीर देऊन सावध केलें. सावध होतांच महासेन अतिशय दुःखित होऊन एखाद्या दीनाप्रमाणें विलाप करूं लागला. आपला बंधु, त्याचे मुलगे, तसाच आपला स्त्रीवर्ग व मुलेंबाळें यांचें पुनःपुनः स्मरण करून तो शोकानें फार हळहळूं लागला. तेव्हां याप्रमाणें तो मोहानें शोक करितांना पाहून त्याला बोध करण्याच्या हेतूनें मुनिपुत्र त्यास म्हणाला, "राजा! तूं खरोखर बुद्धिमान् आहेस; मग तूं कोणासाठीं व काय म्हणून हळहळतोस? शहाणे पुरुष निष्फळ कर्म कधीं करीत नसतात. फल काय याचा विचार न करितां एखादा उद्योग आरंभितो तो बालिश होय. तेव्हां तूं कोणाबद्दल व कां शोक करतोस तें मला सांग पाहूं?"

असा प्रश्न केल्यावर महासेन मोठ्या दुःखानें पुनः ह्मणाला, "मुने! माझ्या शोकाचें कारण तुला दिसत नाहीं काय? जो सर्वस्वीं बुडाला त्याचें कारण तूं काय विचारतोस! एखाद्या आप्ताचा वियोग झाला तरी मनुष्याला दुःख होतें, आणि माझ्या सर्वस्वाचा नाश झाला असतांहि तूं पुनः कारण विचारतोस, तेव्हां तुला काय ह्मणावें!"

तेव्हां मुनिपुत्रहि पुनः हंसून म्हणाला—"राजन्! तुझा हा पूर्वापार चालत आलेला कांहीं कुलधर्मच आहे कीं काय? मला माहीत नाहीं! सांग पाहूं? तसें असेल तर शोक करणें बरोबर आहे. नाहीं तर त्यांत मोठाच प्रत्यवाय यावयाचा! अथवा शोक केल्यावर गेलेलें

पुनः प्राप्त होतें, अशी का तुझी समजूत आहे? राजा, धीर धरून विचार कर कीं, दुःख करून आतां फायदा काय? स्वजन नष्ट झाले म्हणून तूं शोक करीत असलास, तर मला सांग कीं, तुझा आजा वगैरे पूर्वींचे जे आप्तेष्ट केव्हांच विनाश पावले होते, त्यांच्याबद्दल तूं सदैवच शोक करीत राहिलें पाहिजे होतेंस; मग या वेळेपूर्वीं तूं शोक करीत नव्हतास तो कसा? दुसरें असें सांग कीं, ते बांधव कोणाचे? तुझे?—तर त्यांच्याशीं तुझें बंधुत्व कशावरून? त्यांचे व माझे आईबाप एकच, असें म्हणशील तर त्या आईबापांच्या विष्ठेमधील जे कीटक असतात, तेहि देहसंबंधीं असतात; मग ते तुझे बांधव कां नव्हेत? आणि त्यांच्याबद्दल तूं शोक केला नाहींस तो? राजा, प्रथम तूं विचार कर कीं, तूं स्वतः वस्तुतः कोण आहेस, व जे नष्ट झाले म्हणून तूं शोक करीत आहेस ते वस्तुतः कोण आहेत? तूं देहच आहेस, किंवा त्याहून भिन्न कोणी आहेस? देह हा एक जड पदार्थांचा समुदाय आहे. आणि सर्व समुदायाचा किंवा त्याच्या एखाद्या अंगाचा जो नाश त्यालाच नाश असें म्हणतात. मग यावरून पाहतां देहाच्या अंशाअंशाचा नाश तर प्रत्येक क्षणास होतच आहे! मल, मूत्र, कफ, तसेंच नखें, केस इत्यादि यांचा सारखा नाश चाललाच आहे! मग तूं अखंड रडतच बसावयास पाहिजे! आतां—देहाच्या सर्वांशीं नाशाला नाश म्हणावें, आणि ह्मणून दुःख करावें, तर सर्वात्मना देहाचा नाश केव्हांच होत नाहीं. तुझ्या बांधवांच्या देहांचा अंश पृथिव्यादि पदार्थांच्या रूपानें आहे हें उघड आहे. अथवा त्यांचाहि नाश होतो म्हटलें तरी शेवटीं केवळ आकाश

हें अविनाशी व शुद्ध राहतेंच. परन्तु हें राहूं देच. आधीं तूं ह्मणजे कांहीं देह नव्हेस, देही आहेस. कारण तूं जसा ' हें माझें वस्त्र ' म्हणतोस, तसाच ' हा माझा देह ' म्हणतोस; मग तूं देहच कसा तें सांग पाहूं? तेव्हां जर तूं देहाहून निराळा आहेस, तर दुसऱ्यांच्या देहांशीं तुझा संबंध तो काय? तुझ्या बांधवांच्या वस्त्रादिकांशीं जसा तुझा तिळभराहि संबंध नाहीं, तसाच त्यांच्या देहांशींहि नाहीं. जसें वस्त्र तसेंच शरीर. मग त्यांचे देह नष्ट झाले म्हणून तुला शोक कां व्हावा? माझें शरीर, माझा प्राण, माझें मन इ॰ बोलत असणारा तूं स्वतःच काय स्वरूपाचा आहेस, तें मला सांग पाहूं? "

असें मुनिपुत्रानें विचारल्यावर महासेन घटकाभर स्वस्थपणें विचार करीत राहिला. परन्तु शेवटीं त्याच्या प्रश्नाचें उत्तर न सांपडल्यामुळें दीनपणें तो मुनिपुत्राला म्हणाला, " भगवन्! मी कोण हें मला अगदींच कळत नाहीं! मी शोक करीत आहें खरा, पण त्याचें कारण मला समजत नाहीं. मी अज्ञान, आपणाला शरण आहें. तर भगवन्! हें काय गूढ आहे तें मला सांगा. आपला कोणीहि बांधव मृत झाला कीं सर्वचजण शोक करितात. ते आपण कोण किंवा दुसरे कोण हें जाणत नसतात, पण शोक मात्र चालवितातच. तेव्हां भगवन्! मी आपला शिष्य आहें, मला हें सर्व स्पष्ट समजून सांगा. "

तेव्हां मुनिपुत्र महासेनाला म्हणाला, " राजा, ऐक. महादेवाच्या मायेनें सर्व लोक मूढ झाले असल्यानें स्वतःचें स्वरूप न ओळखतांच विनाकारण सारखे शोक करितात! आपलें सद्रूप जोंवर ओळखलें नाहीं तोंवर मनुष्य दुःख करीत राहतो, पण तें स्वरूप कळल्यावर

पुनः म्हणून केव्हांच दुःख करण्याचा प्रसंग त्यास येत नाहीं. जसा कोणी झोंपेच्या भरांत मोहवश होऊन स्वतःस विसरून दुःख करूं लागतो, अथवा–गारोड्याच्या मांत्रिक विद्येनें कोणी फसून सर्पादिकांच्या भयानें भयभीत होतो, तसेच मायेनें वेडे झालेले हे लोक व्यर्थ दुःख पावतात. परन्तु स्वप्नांतून जागृत झाल्यावर अथवा इंद्रजालविद्येचें स्वरूप जाणल्यावर तो जसा त्यास भीत नाहीं, उलट दुसरे कोणी भीत असतील त्यांस हंसतो, त्याप्रमाणें आत्मस्वरूप ओळखणारे पुरुष या मायेंतून सुटून दुःखरहित होतात, व तुजसारख्या मायेनें मोहित झालेल्या वेड्यांना हंसतात! करितां तूं आत्मस्वरूपाचें ज्ञान करून घेऊन या दुस्तर मायेंतून पार हो, आणि विवेकबळानें हा मोहजन्य शोकावेग दूर कर."

यावर महासेन मुनिपुत्रास म्हणाला, "भगवन! आपण दिलेला दृष्टान्त येथें जमत नाहीं. कारण, स्वप्नांत किंवा इंद्रजालविद्येंत भासणारा प्रकार केवळ असत्–मिथ्या–असून भासतो. पण जागृतींत अनुभवास येणारें हें जग सत्य आहे,–सर्व गोष्टी प्रत्यक्ष घडाव्या अशा प्रकारचें आहे; व याचा केव्हांहि लोप होत नसून तें स्थिर आहे, तर तें स्वप्नाप्रमाणें कसें व्हावें?"

तेव्हां यावर तो बुद्धिमान् मुनिपुत्र पुनः म्हणाला, "एक, तूं दृष्टांत जमत नाहीं म्हणतोस, हा तुला दुसरा एक मोह झाला आहे. जसा एखाद्याला स्वप्नरूप एक भ्रम झाला असतां तेथें आणखी दोरीवर सर्पादिक भासावे, तसाच तुझा प्रकार झाला आहे. कारण असें पहा कीं, स्वप्नांतील वृक्षादिक तरी स्वप्नाच्या वेळीं कोणतें कार्य

प्रत्यक्ष साधीत नाहींत ? वाटसरू लोकांना सावली करून त्यांचा ताप ते निवारण करीत नाहींत काय? किंवा स्वप्नांतील पुरुषांना फळें वगैरे देऊन त्यांचें समाधान करीत नाहींत कीं काय? तें सांग? आणि स्वप्नांमध्यें स्वप्नसृष्टि कधीं खोटी ठरते ? किंवा ती कायमची नव्हे, क्षणिक आहे, हें तरी कधीं कोणाला समजतें ? आतां 'तें सर्व जागृत होतांच खोटें ठरतें' म्हणून म्हणशील, तर पहा कीं, हा सर्व जागृत्प्रपंचसुद्धा निद्राकाळीं नष्ट होत नाहीं काय ? 'दुसऱ्या दिवशीं तो तसाच पुनः अनुभवास येतो, म्हणून तो नष्ट होत नाहीं' म्हणशील तर स्वप्नांतील विषय सुद्धां दुसऱ्या दिवसास अनुभवास येतच नाहींत कीं काय तें सांग? अथवा 'ते पुनः अनुभवास येत नाहींत' म्हणशील, तर राजा ऐकून घे कीं, जागृतींत तरी पुनः तोच पदार्थ कधीं अनुभवास येतो ? दुसरा नवीनच भासत असतो. आतां पदार्थ नवीन भासत असतांहि पृथिव्यादिक तींच तीं भासतात, असा तूं भेद काढशील, तर स्वप्नामध्येंहि त्याच त्या पुत्रकलत्रादिकांचा अनुभव पुनः पुनः येत असतोच. तूं सूक्ष्म विचार करून पहा. तो अनुभव खोटा म्हणशील, तर जागृतींतला तरी खोटा कां म्हणू नये ? जागृदवस्थेंत जे देह, वृक्ष, नद्या, तसेंच दीपादिक पदार्थ भासतात, ते प्रत्येक क्षणाला निराळे होतात. मग अगदीं तंतोतंत तोच अनुभव येतो हें तरी कसें म्हणावें ? पर्वतासारख्या वस्तूंचें स्वरूप सुद्धां दुसऱ्या क्षणाला टिकत नाहीं. झरे, ओढे वगैरेंनीं ते सारखे पालटत आहेत. उंदीर, लांकडाची माती करून टाकणारे कीटक, डुकरें इत्यादिकांनीं पर्वतांच्या स्वरूपांत सारखा भेद

होत आहे. याचप्रमाणें समुद्र व भूप्रदेश क्षणोक्षणीं बदलत आहेत. मग ते तसेच पुनः अनुभवास येतात असें तूं कसें म्हणतोस ? राजा, याचें आतां अधिक स्पष्टीकरण करितों; जरा सूक्ष्म बुद्धीनें पहा. विशिष्ट देशीं व विशिष्ट कालीं मात्र पदार्थांचा अनुभव येणें हा प्रकार स्वप्नांत व जागृतींत सारखाच आहे. आणि सर्व देशीं किंवा सर्व काळीं एखाद्या पदार्थाचा अनुभव येणें हें तर अत्यंत दुर्लभच आहे. तें दोन्ही प्रकारांत संभवत नाहीं. आतां पदार्थांचा पदार्थरूपानें नाहीं तरी कारणरूपानें अनुभव येतो म्हणावें, तर कारण म्हणजे पृथिव्यादि भूतें व त्यांचा तर स्वप्नामध्येंहि अनुभव येतच असतो. मग फरक तो काय ? ‘ स्वप्नाचा बाध जागृतींत होतो, परन्तु जागृतीचा बाध झालेला कधींच भासत नाहीं ’ म्हणून म्हणशील, तरी हे पहा कीं, बाध म्हणजे तरी काय ? पदार्थांचा भास न होणें हाच बाध. व झोंपेमध्यें सर्वच जगाचा भास होत नसतो, हा तर सर्वांचा अनुभव आहे. मग जागृतीचा बाध होत नाहीं. असें तूं काय म्हणतोस ? आतां पदार्थांचा भास न होणें हा बाध नसून ‘ तो मिथ्या आहे ’ असें ओळखून येणें म्हणजे बाध. असें म्हणशील तर— तुजसारख्या भ्रांतांना तसें ओळखण्याची शुद्ध दृष्टि आहे कोठें ? ज्यांनीं ज्ञेय वस्तु पूर्ण ओळखली आहे, त्यांना ती दृष्टि असते. तस्मात् राजा, तुझा एकहि आक्षेप विचारापुढें टिकत नाहीं. म्हणून मी म्हणतों कीं, हें सर्व दृश्यजाल अगदीं स्वप्नांतील सृष्टीप्रमाणें आहे. जागृतीप्रमाणेंच स्वप्नामध्येंहि दीर्घकाल अनुभवास येते. म्हणून स्वप्नसृष्टि हीहि बाधित न होणारी, सर्व व्यवहार करणारी व स्थिर

अशीच असल्यामुळें जागृतीशीं अगदीं तुल्य ठरते. जागृत-अवस्थेंत जसें आपण जागृत् आहोंसें वाटतें, तसेंच तें स्वप्नस्थितींतहि भासतेंच. तेव्हां असा प्रकार असल्यामुळें राजन् ! स्वप्न व जागृति यांत फरक आहे कोठें ? मग तूं स्वप्नांतील आप्तजनांबद्दल शोक कां करीत नाहींस ? यासाठीं बाबा रे, केवळ भावनासामर्थ्यानेंच या जगाला खरेपणा आला आहे. शून्यपणाची भावना केली, तर सर्व शून्य, खुलें आकाश होऊन जाईल. तसेंच ' हें सर्व मिथ्या आहे ' अशी भावना जर निश्चयानें दृढ केली, तर तसाच आत्मभाव सर्वत्र अनुभवास येईल. कारण, प्रत्यक्षच पहा कीं, याच टेकडीच्या पोटांत तुला माझें राज्य दृष्टीस पडलें ! हवें तर चल, या टेकडीच्या सभोंवार आपण एक फेरी करून पाहूं. "

असें म्हणून महासेनाला हातीं धरून मुनिपुत्र निघाला. नंतर त्या दोघांनीं टेकडीस प्रदक्षिणा केली. मग परत आल्यावर पुनः तो बुद्धिमान् मुनिपुत्र त्या महासेनास म्हणाला, " राजा ! पाहिलीस ही टेकडी ? फक्त ३।४ मैल परिघाची आहे. हिच्याच अंतर्भागीं मोठा विस्तृत प्रदेश तूं आतां पाहिलास ! मग ही जागृति का स्वप्न ? सत्य का मिथ्या ? सांग. टेकडींत एक दिवस होतो तोंच एथें बारा अर्बुद वर्षें तूं अनुभाविलींस ! तर आतां खरें आणि खोटें याचा तूं निर्णय कर. दोन वेगवेगळीं जशीं स्वप्नें भासावीं, तसाच हाहि प्रकार आहे. तस्मात् फक्त भावना एवढेंच या जगांत सार आहे हें तूं ध्यानांत ठेव. ती भावना सोडून दिल्यावर एका क्षणांत हें जग यास जाईल. म्हणून राजा, जगत् हें एक स्वप्नच समजून शोकाचा

त्याग कर. या स्वप्नचित्रास आधारभूत असा दर्पणासारखा संविद्-रूप केवल आत्मा आहे, हें जाणून, मग जसा तूं असशील तसा अस. या जगच्चित्राचा आरसा चिद्रूप आत्मा आहे हें ओळखून परमानंदानें तुझें अंतःकरण एकदांचें भरून येऊं दे."

---

## प्रकरण १४ वें,

# संकल्पाचें सामर्थ्य.

देशः कालोऽथवा किंचिद्यथा येन विभावितम् ॥
तथा तत् तत्र भासेत दीर्घसूक्ष्मत्वभेदतः ॥ ८३ ॥

मुनिपुत्राचें मागें सांगितलेलें भाषण ऐकून महासेनानें शुद्ध बुद्धीनें आणखी विचार केला. शेवटीं जगताची दशा स्वप्नासारखीच आहे असें ओळखून सर्व शोक करण्याचें सोडून दिलें. नंतर मनाला स्वस्थता आल्यावर पुनः तो मुनिपुत्राला म्हणाला, "भगवन्, आपण महा बुद्धिमान् व प्रत्यक्ष ब्रह्मदर्शी आहां! आपणांला माहीत नाहीं असें कांहींच नाहीं असें मला वाटतें. तेव्हां मी आपल्याला विचारतों, तें कृपा करून सांगावें. आपण म्हणतां हें सर्व भावनाप्रधान आहे; आणि आपण भावनेच्या बळावर टेकडींत स्वतंत्र जगहि निर्माण केलेंत! पण मग मी जशी भावना करितों, तसा प्रकार मला बाहेर अनुभवास कसा येत नाहीं? आणि दुसरें असें कीं, एकच काळ आणि एकच प्रदेश दोन रूपांनीं कसा अनुभवास आला? आणि त्यांत मग खरा कोणता व खोटा कोणता? तर हें मला आपण समजावून सांगा."

असें विचारतांच मुनिपुत्रानें बोलण्यास आरंभ केला. तो म्हणाला, "भावना म्हणजे संकल्प. त्या भावनेचे प्रकार दोन; एक सिद्ध भावना आणि दुसरी असिद्ध भावना. ज्या भावनेंत तिच्या विरुद्ध विकल्पाचा मुळींच प्रवेश होत नाहीं—मन आपल्या एका ध्येयावरून

मुळींच प्रचलित होत नाहीं—तिला सिद्ध भावना म्हणतात. ब्रम्हदेवाच्या भावनेमुळें हें जगच्चित्र निर्माण झालें आहे. आणि तें सर्व जीवांच्या भावनांच्या दृढपणामुळेंच सत्यत्व पावलें आहे. ब्रम्हदेवाच्या जगताप्रमाणें आपल्या संकल्पजन्य जगतासंबंधीं कोणाचीच सत्यत्वाची भावना नाहीं. आणि हाच विकल्प मनांत प्रवेश करीत असल्यामुळें आपली भावना असिद्ध राहते. ही भावनाजन्य सिद्धि पुष्कळ प्रकारची आढळते. कोणाला जन्मतः प्राप्त असते, कोणाला एखाद्या रत्नापासून प्राप्त होते. कोणाला औषधींच्या योगानें, कोणाला योगमार्गानें, कोणाला तपश्चर्येनें, कोणाला मंत्र सिद्ध केल्याच्या योगानें, आणि कोणाला वर मिळाल्यामुळें सिद्धि प्राप्त होते. ब्रम्हदेवाला जन्मतः सिद्धि आहे. यक्षराक्षसांना रत्नांपासून आहे. देवांना औषधापासून—अमृतापासून—आहे. योगमार्गजन्य सिद्धि योग्यांजवळ आढळते. तपस्व्यांची तपापासून व मांत्रिक लोकांची मंत्रापासून आहे. विश्वकर्मा वगैरेंना वराच्या योगानें सिद्धि झालेली आहे. याकरितां जसजशी अनुभवाची अपेक्षा असेल तसतसा संकल्प करावा. मग तो संकल्प करतां करतां जेव्हां ‘ मी संकल्प करीत आहें ’ या भावाचें पूर्णपणें विस्मरण होईल, तेव्हां तो संकल्प सिद्ध होईल. या प्रकारें जेव्हां पूर्वीचें अन्य स्मरण सुटून निर्विकल्प—भावना अगदीं दृढ होईल व प्रयत्नावांचूनच विकल्प बंद पडतील, तेव्हा ती भावना सिद्ध होईल आणि मग हवें तें महत्कार्य सिद्धीस जाईल. राजा ! तुझी भावना मधून मधून उद्भवणाऱ्या विकल्पांमुळें अद्यापि सिद्ध झालेली नाहीं. यासाठीं जर तुला निराळी सृष्टि करण्याची हौस असेल, तर

लागलीच आपली भावना सिद्ध करून घे. म्हणजे तुला मजप्रमाणें प्रत्यक्ष अनुभव येईल."

"आतां दुसरा मुद्दा म्हणजे देशकालांची द्विविधता. ती कशी भासली तें सांगतों, ऐक. तुला या लोकव्यवहाराचें स्वरूप बरोबर समलें नसल्यामुळें हा चमत्कार वाटत आहे. तर आतां नीट लक्ष देऊन माझें भाषण ऐक. अनेक रूपांनीं भासणें हा या जगताचा स्वभावच आहे. सूर्याचा प्रकाश एकच, परंतु त्याचा अनुभव दोन प्रकारचा;–दिवाभीताला अंधार व इतरांना उजेड; पाणी हें मनुष्यांस व पश्वादिकाना श्वासोच्छ्वासाला अडथळा करणारें आहे. परंतु मासे वगैरेंना तें श्वास घेण्याला प्रतिरोध करीत नाहीं. अग्नि सर्व जीवांचें भस्म करितो, पण तित्तिरपक्षी अग्नीचेंच भक्षण करितो! पाण्यामध्यें अग्नि विझतो, परंतु तो त्यांत जास्तच पेट घेतो असेंहि कित्येक कुंडामध्यें आढळतें! सारांश, याप्रमाणें जगतांतील सर्वच भाव असे द्विविध आहेत. हा प्रत्यक्ष अनुभवास येणाऱ्या पदार्थांचा प्रकार झाला. परंतु इंद्रियाना गोचर न होणारे परस्परविरुद्ध अनुभवाचे पदार्थ तर शेकडों, नव्हे हजारों आहेत. आता याची उपपत्ति सांगतों, एकाग्र चित्तानें ऐक. हे सर्वच अनुभव चक्षुरिंद्रियावर अवलंबून आहेत. नेत्राची विकृति हेंच यांचें स्वरूप आहे. नेत्रांच्या बाहेर या दृश्यांचा एक अंशसुद्धां कोठेंच नाहीं. पित्तदोषानें डोळे बिघडलेला मनुष्य जसा बाहेर सर्वत्र पिंवळेंच पाहतो; परंतु तो पिवळेपणा जसा त्या बाह्य पदार्थांवर वस्तुतः असत नाहीं,–अथवा तिमिररोग झालेला पुरुष जसा प्रत्येक वस्तु दोन प्रकारची पाहतो, त्याप्रमाणें निरनिराळ्या

दोषांनीं नेत्र दूषित झाल्यामुळें सर्वजण नानाप्रकारें हें जगत् अनुभवीत असतात. पूर्वसमुद्रांत करंडक नामक बेट आहे, तेथील लोकांना सारे पदार्थ नेहमीं तांबडे दिसतात. तसेंच रमणक बेटांतील लोकांना सर्वच पदार्थ उलटे,—खालचा भाग वर व वरचा खालीं,—असे दिसतात. याचप्रमाणें निरनिराळ्या प्रदेशांमध्यें लोक आपापल्या नेत्रेंद्रियाच्या घटनेप्रमाणें निरनिराळे प्रकार नेहमीं पहात असतात. तेथें त्यांना जर कोठें तसें न दिसतां सुलटेंच दिसूं लागलें, तर ते औषधादिकांनीं आपले डोळे शुद्ध करून घेतात व मग त्यांना पूर्ववत् ते पदार्थ तांबडे किंवा उलटे दिसूं लागतात! आणि मग त्याचें समाधान होतें. सारांश, या जगांत कामीण झालेल्या मनुष्याप्रमाणें, डोळ्यांनीं जसें पाहिलें जातें तसतसा पदार्थ भासमान होतो. असाच घ्राणादि इंद्रियांचा प्रकार आहे. त्यांचे गंधादि पदार्थ केवळ घ्राणमात्र आहेत. घ्राणेंद्रियाहून वेगळें अस्तित्व त्यांना नाहीं. तसेंच मानसिक भाव केवळ मनोमात्र आहेत. व्यवहारांत जो पदार्थांचा क्रम आणि परस्परसंबंध भासतो, तो सर्व इंद्रियांनीं उत्पन्न केलेला आहे, त्यांच्या बाहेर कांहीं सुद्धां नाहीं. राजन्! पहा कीं, जगांत 'बाहेर' म्हणून जें कांहीं भासमान होत आहे तेंच या जगाचें मूळ आहे;—जगद्रूप चित्राला भिंतीप्रमाणें तोच आधार आहे. पण त्याला तरी 'बाहेर' असें म्हणावयाला निश्चित असा आधार मुळींच नाहीं. तें कोणाच्या बाहेर हेंच मुळीं ठरत नाहीं. अशा तऱ्हेचें अपादान आपण शोधूं लागलों तर शरीर हें कदाचित् संभवेल, दुसरें तर कांहीं मानितां येत नाहीं. परंतु वस्तुतः पहातां शरीरसुद्धां बाहेरच भासत आहे. मग

तें जगाला बाहेर म्हणावयाला अपादान कसें होणार? 'पर्वताच्या बाहेर' असें ह्मटल्यावर पर्वत कांहीं बाहेर होत नाहीं. तेव्हां घटाप्रमाणें शरीर हेंहि बाहेरच भासतें. आतां 'यांचा जो भासक आहे त्याच्या बाहेर' असें म्हणावें, तर तेंहि संभवत नाहीं. कारण, दीपाच्या किंवा सूर्याच्या प्रकाशाच्या बाहेर अर्थात् अंधारांत जर कोणी असतील तर ते कधींच भासमान होत नाहींत. यासाठीं हें सर्व जगत् जर भासमान होत आहे तर तें भासकाच्या आंतच आहे, हें म्हणणेंच योग्य होतें. आतां हा भासक कोण आहे? देहादिकांना कांहीं भासक मानतां येत नाहीं. कारण पर्वतादिकांप्रमाणें देह भास्य होणारा आहे. म्हणून 'जें भास्य आहे, तेंच भासक आहे' हें म्हणणें मुळींच योग्य होत नाहीं. भासकालाच भास्यपणा आल्यावर भासकत्व राहिलेंच नाहीं. स्वतःच भासक व स्वतःच आपलें भास्य होणें म्हणजे कर्तृकर्मविरोध उत्पन्न होतो. ह्मणून तें योग्य होत नाहीं. ह्मणून भासक तत्त्व अत्यंत शुद्ध, केवळ भासक या एकाच स्वरूपाचें, फक्त प्रकाशरूप, परिपूर्ण व एकरसात्मकच असलें पाहिजे. देश व काल हे त्यानेंच व्यापिले आहेत. कारण तेहि त्या भासकामुळेंच भासतात. व म्हणूनच तें भासक तत्त्व परिपूर्ण होय. शिवाय जें भासकाशीं तादात्म्य पावलें नाहीं तें भासमानच होत नसतें. त्यामुळें त्या भासकाच्या आंतहि दुसरें कोणी नसून तेंच केवळ प्रकाशक म्हणून एकरस भरलें आहे. आंत किंवा बाहेर म्हणून जें जें कांहीं पदार्थजात भासमान होत आहे, तें तें त्याच्याच पोटांत स्थित आहे. म्हणून पर्वताचें शिखर जसें पर्वताच्या बाहेर म्हणतां येत नाहीं, त्याप्रमाणें जग हें बाहेर भासतें, तें त्या

भासकाच्या बाहेर भासतें असें म्हणतां येत नाहीं. अशा प्रकारें या प्रकाशस्वरूप भासकानेंच सर्व प्रपंच भासला असून तेंच आत्मरूप आपल्या स्वरूपाच्या ठिकाणीं स्वतंत्रपणानें सर्व काळीं व सर्व ठिकाणीं भासमान होत आहे. हींच परम चैतन्यस्वरूप परमेश्वरी त्रिपुरादेवी. हिलाच वेदान्ती ब्रह्म म्हणतात, वैष्णव विष्णु म्हणतात, शैव शिव म्हणतात, व शाक्तपंथी शक्ति म्हणतात. या चित्स्वरूपाशिवाय जें कांहीं बोललें जातें तें अपूर्ण होय. हेंच एक पूर्णरूप आहे. आरसा जसा सर्व प्रतिबिंबांना व्यापून राहतो, त्याप्रमाणें त्या चिच्छक्तीनेंच सर्व व्यापलें गेलें आहे. त्याला भासकत्व आलें आहे तें भास्याच्या अपेक्षमुळें आहे, तें त्याच्या अंगीं वस्तुतः नाहीं. आदर्शांत भासणाऱ्या नगराप्रमाणें सर्व भास्य पदार्थ भानरूपांत अगदीं मिळून गेले आहेत. आदर्शांतील नगर जसें आदर्शाहून वेगळें असत नाहीं, त्याप्रमाणें पूर्ण घनदाट व एकरस अशा चैतन्याच्या ठिकाणीं हें जगत् भासत असल्यामुळें तें त्याहून वेगळें नाहीं. आदर्शावर भासणारें नगर जसें त्याहून निराळें सिद्ध करितां येत नाहीं, तसेंच घनदाट व एकरस चैतन्यावर निराळें असें जगत् मुळींच दाखवून देतां येत नाहीं. आकाश ही एक पोकळी आहे व शून्य हें तिचें स्वरूप आहे, त्यामुळें त्यांत त्याहून वेगळें जगत् सामावूं शकतें, परंतु सर्वदा व सर्वत्र सद्रूप व एकरस असणाऱ्या चैतन्यांत द्वितीयत्वाचा एक लवलेशहि टिकणें शक्यच नाहीं. सारांश, शुद्ध संवित् ही आदर्शाप्रमाणें स्वच्छ आहे, व तींच आपल्या अद्वितीय स्वस्वरूपाच्या ठिकाणीं आपल्या स्वातंत्र्याच्या बळावर सर्व चराचर विश्व भासित करिते.

आणि अशा रीतीनें निमित्त व उपादान कारणांवांचूनच हें अत्यंत चमत्कारिक द्वैत प्रकट होतें. आदर्शामध्यें अनेक आकार व्यक्त होत असतांहि त्याचें एकत्व मुळींच न विघडतां स्पष्ट भासत असतें, त्याप्रमाणें जगतांतील अनेक विचित्र भास भासमान होत असतांहि त्या सर्वांत मिळून राहणारें एक चित्तत्व निर्दोषच असतें. राजा, तूं आपल्याच ठिकाणीं आपल्या मनोराज्याचा सूक्ष्मपणें विचार कर. तेथेंहि केवळ चैतन्यच नाना विचित्र आकार धारण करितें, हें उघडच आहे. तेव्हां प्रतिबिंब पडलें अथवा न पडलें तरी आदर्श जसा शुद्धच असतो, त्याप्रमाणें सृष्टिकाळीं किंवा प्रलयकाळींहि तें चिद्रूप खरोखर निर्विकल्पच असतें. याप्रमाणें हें एकरस असणारें चैतन्यच आपल्या स्वातंत्र्याच्या योगानें, आदर्शांत भासणाऱ्या नगराप्रमाणें, आपलेंच स्वरूप बाहेर करून भासवितें. हीच पहिली उत्पत्ति. हिलाच अविद्या म्हणतात. कोणी तमहि म्हणतात. परिपूर्ण व्यापक चिद्रूपाच्या ठिकाणीं जणूं काय अंशात्मक असें जें भान होतें, त्यालाच बाह्य भास म्हणतात. अहमात्मस्वरूप जें पूर्णचैतन्य त्याच्या ठिकाणीं असा हा छेद झाल्यासारखा झाल्यानें तेथें अहं हें स्फुरण रहात नसून अनहंभावना प्राप्त होते. अर्थात् ज्यांत अहं-तत्त्व नाहीं, तें जडच होय. अशा या तत्त्वाला अव्यक्त असें म्हणतात. पुरुषहि आपल्या ठिकाणीं अहंता धारण करितो, परन्तु शरीराचा अंश जो हस्तपादादि त्याला काहीं अहंता नसते, तसेंच शुद्ध चैतन्याच्या ठिकाणचें अहं हें स्फुरण या जड अव्यक्त तत्त्वावर नसतें. तो त्याचा विराट् देहच होय. या ठिकाणीं मर्यादितपणानें भासणारें जें चैत-

त्यास ' शिवतत्त्व ' म्हणतात. प्रळयकाळीं जड सृष्टीचा लय होऊन जें चैतन्याचें निर्विकल्पक शुद्ध स्वरूप अवशिष्ट राहतें, तेंच हें शिवतत्त्व होय. आणि जो बाह्य भास म्हणजे अहं हें स्फुरण, चैतन्याचें सविकल्प स्वरूप, त्याला शक्ति असें म्हणतात;. म्हणजे हें जीवतत्त्व होय. आणि ' बाहेर ' असें म्हणून शून्य आकाशांत जी पदार्थांची कल्पना होते, तिच्या ठिकाणीं ' हा मी ' असा भाव धरून राहणारें जें तत्त्व त्याला ' सदाशिव ' असें म्हटलें आहे. हें तिसरें तत्त्व. त्यांतच ' हा मी ' यांतील ' हा ' या जड तत्त्वाचा विचार करावयाचा असतां त्यास ईश्वर हें नांव देतात. हें चवथें तत्त्व समजावें. सदाशिव आणि ईश्वर या दोन तत्त्वांचें भेदाभेदपूर्वक जें संवेदन— कीं, जें त्या दोहोंत अनुगत राहून सामान्यत्वेंकरून भासतें, तें शुद्धविद्या नामक पांचवें तत्त्व होय. येथवर जड शक्तीचा विकास झालेला नसल्यामुळें व हे सर्व आत्मतत्त्वाचेच अवभास असल्यानें या तत्त्वपंचकास ' शुद्ध तत्त्वपंचक ' म्हणतात. असो. यानंतर चित्स्वातंत्र्याच्या माहात्म्यानें भेदसंकल्प जेव्हां वृद्धि पावतो, तेव्हां चैतन्य हा जडशक्तीचा धर्म होऊन ती जडशक्ति धर्मी बनते. त्या वेळीं त्या जडशक्तीस ' माया ' असें नांव येतें. भेदसंकल्पाचें प्राबल्य झाल्यामुळें विशिष्ट भेद निश्चित करणारी अवस्था तीच माया होय. याच भेदभावनेनें चिति जेव्हां व्याप्त होते, तेव्हां ती संकोच पावून पंचकंचुकांनीं युक्त होऊन पुरुषरूपास प्राप्त होते. कला, विद्या, राग, काल व नियति हें तें पंचकंचुक होय. शिवाच्या अंगीं या पांच शक्ति पूर्णपणें वास करितात, जीवाच्या अंगीं त्या अंशतः राहतात.

( १ ) कांहीं मर्यादेपर्यंत कर्म करतां येणें, ( २ ) कांहीं मर्यादेपर्यंत जाणणें, ( ३ ) कांहीं मर्यादेपर्यंत इच्छा करणें, ( ४ ) कांहीं काल वास्तव्य करणें, व ( ५ ) कांहीं गोष्टींत स्वावलंबी असणें हीं जीवांचीं पांच लक्षणें आहेत. अनादि कालापासून जीवांचीं जीं बरीं वाईट कर्में चालत आलेलीं आहेत, त्यांच्या संस्काराचा जो समुदाय त्याला प्रकृति असें म्हणतात. कर्माचें हें फल सुख, दुःख आणि मोह या तीन प्रकारचें असल्यामुळें प्रकृतिहि तीन प्रकारची झाली आहे. तिच्याच एका विशिष्ट अवस्थेला चित्त असें नांव आहे. सुषुप्तिस्थितींत तिला प्रकृति म्हणतात; व ती संपतांच तिलाच चित्त नांव देतात. चैतन्य व संस्कारपिंडानें युक्त झालें म्हणजे चित्त होतें. त्यालाच अव्यक्त हेंहि नांव आहे. पुरुषभेदेंकरून चित्त हें नानाविध झालें आहे. परन्तु सर्वच जीवांचें मूल स्वरूप एकच असल्यामुळें सुषुप्तिअवस्थेंत तें सर्वदां एकरूपानेंच अनुभवास येतें. यामुळें त्या वेळीं तेंच प्रकृति होतें, व जागृतींत पुनः चित्त बनतें. यालाच चैतन्याच्या प्राधान्यानें पुरुष म्हणतात; व अव्यक्तप्राधान्यानें त्याला प्रकृतित्व येतें. हेंच चित्त क्रियाभेदपरत्वें अहंकार, मन व बुद्धि या तीन नांवांनीं तीन प्रकारचें होतें. यापुढें पांच कर्मेंद्रियें व पांच ज्ञानेंद्रियें उत्पन्न होतात. नंतर शब्दादि विषयपंचक व आकाशादि स्थूल व सूक्ष्म पंचमहाभूतें उद्भवतात."

मुनिपुत्र पुढें म्हणाला, "राजा महासेना, अशा क्रमानें ती शुद्ध व सर्वसाक्षी परम संवित् बाहेरचा आभास प्रगट करून क्रीडा करीत आहे. या सर्वांचें मूळ जी श्रीत्रिपुरा शक्ति, तिनें सृष्टिकाळीं जो

हिरण्यगर्भ किंवा ब्रम्हदेव भावनाबळानें निर्मिला, त्याच्या भावनेनें हें जगत प्रगट झालें आहे. तूं, मी इत्यादि रूपांनीं जी केवल संवित्, शुद्ध ज्ञानकला, जाणीव भासत आहे, तीच ती परम चैतन्यशक्ति होय. तिच्या मूल स्वरूपांत भेद नाहीं. उपाधिवशात् भेद भासतो. ती उपाधि ब्रम्हदेवाच्या भावनेनें उदय पावली असल्यामुळें तिचा उपसंहार झाल्यावर भेद भासणें शक्य नाहीं. चैतन्याचें हें जें भावनासामर्थ्य तें तुझ्या ठिकाणीं मायेनें आवृत झालें आहे. मी एक क्षुद्र जीव आहें, अशी हृदयांतील दृढ ग्रंथि हेंच त्या मायेचें स्वरूप होय. त्या मायेचें आवरण नष्ट होतांच ती तुझी शक्ति सिद्ध होईल. देश किंवा काल कांहीं का होईना, ज्यानें जशी भावना केली असेल तदनुसार अल्प किंवा विस्तृत भासतात. मीं एक दिवसाची भावना केल्यामुळें एक दिवस झाला; पण तेवढ्यांत ब्रम्हदेवानें बारा अर्बुद वर्षांची भावना केली. त्यामुळें हा असा लहानमोठेपणाचा अनुभव आला. ब्रम्हदेवानें निर्मिलेल्या तीन चार मैलांच्या टेकडींत मीं अनंत प्रदेशाची भावना केल्यामुळें त्यांत अनंतता उत्पन्न झाली. यामुळें हा सर्व प्रकार म्हटला तर खराहि आहे आणि म्हटला तर खोटाहि आहे. कारण तो सर्वस्वीं भावनेवर अवलंबून आहे. म्हणून हवें तर तूंहि आपल्या अंतर्यामीं एक दोन मैलांचा प्रदेश व अल्पसा काल घेऊन तेथें अनंत योजनें लांब प्रदेशाची व दीर्घकालाची भावना कर. भावना सिद्ध होतांच म्हणजे विरुद्ध विकल्पांचा चित्तांत उदय होण्याचें राहतांच तुला त्याचा प्रत्यक्ष अनुभव येईल. सारांश, हें बाह्य जगत् केवळ भावनामात्र आहे. व तें अव्यक्त अशा चैतन्यावर भा-

सत आहे. अर्थातच हें चित्रमय जगत् अव्यक्त नामक भिंतीवर अव्यक्तैकस्वरूपानें भासत आहे. चैतन्य ही ती अव्यक्त भिंत होय. ह्मणूनच जेथें जाण्यास सामान्य मनुष्यास कालावधि लागतो अशा दूरदेशांतहि योगी एका क्षणांत जाऊन पोंचतात. तेव्हां महासेना! दूर किंवा जवळ, लौकर किंवा उशिरां हें सर्व भावनांनीं सिद्धतेस आलें आहे, व चैतन्यरूप आदर्श हाच यांना आश्रय आहे, हें निश्चयपूर्वक जाणून शुद्ध चिद्भावनेच्या योगानें तूं ही सर्व भ्रांति सोडून दे; म्हणजे मजप्रमाणेंच तूंहि सर्वसमर्थ होशील."

मुनिपुत्राचें हें भाषण ऐकून कांहीं विचार केल्यानंतर महासेनाच्या सर्व भ्रमाचा निरास झाला. सर्व ज्ञेय जाणल्यामुळें त्याचें अंतःकरणहि अतिशय शुद्ध झालें. नंतर त्यानें समाधीचा अभ्यास करून भावनासामर्थ्य मिळविलें, व सर्वसमर्थ होऊन या पृथ्वीतलावर चिरकाल विहार केला. देहाहंभावाचें उन्मूलन करून शुद्ध चिद्गगनाच्या आश्रयानें शेवटीं तो परम निर्वाणपदास प्राप्त झाला.

दत्तात्रेय ह्मणतात, परशुरामा! असें हें जगत् केवळ सत्यत्वाच्या भावनेमुळेंच सत्यरूपानें भासत आहे. तूं याचा चांगला विचार कर, म्हणजे तुझ्या चित्तांतील सर्व भ्रम विचाराच्या योगानें शांत होऊन जाईल.

---

## प्रकरण १५ वें,

# समुद्रास्तृप्यन्तु !

जिजेय वारुणिर्विप्रान् वितंडाजल्पवर्त्मना ॥
सिंधौ निमज्जितास्तेन शतशस्ते सहस्रशः ॥ ४५ ॥

संकल्पाच्या सामर्थ्याचा असा हा अद्भुत प्रकार श्रवण करून परशुरामास वरचेवर फार आश्चर्य वाटूं लागलें. मग त्यानें त्या श्रीगुरूंच्या सांगण्याचा चांगला विचार केला आणि शुद्ध बुद्धीनें कांहीं एक मनाचा निश्चय ठरविला. नंतर दत्तात्रेयांच्याकडे पुनः जाऊन आदरानें त्यांस नमस्कार करून त्यांना त्यानें एक प्रश्न केला. तो म्हणाला, " भगवन् ! आपण अनेक गोष्टी सांगून जो बोध केलात, त्यासंबंधीं मी पुष्कळ विचार केला, आणि एक सार शोधून काढलें. तें असें की, संवेदन म्हणजे चैतन्य अथवा ज्ञान हेंच काय तें एक सत्य तत्त्व आहे. संवेद्य अथवा ज्ञेय भाव हे त्याच्या आधारावर कल्पित आहेत. आदर्शांत भासणाऱ्या नगराप्रमाणें ती खोटी कल्पना आहे. हें चैतन्य हाच परम समर्थ संविद्रूप परमेश्वर असून, तोच स्वस्वरूपभूत भिंतीच्या ठिकाणीं बाह्यपदार्थांनीं बहुविध झालेलें हें जगच्चित्र भासवितो. व तो स्वतंत्र असल्यामुळें त्याला या कामीं अन्य सामग्री कांहीं लागत नाहीं. सूक्ष्म विचार केल्यावर इतकें मला समजलें. परंतु अशा प्रकारची ही संविति वस्तुतः वेद्य-रहित—म्हणजे निर्विकल्प म्हणून आपण म्हटली, ती सांपडणें अशक्य आहेसें मला वाटतें. कारण ती नेहमीं संवेद्य भावांना चिकटून

राहिलेली आहे. तर वेद्यरहित अशी संविति, निर्विकल्प स्थिति कशी जाणावी? आणि निर्विकल्प विज्ञान झाल्यावर जर मोक्ष होत असेल, तर मुक्त झाल्यावर व्यवहार कसा व्हावा? ज्ञानी सुद्धां व्यवहार करतांना आढळतात. मग त्यांना ती निर्विकल्प अवस्था कशी असूं शकते? शुद्ध निर्विकल्पावस्थेंत व्यवहार कसा होईल तें कळत नाहीं! दुसरें असें कीं, ज्ञान हें एकाच प्रकारचें आहे. अर्थात् त्याचें फळ जो मोक्ष तोहि एकाच प्रकारचा असणार. तर जगावर ज्ञान्यांमध्यें फरक कसा आढळतो? पहा कीं, कित्येक ज्ञानी यथाकालीं शास्त्रविहित कर्में करितात. कित्येक नाना प्रकारांनीं देवाची भक्तिच करीत असतात. कोणी सर्व इंद्रियांचा उपसंहार करून समाधींत गढून जातात. कोणी तपश्चर्येनें देहेंद्रियांना वाळवीत राहतात. कोणी निरनिराळ्या प्रकारानें शिष्यगणाला सुबोध तत्त्वोपदेश करीत असतात. कोणी तर दंडनीतीच्या मार्गाचा स्वीकार करून राज्यकारभार चालवितात. कोणी सभा भरवून प्रतिपक्ष्यांशीं वाद करितात. कोणी अनेक प्रकारच्या शास्त्रांचीं बाडें लिहून ठेवितात. दुसरे कोणी सदोदित वेडेपणा पांघरतात. आणि कोणी तर लोकनिंद्य वृत्तिच घेऊन बसतात. पुनः हे सारे लोकांमध्यें ज्ञानी म्हटले जातात! तर साधनांत किंवा फलांत भेद नसतांहि स्थितींत भेद कां पडतो? मग यांचें ज्ञान हें समसमान आहे किंवा कांहीं कमीजास्त आहे? हें सर्व मला आपण समजावून सांगा. एकनिष्ठ शिष्यासंबंधी आपलें हृदय स्वभावतःच दयाळू आहे, म्हणून पुनः पुनः विचारावेंसें वाटतें.

असें परशुरामानें विचारल्यावर श्रीदत्तात्रेय सुप्रसन्न झाले. व सर्व

प्रश्न योग्य आहेत असें पाहून त्यांनीं भाषणास आरंभ केला. ते म्हणाले:—परशुरामा, खरोखर तूं बुद्धिमानांमध्यें श्रेष्ठ आहेस, म्हणून त्या पदाला तुझा आज हा स्पर्श होत आहे! तूं सद्विचारतत्पर झाला असल्यामुळें तें तत्व जाणण्यास तूं योग्य आहेस. सद्विचारतत्पर होणें हाच परमेश्वराचा अनुग्रह आहे. भगवत्कृपेवांचून कोणाचें परम कल्याण होणें शक्य आहे? हा एवढा आत्मदेवाच्या कृपेचा प्रभाव होय. तीच देवता प्रसन्न झाल्यामुळें तुझा सद्विचार नित्यशः वाढवीत आहे. असो. आतां तूं जें तत्व जाणलेंस तें बरोबरच आहे, चुकीचें नाहीं; परंतु तूं ह्मणतोस तसेंच शुद्ध चैतन्याचें स्वरूप असूनहि तें तें तुला अगदीं बरोबर कळलेलें नाहीं; आणि ह्मणून तूं असें विचारीत आहेस. परशुरामा, जोंपर्यंत तटस्थ राहूनच ब्रह्म ओळखतां येतें, तोंवर त्याचें सम्यक ज्ञान झालेंच नाहीं, असें समजावें. कारण त्याचें निश्चित ज्ञान झाल्यानंतर आसनावर तटस्थ बसून राहण्याची अपेक्षा नसते. तटस्थ राहून ब्रह्म ओळखणें स्वप्नांतल्या ओळखीसारखें क्षणिक होय; नित्याचें नव्हे. कारण, उत्थान पावतांच तें नष्ट होतें. स्वप्नांत प्राप्त झालेला ठेवा जसा पुरुषाला निरुपयोगी असतो, तसेंच हें तटस्थ ज्ञान होय. मुख्य फल जो मोक्ष तो तें देऊं शकत नाहीं. या संबंधांत तुला आतां एक पूर्वीचा सुंदर इतिहास सांगतों. पूर्वी विदेह देशीं जनक नामक फार बुद्धिमान व अत्यंत धर्मशील राजा होता. त्यास स्वस्वरूपाचें ज्ञान झालें होतें. त्यानें एकदां विधिपूर्वक यज्ञ करून आत्मस्वरूपाचें पूजन केलें. त्या प्रसंगीं तेथें कित्येक ब्राह्मण, विद्वान लोक, तपस्वी जन, कलाभिज्ञ पुरुष, वैदिक, याज्ञिक

व दुसरेहि कितीएक लोक जमा झाले होते. त्याच वेळीं दुसरीकडे वरुणानें यज्ञ करण्यास आरंभ करून ब्राम्हणांस बोलावणें केलें. परन्तु ब्राम्हणांचें जनकावर फार प्रेम असून, जनकानेंहि त्यांना आदरसत्कार करून संतुष्ट केलें होतें; यामुळें वरुणाकडे फारसे ब्राम्हण गेले नाहींत. तेव्हां वरुणाचा एक तीक्ष्णबुद्धीचा मुलगा होता, तो ब्राम्हणांना नेण्याकरितां कपटानें स्वतः ब्राम्हणाचा वेष घेऊन जनकाच्या यज्ञमंडपांत आला. त्यानें सर्व सभासदांच्या आणि राजाच्या देखत सभेंतील पंडितांचा फारच उपमर्द केला. राजाला प्रथम आशीर्वाद देऊन तो ह्मणाला, "राजा! तुझा हा यज्ञमंडप शोभावा तसा शोभत नाहीं. समुद्राचे किनाऱ्यावर कावळे जमावे तसा प्रकार तुझ्या एथें झाला आहे. कमळांचें सरोवर जसें हंसांच्या वस्तीनं शोभतें, तशी सभा ही विद्वानांच्या समुदायानें सुंदर दिसते. पण येथें तर मला एकहि विद्वान् दिसत नाहीं. तर तुझें कल्याण असो. मी आतां जातों. येथें माझें वास्तव्य होणें शक्य नाहीं. कारण मूर्खांनीं भरलेल्या या सभेंत मीं कसें बसावें?"

वरुणपुत्रानें असें म्हटल्याबरोबर सर्व सभासद अगदीं संतापून गेले! ते म्हणाले, "काय रे ब्राम्हणा! तूं सर्वांचा असा अपमान करितोस! अशी तुजजवळ विद्या तरी कोणती आहे, कीं जिच्या योगानें तूं आम्हां सर्वांना पराजित करशील! मूर्खा! तूं व्यर्थ प्रतिष्ठा मिरवितोस! तूं आधीं आम्हांला जिंक, आणि मग जा. बहुतेक सर्व भूलोकावरील विद्वान् लोक येथें जमले आहेत. तर मूर्खा! तूं काय सर्व भूलोकाला जिंकावयाची हाव धरितोस? मग बोल तर तुझी

कोणती विद्या आहे?—कीं तींत तूं आम्हांस जिंकणार आहेस!"

सभेंतील विद्वानांनीं असें आव्हान करतांच वरुणपुत्राला आपला हेतु सिद्ध होणार असें वाटून फार आनंद झाला. मग तो सभासदांना म्हणाला, "पुष्कळ बोलून काय करावयाचें आहे? मी पण लावतों. मी तुह्मां सर्वांना एका क्षणांत जिंकतों. जर तसें न होतां मी तुमच्याकडून जिंकला जाईन, तर तुम्हीं मला समुद्रांत बुडवावें; उलट, तुमच्यांपैकीं मी ज्याला ज्याला जिंकीन, त्याला त्याला समुद्रांत नेऊन बुडवीन! हा माझा पण पत्करून माझ्याशीं वादास या."

तेव्हां सर्व सभासदांनीं त्या गोष्टीला रुकार दिला व वरुणपुत्राशीं त्यांनी मोठा कडाक्याचा वाद चालविला. त्यांत वरुणपुत्रानें वितंडवादाच्या मार्गानें बहुतेक ब्राम्हणांस जिंकलें. तेव्हां ठरल्याप्रमाणें शेंकडों, हजारों ब्राह्मण समुद्रांत नेऊन बुडविण्यांत आले! जे ब्राम्हण बुडविले त्यांना इकडे वरुणाच्या सेवकांनीं वरुणाच्या यज्ञांत नेऊन पोंचविलें. तेथें त्यांनीं वरुणाचा आदरसत्कार घेऊन आनंदानें त्याच्या यज्ञाचें काम चालविलें. याप्रमाणें चालतां चालतां पुढें एकदां कहोल ऋषीला बुडविण्यांत आलें! पण त्याचा पुत्र अष्टावक्र याच्या अंगीं सयुक्तिक आणि वितंड असे दोन्हीहि वाद करण्याची कला होती. तेव्हां आपल्या पित्याला बुडविल्याचें ऐकून त्यानें सभेंत येऊन वारुणीला वादास आव्हान केलें. त्यांत शेवटीं वारुणी हा पराभूत होऊन, समुद्रांत नेऊन बुडविण्याची त्यावरच पाळी आली! त्याबरोबर वारुणीनें विप्रवेष टाकून आपलें मूळ स्वरूप प्रगट केलें; व वरुणलोकांत पोंचविलेल्या सर्व ब्राम्हणांस त्यानें परत

जनकाच्या सभेंत आणून पोंचविलें.

ते सर्व ब्राम्हण परत आल्यावर इकडे अष्टावक्राला आपल्या वादविद्येचा गर्व होऊन तो त्या ब्राम्हणांशीं अगदीं चढून वागूं लागला. अष्टावक्राच्या अशा अपमानास्पद वर्तनानें ब्राह्मणांसहि वैषम्य वाटूं लागलें. याच सुमारास तेथें एक तापसी प्राप्त झाली. त्या वेळीं त्या ब्राम्हणांनीं तिजकडे जाऊन आपली सर्व हकीकत तिला सांगितली. तेव्हां तिनें त्यांना चांगलें आश्वासन दिलें आणि ती एकदां सभेंत आली. तिनें अंगावर काषाय वस्त्रें परिधान केलीं होती. डोकीवर सुंदर जटा ठेविल्या होत्या. आणि योगाभ्यासाच्या योगानें तिच्या त्या जरारहित झालेल्या शरीराची कांति सुमनोहर असून, पाहणाराची तिजविषयींची आदरबुद्धि वाढवीत होती. ती सभेंत येतांच जनकानें तिचा चांगल्या प्रकारें आदरसत्कार केला. तेव्हां प्रसंग पाहून तिनें अष्टावक्राला एक प्रश्न केला कीं, "वत्सा! तूं मोठा बुद्धिमान आहेस. तूं वरुणाच्या पुत्राला वादांत जिंकून ब्राह्मणांस सोडविलेंस, फार चांगलें केलेंस! आतां मी तुला थोडेंसें विचारतें, तेवढें मला सरळपणानें, वितंडवाद सोडून, सांग बरें? सर्वत्र एकच अमृत तत्व भरलें आहे, असें सिद्ध करणारें एक परम पद तुला ठाऊक आहे काय?—कीं, जें पद समजल्यानंतर सर्व संदेह नष्ट होतात, जाणावयाचें कांहीं रहात नाहीं, आणि कांहीं इच्छाहि उरत नाहीं. आणि जें स्वतः जाणतां येईल असेंहि नाहीं. तें पद तुला माहीत असेल तर मला सांग पाहूं?"

तापसीनें हा प्रश्न केल्यावर अष्टावक्र म्हणाला, "मला तें पद

माहीत आहे. तें मी पुष्कळांना सांगत असतों. तुलाहि सांगतों ऐक. मला माहीत नाहीं असें या जगांत कांहींच नाहीं, मग तुझ्या या प्रश्नाचें महत्त्व तें काय? सर्वच शास्त्रें मीं वारंवार उलथीं पालथीं केलीं आहेत! आतां तापसी, तूं विचारतेस, तर तुला सांगतों ऐक. तें पद म्हणजे सर्व जगताचें मूळ असून त्याला आदि, मध्य, अंत इ० कांहीं नाहीं. तसेंच त्याला देशाची व काळाची मर्यादा नसून तें शुद्ध व अखंड चैतन्यस्वरूप आहे. आदर्शांतील नगराप्रमाणें हें जग ज्यावर विराजमान झालें आहे तें तें परम पद होय. तें पद विज्ञात झाल्यावर चिरंतन अमृतता प्राप्त होते. आदर्श समजून आ-ल्यानंतर त्यांतील सारीं प्रतिबिंबें जाणावयाचें निराळें रहात नाहीं, व त्यासंबंधांत कांहीं संशयहि उरत नाहीं, व मग कशाची आशाहि धरावी लागत नाहीं, त्याप्रमाणें तें परम पद विदित झाल्यावर पुरु-षाची स्थिति होते. त्याला त्याहून अन्य कोणी जाणणारा नसल्यामुळें तें वस्तुतः अज्ञेयच आहे. हे तापसी, शास्त्रामध्यें त्या तत्त्वाचा असा निर्णय झालेला आहे."

अष्टावक्राचें भाषण ऐकून तापसी पुनः म्हणाली, "ऋषिपुत्रा! तूं चांगलें सांगितलेंस. हें भाषण जसें असावें तसें असून सर्वसंमतहि आहे. परंतु अष्टावक्रा! जाणणाराचा अभाव असल्यामुळें तें अज्ञेय आहे म्हणून तूं म्हटलेंस; आणि पुनः त्याचें ज्ञान झाल्यावर चिरंतन अमृतता प्राप्त होते, असेंहि तूं बोललास! तर हीं दोन्ही विधानें तुला सुसंगत कशीं वाटतात? तें अज्ञेय असेल, तर तें मला माहीत नाहीं किंवा मुळींच नाहीं, म्हणून सांग एक; नाहींपेक्षां तें असेल

व तूं तें जाणत असलास, तर अज्ञेय म्हणूं नकोस ! पण अष्टावक्रा तूं हा शास्त्रांतील निर्णय सांगितला आहेस, तेव्हां तुला स्वतःला तें पद समजलेलें नाहीं, म्हणजे त्याचें प्रत्यक्ष ज्ञान झालेलें नाहीं, असे दिसतें. परंतु अष्टावक्रा ! सर्व प्रतिबिंबें जशींच्या तशींच अगदीं प्रत्यक्ष तूं पाहत असून, तुला आरसा प्रत्यक्ष दिसत नाहीं, हें कसें बरें ? आणि अशा प्रकारचें भाषण एवढ्या सभेंत प्रत्यक्ष जनकाच्या समोर करितांना, आपण वेडेपणा करीत आहों असें तुला कसें वाटलें नाहीं ? "

तापसीनें असें विचारल्यावर अष्टावक्र हा कांहीं एक बोलला नाहीं. उलट लाजला, बावरून गेला आणि खालीं मान करून क्षणभर स्वस्थ बसला. नंतर त्यानें बराच विचार केला. परंतु शेवटीं तिच्या प्रश्नाचें उत्तर न मिळाल्यामुळें तो तिला म्हणाला, " तापसी, तुझ्या प्रश्नाचें उत्तर मला देतां येत नाहीं, याचा मला खेद वाटतो. तर आतां मी तुझा शिष्य आहें. शास्त्रांत असें विरोधी निरूपण कसें केलें आहे, तें मला समजाऊन दे. हें मी खोटें सांगत नाहीं. खोटें भाषण पुण्याचा नाश करून अनर्थ उत्पन्न करितें, हें मला चांगलें माहित आहे."

अष्टावक्राचें असें उत्तर आलेलें पाहून त्याच्या खरेपणानें तापसी संतुष्ट झाली. नंतर सर्व समाजन ऐकत आहेत अशा स्थितींत ती अष्टावक्राला म्हणाली, " बाबा रे ! हेंच मर्म न समजल्यामुळें पुष्कळ लोक मोह पावतात. हें कोरड्या तर्कांनीं कळण्याजोगें नाहीं. सर्व शास्त्रांतुन हें गूढ तसेंच राखून ठेविलें आहे. एवढ्या सभासदां-

तूंनहि कोणी हें जाणत नाहीं. एक हा राजा जनक, किंवा मी; दुसरे कोणीच तें मर्म ओळखीत नाहींत. जिकडे तिकडे वाद चालतात. परंतु तार्किक कोट्या करणाऱ्या विद्वान मंडळींत असले प्रश्न व त्यांचीं उत्तरें यांचें आकलन बहुतकरून कोणालाच होत नाहीं. मोठी कुश अबुद्धि असली तरी केवळ तर्कानें, म्हणजे सद्गुरुसेवेवांचून किंवा ईश्वरप्रसाद झाल्यावांचून हें नीट कळण्याजोगें नाहीं. अष्टावक्रा, तें मी आतां तुला समजावून देतें, तूं सूक्ष्म बुद्धीनें विचारांत घे. विचार न करितां बुद्धि स्वस्थ राहील, तर हें ऐकूनहि समजून येणार नाहीं. हें ज्ञान जोंवर अंतर्मुखतेनें प्रत्ययास आलें नाहीं, तोंवर तें हजारों वेळ दुसऱ्यास सांगितलें आणि स्वतः ऐकलें, तरी निरर्थकच होय. जसा कोणी मनुष्य आपल्या गळ्यांतील मोत्यांचा हार भ्रमानें ध्यानांत न राहिल्यामुळें, मूर्खपणानें तो चोरांनीं नेला असें समजूं लागतो,—तो तुझ्या गळ्यांतच आहे म्हणून कोणीं सांगितलें, तरीहि तो जोंवर आपल्याकडे वळून आपल्या गळ्यांत प्रत्यक्ष पाहत नाहीं, तोंपर्यंत तो गळ्यांतील हार—तो मोठा विचारशील असला तरीहि त्याला जसा प्राप्त होत नाहीं, तद्वत् हे मुनिपुत्रा! आत्मा म्हणजे स्वस्वरूपच आहे असें कानावर आलें, आणि ऐकणारा मोठा शहाणा असला, तरीहि तो जोंवर अंतर्मुख होऊन त्याला प्रत्यक्ष पहात नाहीं, तोंवर तो त्याला बाहेर प्राप्त होणार नाहीं! पहा कीं, दीप हा अन्य पदार्थांना प्रकाशांत आणितो, पण स्वतः दुसऱ्या एखाद्या दीपाकडून प्रकाश्य होत नाहीं, म्हणजे दुसऱ्याची आवश्यकता न धरतांच स्वतः प्रकाशित होतो. असाच सूर्योदय.

याचप्रमाणें प्रकाश करणारे दुसरेहि पदार्थ घेतां येतील. तेव्हां मग हे दीपादिक कोणाकडून प्रकाशित होत नाहींत म्हणून ते मुळींच नाहींत, किंवा प्रकाश देत नाहींत, असें म्हटलें तर योग्य होईल काय? त्याचप्रमाणें दीपादिक पदार्थ प्रकाशित होत असतांना स्वतः प्रकाश्य न होणारें जें शुद्ध चितत्त्व तें अर्थात् संवेद्य नसूनहि प्रकाशलें जातें, असें म्हटलें तर तुला संशय कोठें येतो? तर अष्टावक्रा, दृष्टि अंतर्मुख करून तूं नीट विचार कर. ही चिच्छक्ति त्रिपुराच परम श्रेष्ठ असून सर्वांना आधार आहे. सर्वांना प्रकाशित करणारी ही कोठें व केव्हां प्रकाशित होत नाहीं? ती जर प्रकाशित होत नसेल तर काय प्रकाशित होईल? पण दुसऱ्या कशाचा प्रकाश होत नसतांहि ही चिच्छक्ति प्रकाशितच असते. कारण प्रकाशाचा अभावहि ज्या शक्तीनें भासतो, ती स्वतःच भासत नाहीं हें कसें होईल? आतां ती भासते ती कशी भासते, याचा अगदीं सूक्ष्म विचार कर. याच ठिकाणीं कुशल पंडितांचीहि बुद्धि चालत नाहींशी होते. अंतर्दृष्टि न केल्यामुळें ते मोहांत सांपडून वाहत जातात. दृष्टि जोंवर बाहेरील प्रवृत्तीचा त्याग करून शांत होत नाहीं, तोंवर अंतर्मुखता प्राप्त होऊं शकत नाहीं; आणि जोंवर अंतर्दृष्टि येत नाहीं तोंवर स्वरूपदर्शन होत नाहीं. मन निःसंकल्प होणें हीच अंतर्दृष्टि. मग ते संकल्प आहेत तोंवर ती होणार कशी? यासाठीं सर्व संकल्पांचा त्याग करून तूं स्वस्वरूपाचा आश्रय कर; आणि तेथें किंचित्काल स्थित होऊन, त्यानंतर तो विचारहि तूं सोडून दे. नंतर त्या अवस्थेचें फक्त स्मरण ठेव. म्हणजे तेंच तत्त्व ज्ञेय

कसें व अज्ञेय कसें हें सर्व तुझ्या ध्यानांत येईल. याप्रमाणें तें परम पद तुला समजल्यानंतर तूं अमृत-अवस्थेला प्राप्त होशील."

तापसी शेवटीं म्हणालीः—" मुनिपुत्रा ! असें हें सर्व मीं तुला सांगितलें आहे. आतां तुला नमस्कार. मी जातें. एकदांच श्रवण केल्यामुळें तुला हें बरोबर समजलें नसावें. तेव्हां आतां हा महा बुद्धिमान राजा जनक तुला तत्त्वबोध करील. त्याला विचार; तो तुझे सर्व संशय फेडून टाकील."

याप्रमाणें भाषण झाल्यावर ती तापसी जाण्यास निघाली. तेव्हां राजा जनकानें तिचा फार सत्कार केला. सभासदांनीं तिला नमस्कार केला. नंतर ती तापसी वायुवेगांत सांपडलेल्या अभ्राप्रमाणें अकस्मात् अंतर्धान पावली.

दत्तात्रेय म्हणतात, परशुरामा ! स्वस्वरूप उपलब्ध होण्याचा हा प्रकार मीं तुला सांगितला. यायोगें निर्विकल्प चित्स्वरूप, म्हणजे वेद्यरहित संवित् कशी अनुभवास येते, हें तुझ्या चांगलें ध्यानांत येईल.

## प्रकरण १६ वें

# निद्रा म्हणजेच ब्रह्म!

अतः सुषुप्तिरेव स्याद् जडदर्शनसंगता ॥
समाधौ भासमाना या चितिः सा ब्रह्मरूपिणी ॥ ९२

ही सर्व कथा ऐकून परशुरामाला मोठें नवल वाटलें. मग श्रवण करण्याची तृप्ति न झाल्यामुळें तो पुनः श्रीदत्तात्रेयांना म्हणाला, "भगवन्! ही हकीगत अतिशयच अद्भुत आहे! तर यापुढें अष्टावक्रानें राजाला जें कांहीं विचारलें, व त्यावर जनकानें त्यास जें सांगितलें, तें सर्व मला सांगा. याच्यासारखें मौजेचें आख्यान मीं कोठेंच ऐकिलें नाहीं!"

तेव्हां महामुनि द त्रेय ह्मणालेः—परशुरामा! पुढें जें काय झालें ते ऐक, पूर्वीं सांगितल्याप्रमाणें ती तापसी तेथून निघून गेल्यानंतर कहोलकुमार अष्टावक्र पुष्कळ ब्राम्हणमंडळीसह त्या नृपश्रेष्ठाकडे आला व त्यानें तापसीनें संक्षेपतः सांगितलेला तो महत्वाचा विषय त्याला पुनः विचारला. तो ह्मणाला, "राजा विदेहाधिपते! तापसीनें सांगितलेला ज्ञेयाज्ञेयाचा निर्णय फार थोडक्यांत सांगितला असल्यामुळें मला चांगलासा समजला नाहीं. तर दयानिधे! तें सत्तत्त्व माझ्या ध्यानांत येईल अशा सुलभ रीतीनें आपण मला सांगावें."

तेव्हां जनक राजा किंचित् स्मित करून म्हणाला, "अष्टावक्रा! सांगतों, ऐक. तें पद ज्ञेय आणि अज्ञेय कसें, असा तुझा प्रश्न आहे. तर तूं असें पहा कीं, तें तत्त्व सर्वथा अज्ञेय नाहीं व सर्वथा ज्ञेयहि नाहीं.

कारण तें सर्वथा अज्ञेय असतें, तर सद्गुरु त्यासंबंधीं उपदेश तरी कसा करितील? पण सद्गुरु तत्त्वोपदेश तर करतात. व म्हणूनच अशा प्रसंगीं साधकाला सद्गुरूचा आश्रय अवश्य करावा लागतो. अष्टावक्रा! हें परम पद ओळखणें अतिशय सुलभहि आहे आणि अतिशय कठिणहि आहे. ज्याची दृष्टि बाह्य पदार्थांवरून परत वळली आहे, त्याला तें सुलभ आहे; व ज्याची दृष्टि बाहेरच पसरली आहे त्याला तें दुर्लभ आहे. खरें म्हटलें तर तें निरूपण करतां येण्याजोगें किंवा जाणण्याजोगेंहि नाहीं. पण कसें तरी अप्रत्यक्षपणें तें निरूपितां येतें व जाणतांहि येतें. तूं हें जें दृश्य पाहत आहेस त्यावरून तें जाणतां येत असल्यामुळें तें वेद्य म्हणतां येईल. यासाठीं तुला जें जें म्हणून भासमान होत आहे त्याचाच तूं सूक्ष्म रीतीनें विचार कर. ही भान-शक्ति म्हणजे ज्ञानकला जाणीव, भासमान होणाऱ्या नाना आकारांहून वेगळी असून सर्व तऱ्हेच्या साकार भानांला तीच आश्रय आहे. तेंच तें परम पद होय. अष्टावक्रा, नीट ध्यानांत आण. ज्ञेय आहे तें कांहीं ज्ञान नव्हे. कारण तें स्वतः प्रकाशमान होत नाहीं. जिच्या योगानें वेद्य म्हणजे ज्ञेय पदार्थ जाणले जातात, ती संवित् स्वतः वेद्य अर्थातच नव्हे; त्याहून ती निराळी आहे. वेद्याचें स्वरूप भिन्न भिन्न आहे; परंतु त्या रूपांनीं संवित् कांहीं कोठेंच भेद पावत नाहीं; ती त्या त्या आकारांत एकरूपच असते. भेद हा वेद्याचा स्वभाव आहे. तो संवित्‌ला स्पर्श करीत नाहीं. कारण वेद्यामध्यें अनेक आकार भासत असतात. तेव्हां विवेकदृष्टीनें वेद्य पदार्थ पृथक् करून आकाररहित अशा संवित्‌ला तूं नीट शोधून पहा. म्हणजे, वेद्यत्वाला दूर सारून

निःसंकल्प अवस्थेमध्यें ही संवित् वेद्य होईल,—अनुभवास येईल. एरवीं ती वेद्य होत नाहीं. प्रतिबिंबाचें अनुकरण करणाऱ्या आदर्शाप्रमाणें ही शुद्ध चिति दृश्याचे आकार धारण करून नानारूप होते. पण संवित् हेंच जाणणाराचें स्वरूप असल्यामुळें ती ज्ञेय होत नाहीं—जाणतां येत नाहीं, हेंहि अगदीं उघड आहे. तेव्हां अष्टावक्रा ! तूं प्रथम अशा प्रकारच्या आपल्या स्वस्वरूपाचा सूक्ष्म दृष्टीनें शोध कर. प्रथमतः असें पहा कीं, तूं हें शरीर नव्हेस, तसाच तूं प्राण नव्हेस कीं मनहि नव्हेस. कारण हीं सर्व स्थिर नाहींत, अनित्य आहेत. तूं मात्र नित्य आहेस. हें शरीर म्हणजे एक सप्त धातूंचा गोळा, तेव्हां तें तुझें स्वरूप कसें होईल ? आणि तेंच ' माझें ' या रूपानें जेव्हां अन्य विषय होऊन भासतें, तेव्हां तें अहं या भावनेला सोडून जातें. म्हणजे ' माझें शरीर ' असें म्हणते वेळीं त्यावर अहं असा भाव अर्थातच नसतो. याचप्रमाणें प्राण आणि मन हींहि दोन्ही अहं-बुद्धीला सोडून जातात, असें विचाराअंतीं अनुभवास येतें. परंतु परम चैतन्य म्हणजे जाणीव ही मात्र अहं या स्फूर्तीस सोडून कधींच राहत नाहीं. तेव्हां हीच संवित् सर्वज्ञ आहे. म्हणून अष्टावक्रा ! दृष्टि अंतर्मुख करून तत्त्वतः केवळ चिद्रूप आत्म्याचा एकवार शोध घे. जे उत्कृष्ट बुद्धिमान् असतात, ते तत्त्वाच्या उपदेशकाळींच स्वस्वरूपाचें दर्शन घेतात. येथें दृष्टि म्हणजे हे बाह्य नेत्रगोलक नव्हेत, तर मनश्चक्षु म्हणजेच दृष्टि होय. ज्यायोगें स्वप्न पाहिलें जातें तेच मुख्य चक्षु होत. त्यांची अंतर्मुखता म्हणजे काय तें सांगतों, ऐक. कारण चक्षु अंतर्मुख झाले नाहींत, तर व्यवहारांतहि कांहीं

पाहतां येत नाहीं. डोळ्यांनीं कांहीं पाहणें झालें तर त्याहून अन्य पदार्थांवरून नेत्र जेव्हां निःशेष परतवावे व त्यावर लावावे, तेव्हां तें स्पष्ट भासतें. नाहींतर तें समोर असलें तरी अनुभवास येत नाहीं. म्हणजे दिसलें असूनहि डोळे तिकडे न वळल्यास तें न भासल्यासारखेंच होतें. अष्टावक्रा, याचप्रमाणें श्रोत्र, त्वचा, इत्यादिकांचीहि स्थिति आहे. मनाला भासणारें सुखदुःखहि असेंच आहे. मन त्याकडे लागलें नसेल तर तेंहि जाणण्यांत येत नाहीं. तेव्हां जें कांहीं जाणावयाचें असेल तदेकपर होणें, हीच दृष्टीची अंतर्मुखता होय. अंतर्मुख असलेलें शुद्ध चित्तच स्वस्वरूपाची ओळख करून देतें. हाच विषय तुला आणखी स्पष्ट करून सांगतों, तूं स्वस्थ चित्तानें ऐकून घे. अष्टावक्रा ! हा चिदात्मा मनाला गोचर आहे आणि अगोचरहि आहे. हेंच समजून घेण्याच्या संबंधांत वेदांचा व शास्त्रांचा पुष्कळ विचार करणारे पंडितहि फसतात. असो, आतां कोणताहि बाह्य पदार्थ मनाला गोचर होतांना दोन क्रिया व्हाव्या लागतात; एक अन्य पदार्थांवरून मन परत वळणें, व दुसरी, तें त्या पदार्थावर लागणें. केवळ अन्य पदार्थांवरून मन परावृत्त झाल्यानें प्राप्त होणाऱ्या तटस्थ अवस्थेमध्यें कांहीं आपणांस हवा तो पदार्थ प्रत्ययास येत नाहीं. यासाठीं त्या पदार्थासंबंधीं तत्पर होणें हा मनोव्यापारहि अत्यंत आवश्यक आहे. याप्रमाणें समर्याद पदार्थ या दोन क्रियांच्या योगानें भासतात. परन्तु शुद्ध चैतन्य हें मर्यादारहित असल्यामुळें त्याचें दर्शन घेण्याचा प्रकार असा नाहीं. अन्य पदार्थभावांना निवृत्त केलें म्हणजे अधिक कांहीं न करतांत तें प्रत्य-

यास येतें. उदाहरणार्थ असें पहा कीं, पुढें असलेल्या आरशांत कांहीं प्रतिबिंब पहावयाचें असेल तर अन्य पदार्थ दूर सारून तो विशिष्ट पदार्थ पाहणाराला समोर आणावा लागतो; परन्तु आरशांत आकाश पहावयाचें असेल तर फक्त दुसरे पदार्थ दूर केले म्हणजे, दुसरें कांहींहि समोर आणावें न लागतांच, कार्यभाग होतो. कारण आकाश हें सर्वत्र व्यापलें असल्यामुळें तें त्या आदर्शांत सदैव स्थितच असतें; दुसऱ्या प्रतिबिंबांनीं आच्छादिल्यामुळें तें फक्त भासत नसतें इतकेंच. तें सर्वांत अनुगत आणि सर्वांना आश्रय असल्यामुळें, अन्य पदार्थ दूर केल्याबरोबरच अनुभवास येतें. याचप्रमाणें शुद्ध चैतन्य सुद्धां सर्वगत, सर्वाधार, व सर्वकालीं एकरूप असून आदर्शांतील आकाशाप्रमाणें हृदयांत परिपूर्ण भरलेलें आहे. त्यामुळें मन अन्य पदार्थांवरून परावृत्त करणें, एवढेंच येथें आवश्यक आहे. अष्टावक्रा ! हें प्रकाशक चित्तत्त्व कोठें आणि केव्हां नाहीं सांग बरें ? तें जेथें व जेव्हां नसेल, तें जेथेंहि नाहीं आणि जेव्हांहि नाहीं ! तेव्हां चिदात्म्याचा अनुभव येण्याला मन अन्यांपासून निवृत्त करणें हेंच केवळ अपेक्षित आहे; निराळें कांहीं समोर आणावयास नको. आणि असें कांहीं अभिमुख करावें लागत नसल्यामुळेंच तें एखाद्या पदार्थाप्रमाणें विशिष्ट आकारानें वेद्य नाहीं असें म्हणावें लागतें. व शुद्ध मनाला स्वभावतःच अनुभवास येत असल्यामुळें पुनः तें वेद्य आहे, असेंहि म्हणतां येतें. मनांतील अन्य आकार—संकल्प—नष्ट होणें हीच मनाची शुद्धि होय. स्वस्वरूप प्रत्यक्ष अनुभवास येण्याला हेंच साधन मुख्य आहे. जोंवर

चित्त शुद्ध नाहीं, तोंवर ज्ञान कसें होणार ? आणि शुद्ध अंतःकरणांत ज्ञान प्रकट झाल्यावांचून कसें राहणार ! या तत्त्वशोधनाच्या कामीं अन्य सर्व उपाय फिके पडतात. कर्म, किंवा उपासना, किंवा वैराग्य, हे सारे मार्ग चित्ताच्या शुद्धीसाठींच योजिलेले आहेत; त्यांचा दुसरा कांहीं उपयोग नाहीं. सारांश, अष्टावक्रा ! शुद्ध चित्तानेंच तें परम पद अनुभवास येतें. "

हें भाषण ऐकून अष्टावक्र पुनः म्हणाला, " महाराज ! अन्य पदार्थांवरून मन परावृत्त होण्यामुळेंच केवळ तें परम चैतन्य अनुभवास येतें असें आपण म्हटलें; तर मग झोपेंत मन तसें परावृत्त असतेंच; तिथें त्याचा अनुभव आपोआप यावा ! मग दुसरे नाना उपाय कशाला करावे ? फक्त झोंप घेऊनच पुरुष कृतार्थ होईल म्हणावयाचा ! "

असा उलट प्रश्न केल्यावर राजा जनक म्हणाला, " अष्टावक्रा, शांत चित्तानें ऐकून घे. अरे, झोपेंत मन सर्वथा परावृत्त झालेलें असतें हें खरें; पण त्या वेळीं मनाचें मनपणच तमानें झांकून जातें. मग तें त्या स्वरूपास कसें व्यक्त करील ? करणार नाहीं. आरशावर काजळ सारविलें, आणि अन्य पदार्थ दूर करून आकाश पहावें म्हटलें, तर तें जसें दिसत नाहीं त्याप्रमाणें बाह्यपरावृत्त मन निद्रेनें लिप्त झालें असल्यामुळें तें चैतन्यास भासित करीत नाहीं. एरवीं, तुझ्या मतानें म्हटलें तर तें लाकडांत सुद्धां अनुभवास कां येऊं नये ? तेव्हां निःसंकल्प मनच स्वरूप दाखविण्यास योग्य आहे. त्यानेंच चैतन्य भासमान होतें. नुकतेंच जन्मलेल्या मुलालाहि स्वस्वरूप भासमान

होत नाहीं; याचेंहि कारण मन:पटावरील तमाचा लेपच होय. आणखी सांगतों ऐक. काजळ सारविलेल्या आदर्शावर त्या काजळाचें प्रतिबिंब पडलेलें असतेंच. तें कोणाला पाहतां येत नाहीं, पण तेवढ्यावरून तें नसतें, असें नाहीं. कारण पुढच्या पदार्थाचें प्रतिबिंब घेणें हा आदर्शाचा स्वभावच आहे. फक्त वर काजळाचें पुट असल्यानें तें ओळखूं येत नाहीं, इतकेंच. तसेंच सुषुप्तीमध्यें मन हें निद्रेनें व्याप्त झालेलें असल्यामुळें वस्तुत: अन्य पदार्थांची निवृत्ति झालेलीच नसते; म्हणून तें या चैतन्यास व्यक्त करूं शकत नाहीं व म्हणूनच जागृत होतांच निद्रेची स्मृति होते. शिवाय त्या अवस्थेंत अज्ञानाचा अनुभवहि येतो. हाच विषय तुला आणखी स्पष्ट करून सांगतों, एकाग्र होऊन ऐक. १ प्रकाशावस्था व २ विमर्शावस्था अशा मनाच्या दोन स्थिति आहेत. बाह्य पदार्थांच्या संबंधांत मन जेव्हां विश्रांति घेतें, म्हणजे सर्वसंकल्परहित असतें, तेव्हां ती प्रकाशावस्था; व त्याच्यासंबंधीं जेव्हां संकल्प चालू असतात, तेव्हां ती विमर्शावस्था. प्रकाशावस्थेंत पदार्थासंबंधीं कांहींच भेद भासत नसल्यामुळें ती निर्विकल्पस्थिति असते व विमर्शावस्थेंत पदार्थांचा विमर्श म्हणजे विचार असल्यामुळें ती सविकल्प स्थिति असते. ‘ हा अमुक ’ असा भाव उद्भवला नसतां चिद्वस्तुदर्शनरूप असा प्रकाश अर्थातच निर्विकल्पक असतो; आणि त्याच अवस्थेच्या आधारावर प्रगट होणारा ‘ हा अमुक ’ म्हणून भेदात्मक विमर्श तो सविकल्पक असतो. हा विमर्श दोन प्रकारचा आहे:—एकाचें नांव अभिनव आभास. नवीन नवीन येणारे अनुभव, हें त्याचें स्वरूप आहे. दुसरा प्रकार स्मृतिरूप, पूर्व

अनुसंधानात्मक असतो. पूर्वसंस्कारवशात् मनांत जे आकार उत्पन्न होतात, तें याचें स्वरूप. याप्रमाणें मन हें नेहमीं या दोन शक्तींनीं युक्त असतें. निद्राकाळीं असणारें जें निर्विकल्प ज्ञान ती सुषुप्ति. तींत निर्विकल्पता अगदीं घनदाट असते, म्हणून तिला मूढदशा म्हणण्यांत येतें. ती दीर्घकालिक असते. जागृतीमध्यें सविकल्पक अशीं अनेक भानें होत असल्यामुळें तिला अमूढदशा असें नांव देतात. याच कारणामुळें दीपादिकांच्या ठिकाणीं प्रकाश अगदीं पूर्ण भरलेला असूनहि त्यांच्या ठिकाणीं वरील विमर्श असल्यामुळें, म्हणजे त्यांना त्याचें ज्ञान नसल्यामुळें त्यांची ती मूढदशाच आहे, असें सर्व विद्वानांनीं निश्चित केलें आहे. शुद्ध चैतन्यापासून प्रथम प्रकट झालेला जो बाह्य भास म्हणजे अव्यक्त तत्त्व किंवा ज्याला महाशून्य म्हटलें आहे, तेंच निद्रेचें स्वरूप होय. ' कांहीं नाहीं ' ही जी सर्वसामान्य भावना, दृश्यभासाचा अभाव, तीच सुषुप्ति; व ती निर्विकल्पच असते. जागृदवस्थेंत पदार्थाचें दर्शन होत असतांनासुद्धां तेवढ्या वेळेपुरतें मन या निर्विकल्प अवस्थेंतच असतें. परंतु दुसऱ्या क्षणालाच जे विकल्प प्रगट होतात, त्यांमुळें त्याची ती अवस्था नष्ट होते. सुषुप्ति-अवस्थेंत अव्यक्त म्हणून सांगितलेल्या शक्तीच्या निर्विकल्पतेच्या दृढतेमुळें ' मन विलीन होतें ' असा विवेचक पुरुष विचार ठरवितात; बाकी, पदार्थ पाहत असतांहि मन त्या त्या वेळेपुरतें लीनच असतें. अष्टावक्रा, तुला मी आपल्या अनुभवाचें रहस्य सांगतों, चांगलें ऐकून घे. अतिशय सूक्ष्म विचार करणारे पंडितहि येथें मूढ होतात. १ निर्विकल्प समाधि, २ सुषुप्ति आणि ३ पदार्थदर्शन हीं तिन्हीहि निर्वि-

कल्पदृष्टीनें एकाच प्रकारांत मोडतात. एक पदार्थ सोडून दुसऱ्यावर जातांना मन जरी चलन पावतें, तरी एकाच पदार्थावर तें लागलेलें असतांना विकल्परहित असतें. म्हणून लोकांत आढळून येणारे हे तीन प्रकार स्वरूपतः नसून भास्यांतील भेदावरून झालेले आहेत. समाधीमध्यें केवळ चैतन्य भासतें, सुषुप्तीमध्यें अव्यक्त अनुभवास येतें, व पदार्थदर्शनकालीं मर्यादित आकाराचा प्रत्यय येतो. म्हणजे असें हें भास्यच त्रिविध झालें आहे. पण अशा प्रकारें भास्यांत भेद असला तरी, भान, ह्मणजे केवळ ज्ञान, शुद्ध चैतन्य हें स्वतः केवळ निर्विकल्पच आहे. म्हणूनच त्यास ' प्रकाशनिबिड ' असें म्हणतात. त्याचा अर्थ ' निर्विकल्पकतेनें घनदाट व्यापलेलें ' असा आहे. यांतून समाधि व सुषुप्ति या स्थिति बराच काळ भासत असल्यामुळें सर्वांना स्पष्ट जाणतां येतात, पण पदार्थदर्शन अगदीं क्षणिक असल्यामुळें तें तितकें स्पष्ट ओळखत नाहीं. समाधि किंवा सुषुप्ति ही सुद्धां अशीच क्षणिक असते तेव्हां ओळखूं येत नाहीं. पण ती तशीहि असते. त्यामध्यें सुषुप्ति क्षणिक असेल तर सूक्ष्मदृष्टीच्या पुरुषांना, दीर्घसुषुप्तीच्या अनुभवावरून, ती जाणतां येते; परंतु सूक्ष्म समाधि, ओळख नसल्यामुळें कोणालाच जाणतां येत नाहीं. बाबा रे, व्यवहारदशेमध्येंहि सर्व प्राण्यांना अल्पकालिक समाधि प्राप्त होतच असतात. परंतु त्यांचा परिचय नसल्यामुळें त्यांना ते कळत नाहींत. जागृदवस्थेंत विमर्शशून्य-संकल्पशून्य-अवस्था आली ह्मणजे तिला समाधि म्हणतात. विमर्शाचा नाश तोच समाधि. म्हणूनच सुषुप्तींत किंवा पदार्थदर्शनांतहि समाधींची स्थिति असते. परंतु त्यांना मुख्य समाधि ह्मणतां

येत नाहीं. कारण, भेदाचा अनुभव देणारे विमर्शाचे संस्कार त्या वेळीं गर्भांत असतात. व म्हणून ते त्यानंतर संस्काररूपानें उदय पावतात. बाकी जागृतीमध्यें होणारें पदार्थभान तें सुद्धां अविमर्श-स्वरूपच, म्हणजे निःसंकल्पकच असतें. परंतु अष्टावक्रा! तुला आणखी हें स्पष्ट करून सांगतों, तूं चांगलें अगत्यपूर्वक ऐक. अगदीं प्रथमच प्रकट झालेलें जें अव्यक्त तत्त्व, ‘ कांहीं नाहीं ’ हेंच ज्याचें सामान्यस्वरूप, त्याचें भान ह्मणजे अत्यंत अभावरूप नास्तिता हेंच होय. हीच जी चैतन्याची जड शक्ति तीच सुषुप्ति-अवस्था. या सुषुप्तींत ‘ कांहीं नाहीं ’ ही स्थिति भासमान होत असल्यामुळें सुषुप्तींत निर्विकल्प ज्ञान असूनहि ती जड आहे असें सिद्ध होतें. पण समाधींत भासमान होणारें चैतन्य ब्रह्मस्वरूप आहे. सर्व देशकालांना गट्ट करणारें, ‘ कांहीं नाहीं ’ या भासाचाहि नाश करणारें व सर्वथा अस्तिस्वरूप असें तें तत्व आहे. मग अष्टावक्रा! निद्रा म्हणजेच ब्रम्ह असें कसें म्हणतां येईल? यासाठीं तुझ्या कल्पनेप्रमाणें केवळ झोंप घेऊनच पुरुष कृतार्थ होईल हें संभवत नाहीं. ”

---

## प्रकरण १७ वें,

# जनकाचा स्वानुभव.

तस्मान्निरोधने किं स्याद् अहमानंदनिर्भरः ॥

समाधावसमाधौ वा सत्यपूर्णस्वभावकः ॥ १०३

परशुरामा, अशा रीतीनें जनक राजानें अष्टावक्राला बोध केला. तो ऐकून झाल्यावर अष्टावक्र जनक राजाला आणखी कांहीं विचारूं लागला. तें तूं सावधपणें ऐक. तो म्हणाला:—

" महाराज! आपण जें म्हटलें कीं, व्यवहारकाळीं सुद्धां लहान लहान समाधि असतात; तर कोणकोणत्या प्रसंगीं असे निर्विकल्प समाधि प्राप्त होतात, तें मला सांगा."

असा प्रश्न केल्यावर तो महात्मा म्हणाला, " सांगतों ऐक. अत्यंत आवडीच्या स्त्रीनें अगदीं नव्या पहिल्या भेटीच्या वेळीं गाढ आलिंगन द्यावें; अशा वेळीं बाह्य किंवा आंतर कांहींच भासमान होत नाहीं व झोंपेचीहि अवस्था नसते. म्हणून या स्थितीला समाधि असें म्हणतां येतें. अथवा—पुष्कळ दिवसांपासून एखाद्या गोष्टीची फार इच्छा झालेली असावी आणि ती लाभणें अशक्य आहे असेंहि मनानें घेतलें असावें; अशा वेळीं ती अकस्मात् प्राप्त व्हावी! तर त्या वेळींहि निर्विकल्प समाधिच कोणालाहि होतो. अथवा, मनांत कशाची कल्पना सुद्धां नाहीं, अगदीं आनंदानें व निर्धास्तपणें मार्गानें चालला आहे, अशा वेळीं एखाद्याला अकस्मात् काळासारखा भयंकर वाघ वगैरे दृष्टीस पडावा! तर तेव्हांहि चित्ताला जी स्थिति

प्राप्त होतें, तोहि समाधिच होय. आणखी एक उदाहरण पहा कीं, आपला मुलगा वगैरे, अत्यंत प्रेमाचा, सारा संसार चालविणारा व अगदीं धट्टाकट्टा असावा, व तोच अकस्मात् मृत झाल्याचें वृत्त कानावर यावें! तर त्या प्रसंगींहि मन निर्विकल्पसमाधींत शिरतें. त्या अवस्थेंत बाह्य किंवा आंतर कांहींच भान नसतें आणि झोंपहि नसते. यामुळें तोहि समाधिच आहे. आणखी दुसऱ्या तऱ्हेनेंहि समाधीचे प्रसंग मनुष्याला वारंवार येत असतात, ते तुला सांगतों, ऐक. हे समाधि जागृति, स्वप्न व सुषुप्ति यांच्या संधिकाळीं प्राप्त होतात. पहा कीं, जेव्हां फार सूक्ष्म दृष्टि करून दूरची वस्तु पहावयाची असते, त्या वेळीं मन हें, गवतावरून चालणाऱ्या आळीप्रमाणें, लांबवर पसरत असतें. तें देहावर असतांना देहाकार असतें व त्या पदार्थावर जातें तेव्हां तदाकार बनतें. परंतु दोहोंच्या मध्य-अवस्थेमध्यें तें निर्विकल्प राहतें. ती अवस्था नित्य ध्यानांत आण म्हणजे झालें. किंवा अष्टावक्रा, फार सांगून काय करावयाचें आहे? एवढा सूक्ष्म विचार कर पाहूं—कीं, व्यवहारामध्यें कोणचेंहि भान घेतलें तरी त्यांत मन अखंड एकाकार नसतें; तर अनेक वेगवेगळ्या खंडित भानांचा म्हणजे ज्ञानांचा समूह होऊन हा व्यवहार चालत आहे. व म्हणूनच सुगत-कणादादि मतवादी सांगत असतात कीं, आत्मा किंवा बुद्धि ही दरक्षणीं भिन्नभिन्न होते! तर त्या क्षणिक किंवा खंडज्ञानाच्या मध्यंतरीं—म्हणजे चित्तांतील एक पदार्थ जाऊन त्यावर दुसरा उद्भवला नाहीं तोंवर, जो एक क्षण सांपडतो तेथें ही निर्विकल्प अवस्था असल्याचें अनुभवास येतें. अष्टावक्रा! अरे, विचारपूर्वक जाणील

त्याला प्रतिक्षणीं समाधि आहे, नाहीं त्याला सशाच्या शिंगाप्रमाणें कोठेंच नाहीं! जास्त काय?"

हें ऐकून आणखी अष्टावक्र म्हणाला, "राजन्! जर व्यवहारामध्यें सर्वांनाच निर्विकल्प समाधि प्राप्त होतो, तर हा संसार अद्याप कसा राहिला आहे? लोप कसा पावला नाहीं? सुषुप्तीमध्यें अनुभवास येणाऱ्या निर्विकल्प ज्ञानामध्यें जड अव्यक्ताचें भान असतें, ह्मणून त्यायोगें मोक्ष सिद्ध होत नाहीं, असें आपण पूर्वी म्हटलें खरें; पण निर्विकल्प ज्ञान ह्मणजेच शुद्ध चैतन्याचा अनुभव होय, दुसरें काय? तर तो होऊनहि हा संसार कसा संपत नाहीं निर्विकल्प समाधि हेंच मोक्ष होण्याचें मूळ व सर्व अज्ञान घालविणारें शुद्ध ज्ञान होय. मग हें काय? राजन्! एवढें मला समजावून द्यावें, ह्मणजे माझे सर्व संशय नष्ट होतील."

तेव्हां राजा जनक म्हणाला, "ऐक, हें परम रहस्य तुला समजाऊन सांगतों. हा संसार अनादि कालापासून अज्ञानामुळें प्रवृत्त झाला असून सुखदुःखांच्या अनुभवानें त्याचा प्रवाह सारखा चालला आहे. सर्व जीव स्वप्नाप्रमाणें त्याचा नित्य अनुभव घेत आहेत. त्याचा नाश ज्ञानानें होतो. परंतु अष्टावक्रा! अज्ञानाचा नाश करणारें हें ज्ञान सविकल्प असावें लागतें; निर्विकल्प ज्ञानाच्या योगानें अज्ञान निवृत्त होत नाहीं. निर्विकल्प ज्ञान स्वतः कोणालाच विरोधि नाहीं. तें सविकल्प ज्ञानाच्या आश्रयानें नाना आकार भासमान होण्याला स्वतः केवळ चित्राच्या भिंतीप्रमाणें अधिष्ठान आहे. निर्विकल्प ज्ञान म्हणजे केवल ज्ञान. त्यावर विकल्प

उद्भवले, म्हणजे तें सविकल्प ज्ञान होतें. तेव्हां अज्ञान हेंहि सविकल्प ज्ञानच आहे, दुसरें काय? तें कार्य, कारण इत्यादि रूपांनीं अनेक प्रकारचें झालें आहे. स्वात्मस्वरूपाचें विस्मरण हें कारण-अज्ञान म्हटलें आहे. चिदात्मा हा परिपूर्ण भरला आहे. त्याला कशाचीच मर्यादा नाहीं. मर्यादा घालणाऱ्या देशकालादिकांचीहि सिद्धता त्याच्यापासूनच होते. अशा प्रकारच्या चैतन्याचें अपूर्णत्वानें जें भान होतें, म्हणजे 'मी हा, आतां येथें आहे' हें जें स्फुरतें, तें या कारण-अज्ञानाचें स्वरूप होय. नंतर देहादिकांचा स्वत्वानें भास होणें इत्यादि हे त्याला पुढें पल्लव फुटले आहेत. म्हणजे हें कार्य-अज्ञान होय. अष्टावक्रा! या अज्ञानाचें निवारण होईपर्यंत संसार लयास जात नाहीं; आणि सर्वत्र परिपूर्ण भरलेलें आत्म्याचें शुद्ध स्वरूप समजून येईपर्यंत हें अज्ञान निवृत्त होत नाहीं. हें आत्मस्वरूपाचें ज्ञान दोन प्रकारचें होत असतें; एक परोक्ष व दुसरें प्रत्यक्ष. परोक्ष ज्ञान सद्गुरूपासून व शास्त्रावरून होतें. पण तें मोक्षरूप पुरुषार्थाची प्राप्ति करून देण्याला साक्षात् कारण होत नाहीं. तुला जें ज्ञान झालें आहे तेंच हें परोक्ष ज्ञान. शास्त्रावरून प्राप्त झालेलें व केवळ श्रद्धेनें जवळ बाळगलेलें हें परोक्ष ज्ञान फलदायी होत नाहीं, हें अगदीं उघड आहे. पण दुसरें जें साक्षात् किंवा प्रत्यक्ष ज्ञान तें समाधीच्या परिपाकानंतर उत्पन्न होतें; आणि तेंच या अज्ञानाच्या व तज्जन्य संसाराच्या नाशाला समर्थ असून महाशुभ फल प्राप्त करून देण्यासहि तेंच शक्तिमान आहे. समाधि ज्ञानपूर्वक असेल तर त्या समाधीपासून हें फल प्रगट होतें. म्हणून अज्ञ पुरुषांना समाधि

संभवत असतांहि त्यांचा कांहीं उपयोग होत नाहीं. उदाहरणार्थ तूं असें पहा कीं, एखादा रत्नाची ओळख नरूणारा पुरुष कोशागारांत रत्न प्रत्यक्ष पहात असतो, पण तें आपण पाहिलें असें त्याचे प्रत्ययास येत नाहीं. परंतु ज्या दुसऱ्याला त्या रत्नाची माहिती असते, त्याला तिकडे लक्ष देऊन पाहतांच रत्नाची खूण पटते. त्यांतून त्याचेंहि तिकडे लक्ष लागलेलें नसेल तर, रत्नाची त्याला माहिती असली व तो स्वतः मोठा चतुर असला तरीहि, समोर रत्न दिसत असूनहि रत्नाची ओळख होत नाहीं. त्याप्रमाणें अष्टावक्रा ! मूर्खांना अज्ञानामुळें हें विज्ञानजन्य महाफल प्राप्त होत नाहीं, याला काय करावें ! कांहीं पंडितांनीं यासंबंधांत पुष्कळ वाचलेलें असतें, परंतु या विषयाची त्यांना खरी आस्था नसल्यामुळें त्यांनाहि हें ज्ञान होत नाहीं. त्यामुळें तेहि कोरडेच राहतात. जसा एखादा माणूस आकाशांत तारा प्रत्यक्ष पाहतो, परंतु अमुक तारा पाहिला हें मात्र त्याला कळत नाहीं. त्याला त्याच्या खुणा माहीत नसतात, किंवा माहीत असूनहि प्रसंगीं तो तितका त्यासंबंधांत आस्थेचा नसतो म्हणून म्हणा, पण पाहूनहि जाणत नाहीं, हें खरें ! पण जो कोणी तो तारा—उदाहरणार्थ शुक्र—कोणत्या दिशेस असतो, केवढासा असतो इत्यादि माहिती करून घेऊन, मला तो समजलाच पाहिजे म्हणून त्याच्या मागें लागतो, त्याला मात्र चित्त एकाग्र करून त्याला पाहतां येतें व लागलीच स्पष्ट ओळखतां येतें. सारांश, मूर्ख लोक अज्ञानामुळें व दुसरे यासंबंधांत उत्सुक नसतात म्हणून निर्विकल्प समाधि वारंवार प्राप्त होत असूनहि आत्मस्वरूप ओळखूं शकत नाहींत;—आणि

अष्टावक्रा ! ठेवलेला ठेवा विसरून दुर्दैवानें भिक्षा मागत भटकणाऱ्या पुरुषासारखे हे सर्व हास्यास्पद होतात ! म्हणून व्यवहारकाळीं अनुभवास येणाऱ्या या क्षणिक समाधीच्या सर्व अवस्था संसार निवृत्त करण्यास निरुपयोगी होतात. यामुळेंच मुलांचीहि निर्विकल्प स्थिति असली तरी तिनें अज्ञानाची निवृत्ति होत नसल्यामुळें ती संसारनाशाच्या उपयोगास येत नाहीं.

अष्टावक्रा ! आत्मस्वरूपाची ओळख करून देण्यास अवश्य असणारें ज्ञान सविकल्प असावें लागतें. तेंच संसाराचें बीजभूत अज्ञान निवृत्त करूं शकतें. अनेक जन्मार्जित पुण्यकृत्यांनीं आत्मदेवता जेव्हां संतुष्ट होते, तेव्हां संसारांतून सुटण्याची इच्छा होते, नाहींतर कोट्यवधि कल्पहि तसेच जातात. प्रथमतः प्राण्याचा जन्म मिळणें हें अतिशय कठिण असतें. त्यांत मनुष्यजन्म मिळणें तर फारच दुर्लभ. त्यांत आणखी बुद्धि सूक्ष्म असणें हें दुरापास्तच. कारण अष्टावक्रा, या पृथ्वीवर स्थावरांच्या एक शतांशसुद्धां चेतन आढळत नाहींत. प्राण्यांच्या एक शतांशहि मनुष्यें नाहींत. आणि त्यांच्यामध्येंहि पशुतुल्य मनुष्यें तर कोट्यवधि आहेत ! तीं चांगलें-वाईट जाणत नाहींत आणि पुण्य-पापहि पहात नाहींत. दुसरे कोट्यवधि लोक विषयसुखाच्या मागें लागले आहेत. पांडित्याच्या भ्रमानें त्यांना गर्व झाला असून पुनःपुनः जन्म घेणें हेंच त्यांना पत्करतें ! त्यांतच कित्येक बुद्धिमानहि आहेत; परंतु त्यांच्या चित्तांतील मालिन्य पूर्ण नष्ट झालें नसल्यामुळें त्यांना हें अद्वैत आत्मपद म्हणजे ‘ कांहीं नाहीं ’ असेंच वाटतें व तें नास्तिक होतात. आणि तें ठीकच आहे.

कारण भगवंताच्या मायेनें हें अद्वैत परमपद आच्छादित झालें असल्यामुळें त्याच्या मायेनें आंधळे बनलेल्या या सर्व दुर्दैवी लोकांना तें कसें प्राप्त होईल ? हें परम पद मायेला मोहून गेलेल्या पुरुषांच्या बुद्धींत शिरत नाहीं. दुसरे कित्येक असे करंटे आहेत कीं, त्यांच्या बुद्धींत तें शिरत असूनहि भलत्याच मताचा खोटा अभिमान धरून ते कुतर्कच वाढवीत सुटतात ! अहो ! ही भगवंताची माया केवढी विलक्षण आहे कीं, तें पद दृष्टीस पडलें असतांहि हे लोक कुकल्पना काढून हातांत आलेला चिंतामणि फेकून देतात ! परंतु ज्यांच्या आराधनेनें ती पर देवता प्रसन्न झालेली असते, ते भाग्यवान् पुरुष मात्र या मायेच्या फेऱ्यांतून सुटून सद्विचाराचा व श्रद्धेचा आश्रय करतात, व अद्वैत पदावर त्यांची निष्ठा जडून शेवटीं त्या परमपावन पदास पोंचतात. अष्टावक्रा, त्याचा क्रम तुला सांगतों, तो तूं चित्त चांगलें एकाग्र करून ऐक. अनंत जन्मींच्या पुण्यानें देवतेवर भक्ति जडते. तिच्या योगानें देवतेची दीर्घकाल आराधना घडते. त्यानंतर तिच्या कृपेनें विषयांसंबंधीं वैराग्य उत्पन्न होऊन तें पद प्राप्त होण्यासंबंधीं उत्कंठा—तत्परता—प्राप्त होते. नंतर विषयांवरील वैराग्य व पदप्राप्तीची खरी उत्कंठा यांच्या जोडीला श्रद्धा प्राप्त होऊन पुढें प्रसंगवशात् सद्गुरूंची भेट होते. नंतर त्यांच्या उपदेशानें अद्वैत परम पदाचें ज्ञान प्राप्त होतें. हें ज्ञान परोक्षच असतें. ह्मणजे अद्वैत पद असें-असें आहे इतकाच भाव या वेळीं उत्पन्न होतो. नंतर साधकाला त्या अद्वैत आत्मस्वरूपाचा सम्यक् विचार करावा लागतो. नंतर सुविचाराच्या योगानें क्रमाक्रमानें त्याची उत्पत्ति बसून शेवटीं सर्व संशय

नष्ट होतात. यानंतर निश्चित झालेल्या स्वरूपभूत अद्वैततत्त्वाचा मोठ्या दृढनिश्चयानें निदिध्यास घ्यावा. दीर्घ प्रयत्नानें आणि बलात्कारानें चित्त तदाकार ठेवावें. त्यानंतर ‘ तें तत्त्व मीच आहें ’ अशा प्रकारच्या सविकल्प ज्ञानानें तो निदिध्यास पूर्ण झाल्यावर मग हें संसारकारण अज्ञान निःसंशय नष्ट होतें. विकल्परहित ध्यान साध्य होऊन तें समाधीपर्यंत परिपक्व झालें असतां त्या अद्वैताचा साक्षात्कार होतो. यापुढें फक्त स्मृति होतांच त्या पदाचें प्रत्यक्ष दर्शन होऊं लागतें. ‘ तो अद्वय परमात्मा मीच आहें ’ असें सविकल्प ज्ञान प्रत्यक्ष अनुभवास आलें असतां तें तत्क्षणींच या संसार उत्पन्न करणाऱ्या अज्ञानाला त्याच्या परिवारासह नष्ट करितें. विकल्प मावळणें हीच ध्यानाची परिपक्व दशा. विकल्प हे नाना आकारांचे असतात. निर्विकल्प स्थिति एकाकार असते. अन्य भावनेचा उद्भव व्हावयाचा राहिला, म्हणजे विकल्प संपला. आणि विकल्प संपल्यावर पश्चात् निर्विकल्प अवस्था स्वतःसिद्धच असते. चित्र पुसून काढल्यावर ज्याप्रमाणें मागें भिंत ही उभीच असते, भिंत प्राप्त करून घ्यावयाची म्हणजे चित्र तेवढें पुसावयाचें; त्याप्रमाणें विकल्प नष्ट झाल्यावर मन स्वभावतःच निर्विकल्प राहतें. विकल्पांचा त्याग म्हणजेच निर्विकल्प शुद्ध आत्मस्वरूपसंपात्ति होय. याहून अधिक कांहीं एक स्थान मिळवण्याजोगें नाहीं. याच संबंधांत मायेच्या प्राबल्यामुळें मोठे विद्वानहि मूढ बनतात. परंतु उत्तम बुद्धिमानांना हें पद क्षणांत आकलन होतें. अष्टावक्रा, अधिकारी पुरुष उत्तम, मध्यम व कनिष्ठ असे तीन प्रकारचे आहेत. उत्तम आहेत ते उपदेशकालींच आत्मस्वरूप ओळ-

खतात. विचार व ध्यान हीं दोन्हींही त्यांचीं ऐकतां ऐकतांच होतात. अशा अधिकाऱ्यांना त्या पदाच्या प्राप्तीला कष्ट पडत नाहींत. आतां माझाच इतिहास पहाः—

उन्हाळ्याचे दिवस होते. रात्रीच्या चंद्रप्रकाशानें सर्व भूभाग सुशोभित झाला होता. अशा वेळीं मी आपल्या वाड्यापुढील सुंदर उद्यानांत एक सुरेख पलंग टाकून आपल्या स्त्रीसह बसलों होतों. इतक्यांत आकाशांत अद्वैततत्त्वासंबंधीं सिद्धगणांनीं केलेलें मधुर भाषण माझ्या कानावर आलें. तत्काळ तें पद माझ्या ध्यानांत आलें! अष्टावक्रा! तेवढ्याच वेळांत मीं विचार केला, ध्यानहि केलें; आणि शेवटीं आत्मस्वरूपास जाणलें. याप्रमाणें अर्धमुहूर्तांतच तें पद माझ्या ध्यानांत येऊन पुढें एक मुहूर्तपर्यंत माझा निर्विकल्पसमाधि लागला. तेव्हां मी सर्वच्या सर्व परमानंदसमुद्रांत अगदीं बुडून गेलों, अशी माझी अवस्था झाली. नंतर थोड्या वेळानें सावध होऊन मग मी विचार करूं लागलों. मला वाटलें कीं, "अहाहा! हें परमानंदानें भरलेलें अद्भूत व अपूर्व स्थान आज मला सांपडलें! मी पुनः आतां तेथेंच प्रवेश करितों. कारण इंद्रादिकांचें स्वर्गीय सुखसुद्धां याच्या एक अंशमात्र नसेल! ब्रम्हलोकापर्यंतचें सुख पाहिलें तरीहि तें याच्या लेशाच्याहि तुलनेस येणें शक्य नाहीं. अहाहा! मीं आजवर इतके दिवस फुकट घालविले! चिंतामणींनीं भरलेला आपला ठेवा विसरून जसा कोणी मूर्ख मनुष्य मूठभर पीठ मिळण्याच्या आशेनें घरोघर भिक्षा मागत फिरतो, त्याप्रमाणें हे लोक आत्मीय परमानंदाच्या संबंधांत अज्ञानानें भ्रांत होऊन जिवापाड श्रम करितात;

आणि कवडी किंमतीचें लेशमात्र बाह्य विषयसुख संपादन करितात! हा काय चमत्कार आहे! तर आजवर या क्षुद्र बाह्य सुखासाठीं मीं जे परिश्रम घेतले ते पुष्कळ झाले. आतां मी या निःसीम परमानंदाचें यथेच्छ सेवन करण्यांत अगदीं तत्पर होऊन राहणार! हा कंटाळवाणा बाह्य व्यवहार आतां पुरे! पिठाचें पुनः पीठ करीत बसण्याप्रमाणें या व्यवहारानें मला लाभ काय? हा सर्व दुर्लक्ष करण्याजोगा तुच्छ विषय आहे. अहो! पहा कीं, पुनः पुनः तेंच अन्न, त्याच पुष्पमाला, आणि तेच बिछाने! त्यांत नवीन तें काय आहे? मग त्यांत गोडी ती काय? अलंकारहि तेच आणि भोग्य स्त्रियाहि त्याच. पूर्वीं त्यांचेंच सेवन केलें व आतांहि तेंच चाललें आहे. यांत काय अर्थ आहे! पण सर्व लोकहि याच मार्गानें चालत असल्यामुळें मला त्याची आजवर कांहीं किळस वाटली नाहीं. अरेरे! हा केवढा मोह आहे!"

अष्टावक्रा! अशा विचारानें मी या बाह्य जगताचा तिरस्कार करून पुन्हां जों अंतर्मुख होण्याची तयारी करीत आहें, इतक्यांत मला एक निराळा शुभ विचार सुचला. मला मग असें वाटलें कीं, "अहो! माझ्या चित्ताला हा असा कसा मोह उत्पन्न झाला बरें? आनंदानें परिपूर्ण भरलेला जो आत्मा तोच मी असतांना पुनः कांहीं करण्याचें मी कशाला मनांत आणीत आहें? आणि मला आतां काय प्राप्त करून घ्यावयाचें आहे? प्रथम मला अप्राप्त काय आहे? आणि तें आतां कोठें मिळणार? केव्हां मिळणार? व कसें मिळणार? शिवाय असें कीं, आज अप्राप्त आहे त्याची उद्यां प्राप्ति झाली, तरी

पण काय ?—ती कायमची कशी होणार ? पण आधीं माझ्या अनंत चैतन्यस्वरूपांत क्रियाच संभवणार कशी ? देह, इंद्रियें व मन हीं तर स्वप्नाप्रमाणें मिथ्या आहेत. तसेंच मी अखंड एकरस चिदात्मा असल्यामुळें तीं सर्वच माझीं आहेत. मग त्यांतून एकच अंतःकरण निरुद्ध करून काय होणार आहे ? दुसरीं निरुद्ध नसलेलीं मनें, तीं तरी दुसऱ्या कोणाचीं आहेत काय ? माझींच तीं आहेत. जगतांतील निरुद्ध किंवा अ-निरुद्ध सर्वच मनें माझ्या ठिकाणीं भासमान होतात. मग एकाच मनाचा निरोध करण्याचा मला हा काय मोह झाला आहे ! शिवाय माझें स्वरूप तर असें आहे कीं, सर्व मनांचा निरोध करूनहि माझा निरोध होणारच नाहीं. महाकाशाहूनहि विस्तृत अशा माझ्या ठिकाणीं निरोध कोठून संभवणार ! याचप्रमाणें मज पूर्ण आनंदरूपाच्या ठिकाणीं समाधि कसा होईल ? चिदानंदानें भरलेल्या व गगनापेक्षां पूर्ण अशा मज आत्म्याचें शुभ किंवा अशुभ करील अशी कोणती क्रिया आहे ? अथवा ती असेल कशी ? शिवाय माझ्याच सामर्थ्यावर देहात्मत्वाचे कोट्यवधि भास होत असतांना त्यांत आणखी कांहीं आभासात्मक क्रिया भासमान झाल्या तरी काय आणि न झाल्या तरी काय ? मला कर्तव्य अथवा अकर्तव्य दोन्हीहि तिळमात्र नाहींत. तेव्हां निरोधांत काय अर्थ आहे ? सत्य आणि पूर्ण स्वभावाचा मी समाधींत अथवा उत्थान-अवस्थेंत सदा आनंदानें दाट भरलेलाच आहें ! तर आतां हा देह, हीं इंद्रियें, हें मन, ही बुद्धि, हीं सर्वहि स्वभावतः पूर्वसंस्कारवशात् ज्या कर्मांत, विषयांत किंवा विचारांत प्रवृत्त होत असतील, त्यांत

तीं प्रवृत्त होवोत; व स्वभावतः ज्यांपासून निवृत्त होतील त्यांपासून तीं निवृत्त होवोत. त्यांच्या प्रवृत्तीनें किंवा निवृत्तीनें मज असंग चिदानंदपूर्ण आणि सर्वग आत्म्याची हानि काय होणार व लाभ काय होणार ? "

तर अष्टावक्रा ! अशा प्रकारें स्वस्वरूपाचें अनुसंधान मला प्राप्त झाल्यापासून मी सर्वथा स्वस्थ असून परमानंदाचें आगरच झालों आहें. माझ्या प्रकाशाला अस्त असा केव्हांच नसून मी अत्यंत परिपूर्ण आणि सर्वसंगरहित आहें. ही माझी उत्तम अधिकाऱ्याची स्थिति मीं तुला सांगितली. मध्यम अधिकाऱ्यांना क्रमानें श्रवण, मनन व निदिध्यास हीं साधनें चालवावीं लागतात; व त्यानंतर त्यांना ज्ञान उत्पन्न होतें. कनिष्ठ अधिकाऱ्यांना अनेक जन्मांनीं, साधन पूर्णतेस येतें तेव्हां, ज्ञानाचें फल प्राप्त होतें. साधारणपणें ज्ञानयुक्त समाधि दुर्लभ असतो. व म्हणून अशा विज्ञानरहित शेंकडों समाधींनीं काय होणार ? त्यांचा कांहीं उपयोग नाहीं. व्यवहारांत सुद्धां पहा कीं, कधीं कधीं वाटेनें जातांना मन निर्विकल्प असून त्या स्थितींत पुष्कळ पदार्थ पाहिले जातात. परन्तु मनाला त्यांची भावना न झाल्यामुळें ते पाहिले असूनहि त्यांसंबंधींचें अज्ञान तसेंच कायम राहतें. तशाच या लहान मोठ्या समाधि स्वरूपाच्या ओळखीवाचून विफल होतात. विकल्पांनीं रहित, केवळ निर्विकल्प ज्ञान तेंच आत्मस्वरूप. तें सर्व मर्यादित भानांला आश्रय असल्यामुळें सदोदित भासमान असूनहि विकल्पांच्या अच्छादनामुळें न भासल्यासारखें होतें ! विकल्पांचें निवारण झालें असतां भासमान अस

णारें तेंच पुनः भासल्यासारखें होतें. शुद्ध निराकार ज्ञान व त्यावर भासमान होणारें साकार ज्ञेय या दोहोंमधील भेद न ओळखल्यामुळें जें आत्मस्वरूप अज्ञात राहिलें असतें, तेंच पुढें ज्ञात होतें असें ह्मणतात. दुसरें कांहीं मिळावयाचें असें नसतें. सारांश, याप्रमाणें आत्मज्ञान होण्याचा व्यवस्थित क्रम आहे. तूं हें सर्व श्रवण केलें आहेस. आतां तुला हें विचाराच्या योगानें आकलन करितां येईल; आणि तें आत्मतत्त्वाचें ज्ञान प्रत्यक्ष झाल्यावर तूं कृतार्थ होशिल."

याप्रमाणें अष्टवक्रास उपदेश करून जनकराजानें त्याचा सत्कार करून त्यास निरोप दिला. त्यानंतर अष्टावक्र परत गेला. नंतर मनन आणि निदिध्यास यांच्या योगानें त्यानें परमात्मस्वरूप जाणलें, व शेवटीं सर्व संशय नष्ट होऊन तो जीवन्मुक्त-अवस्थेस प्राप्त झाला!

## प्रकरण १८ वें.

# सारेंच पटत नाहीं !

भगवन्! भवता प्रोक्तं दुर्घटं प्रतिभाति मे ॥
चेत्यं चिदात्मकामिति नानुभूतिं समारुहेत् ॥ ४ ॥

दत्तात्रेय म्हणाले, परशुरामा! ही 'वेदवंध्या' म्हणजे वेद्यपदार्थ-रहित शुद्ध संवित् कशी अनुभवास येते, हें तुला सांगितलें. ही शुद्ध ज्ञानकला उपलब्ध होण्याचे प्रसंग व्यवहारांतहि पुष्कळ असतात; परंतु मायेनें मोहित झालेल्या या लोकांना त्याची ओळख नसल्या-मुळेंच त्याचें स्पष्ट ज्ञान होत नाहीं. ती स्थिति सूक्ष्म दृष्टीच्या पुरु-षांनाच जाणतां येते, दुसऱ्यांना येत नाहीं. परशुरामा, फार बोलून काय करावयाचें आहे? मी तुला सार सांगतों. सर्व वेद्य-वस्तु मनानें जाणतां येतात. अर्थात् मन हें कांहीं वेद्य नव्हे. आणि मन हें वेद्य पदार्थांचें भान नसतांही विद्यमान असतें, हेंहि तुझ्या ध्यानांत येण्या-जोगें आहे. म्हणून त्या मनालाच वेद्यरहित शुद्ध संवित् असें म्हण-तात. प्रकाश अथवा ज्ञान हेंच तिचें स्वरूप असल्यामुळें ती सदा ज्ञात असतेच. ती उपलब्ध होण्याला दुसऱ्याची अपेक्षा आहे असें म्हटलें, तर पुनः त्याला दुसऱ्याची अपेक्षा आहे असें होईल. म्हणजे या मार्गानें याचा शेवट न लागून अनवस्थिति दोष येईल, व मग कोणाचाच प्रकाश होईनासा होऊन सर्वच अंधार होऊन जाईल! अथवा परशुरामा! दुसऱ्या दृष्टीनें विचार कर कीं, कोणता एखादा पदार्थ भासमान होत असतांना तूं स्वतः भासमान होत नाहींस असें

आहे काय? कारण तूं भासमान होत नसल्यास 'तूं नाहींस' असें होतें. मग तुझा प्रश्नच कोठला? अरे! स्वतः आकाशाला येणाऱ्या फुलाप्रमाणें अभावरूप असतांना तूं आपल्या स्वहिताची, मोक्षाची इच्छा ती कसली करतोस! आणि अशा तुझा अभावरूपाचा आत्मा तरी मीं कसा अनुभवास आणून द्यावा तें सांग? आतां, 'सामान्यपणें भासमान होणारा मी विशेषेंकरून आपलें स्वरूप जाणत नाहीं' असें तूं म्हणत असलास, तर परशुरामा! सामान्यतः भासमान होणें हेंच तुझें शाश्वत स्वरूप आहे. तुझ्या ठिकाणीं विशेष भावांचा लेशहि नाहीं, हें तुझ्या ध्यानांत कसें येत नाहीं? अरे, तूं जाणत असूनहि पुनः व्यर्थ भ्रमांत पडतोस! याला काय म्हणावें? पदार्थांना भासमान करणारें ज्ञान त्या त्या विशेष आकारांचें असतें. परंतु तूं स्वतः सामान्यरूपच आहेस व स्वतःच्या योगानेंच भासमान होत आहेस. आतां तूं शरीरादिकांच्या योगें भासमान होत असशील म्हणावें, तरीहि सांगतों ऐक. देहादिकांनीं तूं भासमान होतोस तो देहादिकांचा संकल्प चित्तांत उद्भूत होतो, तेव्हां होतोस; तो नसतांना तूं देहादिकांनीं कधीं भासमान होतोस? सूक्ष्म विचारानें तूं आपला अनुभव पहा. देहाशिवाय निराळ्या संकल्पाचे वेळीं तुला देहत्व भासतें काय? नाहीं; त्या संकल्पाचा जो दुसरा विषय असेल तो भासतो. मग तोहि तुझा देह होईल. मग जो जो संकल्प होईल तें तें तुझें स्वरूप असा अर्थ होईल. मग तर तूं सर्वात्मकच झालास! तेव्हां एकदेहमात्रच तूं कसा होशील? यासाठीं कोणताहि दृश्य आकार हा, त्याला जाणणाऱ्या तुझें स्वरूप नव्हे, असें ठरतें. कारण तो आकार

प्रत्येक संकल्पाबरोबर बदलणारा आहे. म्हणून तूं केवळ दृङ्मात्ररूप आहेस. ही स्वरूपभूत दृक् देवता दृश्यरूप केव्हां-हि होत नाहीं. ती स्वयंप्रकाश आहे. शरीरादिक, तशीच देशकालादि भेदात्मक चित्रांच्या चमत्कारानें जरी ती शोभत आहे तरी तिच्या ठिकाणीं दृश्यभावाचा लेशहि नाहीं. सारांश, 'फक्त संकल्प वर्ज्य केल्यावर शेष राहणारें जें शुद्ध चैतन्यस्वरूप तोच आत्मा' असा तूं निश्चय कर. त्याचें एकवार दर्शन झालें असतां आणि त्यावर अधिष्ठित असलेले देहादिक भाव भासावयाचे राहिल्यावर, सर्व संसाराचें कारण असें जें अज्ञान तें लयास जातें. आणि हाच मोक्ष. मोक्ष कांहीं भूतळांत नाहीं, पाताळांत नाहीं, किंवा कोठें आकाशांत नाहीं. संकल्प वर्ज्य करतांच जो शुद्ध स्वरूपाचा अनुभव येतो, तोच मोक्ष. तेंच जीवाचें स्वरूप असल्यामुळें, तो मोक्ष नाहीं असें तर केव्हांच नाहीं. फक्त मोहाचें निरसन केलें कीं कृतार्थता झाली. दुसरा मोक्ष संभवत नाहीं. कारण जो करून होतो तो विनाशी असतो. म्हणून स्वरूपाव्यतिरिक्त कांहीं मोक्ष असेल तर तो सशाच्या शिंगाप्रमाणें असत् समजावा. स्वस्वरूप सर्वत्र भरलें असल्यामुळें त्याहून दुसरा मोक्ष संभवणार तरी कसा? त्या स्वरूपाच्या आंत मोक्ष संभवेल, असें मानलें, तरी तो आदर्शातील प्रतिबिंबाप्रमाणें तद्रूपच होणार. व्यवहारांतहि बंधाच्या नाशाहून निराळा मोक्ष कोणी समजत नाहींत. आणि नाश हा अभावात्मक आहे. मग तो सत्य म्हणजे भावरूप कसा होणार? तो भावाभावात्मक असेल म्हणावें, तर तशी वस्तु केव्हांहि संभवत नाहीं. आतां

'स्वप्नांतील पदार्थ असे उभयविध असतात; कारण ते अनुभवास येतात म्हणून सत्य, व जागृतींत त्यांचा बाध होतो म्हणून अभावात्मक.' असें जर कोणी म्हणेल तर त्यावर उत्तर आहे कीं, पदार्थांचा अनुभव न येतां त्याच्या अभावाचा अनुभव येणें याचें नांव बाध. असा ज्याचा बाध होतो तें असत्य, आणि होत नाहीं तें सत्य. परन्तु स्वप्नादिक दृश्याचा अनुभव नाहींसा होऊन त्याचा बाध होत असतो. यावरून स्वप्नासारखी भावाभावात्मक वस्तु असली तर ती असत्य असते, असेंच सहज सिद्ध होतें. तेव्हां ज्याला केव्हांहि व कोठेंहि अभावाचा तिळमात्रदेखील स्पर्श होत नाहीं, अशा प्रकारचें एक चित्तत्त्व मात्र सर्वथा सत्य आहे. तेव्हां त्या स्वरूपाहून अन्य मोक्ष असेल तर तो कांहीं केल्या सत्य नव्हे. त्या पूर्णस्वरूपाचें जें केवल स्फुरण, त्यालाच मोक्ष म्हणतात. चेत्य पदार्थांना दूर सारतांच चैतन्य स्वतः परिपूर्णच आहे. चेत्याचा आभास हेंच चितीचें संकोचन होय. त्याच्या अभावीं चित्स्वरूप सर्वपरिच्छेदशून्य आणि परिपूर्ण अर्थातच राहतें. त्याला कालादिकांची मर्यादा असेल असें कदाचित् तूं म्हणशील, तर ती मर्यादा चेतन असेल किंवा जड असेल तें सांग पाहूं? जड-पक्ष तर घेतांच येत नाहीं; कारण स्वतः जड तें चितीला मर्यादा कशी घालणार? व चेतन-पक्ष घ्यावा, तर हें चित्स्वरूपच सर्वत्र व्यापून आहे. त्याशिवाय अन्य असें कांहींच नाहीं. व्यवहारांत जो एखादा भाव कालादिकांनीं परिच्छिन्न असतो, तो भाव व तो कालादींचा परिच्छेद दोघेहि या चैतन्यानें व्यापले जातात तेव्हांच त्या त्या स्थितीस

पावतात. त्यांवर चैतन्याची व्याप्ति झाली नसेल तर तो परिच्छेद आहे, हें तरी सिद्ध कसें होणार? कारण तें जाणणार कोण? चैतन्याहून वेगळें चेत्य जर संभवत असतें, तर त्यानें कदाचित् चैतन्याला परिच्छेद करितां आला असता. परन्तु चैतन्यावेगळें चेत्य सिद्ध होणेंच सर्वथा अशक्य आहे. चैतन्य म्हणजे ज्ञान. मग जें ज्ञानाच्या बाहेर, त्याचा अर्थात्च जाणिवेशीं संबंध येत नसल्यामुळें त्याची अस्तिता तरी कशी ठरणार? आतां या कालादिकांचा चिद्रूपाशीं सर्वांशीं संबंध नसेल, एकांशानें मात्र संबंध होत असेल व त्यामुळें अन्य अंशांनीं तीं मर्यादक होतील, असें मानावें, तरीहि तें संभवत नाहीं. कारण एकांशानेंच चैतन्याशीं संबंध आहे म्हटल्यास, चैतन्याशीं संबंध नसलेल्या अन्य अंशांची सिद्धि होत नाहीं. कारण, चैतन्यावांचून ते भासमान होणार कसे? म्हणून बाह्य पदार्थसुद्धां या चित्समुद्रांतच बुडालेले आहेत. याप्रमाणें सर्व चेत्यजात चैतन्याच्या, जाणिवेच्या पोटांत आहे. मग तें त्यालाच परिच्छेदक कसें होणार? म्हणून परशुरामा! चेत्याचें स्वरूप असें मिथ्या आहे, हें तूं चांगल्या विचारानें ध्यानांत आण. जें चैतन्याच्या आंत भासमान होतें तें प्रतिबिंबाच्या स्वरूपाचेंच असलें पाहिजे. कारण एका पदार्थाच्या आंत दुसरा पदार्थ असूंच शकत नाहीं, हें व्यवहारांत तर स्पष्ट दिसून येतें. नाहीं तर एकमेकांच्या आंत सर्व पदार्थ मिश्र झाले तर भांडें कोणतें ओळखावें व वस्त्र कोणतें ओळखावें? म्हणजे सर्वत्र सांकर्य दोष उत्पन्न होईल. शिवाय परशुरामा! हा बाह्यभास सर्व भ्रममूलक आहे म्हणून तुला

पूर्वीच सांगितलें आहे. तेव्हां चैतन्याच्या आश्रयानें भासणारे हे नाना भाव स्वतः सत्य कसे होतील तें सांग पाहूं ? अरे, हा चैतन्य-स्वरूप आत्माच आपल्या स्वातंत्र्यशक्तीनें त्या त्या पदार्थांच्या आकारानें भासत आहे, याशिवाय दुसरें कांहीं नाहीं.

हें दत्तात्रेयाचें भाषण ऐकून परशुराम अधिकच संशयित झाला ! किंबहुना, त्याला सारेंच पटत नाहींसें झालें ! अनेक तऱ्हेचे आक्षेप त्याच्या मनांत उभे राहिले. तेव्हां तो म्हणाला, "भगवन् ! आपण सांगत आहां हें सर्व अशक्य आहे, असें मला वाटतें. ( १ ) शुद्ध संवित् एकच असून तीच नाना आकारांनीं भासते, हें संभवनीय दिसत नाहीं. संवित् आणि वेद्य अशा दोन वस्तु आहेत असा सर्वांचा अनुभव आहे. त्यामध्यें आपल्या म्हणण्याप्रमाणें चिति ही स्वतःच प्रकाशस्वरूप असो हवी तर, परंतु चेत्य किंवा वेद्य हें त्या चैतन्याच्या योगानें प्रकाशित होणारें अर्थात् चैतन्याहून भिन्न आहे हें खास. ज्याप्रमाणें व्यवहारांत एखाद्या प्रकाशाच्या योगानें भासमान झालेली वस्तु त्या प्रकाशाहून वेगळी असते, त्याप्रमाणें चैतन्यावर भासमान होणारें चेत्यजात त्याहून वेगळें असणें अगदीं शक्य आहे. शिवाय आपले म्हणण्याप्रमाणें चेत्य हें चैतन्यात्मकच आहे हें अनुभवासहि येत नाहीं. ( २ ) जनकानेंहि पूर्वीं सांगितलें आहे कीं, 'संकल्प वर्ज्य केल्यावर मन निर्विकल्प होतें; आणि त्याच निर्विकल्प ज्ञानानें संसाराचा नाश होतो, तेंच आत्मस्वरूप होय.' हें सांगितलें खरें; पण तें व्हावें कसें ? कारण ज्ञान होण्याला किंवा कर्म करण्याला आत्म्याला मन हें एक साधन आहे. तें जर त्याला नसेल तर तो

जडाहून वेगळा कसा ठरेल? आत्म्याला मन असतें, हाच जडापेक्षां आत्माच्या ठिकाणीं विशेष आहे. तसेंच भगवन! आत्म्याला मनामुळेंच बंध होतो व मनानेंच मोक्ष होतो हें स्पष्ट आहे. संकल्पयुक्त मन हाच बंध व निःसंकल्प मन हाच मोक्ष. तर मनच आत्मा हें कसें शक्य आहे? मन हें साधन आहे. म्हणून निर्विकल्प अवस्थेची सिद्धि झाली तरी मनाच्या योगानें द्वैत पुनः राहतेंच. ( ३ ) शिवाय, लोकांमध्येंहि असें आढळतें कीं, ज्यासंबंधांत भ्रांति झालेली असते, तो विषय जरी मिथ्या असतो, तरी त्याची भ्रांति हीहि कांहीं मिथ्या नसते; ती खरीच असते. तेव्हां यावरून द्वैत अजिबात नाहीं असें कसें ठरतें? शिवाय नसलेल्या वस्तूचा व्यवहार चाललेलाहि आजवर कधीं आढळून आलेला नाहीं. पण या जगांतील सर्व पदार्थजात स्थिर असून तें प्रत्यक्ष कार्यें करीत आहे! तर तें असत्य कसें तें सांगा. मग तुमचें अद्वैत सिद्ध होईल. अहो! सर्वच भ्रांतिमय आहे, तर भ्रांति व अभ्रांति हा भेद तरी कसा ओळखण्यांत येतो? शिवाय सर्वांना एकसारखीच भ्रांति तरी व्हावी कशी? स्वामिन् दत्तात्रेय! ही शंका माझ्या हृदयांत डांचत आहे, आपण माझी समजूत करा."

सर्वज्ञ दत्तात्रेयांना हा सरळ प्रश्न ऐकून फार संतोष झाला. ते ह्मणाले, परशुरामा! हें पूर्वीं बहुतेक सांगितलेंच आहे. तरी तूं पुनः विचारलेंस हेंहि योग्य आहे. कारण जोंपर्यंत मनाचें समाधान झालें नाहीं तोंवर वारंवार प्रश्न करावे हें योग्य आहे. प्रश्नच केला नाहीं तर आपलें मनोगत सद्गुरु झाले तरी कसे जाणतील! कारण

जीवांच्या बुद्धि निरनिराळ्या असल्यामुळें प्रत्येकाचे निरनिराळे तर्क असतात. म्हणून आपला अभिप्राय बोलून दाखविल्यावांचून संशयांतून कोणीच मुक्त होणार नाहीं. प्रश्न करणाऱ्यालाच दृढ ज्ञान होतें. प्रश्न हेंच निरूपणाचें बीज आहे. जो शंकाच विचारीत नाहीं, त्याला विद्या अवगत होत नाहीं. म्हणून गुरूला प्रश्न करून सर्व मर्म पूर्ण समजून घ्यावें. असो, आतां तुझ्या प्रश्नांचीं उत्तरें क्रमानें सांगतों तीं ऐकः

( १ ) एकच आरसा नाना प्रतिबिंबामुळें जशीं अनेक रूपें धारण करितो, त्याप्रमाणें एकच शुद्ध चैतन्य अनेक विचित्र आकारांनीं भासावें, हें संभवतें. पहा कीं, स्वप्नादि विकल्पांमध्यें मन केवळ एकच असतांहि द्रष्टा, दर्शन, दृश्य इत्यादि विचित्र प्रकारांनीं अनुभवास येत नाहीं काय? याचसारखें तें शुद्ध चैतन्य अनेक विचित्र आकार आपल्याच स्वरूपावर भासवितें, यांत संशय कोठे आहे? एक चिति व दुसरें चेत्य असे दोन प्रकार स्वप्नांतहि भासतात. ते जर मिथ्या आहेत, तर ते जागृतींत तरी मिथ्या म्हणण्यास काय अडचण आहे? आतां व्यवहारांत पाहतां प्रकाश व प्रकाशित पदार्थ हे दोन्ही भिन्न असतात खरे, पण ते पदार्थ केवळ त्या प्रकाशावरच भासतात असें नाहीं; त्यांचा अनुभव अन्य साधनांनीं होणें शक्य असतें. कारण, अंधळ्याला त्या प्रकाशावांचूनहि त्वचेनें वगैरे पदार्थ अनुभवास येत असतात ना? म्हणून ते पदार्थ त्या प्रकाशाहून भिन्न मानावे लागतात. ते केवळ प्रकाशामुळेंच भासतात असें असेल तर मात्र ते प्रकाशाहून भिन्न नव्हेत, असें मान्य करितां

येईल. तूं म्हणशील, ' रूप भासणें हें तर प्रकाशावरच सर्वस्वीं अवलंबून आहे. तरीहि प्रकाश व रूप हीं दोन मानलीं जातात; तसेंच चित्प्रकाशासंबंधीं द्वैत असेल.'—तर तेंहि व्यर्थ आहे. कारण रूपसुद्धां प्रकाशावांचून, केवळ स्मृतीच्या योगानें भासमान होतें. मनोराज्य चाललें असतां मनःपटावर रूपाचे देखावे स्पष्ट भासतात. अशा तऱ्हेनें प्रकाशावांचूनहि रूपाच्या भावांचा अनुभव येत असल्यामुळें हा दृष्टांत चैतन्याशीं सुसंगत होत नाहीं. चैतन्याचा प्रकाश इतर प्रकाशांप्रमाणें एकदेशीय नाहीं. कारण चैतन्याच्या भानावांचून कोठेंच कांहींहि भासमान होत नाहीं. ज्याप्रमाणें आदर्शावांचून प्रतिबिंब भासत नाहीं, व म्हणून आदर्शाहून प्रतिबिंब वेगळें असूं शकत नाहीं, त्याप्रमाणें चैतन्यावांचून निराळें असें कांहींच नाहीं. म्हणून चेत्यपदार्थ चैतन्याहून पृथक् ठरत नसल्यामुळें एक अद्वितीय चैतन्यच आहे, द्वैत नाहीं, असेंच सिद्ध होतें.

( २ ) तुझा दुसरा प्रश्न मनासंबंधीं आहे. तर परशुरामा! मनसुद्धां चितीहून निराळें सर्वथैव नाहीं. जसें स्वप्नामध्यें मन त्या स्वप्नभासाहून निराळें नाहीं, त्याप्रमाणें जागृतीमध्येंहि मन म्हणून एखादा वेगळा पदार्थ नाहीं. कार्यांच्या सिद्धीसाठीं फक्त मन हें एक साधन मानिलेलें आहे. स्वप्नांतील झाडें तोडण्यासाठीं घेतलेली स्वप्नांतील कुऱ्हाड जशी कल्पित, तसें तें केवळ कल्पित आहे. जशी क्रिया असत् तसें तिचें साधनहि असत्. अगोदर तीं कार्यें कोठें सत्य आहेत? आणि नसलेल्या नरशृंगानें कधीं कोणाचें विदारण केलें आहे? म्हणून परशुरामा! चेत्य जीं कार्यें तींच नाहींत, तेव्हां त्यांचें

साधन जें मन तेंहि नाहीं! स्वप्नामध्यें ज्याप्रमाणें स्वप्नक्रियेचें कारण म्हणून दृक्‌शक्तीलाच मन म्हणण्यांत येतें, त्याप्रमाणें जागृतींतहि तीच मन होते. दृक्शक्तीला-चैतन्याला-सोडून वेगळें, क्रिया करणारें, मन केव्हांच नसतें. हा चिदात्माच आपल्या पूर्ण स्वातंत्र्य-शक्तीच्या जोरानें मन इत्यादिकांची कल्पना करून द्रष्टा, दृश्य इत्यादि भेदांनीं व्यवहार करींत असतो. क्वचित् केवळ निर्विकल्प अवस्थेंतहि स्थित होतो. परशुरामा! ऐक. हें चित्तत्व परिपूर्ण असूनहि एका चेतन-धर्मामुळें तें स्वप्रकाशक झालें आहे; त्यामुळेंच जड आकाशाशीं त्याची तुलना करितां येत नाहीं. एरवीं आकाश व चिदात्मा यांत दुसरा कांहींच भेद नाहीं. आकाशाप्रमाणेंच हा आत्मा पूर्ण आहे, सूक्ष्म आहे, मलरहित आहे, अज आहे व अनंत आहे; आणि तसाच तो निराकार, सर्वाधार आणि संगरहित असून सर्व चराचराच्या अंतर्बाह्य राहणारा आहे. एक चैतन्य मात्र जास्त, तेवढें आकाशाच्या ठिकाणीं नाहीं. वस्तुतः चैतन्यपूर्ण आकाशालाच आत्मा असें म्हण-तात. याशिवाय आत्मा व आकाश यांच्यांत काडीमात्र भेद नाहीं. या कारणानें जसें दिवाभीत स्वनेत्रदोषामुळें सूर्यप्रकाशालाच अंधार समजतें, त्याप्रमाणें अज्ञानी लोक या जड आकाशालाच आत्मा समजतात. ज्ञाते मात्र हें आत्मचैतन्य आकाशासारखें आहे, या वाक्यांतील अभिप्राय जाणतात. हें परमेश्वरी परमचैतन्य आपल्या अमर्याद स्वातंत्र्यबळावर अनेक तऱ्हेनें आपणच आपल्याला मर्यादित करून भासवितें. जसें स्वप्न नाना आकारांनीं भासतें, तसेंच हेंहि आहे. आणि असें भासणेंसुद्धां मर्यादित दृष्टीनेंच आहे. स्वतः चैत-

त्याच्या दृष्टीनें तें परिपूर्ण आत्मस्वरूप आहे. जसा कोणी ऐंद्रजालिक आपले जादूचे खेळ अनेक प्रकारांनीं प्रेक्षकांना भासवीत असतो तरी त्याचा त्याला तो एकटाच अनुभवास येत असतो, त्याचप्रमाणें ही परम शुद्ध संवित् एकटी एकच आहे. तिचें स्वरूप अखंड एकरसच आहे. पण मायेच्या योगानें ती स्वरूपाचा संकोच करून अनेक मर्यादित रूपानीं भासते. हें मायेचें आवरणाहि लोकांच्या मर्यादित दृष्टीनेंच आहे. कारण गारोड्याची मायासुद्धां दुसऱ्यांच्या दृष्टीनेंच भासते; ती त्याला स्वतःला शून्यच असते. असो, तर या मायेमुळेंच चैतन्याच्या ठिकाणीं अघटित सामर्थ्य आलें आहे. व्यवहारांतहि योगी किंवा मांत्रिक पुरुष हे आपल्या समर्याद बळानेंहि कित्येक अघटित गोष्टी घडवून आणतात, हें आपण प्रत्यक्ष पाहतों. तर मग चैतन्यात्म्याला हें काय अशक्य आहे? मर्यादित पदार्थांच्या ठिकाणीं अहं असा अभिमान धरणें, हाच चैतन्याला परिच्छेद. त्या भावनेला पूर्णत्व नसल्यामुळें त्यालाच अविद्या असें नांव देत असतात. सारांश, परशुरामा! चैतन्य स्वसामर्थ्यानें स्वतः अनेकरूप होऊन भासतें, हें मी तुला वारंवार सांगत आहें, तूं विसरूं नकोस, आणि व्यर्थ शंकाहि घेऊं नकोस! अरे, याच बाबतींत पुष्कळ तार्किक विद्वानाहि मूढ बनतात, व बहिर्मुखतेमुळें स्वस्वरूपाकडे वळून मुळीं पाहतच नाहींत, हेंहि अनेक वेळ मीं तुला बजावलें आहे. कारण सद्गुरूंनीं सांगितलेली गोष्ट खरी किंवा खोटी असली, तथापि जोंवर अंतर्मुख होऊन ती शोधली जात नाहीं, तोंवर केवळ शब्दज्ञानापासून कांहीं फल मात्र होत नाहीं. म्हणून मी तुला सांगत आहें कीं, तूं सूक्ष्म दृष्टीनें

आपल्या अंतरंगांत शोध घे. जी सर्व पदार्थांच्या भानकाळीं, पदार्थांचे विशिष्ट आकार सोडून सामान्यपणें भासमान होणारी परमदेवता चिच्छक्ति ती जडाहून भिन्न अतएव प्रकाशरूप असल्यामुळें तिच्या ठिकाणीं अहं हें स्फुरण आहे. यालाच आत्मविश्रांति असें म्हणतात. पण जड पदार्थ चैतन्यामुळेंच भासमान् होतात, स्वतः होत नाहींत; त्यामुळें त्यांच्या ठिकाणीं स्वरूपविश्रांतिरूप अहं ही स्फूर्ति नाहीं. चैतन्य केवळ स्वतःच, दुसऱ्याच्या साह्यावांचून सदैव भासणारें असल्यामुळें त्याच्या ठिकाणीं स्वात्मविश्रांतिरूप अहंता असणें योग्य आहे. याच्या ठिकाणीं भेदाचा स्पर्श नसल्यामुळें व याला कांहीं परिच्छेद नसल्यामुळें आदर्शांतील नगराप्रमाणें सर्व दृश्य याच्या स्वरूपावर राहिलें आहे. भेदभावना किंवा मर्यादितपणा कशापासून होणार ? त्याला योग्य निमित्तच संभवत नाहीं. म्हणून पूर्णस्वरूप या चैतन्याच्या ठिकाणीं जें पूर्णतेचें स्फुरण आहे, तीच आत्मविश्रांति आणि तीच पूर्ण अहंता होय. अशा प्रकारें परशुरामा ! हें सर्व खरोखर अखंडैकरस चिन्मात्र आहे. निरूपणाच्या वेळीं जें अनेक नांवांनीं भासमान होतें, तें याचेंच सामर्थ्य; आणि सामर्थ्य हेंहि तद्रूप आहे, त्याहून वेगळें म्हणून कांहीं नाहीं. एकाच अग्नीच्या ठिकाणीं प्रकाश व उष्णता या दोन गोष्टी राहतात, त्याप्रमाणें स्वातंत्र्याचें बळ आणि अहंतेचें स्फुरण असे दोन भाव असतांहि ती चिति एकरसात्मकच राहते. अघटित गोष्टी घडवून आणणारी माया नांवाची जी शक्ति तिचें स्वरूप हेंच कीं, चिदेकरस स्वरूपाच्या ठिकाणींहि अनेक विचित्र भास भासमान होतात. आणि हे भास

भासत असतांहि चिति स्वरूपापासून च्युत होत नाहीं ! मर्यादित भास तोच अनात्मभास, तीच अविद्या, तीच जडशक्ति आणि तीच प्रकृति. तसेंच महाशून्य, अत्यंताभाव, आकाश, तम किंवा प्रथम सर्ग इत्यादि हीं सर्व त्याच प्राथमिक मर्यादित भासाला नांवें दिलीं आहेत. परशुरामा, जें परिपूर्ण आत्मस्वरूपाचें अहं एतद्रूप स्फुरण, तेंच भ्रांतिवशात् एकदेशी होऊन जड रूपानें भासणें हेंच आकाश होय. ह्मणजे ' अहं आत्मा ' हा भाव रहित करून शेष जो आत्मप्रदेश त्यालाच आकाश असें म्हणतात. तेंच जगताचें मूळ होय. अज्ञान लोकांच्या अनुभवास येणारा जो भेदाभास, तो हाच होय. परशुरामा ! तूं सूक्ष्म दृष्टीनें प्रथम असा शोध घे कीं, जें आकाश म्हणून तुझ्या पाहण्यांत येतें, तोच त्यांतील जीवांचा आत्मा, चैतन्य होय. दुसऱ्यांच्या शरीरांत जें आकाश तुला भासतें, तोच त्यांचा चिदानंदघन आत्मा आणि तोच तुझाहि आत्मा. याप्रमाणें स्वतःच कल्पिलेल्या आकाशानें जें चैतन्य व्याप्त होतें, त्यालाच मन म्हणतात. म्हणजे तो आत्माच आहे, दुसरें कांहीं नाहीं. त्यामध्यें, आवरण करणाऱ्या जड तत्त्वाच्या दृष्टीनें मन ह्मणतात आणि आवृत झालेल्या चिदंशाच्या दृष्टीनें प्रमाता जीव म्हणतात. याप्रमाणें चैतन्यांश आकाशरूप जड तत्वानें आवृत झाल्यावर पुनः त्या आकाशांत, त्याच्या कोमल, विरल, मृदु आणि निर्मल भावांवर कठिण, दाट, घट्ट आणि मलिन अवस्थांच्या कल्पना करितो. त्यामुळें एक आकाश व या चार भावनांपासून चार, अशीं पांच भूतें प्रगट होतात. व स्वतः चिदंश त्यांच्या योगानें बनलेल्या देहाची संगति करून

देहात्मा होतो. नंतर, कलशाच्या आंत ठेवलेला दीप ज्याप्रमाणें त्याचा सर्व अंतर्भाग व्यापून प्रकाशित करतो, त्याप्रमाणें हा देहांतर्गत चिंदंश देहाला आंतून प्रकाशित करतो व आपण त्याच्या आंत गुप्त दीपाप्रमाणें राहतो. पुढें, दीपाचा प्रकाश जसा कलशास असलेल्या छिद्रांतून बाहेर पडावा, त्याप्रमाणें हा चिद्दीप इंद्रियद्वारा बाहेर प्रकाश करितो. वस्तुतः अक्रिय व पूर्ण चिद्रूपाच्या ठिकाणीं बाहेर किंवा आंत हें संभवत नाहीं. परन्तु चैतन्याची ज्ञानशक्ति आपल्याला आवृत करणाऱ्या जड आकाशाला जेव्हां दूर सारिते, तेव्हां ती बाहेर येतेशी भासमान होते. ज्ञानशक्तीनें आवरणास दूर करणें हाच मनाचा व्यापार होय. म्हणून आत्मा हेंच मन होय. चंचल चिति म्हणजे मन आणि निश्चल चिति म्हणजे आत्मा. आवरण दूर करणें हेंच चिच्छक्तीचें चलन होय. यालाच विकल्प म्हणतात; व हेंच मनाचें स्वरूप होय. त्याच विकल्पांचें निरसन केल्यावर शेष जें पूर्ण निर्विकल्प आत्मस्वरूपभूत विज्ञान राहतें, तेंच मोक्षप्राप्तीस कारण आहे. परशुरामा, आतां 'विकल्पांचें निरसन केल्यानंतरहि आवरण–दोष पुनः राहणारच' असा संशय तूं येथें घेऊं नकोस. कारण आवरण मुळीं आहे कोठें? तें स्वतः केवळ कल्पित असल्यामुळें वस्तुतः नाहींच. मनोराज्य करतांना ज्याप्रमाणें कोणा शत्रूनें आपल्याला शिव्या दिल्या, बांधलें, मारलें, तर तें मारणें वगैरे सर्व, संकल्प बंद झाल्याबरोबर विलयास जातें.— मग त्यांतील काय शिल्लक राहतें?——त्याप्रमाणें येथेंहि. परशुरामा, अनादि कालापासून एथें बंध कोणालाच नाहीं!

बंध कोठें आहे तो दाखव पाहूं ? अरे, बंध म्हणून कोणी एक आहे, अशी दृढ भावना हाच महाबंध आहे! खोटयाच भीतीनें भ्यालेल्या मुलाच्या बागुलबोवाप्रमाणें तोच घातक आहे. जोंवर बंध आहे ही भ्रांति नष्ट झाली नाहीं, तोंवर कोणी बुद्धिमान पुरुष सुद्धां केवढेहि दीर्घ प्रयत्न करून संसारापासून कधींच मुक्त होणार नाहीं. कोठला हा बंध ? आणि तो आकाशाप्रमाणें निर्मल चिदात्म्याला व्हावा तरी कसा ? स्वात्मरूप आदर्शांत भासमान होणाऱ्या प्रतिबिंबात्मक दृश्य पदार्थांनींहि जर आत्म्याला बंध लागत असेल, तर दर्पणांत उमटलेलें अग्नीचें प्रतिबिंबहि एखादा पदार्थ जाळील, नेम काय! बंध हा खरोखरीचा आहे हें एक, आणि मन म्हणून एक पदार्थ आहे हें दुसरें; या जोडीशिवाय कोणताच कोणाला कोठें बंध नाहीं. सयुक्तिक विचाराच्या योगानें हा सर्व मळ जर धुवून काढला नाहीं, तर संसाराचा नाश करण्याच्या कामीं मी काय किंवा प्रत्यक्ष ब्रम्हदेव, विष्णु, शंकर काय, किंवा मूर्तिमंत विद्यादेवी त्रिपुरा काय, कोणी झाले तरी कसे समर्थ होणार ? म्हणून परशुरामा! या दोहोंचाहि तूं त्याग कर. असो; तर सारांश काय कीं, निर्विकल्प-अवस्थेंतहि मन हें शेष राहतें, असें म्हटलें तरी तें आत्ममात्र असल्यामुळें द्वैत हें सिद्ध होत नाहीं. ‘ हें अमुक ’ असें भासण्यापलीकडे निराळें मन नाहीं. त्यामुळें ‘ हें अमुक ’ इत्यादि विकल्पांचा त्याग केल्यावर केवळ भावरूप आत्माच अवशिष्ट राहतो.

( ३ ) आतां रज्जूवर सर्पाभास करणारी व्यवहारांतील भ्रांति ती सत्य म्हटलेल्या वस्तूवर होत असते. म्हणून येथें सर्पाचा

बाध झाला तरी रज्जूचा बाध होत नाहीं. त्यामुळें भ्रांति तरी सत्य राहते. परंतु समज कीं, हाच प्रकार स्वप्नामध्यें घडून आला; तर तेथील रज्जु सुद्धां स्वप्नोत्तरकालीं अन्य सर्व पदार्थांप्रमाणें बाधित होणार असते. यामुळें ती भ्रांति सुद्धां सत्य आहे असें म्हणतां येत नाहीं. कारण मग तें भ्रांतीचें ज्ञान तरी कोणाच्या आश्रयावर राहणार? तस्मात् दृश्याचें परिमार्जन झाल्यानंतर त्याचें ज्ञान हें केवळ दृक्स्वरूप असल्यामुळें चित्स्वाहून वेगळें नसतें. मग त्यायोगें द्वैत कसें सिद्ध होणार? आतां प्रत्यक्ष व्यवहार होतो यासंबंधानें तूं म्हणशील, तर तो स्वप्नस्थितींतहि अगदीं हुबेहूब आढळतो. तशीच ती अवस्था स्वप्नापुरती स्थिरच असते, हाहि सर्वांचा अनुभव आहे. त्यामुळें स्वप्नाला मिथ्या म्हणून जागृति सत्य म्हणण्याचें कारण तें काय? कांहींच नाहीं. स्वप्न व जागृति यांत भेद इतकाच कीं, जागृतीमध्यें स्वप्न हें मिथ्या आहे असा निश्चय होतो, तसा स्वप्नांत जागृति मिथ्या हा निश्चय होत नाहीं. पण एवढ्यावरूनच जागृतींतील व्यवहारांचा खरेपणा सिद्ध होत नाहीं. जागृतींतील वस्तु स्थिर व कार्यकारी आढळतात, तशाच त्या स्वप्नांत स्थिर व कार्यकारी आढळत नाहींत काय? जागृतींतील भाव स्वप्नांत येत नाहींत; व स्वप्नांतले जागृतींत येत नाहींत; परंतु दोन्हीहि आपापल्या काळीं सारखेच स्थिर व सारखेच कार्यकारी असतात यांत संशय नाहीं. परशुरामा, जागृदवस्थेंतील पूर्वीं घडलेल्या गोष्टी व स्वप्न यांमध्यें काय भेद आहे, हें सूक्ष्म विचारानें पहा बरें? सर्व भूतकालीन गोष्टी स्वप्नाप्रमाणेंच भासतात. तसेंच जागृतीसारखीच स्थिरता व व्यवहार-

क्षमता आपल्या अवस्थेपुरती ऐंद्रजालिक प्रकारांतहि असते. मग ते-वढ्यावरून तें सत्य म्हणतां येईल काय ? या सामान्य लोकांना सत्य व असत्य यांचें स्वरूपच बरोबर कळत नाहीं. म्हणूनच ते भ्रांत होतात व जगाला सत्य म्हणतात. परंतु ज्याला केव्हांहि अभावाचा स्पर्श होत नाहीं त्यालाच सत्य म्हणावयाचें असतें. व्यवहारांत तरी तूं ज्याला खोटें म्हणतोस त्याचें स्वरूप काय असतें ? तें एका क्षणीं भासतें व पुनः उत्तरक्षणीं पाहूं जातां तें तसें नसतें. मग याच तुझ्या व्याख्येप्रमाणें हें जग खोटें कसें ठरत नाहीं सांग पाहूं ? सर्वच जगताचा कालानें अभाव होतो; आणि भान होणार नाहीं तेव्हां अभाव म्हणतां येतो. याप्रमाणें पाहतां चैतन्याचें अभान कधींच होत नाहीं- परंतु सर्व जगत्पदार्थ हे असे आहेत कीं, त्यांपैकीं एक भासमान होतो तो राहील तेव्हां दुसरा भासमान होतो. कारण ते अनेक आहेत. त्यामुळें क्रमानें त्या सर्वांचें अभान होतें. तसें या चितीचें अभान केव्हां व कुठें होतें तें विचार करून सांग पाहूं ? जेव्हां चिद्रूप भासत नाहीं, तेव्हां—तें ' तेव्हां ' च कसें भासणार तें सांग ? आणि ' भासणार नाहीं ' हें तरी चैतन्यावांचून कसें अनुभवास येणार ? पण तो ' तेव्हां ' चा काळ, व ' भासणार नाहीं ' ही त्याची अवस्था या दोहोंचेंहि अभान झालें, तरी चैतन्य भासत असतेंच; त्या अर्थीं तें चिद्रूपच एक सत्य आहे. परशुरामा, तुला आतां सत्य व असत्य यांतील भेद थोडक्यांत सांगतों पहा. " अन्याच्या साह्यावांचून, केवळ स्वतःच भासमान होतें तें सत्य; व तसें होत नाहीं तें असत्य " ही व्याख्या निर्दोष आहे. ही सोडून जर दुसरी—म्हणजे

'जें बाधित होणार नाहीं तें सत्य व होईल तें असत्य' अशी व्याख्या केली, तर ती योग्य नाहीं. कारण तिला अपवाद आढळतात. पहा कीं, रज्जूवर भासलेल्या सर्पाला बाधित करणारें ज्ञान जर प्रसंगीं उत्पन्न झालें नाहीं, तर तेथें त्या भासमान होणाऱ्या सर्पालाहि तुझ्या व्याख्येनें सत्यता येईल! बाध होणें म्हणजे पदार्थ नाहीं असा प्रत्यय येणें. पण तसा प्रत्यय तर एखादा पदार्थ असूनहि भ्रमानें कित्येकदां येतो. तसेंच पदार्थ मुळींच नसतांहि त्याच्या अस्तित्वाचा अनुभव येतो, असेंहि आढळतें. परन्तु पहिल्या व्याख्येवर असा कांहीं आक्षेप येत नाहीं. चैतन्य नाहीं, तर दुसरें कांहींच नाहीं.—'कांहींच नाहीं' हें सुद्धां नाहीं. तेव्हां हें चैतन्य नाहींच असें जर कोणी तर्कटी मूर्ख ह्मणेल, तर तो स्वतः 'मी नाहीं' असेंच म्हणतोसें होईल. मग तो शास्त्रकार झाला तरी काय? आणि, आत्मा भासमान होत नाहीं म्हणून त्याच्या अस्तित्वाविषयीं ज्याला संशय आहे, तो उत्कृष्ट तार्किक कोट्या लढवून त्यायोगें जर दुसऱ्यांचा मोह नष्ट करील, तर ही शिलासुद्धां तें काम करील असें म्हटलें पाहिजे. तस्मात् खऱ्याप्रमाणें क्रिया होतांना भासली तरी तेवढ्यानें तीस खरेपणा येत नाहीं. आतां, हे सर्व जाणण्याचे प्रकार भ्रांतिरूपच आहेत यांत शंका नाहीं. परंतु त्याच भ्रांतीला सत्य समजणें ही दुसरीच एक महाभ्रांति होय. आणि परशुरामा! मी याच भ्रांतीसंबंधीं वारंवार बोलत आहें. नेहमीं पदार्थांची असत्यता ठरेपर्यंत अशीच भ्रांति असते. हा सर्व दृश्याचा भास सध्यां खरासा होऊन बसला आहे. परंतु रुप्याचा भास हा शिंपीचें ज्ञान

झाल्यानंतर जसा भ्रमात्मक ठरतो, त्याप्रमाणें चैतन्यात्म्याचें ज्ञान होतांच हें सर्व ज्ञान म्हणजे भ्रम आहे, असें उघड होतें. आतां आकाशाच्या ठिकाणीं जसा निळेपणाचा भ्रम सर्वांना सारखा झालेला आढळतो, त्याप्रमाणें सर्वांना त्यांच्या दोषसाम्यामुळें हा जगद्भ्रम एकसारखाच भासत आहे. यांत असंभाव्य तें काय आहे, चिदात्मरूपानें असणारें शुद्ध विज्ञान ही मात्र अभ्रांति म्हणजे सत्य स्थिति आहे.

परशुरामा! तूं विचारलेंस तें याप्रमाणें सयुक्तिकपणें येथवर तुला सांगितलें. आतां तूं सर्व संशयांचा त्याग करून सांगितल्याप्रमाणें पूर्ण निश्चय कर. यापुढें, मुक्त झाल्यावर व्यवहार कसा संभवतो, म्हणून तूं जें पूर्वीं विचारिलें आहेस, तेवढें तुला सांगतों, सावधान होऊन ऐक. मुक्त झालेले ज्ञानी पुरुष उत्तम, मध्यम, कनिष्ठ असे तीन प्रकारचे असतात. जे स्वस्वरूप जाणत असतात, परंतु प्रारब्धवशात् प्राप्त होणाऱ्या सुखदुःखादि भोगांनीं क्षणोक्षणीं कष्टी होतात, ते मंद ज्ञानी होत. दुसरे कित्येक प्रारब्धप्राप्त सुखदुःखें भोगतात, परंतु झोंपेंत डांस चावतात त्याप्रमाणें तिकडे लक्षच ठेवीत नाहींत, ते मध्यम ज्ञानी होत. आणि जे कोट्यवधि प्रारब्धकर्मांचीं विचित्र फळें प्राप्त झालीं असतांहि अगदीं ढळत नाहींत, संकटांची परंपरा लागली तरी उद्विग्न होत नाहींत,—आश्चर्यानें विस्मित होत नाहींत, आणि महासुख प्राप्त झालें तरी हर्षयुक्त होत नाहींत व आंतून शांत असून बाहेरून इतरांप्रमाणेंच व्यवहार चालवितात, ते या सर्वांत उत्तम ज्ञानी होत. याप्रमाणें बुद्धिभेदानें,

ज्ञानाच्या परिपाकाच्या अधिकउणेपणामुळें व प्रारब्धवैचित्र्यामुळें ज्ञान्यांचे व्यवहार निरनिराळ्या तऱ्हेचे होतात. परंतु परशुरामा, त्यांजकडून व्यवहार संभवतो, नाहीं असें नाहीं.

---

## प्रकरण १९ वें,

# विचित्र ज्ञानी.

अत्र बुद्धिविभेदेन वासनातारतम्यतः ।

साधनानां हि वैचित्र्याद्विचित्रा ज्ञानिनां स्थितिः ॥ ६४

वरीलप्रमाणें आपल्या शंकांचें समाधान दत्तात्रेयांच्या तोंडून ऐकून घेऊन परशुरामानें मुक्तांच्या व्यवहारासंबंधीं पुनः प्रश्न केला. तो म्हणाला, "भगवन्! बुद्धिभेदानें ज्ञानाची परिपक्वता अधिकउणी होते, ही गोष्ट मला कांहींशी विस्तारून सांगा. आत्मस्वरूपाचें भान होणें हें ज्ञान, तें तर एकाच प्रकारचें आहे. व मोक्ष तद्रूपच असल्यामुळें तेंच संपादन करावयाचें असतें. तर बुद्धिभेदानें ज्ञानाच्या परिपक्वपणांत फरक कां पडावा? मग ज्ञानाच्या साधनांत भेद आहे किंवा काय? एवढें समजावून द्या."

तेव्हां दयाळू दत्तात्रेयांनीं तत्काळ हेंच अधिक विस्तारानें सांगण्यास आरंभ केला. ते म्हणाले, परशुरामा! ऐक, मीं हें सर्व रहस्य तुला सांगतों. साधनांत कोणाच्याच फरक नाहीं. यासंबंधीं निरनिराळीं साधनें नाहींतच. परंतु साधनाच्या कमजास्तीपणामुळें फलाच्या प्राप्तींत फरक पडतो;—वेगळेपणामुळें नाहीं. साधन पूर्णावस्थेस पोंचलें ह्मणजे ज्ञान अगदीं अनायासें परिपक्व होतें. पण तें अपूर्ण असलें, ह्मणजे जसजसें तें अपूर्ण असतें, तसतसे त्याच्या पूर्णतेस अभ्यासहि जास्त पडतात. खरोखर पाहतां ज्ञानाच्या प्राप्तीसंबंधीं साधनांचा कांहींच उपयोग नाहीं. ज्ञान हें कधींच साध्य

असत नाहीं. तें स्वभावतः सिद्धच आहे. चैतन्य म्हणजेच ज्ञान; आणि तें तर सदोदित स्वप्रकाशच आहे. मग ज्याचें नित्य भान होत आहे, त्याला उपाय करण्याची जरूरी काय? पण तें हजारों वासनांच्या चिखलांत बुडून गेलें असल्यामुळें कोणास ओळखूं येत नाहीं. म्हणून मनाचा निरोध करणें हेंच कोणी एक जल, त्या जलानें तो वासनांचा मळ धुऊन काढण्याठीं मात्र साधन करावें लागतें. चित्तरूपी करंडा पुष्कळ दिवसांपासून तोंड बंद करून ठेव-लेला आहे. म्हणून प्रयत्न, करून विचाररूपी तीव्र यंत्रानें तो फार जपून उघडावा लागतो. मग तो उघडल्यानंतर, नित्य भासमान होणारें चैतन्य, करंडयांतील रत्नादिकांप्रमाणें प्राप्त होतें. म्हणून परशुरामा! चित्तांत पसरलेल्या वासनांचें निरसन करण्याकरितां साधन ठेविलें आहे. वासनांच्या अधिक-उणेपणामुळें बुद्धीची शुद्धता अधिक-उणी असते. ज्याचा जेवढा वासनामल बुद्धीला आच्छादित करीत असेल, तेवढ्या मानानें त्याला साधनांची अपेक्षा असते. परशुरामा, या वासना नाना तऱ्हेच्या आहेत. त्यांतील मुख्य तेवढ्या तुला सांगतों, ऐक. पहिली अपराधवासना, दुसरी कर्मवासना आणि तिसरी काम-वासना, असे त्यांचे मुख्यतः तीन प्रकार आहेत. वेदादिकांवर अश्रद्धा हा मुख्य अपराध, तोच आत्मविनाशी आहे. आणि विप-रीत ग्रह हा पुरुषांचा दुसरा एक अपराध. बहुधा अनेक कलांमधील कुशल पुरुष या एका अपराधामुळें संतांचा सहवास व शास्त्रांचें ज्ञान यांचा योग येऊनही त्या परम श्रेष्ठ स्थळीं प्राप्त होत नाहींत! 'सर्व विशेषरहित असें हें परम तत्व मुळींच नाहीं, व तसें तें संभवतहि

नाहीं. निदान, तें असलें तरी कोणालाहि केव्हांहि तें जाणतां येणें शक्य नाहीं.' अशा प्रकारच्या त्यांच्या भलत्याच समजुती झालेल्या असतात. एवढेंच नव्हे तर–तें तत्त्व जाणतां आलें तरीहि 'हें परम तत्त्व नव्हेच! हें समजून मोक्ष कसा मिळणार?' इत्यादि संशय ते पुनः घेतच असतात. हा जो अश्रद्धानामक अपराध, हीच मुख्य आड येणारी वासना. शास्त्रविद्येंत कुशल असे शेंकडों, हजारों पुरुष हिच्या तडाक्यांत सांपडून जन्ममरणांत वाहत चालले आहेत! याशिवाय, कांहींजणांच्या बुद्धीवर पूर्वीच्या दुष्कृतजन्म संस्कारांनीं मालिन्य आलें असल्यामुळें तें तत्त्वोपदेशाचे वेळीं त्यांचा घात करतें. म्हणजे गुरूंनीं पुष्कळ युक्तियुक्तीनें समजावून दिलें तरी त्यांना त्याचें आकलनच करितां येत नाहीं. ती कर्मवासना होय. ती वासना मनाना निरोध करूनहि जिंकावयाला कठिण आहे. यापुढें काम. काम म्हणजे कर्तव्यशेष;–'माझें हें कर्तव्य आहे, तें कर्तव्य आहे' इत्यादि दृढ भावना. याच्या पुष्कळ शाखा असून त्यांचा विस्तारहि अनंत आहे. परशुरामा! समुद्रावरील लाटांची गणना कोणी करील काय? किंवा पृथ्वींतील कणांची किंवा आकाशांतील नक्षत्रांची गणना कोणाला करतां येईल काय? त्याप्रमाणें कोणाएकाच्याहि या कामांची संख्या ठरविणें अशक्य आहे! तर परशुरामा, तुला सांगितलेली ही तिसरी कामवासना होय. ही आकाशापेक्षांहि विस्तीर्ण व पर्वतापेक्षांहि दृढ आहे. या कामवासनेलाच आशापिशाचिका म्हणतात. तिच्या योगानेंच हे सर्व लोक भ्रमिष्टासारखे झाले असून दुःखाग्नीनें होरपळून ओरडत आहेत. कांहीं थोडे धन्य महात्मे मात्र एका महा-

मंत्राचे योगानें—वैराग्यबळानें—या पिशाचीपासून सुटून सर्वांगशीतल झालेले आढळून येतात. परशुरामा ! या तीन प्रकारच्या वासनांनीं मन भरून गेल्यामुळें तें चित्तत्व भासमान होत नाहीं. म्हणून वासनानाश हेंच सर्व साधनाचें फळ आहे. त्यामध्यें पहिली अपराधवासना विचारपूर्वक निश्चय केल्यानें निवृत्त होते. दुसरी कर्मवासना एक जन्मांत किंवा कदाचित् अनेक जन्मांनीं, जेव्हां परमेश्वराची कृपा होईल तेव्हां निवृत्त होते; त्याला दुसरे शेकडों उपाय व्यर्थ आहेत. तिसरी कामवासना वैराग्यादि साधनांनीं निवृत्त होते. हें वैराग्य, विषयांच्या ठिकाणीं दोषदृष्टि ठेवल्यावांचून प्राप्त होत नाहीं. या कामवासना जशा थोड्या-फार असतील तशी दोषदृष्टि कमीअधिक ठेवावी लागते. पण या सर्वांला मुख्य कारण ह्मणजे मुमुक्षुता. तिच्यावांचून केलेल्या श्रवणमननाचा खरा फायदा न होतां फक्त वक्तृत्वाची कला अंगीं येते. असल्या वक्तृत्वात्मक ज्ञानाच्या योगानें परमपद प्राप्त होत नाहीं. खरी मुमुक्षा नसतांना जो पुष्कळ विचार केला असेल, किंवा जें श्रवणादिक केलें असेल तें सर्व प्रेताला घातलेल्या अलंकाराप्रमाणें अगदीं व्यर्थ होतें. तशीच मंद मुमुक्षाहि व्यर्थ आहे. सामान्यतः आपले हातून पुण्य घडावें, एवढी इच्छा कांहीं उपयोगाची नाहीं. पुण्याच्या लालसेनें होणारें कर्म मोक्षाचें फळ देऊं शकत नाहीं. ही सुखाची इच्छा कोणत्या जीवाला नाहीं ? सर्वांनाच आहे. तेव्हां असल्या मुमुक्षेचाहि उपयोग काय ? मुमुक्षा तीव्र पाहिजे. तरच लवकर मोक्षफळ प्राप्त होईल. अशी जी तीव्र मुमुक्षा ती एकटीच सर्व साधनसमुदायांत पुरेशी आहे. कारण तीच पुरुषाला सर्व

साधनांमध्यें प्रवृत्त करते. या प्रवृत्तीलाच तत्परता म्हणतात. सर्वांग होरपळून गेलेला पुरुष जसा एका शांतीवांचून दुसऱ्या कशाची अपेक्षा करीत नाहीं, त्याप्रमाणें जेव्हां संसारांतून मुक्त होण्याशिवाय दुसरें कांहींहि अगदीं सुचेनासें होईल, तेव्हां ती उत्कट मुमुक्षा फल देण्याला समर्थ होईल. ही स्थिति, मोक्षावांचून दुसऱ्या सर्व प्राप्तव्यांच्या ठिकाणीं दोषदृष्टि केल्यानें प्राप्त होते. तीव्र वैराग्यादिकांच्या योगानें ही मुमुक्षा क्रमानें तीव्र होत जाते. विषयांवरील प्रीति नष्ट करणारें वैराग्य दोषदृष्टीनें उत्पन्न होतें; व या वैराग्याच्या योगानें, पुरुषाला अत्यंत तत्पर करणारी तीव्र मुमुक्षा उत्पन्न होते. साधनांकडे अत्यंत तीव्रतेनें प्रवृत्ति होणें याचें नांव तत्परता. परशुरामा, अशा तीव्र प्रवृत्तीमुळेंच मोठें अद्भुत फल प्राप्त होतें.

असें भाषण ऐकून परशुरामाचें मन पुनः संशयांत पडलें. म्हणून त्यानें प्रश्न केला कीं, "भगवन्! सत्संग हें मोक्षाचें मुख्य साधन म्हणून आपण पूर्वीं सांगितलें. आणि आतां पुनः ईश्वराचा अनुग्रह पाहिजे ह्मणतां; आणि दोषदृष्टिहि करण्यास सांगतां! तर या तीन आदिकारणांत मुख्य कोणतें? आणि तें प्राप्त कसें होतें? आपोआप कांहींच होणार नाहीं, हें तर निश्चित आहे. म्हणून हें मला विस्तारपूर्वक सांगा."

तेव्हां दयाळू श्रीगुरु दत्तात्रेय म्हणाले,—परशुरामा! मोक्षाचें मुख्य साधन सांगतों ऐक. जी परम चिद्देवता तीच आपल्या सामर्थ्यानें आपल्या स्वरूपावर दर्पण-प्रतिबिंबाप्रमाणें जगद्रूप चित्र भासमान करिते. त्याच परा देवीनें हिरण्यगर्भनामक देह धारण करून,

अनादि अविद्येनें मलिन झालेल्या जीवांच्या कल्याणासाठीं, सव मनोरथांची पूर्तता करणारा वेदरूप ज्ञानसागर प्रगट केला. जीवांच्या ठिकाणीं स्वभावतःच विचित्र इच्छा व वासना असतात, त्यांचें हित कशानें होईल असा विचार करून निरनिराळीं फळें देणारीं काम्यकर्मे त्यानें निर्माण केलीं. प्रत्येक जीव चांगलें वाईट कांहीं तरी कर्म स्वभावतःच करीत असतो. तो पुढें, कांहीं कर्म फळास येऊन, नाना योनींमधून फिरतां फिरतां मनुष्यजन्मास प्राप्त होतो. नंतर वासनांना वश होऊन तो काम्य कर्मांकडे वळतो. मग तीच कामना पूर्णपणें सफल होण्याच्या इच्छेनें ईश्वरसंबंधीं शास्त्रें अवलोकन करितो. काम्यकर्मांचीं फळें ऐकून तो त्या कर्मांकडे प्रवृत्त झाला असतां क्वचित् एखाद्या सूक्ष्म दोषामुळें फळाच्या प्राप्तीस अंतरतो. असा आघात झाल्यावर. काय करावें हें समजून घेण्यासाठीं एखाद्या सत्पुरुषाची संगति करितो. तेथें प्रसंगवशात् परमेश्वराचें माहात्म्य कानावर पडून, प्राक्पुण्य उदयास आल्यामुळें त्यावर परमेश्वराचा प्रसाद होतो. तेव्हां त्याची मोक्ष मिळविण्याकडे प्रवृत्ति होते. सारांश, पूर्वपुण्यबळानें सत्संगति प्राप्त करून घेऊन त्यायोगें पुरुष अत्यंत दुर्मिळ अशी मोक्षमार्गाची सोपानपंक्ति संपादन करितो. म्हणून मोक्षप्राप्तीला सत्संगच मूळ आहे, असें ठरतें. कधींकधीं उत्कृष्ट पुण्यबळानें किंवा उत्कट तपश्चर्या घडल्यामुळेंहि, अकस्मात् आकाशांतून फळ पडावें त्याप्रमाणें ज्ञानाची प्राप्ति झालेली आढळते.

परशुरामा! अशा भिन्न भिन्न कारणांनीं होणारी ज्ञानप्राप्ति, अर्थातच भिन्न भिन्न असते. तसेंच अधिक उणी बुद्धि, कमी जास्त

वासना आणि थोडें फार साधन यांच्यामुळेंहि ज्ञान्यांची स्थिति निर- निराळी होते. ज्याच्या बुद्धीवर वासनांचें पुट स्वभावतःच विरळ असतें, त्याला थोड्याशा साधनानेंच पूर्ण ज्ञान प्राप्त होतें. ज्याची अशी शुद्ध वासना स्वभावतः नसते, त्याला ज्ञान पूर्णपणें प्राप्त होण्या- साठीं पुष्कळ काळपर्यंत साधन चालवावें लागतें; आणि ज्याचें मन स्वभावतः वासनांनीं अगदीं घनदाट भरलेलें असतें, त्याला ज्ञान झालें तरी तें झांकून गेल्यासारखेंच होतें. मग त्यानेंहि पुढें साधन चालविलें तर कालानें त्याचें तें ज्ञान परिपक्व होतें. असा प्रकार असल्यामुळें ज्ञान्यांची स्थिति निरनिराळी आढळते. परशुरामा, चित्ताच्या परिपक्व अवस्थेंत भेद असल्यामुळें स्थितींत भेद होतो. बुद्धीवर वासनांचें आवरण कमजास्त असेल त्याप्रमाणें ज्ञान भिन्न होत असल्यामुळें स्थिति बदलते. ज्ञान्यांच्या अवस्थेंत परस्पर भेद कसा होतो पहाः— ब्रह्मदेव, विष्णु व शंकर हे जन्मतःच ज्ञानी आहेत; पण त्यांच्या स्वभावप्रभव गुणांनीं त्यांचीं कार्यें निरानिराळीं. पण त्यांच्या ज्ञानांत मलिनता आहे, असें म्हणतां येणें मुळींच शक्य नाहीं. प्रकृतीच्या गुणांचेंच स्वरूप निरनिराळें आहे. ज्ञान्याचें शरीर जसें काळ्याचें गोरें होऊं शकत नाहीं, त्याप्रमाणें त्याच्या चित्ताचा धर्म हाहि पाल- टत नाहीं. परशुरामा! आमच्याकडेच पहा. आम्ही अत्रिऋषीचे तिघे मुलगे; पण दुर्वास निराळा, चंद्र निराळा आणि मी निराळा. पहिला क्रोधानें सदोदित भरलेला, तर दुसरा नेहमीं विलासांत दंग, आणि तिसरा मी असा सर्वसंगपरित्यागी. आणखी पहा कीं, वसिष्ठ अतिशय कर्मनिष्ठ, सनकादिक संन्यासी व नारद भक्तिप्रेमानें ओथंबलेला!

शुक्राचार्य हा कवि आणि दैत्यांच्या संरक्षणाची काळजी वाहणारा. गुरु देवपक्षाचा; व्यास वादांत कुशल आणि सारखा शास्त्रें तयार करण्यांत दंग; जनक राज्य करीत आहे आणि जडभरत तर लंगोटी घालून पडला आहे! असे दुसरेहि कित्येक ज्ञानी पुरुष स्वभाववशात् निरनिराळ्या स्थितींत राहात आहेत. आतां याचें गूढ रहस्य तुला सांगतों; ऐक. पूर्वीं ज्या तीन प्रकारच्या वासना सांगितल्या, त्यांतील दुसरी जी कर्मवासना,–बुद्धिमांद्य हें जिचें लक्षण,–ती सर्वांत बलवत्तर आहे. तिचा ज्यांना लेशमात्रहि स्पर्श नाहीं, ते खरे बुद्धिमान्. त्यांची अपराध-वासनाहि मग सहज नाश पावते. अशांच्या कामवासना अभ्यास करून नष्ट केलेल्या नसल्या, तरी परशुरामा! त्या त्यांच्या ज्ञानाला प्रतिबंध करीत नाहींत. म्हणून त्यांना वैराग्यादिकांचा फारसा उपयोग नसतो. तसेंच त्यांना मनन, ध्यान किंवा समाधि यांचीहि फारशी आवश्यकता लागत नाहीं. त्यांनीं एकवार तत्त्वाचें श्रवण केलें म्हणजे लागलीच त्याचें मनन, निदिध्यास होऊन तें पद त्यांस ज्ञात होऊन त्यांचे सर्व संशय नष्ट होतात. मग ते जनकादिकांप्रमाणें जीवन्मुक्त होऊन राहतात. त्यांची बुद्धि सूक्ष्म आणि निर्मल असल्या-मुळें त्यांना कामादि वासनांचा नाश करण्यासाठीं त्यांच्या उलट अभ्यास करावा लागत नाहीं. त्या वासना त्यांच्या ज्ञानाला प्रतिबंध करूं शकत नसल्यामुळें त्यांनीं त्या पूर्ण निवृत्त केलेल्या नसतात. त्यामुळें त्यांनीं तें परम पद ज्ञात करून घेतल्यावरहि त्यांच्या त्या पूर्वींच्या विद्यमान् वासना पूर्वींप्रमाणेंच निरंतर प्रवृत्त होत राहतात. परंतु त्यांयोगें त्यांची शुद्ध बुद्धि थोडीसुद्धां मलिन किंवा लिप्त होत

नाहीं. अशा ज्ञानी पुरुषांना 'बहुमानस' असें नांव आहे. पण ज्यांचें चित्त कर्मवासनांनीं अत्यंत मूढ झालें आहे, त्यांना या परम पदाचें ज्ञान प्रत्यक्ष महादेवानें उपदेश केल्यानेंहि होत नाहीं. तसेंच ज्यांची अपराध-वासना दृढ असते, त्यांनाहि ज्ञान प्राप्त होत नाहीं. परंतु ज्यांची अपराधवासना आणि कर्मवासना या दोन्ही अल्प असून कामादिवासना दीर्घ आहे, त्यांना पुष्कळ वेळां श्रवण करून, पुष्कळ मनन करून, समाधीचा अभ्यास केल्यावर पुष्कळ कष्ट सोसून कालांतरानें ज्ञान उत्पन्न होतें. अशांचा अभ्यास पुष्कळ दीर्घ काळाचा असल्यामुळें त्यांचा व्यवहार फार थोडा होतो. त्यांचें मन, वासनाक्षयामुळें नष्ट झाल्यासारखेंच असतें. असे ज्ञानी पुरुष मध्यम ज्ञान्यांत येतात व त्यांना 'नष्टमानस' असें नांव आहे. आतां त्यांच्याचपैकीं कित्येकांचा अभ्यास इतका परिपक्व झालेला नसतो. त्यामुळें वासनांचा अंश राहून, मन नष्ट झालेलें नसतें. ते मंदज्ञानी असून त्यांना 'समनस्क' असें म्हणतात. हे केवळ ज्ञानी होत व पहिले दोघे ज्ञानी आणि जीवन्मुक्त होत. केवळ ज्ञानी असतात ते प्राप्त झालेलीं दुःखें भोगतात व नित्य प्रारब्धाधीन राहतात. त्यांना देहान्तीं मोक्ष प्राप्त होतो. जे नष्टमानस म्हणून सांगितले त्यांनीं प्रारब्ध जिंकलेलें असतें. परशुरामा! जीवांच्या मनोरूप भूमीवर प्रारब्धाच्या बीजापासून भोगरूप अंकुर उत्पन्न होतात. परन्तु त्या नष्टमानस पुरुषांना ही मनोभूमिच नसल्यामुळें कुसळाच्या बीजाप्रमाणें त्यांच्या प्रारब्धाची सर्व शक्ति संपून तें नाश पावतें. आतां राहिले बहुमानस. तर जसा एखाद

अतिबुद्धिमान पुरुष एकदम दहा पांच कार्यें अगदीं कोठेंच न अडतां करीत असतो, आणि असे कर्मकुशल पुरुष वारंवार आढळण्यांतहि येतात, तसाच या ज्ञान्यांचा प्रकार आहे. साधारण मनुष्यहि एकीकडे वाट चालत असतो, एकीकडे बोलत असतो व हातानें कांहीं क्रियाहि करीत असतो, हें तर नेहमीं दिसतें. मन एकच असून जशा या तीन क्रिया होत असतात, त्याप्रमाणें हे उत्तम ज्ञानी स्वरूपानुसंधानापासून न चळतां व्यवहारांत निर्भयपणें वागत असतात. पुष्कळ विद्यार्थी अध्ययन करीत असतांना त्यांमध्यें कोण अशुद्ध म्हणतो, कोण उच्चारच करीत नाहीं, व कोणाचें म्हणणें व्यवस्थित आहे हें सर्व एकच शिक्षक एकदम पहात असतो, हें सर्वांच्या अनुभवाचेंच आहे. अथवा, परशुरामा! तूं मारलेला तुझा शत्रु सहस्रार्जुन, त्याला हजार हात होते. तो त्या हातांनीं अनेक आयुधें धारण करून मुळींच न चुकता तुजशीं कसा लढला, हें तूं पाहिलेंच आहेस. तर असें व्यवहारी पुरुषांचेंहि मन जसें बहुविध होऊन क्रमानें येणारीं अनेक कार्यें करीत असतें, त्याप्रमाणेंच या उत्तम ज्ञान्यांची स्थिति आहे. त्यांचें आत्माकार झालेलें मन बाह्य विषयांच्या आकारानें परिणाम पावलें तरी त्यांच्या स्वस्थितीस कांहीं विरोध येत नाहीं. म्हणून ते बहुमानस म्हटले जातात. त्यांचें प्रारब्ध त्यांच्या मनोभूमीवर अंकुरास येऊं लागतें तोंच ज्ञानाग्नीनें जळून जातें. पुनः अंकुरास आलें कीं पुन्हां दग्ध होतें. प्रारब्धबीजाचा अंकुर म्हणजे सुखदुःखांचा समागम; व त्यांसंबंधीं विचार चालू होणें हें त्याचें फळ होय. पण अंकुर दग्ध झाल्यावर फळ येणार कोठून? म्हणून अशा

304

ज्ञान्यांचा व्यवहार चालतो तो दृढ परिचित अशा अनुसंधानानें किंवा संस्कारप्राबल्यानें चालतो. ज्याप्रमाणें, एखादा प्रौढ माणूस मुलांशीं खेळताना आढळतो;—मग तो एखाद्या क्षुद्र निमित्तानें आनंदित होतो, व पुन्हा एखादी बाहुली नष्ट झाली असतां अतिशय खिन्न होतो, त्याप्रमाणेंच हे बहुमानस ज्ञानी पुरुष व्यवहारांत वागतांना आनंद व खेद करीत असतात. दुसऱ्या कोणाचें कार्य आपण करीत असतां त्यांत होणारे हर्ष आणि खेद हे जसे बाह्याकारीं होत असतात, अंतःकरणापासून नसतात, तशाच प्रकारचा या ज्ञान्यांचा व्यवहार असल्यामुळें त्यांच्या हृदयांत सर्वदा स्वस्थता असते. या बुद्धिमान ज्ञानी पुरुषांनीं वासनांचा नाश करण्यासाटीं तद्विरुद्ध भावनांचा अभ्यास किंवा मनाचा निरोध इत्यादिक कांहीं फारसें केलेलें नसतें. त्यामुळें त्या वासना तशाच ज्ञानोत्तरहि प्रकट होऊं लागतात. त्यामुळेंच कोणी कर्मनिष्ठ, कोणी कामी तर कोणी क्रोधी, असे उत्तम ज्ञानी अनेक तऱ्हेचें आचरण करीत असतात. यांमध्यें समनस्क म्हणून जो मंद ज्ञानी सांगितला, त्याचा सुद्धां, 'अखिल दृश्यजात असत्य आहे.' असा निश्चय झालेला असतोच व समाधींत किंवा स्वरूपानुसंधानांत असतांना त्याला दुसरें कांहीं भासमानहि होत नाहीं. परंतु समाधींतून उत्थान पावल्यावर त्याचें अनुसंधान भंग पावतें. वास्तविक पाहतां स्वरूपाचें अखंड अनुसंधान असणें,—म्हणजे व्यवहारामुळें तें खंडित न होणें हाच खरा समाधि म्हटला पाहिजे. कारण, मूळ जें निर्विकल्प स्वरूप तें सर्वालाच आधार आहे. तसेंच तें सर्वांना निरंतर स्फुरतच आहे. त्याच्या-

विरहित असें काहींच नाहीं. आणि पूर्वीं सांगितलेल्या व्यवहारांतील कित्येक अवस्थांमध्यें त्याचा निर्विकल्पतेनें अनुभवहि येतो. पण तेवढ्यानें तो सर्वांचाच समाधि मोक्षदायक होत नाहीं. ज्यांना स्वरूपाचें अनुसंधान अखंड साधतें, त्यांचाच समाधि खरा म्हटला पाहिजे. व्यवहारकाळीं सुद्धां शुद्ध चिद्रूप हें वेद्य पदार्थांनीं विवर्जितच आहे, —त्यांचा त्याला स्पर्श नाहीं,—असाच—अनुभव उत्तम ज्ञान्यांना निरंतर येत असतो. आकाशाचा नीलवर्ण हा त्यावर वस्तुतः नाहीं, असें ज्ञान झाल्यानंतरहि तो डोळ्यांना दिसतच असतो. पण त्याचा असत्यपणा जाणला असल्यामुळें हृदयांतला अनुभव मात्र बदलतो; याप्रमाणें तत्व ओळखण्यापूर्वीं होणारा भास व नंतरचा भास यांमध्यें एका अंतरंगावांचून दुसरा कांहीं भेद नाहीं. यामुळें सर्व वेद्यजात असत्य ठरल्यावर त्याचा वेदनाशीं—शुद्ध चिद्रूपाशीं संबंध कोठून होणार? म्हणून उत्तम ज्ञानी पुरुषांची संवित्—चित्कला—व्यवहारकालींहि वेद्यसंबंधविरहितच असते. नष्टमानस म्हणून जे सांगितले ते सदोदित उन्मनी अवस्थेंतच राहतात. मन निःसंकल्प असणें हीच उन्मनी अवस्था. वेद्यपदार्थांचें सत्यरूपानें ग्रहण करणें हेंच मनाचें चलन किंवा संकल्प होय. उत्तम ज्ञान्याला या दोन्हीहि अवस्था एके काळींच असतात. म्हणजे बाह्यतः व्युत्थान पावलेला, व्यवहार करीत असलेला—व अंतरतः समाधींत गढलेला—असा तो नेहमींच असतो. यामुळें त्याची संवित् निरंतर संगरहितच असते.

———

## प्रकरण २० वें
# देवीचा अवतार.

एवं सर्वैरभिध्याता त्रिपुरा चिच्छरीरिणी ॥
आविरासीच्चिदाकाशरूपा शब्दात्मिका परा ॥ १९

दत्तात्रेय पुढें ह्मणाले, परशुरामा! तूं विचारलेल्या प्रश्नाचें उत्तर याप्रमाणें तुला सांगितलें. यासंबंधांत तुला आणखी एक पूर्वीचा इतिहास सांगतों, ऐक. पूर्वी सत्यलोकामध्यें, ब्रम्हदेवाच्या सभेंत एकदां ज्ञानविषयासंबंधानेंच अगदीं सूक्ष्माहून सूक्ष्म विचार निघाला होता. ब्रम्हदेवाच्या या ज्ञानसत्रामध्यें भृगु, अंगिरा, प्रचेता, नारद, तसेंच च्यवन, वामदेव, विश्वामित्र, गौतम, शुक्र, पराशर, कण्व, काश्यप, दक्ष, सुमंत, शंख, लिखित, देवल हे व दुसरे कित्येक ब्रह्मर्षि आणि थोरथोर राजर्षि एकत्र जमले होते. त्यांनीं तेथें सूक्ष्मांतला सूक्ष्म विषय काढून परस्परांत फार मोठी मीमांसा केली. त्या वेळीं ऋषींनीं ब्रम्हदेवाला असा प्रश्न केला कीं, " भगवन्! आपण हे सर्वजण ज्ञानी—परावर तत्त्व जाणलेले—आहोंत. परन्तु आम्हां सर्वांचा स्वभाव निरनिराळा असल्यामुळें आचरण निरनिराळें आढळतें. आमच्यांतील कित्येक समाधिस्थ राहतात; कित्येक मीमांसा करण्यांतच रमून जातात. दुसरे कोणी भक्तिप्रेमांत निमग्न झाले आहेत व कोणी कर्ममार्गच आस्थेनें चालवीत आहेत. शिवाय कित्येक तर एखाद्या बहिर्मुख पुरुषाप्रमाणें व्यवहार चालवीत आहेत. तर ब्रम्हदेवा! यांच्यामध्यें श्रेष्ठ कोण एवढें आपण सांगा. सध्या आम्ही

तर आपापला पक्षच श्रेष्ठ आहे, असेंच समजून आहों."

असा ऋषींनीं प्रश्न केल्यावर ब्रम्हदेवाच्या मनांत आलें कीं, यांची आपल्यावर असावी तितकी श्रद्धा दिसत नाहीं. तेव्हां तो ह्मणाला—"मुनि हो! मी सुद्धां ही गोष्ट अगदीं बरोबर अशी जाणत नाहीं. पण सर्वज्ञ महादेवाला ही पूर्णपणें कळत असेल. म्हणून हवें तर त्याला विचारण्यासाठीं चला."

याप्रमाणें भाषण करून तो त्या ऋषिमंडळीसह त्या देवदेवाकडे गेला. तों तेथेंच श्रीविष्णुहि आलेले होते. तेव्हां तो ऋषिमंडळींचा प्रश्न ब्रम्हदेवानें श्रीशंकरांना विचारला. प्रश्न ऐकून व ब्रम्हदेवाचा आशय पाहून त्यांनाहि असें वाटलें कीं, हे ऋषि श्रद्धावान् नाहींत. यामुळें आपलें भाषण यांना खरें वाटणार नाहीं. त्यांनीं असा विचार केला कीं, आपण यांना कांहीं सांगितलें तरी व्यर्थ होणार. कारण, 'आमच्याप्रमाणें हें एक शंकराचें मत आहे' एवढेंच यांना वाटेल, दुसरें काय? असा विचार करून महादेव म्हणाले—"मुनि हो! मी सुद्धा हें चांगलेंसें जाणत नाहीं. यासाठीं भगवती श्रीविद्यादेवीचें आपण ध्यान करूं. ह्मणजे तिच्या प्रसादानें आपणांला हा गूढ अर्थ समजून येईल."

याप्रमाणें शंकरांचें भाषण ऐकून सर्व ऋषि व ब्रम्हविष्णुमहेश्वरादि देव यांनीं महेश्वरी चिच्छरीरी विद्यादेवीचें ध्यान आरंभिलें. तेव्हां सर्वजण ध्यानस्थ झाल्यानंतर गगनमंडळांत मेघगर्जनेसारखा एक गंभीर गडगडाट होऊन ती चिद्देवता आकाशांत शब्दरूपानें प्रगट झाली. "मुनि हो! तुम्हीं माझें ध्यान कां बरें केलें? तो तुमचा

मनोरथ मला सांगा. माझ्या भक्तांतून कोणाच्याहि इच्छा कधींहि विफल होत नाहींत." याप्रमाणें आकाशवाणी झालेली ऐकून सर्व मुनिमंडळींनीं त्या विद्यादेवीला नमस्कार केले. त्यानंतर तिन्ही देवांनीं निरनिराळ्या प्रकारें तिचा स्तव करून तिला संतुष्ट केलें. इतकें झाल्यावर ऋषींनीं बोलण्यास आरंभ केला. ते म्हणाले—" देवी श्रीविद्ये ! तुज त्रिपुरेश्वरीला आमचा साष्टांग नमस्कार असो. तूं सर्वांना उत्पन्न करणारी, आश्रय देणारी व विलीन करणारी आहेस, तुला नमस्कार असो. तुला जन्म नसल्यामुळें तूं सदैव पुरातन आहेस; व तुला जरा नसल्यामुळें तूं सर्वदा नूतनहि आहेस. तूं सर्व आहेस, सर्वांतील सार आहेस, सर्वज्ञ आहेस व सर्वानंदरूप आहेस ! आणि पुनः तूं सर्वशून्य, कोठेंच नसणारी, साररहित, कशालाच न जाणणारी व सर्व आनंदविवर्जित आहेस. देवी, तुला वारंवार नमस्कार असो ! पुढून, मागून, खालून, वरून, बाजूनें किं-बहुना सर्वतः तुला आमचे नमस्कार असोत. देवी ! आतां तुझें (१) पर आणि ( २ ) अपर रूप कोणतें तें आम्हांला सांग. तसेंच तुझें ( ३ ) ऐश्वर्य, ( ४ ) तुझें ज्ञान, ( ५ ) त्याचें फल व तें मिळ-ण्याचें ( ६ ) साधन काय तें सांग. आणि ( ७ ) मुख्य साधक कोण, ( ८ ) सिद्धीची पूर्णावस्था कोणती व ( ९ ) सिद्ध पुरुषांत श्रेष्ठ कोण हें सर्व हे देवी ! क्रमानें आम्हांला सांग. तुला पुनः आ-मचे अनेक नमस्कार असोत.

याप्रमाणें प्रश्न केल्यावर त्या देवीला ऋषिमंडळीसंबंधीं प्रेम उत्पन्न होऊन तिनें आपल्या असंदिग्ध व उत्कृष्ट भाषणास आरंभ

केला. ती म्हणाली, " ऋषि हो ! ऐका, तुमच्या सर्व प्रश्नांचीं उत्तरें तुम्हांला क्रमानें सांगतें. आज मी वेदसागराचें मंथन करून तुम्हांला अमृतच काढून देतें !

( १ ) प्रथमतः माझें पर रूप. तर—ज्याच्या ठिकाणीं हें सर्व जगत् दर्पणातील प्रतिबिंबाप्रमाणें उत्पन्न होतें, राहतें व लीन होतें, असें सर्वांना नेहमीं भासतें; आत्मज्ञान नसणारांना जें जगाच्या आकारानें भासमान होतें; योग्यांना जें केवल निर्विकल्प म्हणून अनुभवास येतें;—शांत गंभीर सागराप्रमाणें जें अगदीं निश्चळ भासतें; एकनिष्ठ भक्त प्रेमानें व कोणतीच कामना न ठेवतां ज्याचें नित्य सेवन करितात;—अद्वैतपदाचें ज्ञान झालें असतांहि मनाला स्वाभाविक ओढ लागून अत्यंत तत्परतेनें देव आणि भक्त असा भेदभाव ते ज्यासाठीं उत्पन्न करितात; इंद्रियें, मन, बुद्धि यांचें जें अंतःसूत्र; ज्याचें अभान झाल्यास कांहींच नाहीं; आणि शास्त्रावरून जें सामान्यतः जाणतां येतें; तीच माझी श्रेष्ठ मूर्ति, पर रूप होय.

( २ ) सर्व ब्रह्मांडांच्या पलीकडे असलेल्या अमृतसमुद्रांत जें रत्नांचें द्वीप आहे, त्यांतील एका कदंबाच्या उपवनामध्यें चिंतामणींनीं बनविलेलें एक सुमनोहर मंदिर आहे. त्यांत ब्रह्मदेव, विष्णु, रुद्र व ईश्वर या चार पायांचा, व सदाशिवात्मक पृष्ठभाग असलेला जो मंचक आहे, त्यावर विराजमान झालेली अनादि मिथुनात्मक जी त्रिपुरसुंदर मूर्ति, तें माझें अपर रूप होय. तसेंच ऋषिहो, सदाशिव, ईशान, ब्रह्मदेव, विष्णु, शंकर, गणपति, षडानन, इंद्रादि दिक्पाल, लक्ष्मी इत्यादिक शक्ति, वसुरुद्रादि गण, राक्षस, देव, नाग,

यक्ष, किंपुरुष इ० जे जे म्हणून पूजनीय आहेत ते ते सर्व माझीं अपर रूपेंच होत. अशी मी सर्वत्र असूनहि माझ्या मायेनें मोहित झालेले पुरुष मला ओळखीत नाहींत, पण ते माझीच सेवा करितात, व मीच त्यांना त्यांचें अभीष्ट देतें. मजवेगळें कोणीच पूजनीय नाहीं, आणि फलदायीहि नाहीं. जो जसें माझें सेवन करितो, त्याला तसें मजपासून फळ मिळतें.

( ३ ) माझें ऐश्वर्य अमर्याद आहे. कशाचेंहि साह्य न घेतां, एकाकी व चित्स्वरूप असतां मी अनंत जगताच्या आकारानें भासमान होतें, आणि अशी भासमान होतांनाहि अपल्या स्वरूपापासून मुळींच ढळत नाहीं! अशी दुर्घट गोष्ट घडवून आणणारें हेंच माझें महदैश्वर्य. ऋषिहो! आणखी माझें ऐश्वर्य तुम्हाला सांगतें, सूक्ष्म दृष्टीनें तुम्ही पहा. मी सर्वांना आश्रय असून व सर्वांच्या अंतर्यामीं असूनहि मी पुनः केवळ संगरहित आहें. मी नित्यमुक्त असूनहि पुनः पुनः मुक्त होतें. सद्गुरूकडे जाऊन त्याचें शिष्यत्व पत्करून पुनः आत्मस्वरूपाला जाणतें. पुनः आत्मस्वरूपाला विसरून पुष्कळ काळ संसारांत गुंतून राहतें! आणि एवढें हें जग कोणत्याहि साधनसामग्रीवांचून निर्माण करितें. असें माझें नाना तऱ्हेचें ऐश्वर्य आहे! त्याची सहस्रमुखालाहि गणना होणें शक्य नाहीं. म्हणून शेवटीं थोडक्यांत सांगतें कीं, माझ्या ऐश्वर्याच्या एका लेशानेंच ही अद्भुत जगद्यात्रा चोहोंकडे पसरली गेली आहे.

( ४ ) माझें ज्ञान द्वैत, अद्वैत इत्यादि अनेक प्रकारचें आहे. तसेंच त्याचें फळहि श्रेष्ठकनिष्ठभेदानें निरनिराळें झालें आहे. द्वैत-

ज्ञान हेंहि अनेक प्रकारचें आहे कारण तें निरनिराळ्या उपास्य-मूर्तींवर अवलंबून असतें. त्याला ध्यान किंवा उपासना असें म्हणतात. परंतु तें स्वप्नाप्रमाणें किंवा मनोराज्याप्रमाणें क्षणिक अनुभवास येणारें असतें. तेंहि त्याच्या मानानें सफळ होतेंच. तशी नियतीची योजनाच आहे. याच्या अनेक प्रकारांमध्यें पूर्वीं सांगितलेलें माझ्या अपर मूर्तीचें ध्यान हें मुख्य आहे. कारण तें क्रमाक्रमानें मुख्य फल म्हणजे मोक्ष देण्यास कारण होतें. अद्वैतज्ञानालाच मुख्यतः ज्ञान हें नांव आहे. मज परम श्रीविद्यादेवीची आराधना केल्यावांचून ही अद्वैतसंज्ञक महाविद्या कशी प्राप्त होईल? जें केवळ परम चैतन्य तेंच अद्वैत विज्ञान. त्याच्याच शुद्ध अवस्थेचें ज्ञान झालें असतां द्वैतभावनेची निवृत्ति होते. जेव्हां चित्त केवळ आत्माभिमुख होतें, तेव्हांच हें विज्ञान अनुभवास येतें. ऋषि हो! वेदवाक्यांच्या योगानें किंवा सयुक्तिक विचाराच्या योगानें केवल आत्मा भासमान होऊन, 'देहच मी' इत्यादि भावनांचा नाश होणें, यालाच ज्ञान म्हणतात. ज्या ज्ञानानें हें भासणारें दृश्य कोठेंहि किंचित्‌हि स्फुरत नाहींसें होतें; ज्या ज्ञानाच्या योगानें कोठें कांहीं एक लेशसुद्धां जाणवयाचा राहात नाहीं; सर्व तऱ्हेचे विषयादिकांचे अनुभव जेथें आत्मरूप होतात, तेंच खरें अद्वैत ज्ञान होय. जें ज्ञान प्राप्त झालें असतां चिरकाल पुष्ट झालेले संशय वायूनें लय पावणाऱ्या अभ्राप्रमाणें नष्ट होतात, आणि जेथें कामादि क्षुद्र वासना पुढें येऊं शकत नाहींत—दांत पाडलेल्या सर्पाप्रमाणें व्यर्थ होतात, तेंच ऋषि हो, माझें परम विज्ञान होय.

(५) सर्व दुःखांचा नाश होणें हें विज्ञानाचें फळ आहे. अत्यंत निर्भय अवस्था प्राप्त होणें हेंच खरें फळ होय. 'हा दुसरा कोणी आहे,' या भावनेनें भय उद्भूत होतें. पण अद्वैत तत्त्व पूर्णपणें ज्ञात झाल्यावर, सूर्योदयानंतर जसा अंधकार दूर पळून जातो, तशी ही द्वैत भावना कोठच्या कोठें नष्ट होते तें कळतहि नाहीं! म्हणून ऋषि हो, द्वैतसंकल्प नष्ट झाल्यावर कोठेंच भय नाहीं. स्वस्वरूपाहून निराळें फळ ज्यापासून मिळतें तें सर्वदा भयदायी असणार! कारण कीं, स्वात्मस्वरूपाशिवाय अन्य तें सर्वदा नाशवंत असतें, असें प्रत्यक्षच आढळून येतें. नाशवंत वस्तूला भय असल्यामुळें तेथें निर्भयता कोठून प्राप्त होणार? सर्व संयोगांच्या शेवटीं वियोग असतो, असा सर्वत्र अनुभव आहे. तेव्हां फळाचा योगहि नष्ट होणार, हें निश्चित आहे. त्या अर्थीं जोंवर फल आत्मरूप नसून अन्यरूपाचें आहे, तोंवर भय असतें. म्हणून जें आपल्या स्वरूपाहून वेगळें नव्हे, तेंच निर्भय फल होय; त्यालाच मोक्ष म्हणतात. जेव्हां ज्ञाता, ज्ञेय, ज्ञान हीं सर्व एकरूप होतील, तेव्हां सर्व भयरहित असें मोक्षनामक सर्वोत्तम फळ मिळतें. संकल्प-विकल्पशून्य आणि मूढपणानें रहित असें जें ज्ञात्याचें शुद्ध आत्मस्वरूप तेंच ज्ञान. तें स्वरूप प्रथमतः ओळखतां येत नाहीं; गुरु व शास्त्र हीं त्याची ओळख करून देतात. जें विज्ञेय तत्त्व म्हणून म्हणतात तें हेंच. ज्ञाता, ज्ञेय आणि ज्ञान हीं जोंवर निरनिराळीं अनुभवास येतात, तोंवर तीं व्यर्थ होत. पण त्या त्रिपुटींतील परस्परभेद जेव्हां नष्ट होईल, तेव्हांच तो ज्ञाता, तेव्हांच तें ज्ञेय व तेव्हांच तें

ज्ञान. हेंच ज्ञानाचें फळ. वस्तुतः ज्ञाता. ज्ञान, ज्ञेय आणि हें फल यांमध्यें भेदच नाहीं. व्यवहाराची सिद्धि होण्यासाठीं त्यांत हा भेद कल्पिलेला आहे. म्हणून येथें नवीन असें कांहीं फळ मिळवावयाचें नाहीं. हा आत्माच मायेच्या योगानें ज्ञाता, ज्ञेय, ज्ञान व त्याचें फळ इत्यादि रूपांनीं जोंवर भासतो, तोंवर हा संसार पर्वतासारखा कठिण होतो. परन्तु जेव्हां कोणत्याहि कारणानें प्रसंगवशात् भेदशून्य स्वरूप भासमान होतें, तेव्हां वाऱ्यानें ढग नष्ट व्हावे त्याप्रमाणें ह्या सर्व संसाराचा विलय होतो.

( ६ ) अशा प्रकारचा खरा मोक्ष प्राप्त होण्याला त्यासंबंधांत तत्परता हें मुख्य साधन आहे. तीव्र तत्परता असल्यावर अन्य साधनांची कांहीं जरूरी नाहीं. आणि ती तत्परताच विशेष नसली तर दुसऱ्या चांगल्या हजारों साधनांनीं तरी काय होणार आहे? तेव्हां तत्पर होणें हें मोक्षाचें मुख्य साधन आहे. ' सर्व कांहीं करीन पण हें कार्य साधीन !.' असें निरंतर वाटणें हीच तत्परता. ज्याला अशी अवस्था प्राप्त झाली आहे, तो सर्वथा मुक्तच आहे; कारण, मग तो कांहीं दिवसांनीं, किंवा महिन्यांनीं, किंवा वर्षांनीं,—किंबहुना दुसऱ्या जन्मांत म्हटलें तरी चालेल—पण मुक्तच व्हावयाचा ! कारण तो मार्गालाच लागलेला असतो. बुद्धीच्या निर्मळपणांत जसा फरक असेल, तसे दिवस थोडे किंवा फार लागतील इतकेंच. सर्व पुरुषार्थांच्या आड येणारे हे बुद्धीचे दोष पुष्कळ प्रकारचे आहेत. त्यांनींच हे लोक घोर संसाराग्नींत जळत घातले आहेत. त्यांत पहिला अनाश्वास, दुसरी कामवासना व तिसरी जाड्यता असे तीन प्रकार मुख्य

आहेत. त्यांत अनाश्वासाचे प्रकार दोन; एक संशय आणि दुसरा विपर्यय. वरील तत्परतेला हीं दोन मुख्य विघ्नें आहत. उलट निश्चय करीत गेल्यानें हें द्वय क्रमानें नाश पावतें. या कामीं मुख्य उपाय म्हणजे मूळच छेदून टाकलें पाहिजे. हें अनाश्वासाचें मूळ शास्त्रविरुद्ध असलेल्या तर्कांचें चिंतन करणें हें आहे. त्याचा त्याग करावा; व सत्तर्कांचा विचार चालण्यासाठीं त्या विरोधी तर्कविरुद्ध निश्चय करूं लागावें. असें केल्यानें श्रद्धेचा जन्म होऊन अनाश्वास नष्ट होतो. बुद्धीवर कामादि वासनांचें पुट असलें तर तें श्रवणाच्या आड येतें. कामादिकांनीं व्यापिलेली बुद्धि ज्ञानविषयाकडे प्रायः प्रवृत्त होत नाहीं. व्यवहारांतहि कामी पुरुष आपल्या प्रिय विषयाच्या चिंतनांत अगदीं गढून गेला असतां त्याला पुढील कांहीं दिसत नाहीं कीं ऐकूं येत नाहीं! तसेंच यानेंहि श्रवण केलें तरी तें न केल्यासारखेंच होतें. म्हणून या कामवासना वैराग्यबळानें स्वाधीन करून घ्याव्या. या काम, क्रोध, लोभ, दंभ इ० हजारों आहेत. त्या सर्वांना काम हा मूळ आहे. तो नष्ट झाल्यावर मग दुसरे कोणी उरत नाहींत. तो काम वैराग्यानें नाश पावतो. 'असें मला असावें' अशा तऱ्हेची जी आशा तोच काम. ती प्राप्य पदार्थांच्या संबंधांत स्थूल झालेली असते, व अप्राप्य गोष्टींत सूक्ष्म असते. दृढ वैराग्यानें ती सर्व घालवावी. त्या वैराग्याचें मूळ म्हटलें तर प्रतिक्षणीं काम्य विषयाच्या दोषांचा विचार करणें व त्या विषयाचा संबंध वर्ज्य करणें हें आहे. यायोगानें ती वासना नष्ट होते. बुद्धीचा तिसरा दोष जें जाड्य, तो तर अभ्यास करूनहि जिंकावयास कठीण आहे. हा दोष

असला तर, पुरुषानें मोठ्या तत्परतेनें श्रवण चालू ठेविलें तरी तें बुद्धींत प्रविष्ट होत नाहीं. हा पुरुषार्थाचा नाश करणारा मोठा दोष आहे. त्याला परमेश्वराची सेवा केल्यावांचून दुसरा उपाय नाहीं. त्या सेवेप्रमाणें मी त्याचें बुद्धीचें जाड्य हरण करितें. या जाड्याच्या अधिक-उणेपणाला अनुसरून त्याच किंवा दुसऱ्या जन्मीं त्याला ही फलप्राप्ति होते. ऋषिहो, सर्व साधनसामग्री कोणालाही माझ्या कृपेनेंच प्राप्त होते. जो पुरुष निष्काम बुद्धीनें व भक्तिपूर्वक नित्य माझी उपासना करितो, तो साधनांच्या अडचणींचें निवारण करून लौकरच कृतार्थ होतो. उलट जो सारखा अनेक साधनांची पाठ घेतो, पण सर्वांच्या बुद्धीला विकसित करणाऱ्या मज परमेश्वरीकडे मात्र दुर्लक्ष करतो, त्याचें बुद्धिमांद्य दूर न होतां, त्यास त्यामुळेंच पदोपदीं ठेंचा खाव्या लागतात! आणि फळ मिळण्याचीहि वानवाच असते. सारांश, ऋषि हो! तत्परता हें ज्ञानाचें मुख्य साधन आहे.

(७) ज्याला अशी तत्परता आहे, तोच मुख्य साधक. त्यांतून त्याला माझी भक्ति असेल तर तो सर्वमान्यच आहे.

(८) मी देह नव्हे, आत्मा आहें, असा निश्चय होणें याचें नांव सिद्धि. देहादिकांच्या ठिकाणीं भासणारें आत्मत्व नाहींसें होऊन बुद्धि निर्मल झाली, म्हणजे सिद्धि झालीच. आत्म्यासंबंधीं निश्चय सर्वांचाच आहे.—म्हणजे आपण आहों हें सर्वांनाच माहीत आहे. पण तो निश्चय केवलरूपानें नसून देहादींच्या रूपानें आहे. म्हणूनच ही महान् अनर्थपरंपरा ओढवली आहे. म्हणून 'देहादिकांना भासित करणारें जें केवल चैतन्य, तोच आत्मा' असा निश्चय होऊन सर्व

संशय लयास जाणें यालाच ज्ञानसिद्धि असें म्हणतात. खेचरत्वादि आणि अणिमादि सिद्धि या ह्या ज्ञानसिद्धीच्या सोळाव्या हिश्याच्याहि बरोबरीस येत नाहींत. या सर्व सिद्धि विशिष्ट काळानें आणि देशानें मर्यादित असतात. अर्थात् त्यांचें सामर्थ्य अमुक वेळीं आणि अमुक ठिकाणीं मात्र अनुभवास यावयाचें असें असतें. पण ही शिवस्वरूप स्वात्मसिद्धि अमर्याद आहे. आत्मज्ञानाच्या साधनामध्येंच त्या या अणिमादि क्षुद्र सिद्धि प्राप्त होतात. पण त्या आत्मज्ञानाच्या पासीला विघ्न करणाऱ्या आहेत. गारोड्याच्या खेळाप्रमाणें असणाऱ्या या सिद्धींनीं स्वहित काय होणार आहे? ज्याला आत्मज्ञान झाल्यामुळें ब्रम्हदेवाचें अधिकारस्थानहि तृणतुल्य होतें, त्याला या सिद्धि ह्मणजे काय,—एक पोरखेळ आहे. म्हणून एका आत्मज्ञानाशिवाय दुसरी सिद्धिच ह्मणतां येत नाहीं. जिनें दुःखांचा कायमचा नाश होतो, आनंद दाट भरून जातो, व मृत्यूच्या तोंडूनहि सुटका करून घेतां येते, तीच खरी सिद्धि हें काय सांगावें? ही ज्ञानसिद्धि विविध अभ्यासभेदानें, बुद्धीच्या कमीजास्त निर्मलपणामुळें व ज्ञानाच्या परिपक्वतेंतील तारतम्यामुळें तीन प्रकारची आहे; उत्तम, मध्यम व कनिष्ठ. ब्राह्मणांचा वेदांचा पाठहि असाच असतो. तीव्र बुद्धिमत्तेमुळें व फार अभ्यास झाल्यामुळें दुसरे कित्येक उद्योग करीत असतांनाहि ज्यांतील अक्षरें अस्खलित म्हटलीं जातात, तो पाठ उत्तम; ज्यामध्यें दुसऱ्या कार्याकडे आणि पाठाकडे चित्त ठेवावें लागतें,—तरच पूर्ववत् म्हणतां येतें, तो मध्यम प्रकार; आणि ज्यामध्यें केवळ पाठाकडेच मन लावलें—अर्थात् उद्योगाकडे दुर्लक्ष केलें—तर मात्र

जो बिनचूक म्हणतां येतो, तो कनिष्ठ. अशीच ज्ञानसिद्धिहि त्रिविध आहे. जिच्यांत व्यवहार करतांना तत्त्वानुसंधान ठेवावें लागत नाहीं, स्वभावतःच तें राहतें, ती उत्तम; तसें तें ठेवावें लागतें, ती सिद्धि मध्यम; व जिच्यांत व्यवहार मुळींच होत नसून सारखें स्वरूपानुसंधानच करावें लागतें, ती ज्ञानसिद्धि कनिष्ठ होय. वस्तुतः यांच्यांत स्वरूपतः कांहीं भेद नाहीं. तरी त्यांत उत्तम सिद्धि आहे तिला सिद्धीची पराकाष्ठा म्हटली आहे. स्वप्नादि अवस्थांतहि जिचें वास्तव्य असतें आणि विचार उदित होतांच जी अनुभवास येते, तीच स्वरूपसिद्धि सर्वांत श्रेष्ठ आहे. सर्व व्यवहारामध्यें जेव्हां पूर्वसंस्कारवशात्–आपोआप, हेतूवांचून–प्रवृत्ति होऊं लागते, तेव्हां ती सिद्धीची पराकाष्ठा समजावी. प्रयत्न न करितां, संविद्रूप आत्म्याच्या ठिकाणीं जेव्हां अखंड स्थिति होऊं लागते, तेव्हां ती सिद्धि मर्यादेवर पोंचली म्हणावयाची. व्यवहारांत वागत असतां पदार्थमात्राचा अनुभव घेत असूनहि ज्याला द्वैत भासत नाहीं, त्याची सिद्धि पूर्णावस्थेस गेली असें समजावें. जागृतींत व्यवहार करतांना जेव्हां झोंपीं गेल्यासारखी अंतःकरणांत स्वस्थता असते, तेव्हां ती ज्ञानसिद्धीची परिपूर्णता होते.

(९) अशी स्थिति ज्याला प्राप्त झाली तो उत्तम सिद्ध. व्यवहारांत असतांहि ज्या बुद्धिमानाची समाधि केव्हांच भंग पावत नाहीं, तो उत्तम सिद्ध होय. निरनिराळ्या ज्ञान्यांची निरनिराळी स्थिति स्वानुभवावरून ज्याला अंतरांत ओळखतां येते, तो उत्तम सिद्ध होय. ज्याला तिळमात्र संशय नाहीं व तिळमात्र इच्छा नाहीं,

तो सर्वोत्तम सिद्ध म्हणतात. जो व्यवहारांत अगदीं निर्धास्त असतो, आणि सर्व सुखें, दुःखें आणि जगाचे नाना व्यवहार, हे सर्व मजवरच भासत आहेत असें समजतो, त्याला पूर्ण सिद्ध म्हणावें. अत्यंत बद्ध व पूर्ण मुक्त हे ज्याला आपलेंच स्वरूप आहे असें वाटतें, तो उत्कृष्ट सिद्ध समजावा. जो आपणावर बंधाचें जाळें पसरलेलें इतरांप्रमाणें स्पष्टपणें पाहत असतांहि त्यांतून सुटण्याची इच्छा मुळींच करीत नाहीं,—कारण, त्याला त्यापासून पीडाच होऊं शकत नाहीं, तो सर्वांत श्रेष्ठ सिद्ध समजतात. ऋषींनो ! फार काय सांगावें? तो उत्तम सिद्ध म्हणजे मीच म्हणून समजा. आम्हां दोघांत मुळींच भेद नाहीं. हें तुमच्या प्रश्नाचें उत्तर मी तुम्हांला अगदीं स्पष्ट सांगितलें आहे. हें रहस्य चांगलें समजल्यावर पुनः म्हणून कोणाला मोह होणार नाहीं.”

इतकें सांगून त्या विद्यादेवीनें आपलें भाषण पुरें केलें. तें ऐकून सर्व ऋषींनीं आपला संशय सोडून देऊन विद्यादेवीचें निरूपण मान्य केलें. नंतर शिवादि लोकपालाना नमस्कार करून ते आपआपल्या स्थानास निघून गेले.

परशुरामा ! ही विद्यागीता मीं तुला सांगितली. ही श्रवण केली तर पापाचा संचय नष्ट करिते, व तिचा चांगला विचार केला तर ती स्वानंदसाम्राज्याचें दान करिते. ही साक्षात् विद्येनें सांगितली असल्यामुळें फार थोर योग्यतेची आहे. तिचें नित्य पठण करणारावर ती संतुष्ट होऊन स्वतःच त्याला स्वस्वरूपाचें ज्ञान करून देते. परशुरामा ! संसारसागरांत बुडणाऱ्यांना ही एक उत्कृष्ट नौका आहे.

---

## प्रकरण २१ वें.

# ब्रह्मराक्षसाची भेट.

तद्ह्रदस्य परे पारे न्यग्रोधे ब्रम्हराक्षसः ॥
निर्जितान् भक्षयन्नास्ते चिरकालाद्धि भार्गव ॥ ६२

मुनि दत्तात्रेय यांनीं येथपर्यंत केलेला बोध श्रवण करून परशुराम अविद्येच्या भ्रांतिजालांतून बहुतेक मुक्त झाला. मग पुनः भक्तिपूर्वक दत्तात्रेयांना नमस्कार करून तो म्हणाला–"भगवन्! ज्ञानाचें अत्यंत निश्चित व सुलभ साधन कोणतें, हें मला सार काढून सांगा. म्हणजे त्यायोगें मला त्याचा साक्षात्कार व्हावा. तसेंच मला ज्ञानी ओळखतां येतील असें कांहीं लक्षण सांगा. म्हणजे ज्ञानी देहावर असतांना व देहाचें भान नसतांना कशा स्थितींत असतात, आणि व्यवहार करूनहि त्यांचें मन अनासक्त कसें राहतें, हें सर्व आपण मला कृपाळूपणानें समजाऊन सांगा."

असा प्रश्न ऐकून दयाळू दत्तात्रेयांना संतोष झाला; व ते म्हणाले, बाबा परशुरामा! तुला अगदीं सार सांगतों तें एक. परमेश्वराची कृपा हें ज्ञानाचें मुख्य साधन आहे. जो सर्वभावानें परमात्म्याला शरण गेला, त्याला अतिशय सुलभ रीतीनें व निश्चयानें ज्ञान होतें. हेंच साधन अगदीं सर्वोत्तम आहे. याला दुसऱ्याची जोड लागत नसून हें फल देण्याला स्वतःच पूर्ण समर्थ आहे. हें सोडून दुसरें साधन केल्यास तें सम्यक् फल देऊं शकत नाहीं. आणि असें होणें साहजिकच आहे. पहा कीं, पदार्थांना भासमान करणारी जी केवळ ज्ञानरूप

चिति तिच्यावर जें अविद्या नांवाचें एक कल्पित आवरण आहे, तें विचारामुळें जेव्हां नष्ट होईल, तेव्हां तिचे स्वरूपाची ओळख व्हावयाची. अर्थात् ती ओळख अन्य म्हणजे बाह्य पदार्थांवर आसक्त असणाऱ्या पुरुषांना अतिशय दुर्लभ आहे. परंतु ईश्वरभक्तांची बाह्य वस्तूंवर आसक्ति नसल्यामुळें व ते नेहमीं मनन-तत्पर असल्यामुळें त्यांना तिच्या स्वरूपाची ओळख अगदीं अनायासें व विलंब न लागतां होते, हें निश्चित आहे. ईश्वरभक्तींत तत्पर असलेला पुरुष, दुसरीं साधनें फारशीं नसतांहि, स्वस्वरूपाचें साधारण ज्ञान मिळवून प्रथमतः दुसऱ्या भक्तांत त्याचें निरूपण करूं लागतो. तें निरूपण चालत असतां त्याचें चित्त तदाकार होऊं लागतें. हीच तन्मयता वरचेवर होणाऱ्या निरूपणांनीं दृढ झाली म्हणजे त्याचें चित्त अखंड उपास्याच्या आकाराचेंच बनून राहतें. मग त्याला हर्ष-उद्वेग होत नाहींत. ज्याशीं ज्याशीं त्याचा संबंध येतो, त्याला त्याला तो उपासक आपले उपास्याचे रूपांतच मिळवून सोडतो. या क्रमानें त्याची चित्तशुद्धि होते; व शेवटीं त्याला उत्तम विज्ञान प्राप्त होऊन तो जीवन्मुक्त-पदाला जाऊन पोंचतो तेव्हां उत्कट भक्तियुक्त अंतःकरणानें भक्तजनांपुढें ईश्वरस्वरूपाचें निरूपण करणें हेंच उत्कृष्ट साधन आहे. प्रेमभरानें परमेश्वराचें माहात्म्य वर्णन करणें यासारखें दुसरें उत्कृष्ट साधनच नाहीं.

आतां, परशुरामा! ज्ञान्यांचें लक्षण एक तुला सांगावयाचें आहे. परंतु तें लक्षण ओळखणें फारच कठीण आहे. कारण ज्ञान्यांचें स्वरूप अगदीं सर्वांच्या आंत किंवा पलीकडे आहे. तें नेत्र, वाणी इत्यादि-

कांवरून जाणतां येत नसल्यामुळें तें दुसऱ्यांना सांगणें किंवा स्वतः ओळखणें हें ज्ञान्यांच्याशिवाय इतरांना शक्य नाहीं. कोणीं शास्त्राचें अध्ययन केलें असेल तर तें जसें दुसऱ्यांना त्याच्या शरीरावरून किंवा वस्त्रभूषणांवरून निश्चितसें ओळखतां येत नाहीं, तसेंच हेंहि ओळखतां येत नाहीं. आपण चाखलेल्या रसाची गोडी जशी आपणच जाणावी, त्याप्रमाणें ज्ञान हें स्वसंवेद्य-आपलें आपल्यालाच कळणारें आहे. तरीहि चतुर व विद्वान पुरुष, मुंग्यांचा मार्ग जसा मुंग्यांनाच समजतो, त्याप्रमाणें त्यांना त्यांच्या भाषणादिकांवरून ओळखूं शकतात. त्यांचीं स्थूल लक्षणें पुष्कळ आहेत; तशींच सूक्ष्म लक्षणेंहि कित्येक आहेत. पण तीं इतरांना कळण्यास कठीण आहेत. कारण निरूपण, बोलणें चालणें व साधनांचा देखावा हे सर्व प्रकार ज्ञानी पुरुषांप्रमाणें, इतरांनाहि दाखवितां येतात असें आढळतें. तरी त्यांचें कांहींसें चिन्ह तुला सांगतों, ऐक. आरंभीं ज्यांचें अंतःकरण निर्मल नसतें, ते ज्ञानासाठीं कांहीं साधनांचा अभ्यास चालवितात. पुढें त्यांचें तें साधन ज्ञानोत्तर अभ्यासप्राबल्यामुळें प्रयत्नावांचूनहि चालू राहण्याइतकें कधीं कधीं स्थिर होतें. अशांचें कांहीं लक्षण सांगतां येतें. तर पहा कीं, मान आणि अपमान, लाभ आणि हानि, व जय आणि अपजय हीं ज्याच्या स्वरूपांत थोडासाहि बदल करण्यास समर्थ नसतात, तो ज्ञान्यांमध्यें उत्तम ज्ञानी होय. आत्मानुभवाच्या संबंधांत एखादा गूढ प्रश्न केला तरी जो तत्काळ आणि असंदिग्ध उत्तर देऊं शकतो, तो उत्तम ज्ञानी होय. ज्ञानविषयक चर्चा करण्याचा ज्याला अतिशय उत्साह, व निरूपण करण्याचे

कामीं जो अगदीं पुढें, तो खरा ज्ञानी समजावा. स्वभावतःच ज्याला व्यवहाराचा कंटाळा, संतोषी वृत्ति, मोकळें मन, आणि महत् संकटांतहि जो शांत, तो ज्ञानी सर्वांत उत्तम होय. अशीं हीं ज्ञानी पुरुषाचीं लक्षणें, साधकाला आपलें स्वतःचें परीक्षण करतां यावें म्हणून सांगण्यांत आलेलीं असतात. साधकानें नेहमीं आत्मपरीक्षण करावें. दुसऱ्याचे दोष शोधण्यांत मनुष्य जसा निपुण असतो, तशा नैपुण्यानें आपल्याला तपाशीत राहिल्यावर ज्ञान कसें प्राप्त होणार नाहीं? जर दुसऱ्याची परीक्षा करण्याचें सोडून पुरुष आपल्या गुणदोषांचा विचार करूं लागेल, तर त्याला सर्व साधनें प्राप्त होऊन तो सिद्ध पुरुष होईल! म्हणून परशुरामा! हीं सांगितलेलीं ज्ञान्यांचीं लक्षणें स्वतःच्या परीक्षणाच्या उपयोगीं आहेत; दुसऱ्यांसाठीं नव्हेत. व दुसऱ्याची परीक्षा करतां येण्याला तीं तितकीं निश्चयात्मक नसतात कारण, परशुरामा! ज्या पुरुषांची बुद्धि जन्मतःच अत्यंत शुद्ध असते, त्यांना साधनांच्या सुरवातीसच ज्ञान प्राप्त होतें. म्हणजे अशांचा साधनांचा अभ्यास दीर्घ काल झालेला नसतो. त्यामुळें ते पूर्व वासनानुरोधानें कार्यें करीत राहतात. तर असा सर्वसाधारण व्यवहार करणारे ते ज्ञानी वरील लक्षणांवरून तुला कसे ओळखतां येतील? त्यांची परीक्षा ज्यांनीं ज्ञानाचा अभ्यास केला आहे तेच, म्हणजे ज्ञानीच. रत्नपरीक्षकाप्रमाणें त्यांना पाहतांक्षणींच करतील. जे मंद ज्ञानी आहेत, त्यांची देहस्थिति तर मूढाप्रमाणेंच असते. कारण त्यांना सहजसमाधि प्राप्त झालेला नसतो. ते जेव्हां स्वरूपानुसंधान करूं लागतात, तेव्हां ते पूर्ण झालेले असतात. परन्तु जेव्हां अनुसंधान सुटून

देहावर येतात, त्या वेळीं सुखदुःखांचे अगदीं पूर्ण अनुभव घेत,— अगदीं पशूसारखे होऊन राहतात. ते मधून मधून पूर्ण दशेला प्राप्त होऊन स्वरूपसुखानुभव घेत असल्यामुळें त्यांची अनुसंधानरहित जी पशुदशा ती जाळलेल्या दोरीप्रमाणें त्यांच्या बंधनास कारण होत नाहीं. लाक्षारसानें वस्त्राचीं दोन्हीं टोकें एकदां रंगविलीं म्हणजे सर्व वस्त्र व्यापून जाऊन मध्यभागहि ज्याप्रमाणें त्याच रंगानें युक्त होतो, त्याप्रमाणें मंद ज्ञान्यांचा व्यवहार स्वरूपानुसंधानरहित असला तरी त्याच्या पूर्वोत्तरकाळीं स्वरूपानुसंधान त्याला प्राप्त होत असल्यामुळें तो मध्यकालीन व्यवहारहि स्वरूपभूतच होऊन बंधनास कारण होत नाहीं. मध्यम ज्ञान्यांना देहाचा संबंधच नसतो. येथें ‘ देह हाच आत्मा ’ असा ग्रह म्हणजेच देहाचा संबंध. पण अभ्यास अतिशय झाल्यामुळें त्यांचें मन सदैव लीन राहतें, यामुळें त्यांना देहसंयोग अनुभवास येत नाहीं. ते सदैव समाधींत राहतात; त्यामुळें त्यांचा व्यवहाराशीं संबंधच नसतो. त्यांची देहयात्रा सुद्धां निद्रितावस्थेसारखी चालते. जसा एखादा पुरुष झोंपेंत असतांना क्वचित् वासनावशात् कांहीं बोलतो किंवा करतो, पण त्याला त्याचें खरोखर भान नसतें; किंवा कोणी मद्यपान केलेला पुरुष कांहीं बोलतो, करितो, पण जाणत मात्र नाहीं, त्याप्रमाणेंच हा महायोगी सर्व लोकव्यवहारांतून बाहेर पडला असल्यामुळें कोठें तरी कांहीं तरी करितो, पण जाणत नाहीं. प्रारब्धाच्या बळावर उद्भवणाऱ्या संस्कारांनीं त्याचा देहनिर्वाह चाललेला असतो. उत्तम ज्ञान्यालाहि देहभाव नसतोच. पण तो रथाच्या सारथ्याप्रमाणें व्यव-

हार चालवितो. जसा रथाचा सारथि रथानें कांहीं व्यवहार करतो, पण तो स्वतःच रथ होत नाहीं; तसा हा देहसंबंधानें व्यापार करीत राहतो, पण स्वतःच देही किंवा कर्मकर्ता न होतां, शुद्ध संवेदनस्वरूपच असतो; आंत अत्यंत निर्मल व स्वस्थ राहून बाह्यतः व्यवहार करितो. नाटकांतील नटी जशी आंत आणि बाहेर अशा दोन निरनिराळ्या रूपांची असते, अथवा मुलाबरोबर खेळत असणारा प्रौढ पुरुष जसा त्या खेळांतील सुखदुःखादिक दोषांनीं युक्त दिसतो पण रहित असतो, त्याप्रमाणें हा जगत्क्रीडातत्पर उत्तम ज्ञानी पुरुष अंतःकरणांत व्यवहारकाळीं अगदीं निर्मल असतो. मध्यम ज्ञानी समाधीच्या दृढतर अभ्यासामुळें स्वस्थ राहतो, आणि हा तत्त्वविचाराच्या सामर्थ्यावर शांत असतो. बुद्धीच्या परिपक्वतेवरून उत्तम आणि मध्यम असा भेद होतो. परशुरामा! यासंबंधांत पूर्वीं एकदां दोघां ज्ञान्यांचा एक उत्कृष्ट परस्पर संवाद झालेला आहे, तो तुला सांगतों, ऐक.

पूर्वीं पार्वत देशामध्यें रत्नांगद नांवाचा एक राजा होऊन गेला. तो विपाशा नदीच्या कांठीं असलेल्या अमृता नामक नगरींत राहत असे. त्याला मोठे बुद्धिमान् व उदार स्वभावाचे रुक्मांगद आणि हेमांगद असे दोघे मुलगे होते. ते त्याला फार प्रिय असत. त्यांत रुक्मांगद हा सर्व शास्त्रांत निष्णात होता, व हेमांगद हा उत्तम ज्ञानी—स्वरूपानुभवी—होता. ते दोघे एकदां सर्व सेना घेऊन मृगयेला निघाले, ते वसंतारण्यांतील एका दाट झाडींत गेले. तेथें त्यांनीं आपल्या स्वभावानुसार अनेक श्वापदें—वाघ, ससे, रेंडे, हरणें मारिल्या-

नंतर फार थकून जाऊन विश्रांतीसाठीं ते एका सरोवराच्या कांठीं येऊन बसले. त्या सरोवराच्या पलीकडील बाजूस असलेल्या एका वटवृक्षावर एक सर्व शास्त्रवेत्ता ब्रम्हराक्षस होता. तो पंडितांशीं वाद करी, व त्यांना जिंकून भक्षण करी; असें पुष्कळ दिवस चाललें होतें. हें वृत्त सेवकांकडून रुक्मांगदास कळलें. त्याला वादाची फार आवड असे, त्यामुळें तो आपल्या बंधूसह त्याकडे गेला व त्यानें त्याच्याशीं वाद करण्यास आरंभिलें. परंतु शेवटीं ब्रम्हराक्षसानें त्याला त्या वादांत जिंकून पकडून धरिलें; आणि त्याला तो तोंडांत टाकूं लागला! हा विलक्षण प्रकार पाहून हेमांगद पुढें होऊन त्या राक्षसाला म्हणाला, " राक्षसा! थोडासा थांब, त्याला एकट्यालाच भक्षण करूं नकोस. मी त्याचा बंधु आहें, तर तूं मला जिंक व एकदम दोघांचें भक्षण कर." तेव्हां तो ब्रम्हराक्षस म्हणाला--" मला आज पुष्कळ दिवसांनीं हा आहार मिळालेला आहे, व भूकहि फार लागली आहे; म्हणून मी प्रथमतः याला खाऊन पारणा करितों. नंतर तुझ्याशीं वाद करूं. मग तुलाहि जिंकून भक्षण करून तृप्त व्हावें, असा माझा विचार झालेला आहे. पुष्कळ दिवसांनीं महात्म्या वसिष्ठानें मला खाण्याचा वर दिला आहे. त्यांचा एक देवरात नामक शिष्य सहज इकडे आला असतां मीं भक्षण केला. त्यामुळें त्यांनीं मला शाप दिला कीं, 'यापुढें तूं मनुष्य भक्षण केल्यास तुझें मुख दग्ध होईल!' तेव्हां मीं मुनींची पुष्कळ विनवणी केली. त्यावर त्यांनीं मला 'तुजकडे येणाऱ्या लोकांना वादांत जिंकून मग तूं खात जा' असा उपयुक्त वर दिला. तेव्हांपासून मी तसें करीत असतों. आजचा हा सर्वांत

मोठा आहार असून तो मला पुष्कळ दिवसांनीं मिळालेला आहे. तेव्हां याला मी प्रथम भक्षण करून नंतर हवें तर तुलाहि जिंकीन." असें म्हणून तो राक्षस त्याला भक्षण करण्यास तयार झाला. तेव्हां हेमांगद पुनः म्हणाला—" ब्रम्हराक्षसा, माझें थोडेंसें बोलणें कृपा करून ऐकून घे. याचे मोबदला कांहीं घेऊन तूं याला सोडीत असलास तर सांग, म्हणजे तें तुला देऊन मी माझ्या बंधूला सोडवीन "

तेव्हां राक्षस म्हणाला—" राजा, मी याला ज्यायोगें सोडून देईन असें कांहीं एक नाहीं. वेळेवर हातीं आलेला आवडीचा आहार कोण हातचा टाकील? पण माझा एक पण आहे. माझ्या मनांत पुष्कळ प्रश्न उभे आहेत. जर त्यांवर तूं उत्तरें देशील, तर तुझ्या बंधूला मी सोडतों. " तेव्हां हेमांगद म्हणाला—" विचार, मी त्यांचीं तुला उतरें देतों."

असें राजानें म्हटल्यावर त्या ब्रम्हराक्षसानें त्या राजाला फार गूढ अर्थाचे प्रश्न केले. परशुरामा, ते तुला सांगतों ऐक.

" राजपुत्रा, आकाशाहून विस्तृत व परमाणूहून सूक्ष्म ती कोण, तिचें स्वरूप काय व ती कोठें असतें, हें सांग. "

" ब्रम्हराक्षसा, ऐक—चिति ही आकाशाहून विस्तृत व परमाणूहून सूक्ष्म आहे. स्फुरणें हें तिचें स्वरूप आहे, व आत्मा हें तिचें स्थान आहे. "

" राजपुत्रा! एकच चिति अति विस्तृत असून तीच पुनः अति सूक्ष्म कशी होते? आणि स्फुरणें म्हणजे काय व आत्मा म्हणजे काय, हें सांग. "

" ब्रम्हराक्षसा, ऐक–चिति ही सर्वांला कारण असल्यामुळें विस्तृत आहे, आणि आकलन करण्यास कठीण म्हणून सूक्ष्म आहे. चिति हेंच स्फुरणें व चिति हाच आत्मा "

" राजपुत्रा, ती सांपडण्याचें स्थान कोणतें? ती कशी प्राप्त होते? व तिच्या प्राप्तिपासून फल काय, हें सांग."

" ब्रह्मराक्षसा, ऐक–बुद्धि हें तिच्या प्राप्तीचें स्थान आहे. ती एकाग्रतेनें उपलब्ध होते. ती प्राप्त झाल्यानें पुनः जन्म म्हणून येत नाहीं."

" राजपुत्रा! बुद्धि कशाला ह्मणतात? ती एकाग्रता म्हणजे काय? व जन्म कसा येतो? हें सांग."

" ब्रह्मराक्षसा, ऐक–अविद्येनें आवरण केलेल्या चितीला बुद्धि म्हणतात. आत्म्याकडे अभिमुख होणें म्हणजे एकाग्रता; व देह हाच आत्मा अशी भावना होणें हाच जन्म होय."

" राजपुत्रा! कशामुळें चिति उपलब्ध होत नाहीं? आणि ती कोणत्या साधनानें उपलब्ध होते? व तो जन्म कशामुळें प्राप्त होतो? हें सांग."

" ब्रम्हराक्षसा, ऐक–अविवेकामुळें चिति उपलब्ध होत नाहीं. ती आपण स्वतःच उपलब्ध होते. कर्तृत्वाचा अभिमान धरल्यामुळें जन्म प्राप्त होतो."

" राजपुत्रा! तूं सांगतोस हा अविवेक कोण? तसेंच आपण म्हणजे कोण? आणि कर्तृत्वाचा अभिमान तो कोण? हें सांग."

" ब्रम्हराक्षसा, ऐक–देहादिकांहून आत्मा निराळा आहे हें ओ-

ळखतां न येणें हाच अविवेक. आपण कोण याचें उत्तर तुझें तूंच आपणाला विचार. ' मी कर्ता ' अशी भावना, म्हणजे कर्तृत्वाचा अभिमान. "

" राजपुत्रा, अविवेक कशानें नष्ट होतो? तसेंच त्याचेंहि मूळ काय? व त्याला आणखी काय कारण आहे, हें सांग. "

" ब्रम्हराक्षसा, ऐक—विचारानें अविवेक नष्ट होतो. विचाराचें मूळ वैराग्य आहे, व वैराग्याला दोषदृष्टि कारण आहे."

" राजपुत्रा! विचार तो कोण आहे? वैराग्य कशाला म्हणतात? आणि दोषदृष्टि म्हणजे काय? हें सांग. "

" ब्रम्हराक्षसा, ऐक—द्रष्टा आणि दृश्य यांचें परीक्षण करणें हा विचार. दृश्यावर आसक्ति नसणें हें वैराग्य. व दृश्य हें दुःखकारक आहे अशी भावना ही दोषदृष्टि."

" राजपुत्रा! हें सर्व कशानें साध्य होईल? तसेंच तें कशानें मिळेल? आणि त्यालाहि मूळ कारण काय? हें सांग."

" ब्रम्हराक्षसा! ऐक—ईश्वराच्या कृपनें हें सर्व साध्य होईल. ती कृपा भक्ति केल्यानें होईल. भक्तीला सत्संग हें मूळ कारण आहे."

" राजपुत्रा, ईश्वर कोणाला म्हणतात? भक्ति कशाला म्हणावें? आणि संत कसे असतात? हें सांग. "

" ब्रम्हराक्षसा, ऐक—जगाचें धारण करितो तो परमेश्वर. त्याकडे मन लागणें याला भक्ति म्हणतात; संत हे शांत व दयाळू असतात."

" राजपुत्रा, जगांत सदोदित भिणारा कोण? सदा दुःखी कोण? व सदा दीनवाणा कोण? हें सांग."

" ब्रम्हराक्षसा, ऐक--अतिशय धनवान सदा भीत असतो. ज्याचें कुटुंब मोठें असेल तो सदा दुःखी असतो; आशेनें ग्रासलेला पुरुष सदा दीनवाणा असतो."

" राजपुत्रा, जगांत निर्भय कोण आहे, दुःखरहित कोण आहे, व ज्याला दैन्य नाहीं असा कोण आहे, हें सांग."

" ब्रम्हराक्षसा, ऐक--ज्याचा कशाशींच संग, म्हणजे संबंध नसतो, तो निर्भय. ज्यानें मन जिंकलें आहे तो दुःखरहित; व जो आत्मज्ञानी आहे, त्याला तेवढें दैन्य नाहीं."

" राजपुत्रा, ज्याचें लक्षण करितां येत नाहीं, असा कोण? देह-रहित असा कोण? निष्क्रियाची क्रिया कोणती, हें सांग."

"ब्रम्हराक्षसा, ऐक--जीवन्मुक्ताचें लक्षण करितां येत नाहीं. तो व देही असून देहरहित असतो. आणि त्याची क्रिया तीच निष्क्रिय पुरुषाची क्रिया होय."

" राजपुत्रा, जगांत आहे व नाहीं असें काय आहे? व अत्यंत असंभव कोणाचा आहे? एवढें आतां सांग, म्हणजे तुझ्या बंधूला मी सोडून देतों."

" ब्रम्हराक्षसा, आहे व नाहीं अशी एक दृक् वस्तु आहे. दृश्य व्यवहाराचा अत्यंत असंभव आहे. हें सांगितलें; आता माझ्या बंधूला सोडून दे."

इतकीं बिनचूक उत्तरें ऐकून त्या राक्षसास संतोष झाला, व त्यानें शेवटीं रुक्मांगदास सोडून दिलें. त्याबरोबर तो राक्षस ब्राम्हणरूप झाला. त्या वेळीं त्याला तेजस्वी ऋषीसारखा समोर उभा पाहून

राजपुत्रांना आश्चर्य वाटून त्यांनीं ' आपण कोण आहां ? ' म्हणून त्यास प्रश्न केला. तेव्हां त्या ब्राह्मण-श्रेष्ठानें आपलें वृत्त त्यांस सांगितलें. परशुरामा ! तो म्हणाला, मी पूर्वी मगध देशांत वसुमान म्हणून प्रसिद्ध ब्रम्हण होतों. सर्व शास्त्रांत निष्णात अशी माझी ख्याति होती. त्या वेळीं मीं आपल्या विद्वत्तेच्या सामर्थ्यावर अनेक वेळां शेंकडों विद्वानांना जिंकलें. त्यामुळें मला मोठा गर्व झाला. त्यानंतर मीं एकदां मागध राजाच्या सभेंत जाऊन अष्टकमुनीशीं आत्मविद्येसंबंधीं वाद करण्यास सुरुवात केली. तो मुनि आत्मस्वरूप पूर्ण जाणणारा व अत्यंत शांत, आणि मी शुष्क तर्कवाद चालविण्यांत अतिशय निपुण. त्यामुळें मीं त्याच्या वेदार्थानें भरलेल्या सुंदर भाषणाचाहि आपल्या तर्ककौशल्यानें छल करून, त्याजवर दोष ठेवून त्याचा धिक्कार केला. तरी तो महात्मा त्या राजसभेंत अगदीं शांत व स्वस्थ राहिला. पण त्याचा शिष्य काश्यप, त्याला तें सहन झालें नाहीं. तो तें पाहून क्रोधाविष्ट झाला आणि त्यानें मला तेथल्या तेथेंच शाप दिला ! तो म्हणाला, ' दुष्टा ! माझ्या गुरूंचा तूं अपमान केलास ! तुझा हा अधिकार नव्हे ! तर अधमा ! तूं दीर्घकालपर्यंत ब्रम्हराक्षस होऊन रहा ! ' याप्रमाणें शाप झाल्यावर मी अत्यंत भयपावून अष्टक मुनींना शरण जाऊन कांपत कांपत नमस्कार केला. तेव्हां त्या शांत महात्म्यानें, मी त्याच्याशीं विरोध केला असूनहि मजवर दया केली. त्यानें मला शापांतून सुटण्याची तोड काढिली. तो म्हणाला, " ब्राम्हणा ! तूं मला या सभेंत जे प्रश्न केलेस, त्यांचीं मीं तुला यथायोग्य उत्तरें दिलीं असतां तूं केवळ तर्कवादाच्या

आश्रयावर तीं खोडल्यासारखें करून पुनः ते आपलेच प्रश्न स्थापित केलेस; तर जेव्हां कोणी विद्वान येऊन तुझ्या या प्रश्नांचीं योग्य उत्तरें तुला देईल, तेव्हां तूं या शापांतून मुक्त होशील."

सारांश, राजपुत्रा ! आज मी तुझ्या संगतीनें त्या फार दिवसांच्या शापामधून मुक्त झालों ! म्हणून मी असें समजतों कीं, तूं सर्व लोकांत उत्तम आत्मज्ञानी महात्मा आहेस !"

राक्षसाचें हें वृत्त ऐकून हेमांगदाला मोठें आश्चर्य वाटलें. पुढें त्या वसुमान ब्राम्हणानें राजाला पुष्कळ गोष्टी विचारल्या. राजानेंहि त्याला चांगल्या रीतीनें बोध केला; व त्याचे सर्व संशय निवारण केले.

दत्तात्रेय म्हणतात, परशुरामा ! नंतर तो राजा हेमांगद त्या वसुमंताला नमस्कार करून आपला बंधु व त्याचें सैन्य यांसह आपल्या नगराला परत आला.

---

## प्रकरण २२ वें,

# सारांश काय?

आदर्शनगरं यद्वदस्त्यादर्शस्वभावतः ॥
एवं जगच्चिदात्मैकरूपं सत्यमुदीरितम् ॥ १०२

ही राक्षसाची कथा ऐकल्यानंतर परशुराम पुनः नम्रपणानें दत्तात्रेयांना म्हणाला,–"महाराज! त्या शापमुक्त झालेल्या ब्राम्हणानें पुढें काय विचारलें? आणि हेमांगदानें त्याला काय बोध केला एवढें मला कृपा करून सांगा. या प्रसंगाचें मला फार नवल वाटतें."

तेव्हां यावर दत्तात्रेय म्हणाले–परशुरामा! त्या संभाषणांत मोठा गहन अर्थ भरला आहे. तें तुला सांगतों, ऐक. वसुमान हेमांगदाला म्हणाला, "राजपुत्रा! मी तुला थोडें विचारतों, तें मला सांग. हें परम पद मीं प्रथम योगीश्वर अष्टकापासून जाणून घेतलें होतेंच; आणि तुझ्या भाषणानें तें मला पुनः चांगल्या रीतीनें ज्ञात झालें आहे. परंतु शंका अशी येते कीं, तूं तत्वज्ञाता असूनहि तुझी स्थिति अशी कशी? आत्मतत्व जाणणारा तूं व्यवहार कसा करतोस? प्रकाश आणि अंधार यांचें हें एकत्र वास्तव्य कसें संभवतें? तेव्हां हा प्रकार जसा असेल तसा मला चांगला समजावून सांग."

तेव्हां हेमांगद त्याला म्हणाला–"ब्रम्हन्! अद्यापि तुझा भ्रम संपूर्ण नष्ट झालेला दिसत नाहीं. अरे, आत्मस्वरूपानें असणाऱ्या ज्ञानाला व्यवहारानें कांहीं बाध येतो कीं काय? व्यवहारानें या ज्ञानाला बाध येत असेल, तर ज्ञान्यानें समाधींतच सदा रहावें असें

म्हणतां येईल. परंतु समाधीसारख्या स्वप्नतुल्य अर्थात् उत्थानकालीं विनाश पावणाऱ्या अवस्थेपासून पुरुषार्थाचा लाभ काय होणार! अरे, सर्व व्यवहारच मुळीं ज्ञानाच्या आश्रयानें चालत आहे, तर तें ज्ञान त्यानें कसें बाधित होणार तें मला सांग. ज्या स्वरूपावर जगत् भासमान होतें, तेंच ज्ञान. त्यावर संकल्पानुसार व्यवहार भासमान होतो. निःसंकल्प अवस्थेंत एकवार त्या रूपाची बुद्धीला ओळख झाली, म्हणजे पुरुष बंधनिर्मुक्त होऊन कृतार्थ होतो, हें निश्चित आहे. म्हणून वसुमंता! हा तुझा संशय बुद्धिमान पुरुषांना मान्य होणारा नाहीं."

यावर तो वसुमान् राजपुत्राला म्हणाला–" राजकुमार! हें सर्व खरें आहे; व माझाहि असाच निश्चय झालेला आहे. सर्व विकल्परहित जें संवेदन तेंच आत्मस्वरूप होय. पण निसंकल्प अवस्थेचा त्याग करून सविकल्प अवस्थेस प्राप्त होतांना त्या ज्ञानी पुरुषाला पूर्वीं निवारण केलेला भ्रम पुनः कसा होणार नाहीं? जसा दोरीवर भुजंग, तसा निर्विकल्प स्वरूपावर विकल्प भासणें हा भ्रम आहे. तो ज्ञान्याला कां बद्ध करणार नाहीं?"

यावर हेमांगद म्हणाला–" ब्रम्हन्! भ्रम कशाला म्हणावें व अभ्रम कशाला म्हणावें, हें तूं जाणत नाहींस. तर ऐकः–आकाश म्हणजे काय हें ज्यांना कळत आहे त्यांनाहि तें निळें भासतेंच; आणि 'निळें आकाश' असा ते भाषाप्रयोगहि करतात. मग तेवढ्यामुळें त्यांना आकाशासंबंधीं जें ज्ञान झालें आहे, त्याला भ्रांति असें कांहीं म्हणतां येत नाहीं. मूढांच्या ठिकाणीं ती भ्रांति, आणि

तत्त्वज्ञान्याच्या ठिकाणीं तीच 'प्रमा' होय. मूळें मर्म ओळखल्यानंतर जो देखावा केवलपणानें, म्हणजे भय किंवा हर्ष उत्पन्न करण्यास अशक्त असा दृश्य होतो, त्यास प्रमा असें म्हणतात. तेव्हां सत्यतारूपी जीव ज्यांतून निघून गेला आहे, तें ज्ञान मृत झालेल्या एकाद्या महा भुजंगाप्रमाणें अगदीं निरुपद्रव असतें. ज्ञान्याचा व्यवहार दर्पणांतील प्रतिबिंबाप्रमाणें होत असतो. एवढ्यामुळें ज्ञानी व अज्ञानी यांमध्यें भेद होतो. ज्ञान्याचें हें व्यवहारात्मक ज्ञान हा त्याचा स्वतःचा संकल्प किंवा 'प्रमा' आहे, पण अज्ञान्याचा हा भ्रम आहे. ज्ञान्यांचा सर्व व्यवहारच ज्ञानरूप असतो. तेव्हां आदर्शांतील प्रतिबिंबरूप असलेल्या या व्यवहारानें ज्ञान्याला पुनः भ्रांति होण्याचा संभव काय ? आतां ज्ञान झाल्यावर सर्व दृश्याचा लोप व्हावा, असें तुला वाटत असेल, तर वसुमाना ! ज्ञानाच्या योगानें अज्ञानजन्य असें जें असेल त्याची मात्र निवृत्ति होईल खरी; पण निराळ्या दोषानें कांहीं उत्पन्न झालें असल्यास ज्ञान झाल्यानें त्याचा नाश कसा होणार ? पहा कीं, तिमिररोग झालेल्या पुरुषाला दिसणाऱ्या दोन पदार्थांत खरा एकच आहे हें कळतें, पण पहातांना त्याला ते दोनच दिसतात. कारण एकाचे दोन पदार्थ दिसणें हा अज्ञानाचा परिणाम नसून तो एक नेत्रदोष आहे. मग तो ज्ञान झाल्यानें कसा दूर होईल? त्याप्रमाणें हा जगदाभास जीवांच्या कर्मरूप दोषामुळें उत्पन्न झालेला आहे. म्हणून कर्मांचा नाश होईपर्यंत व्यवहार बंद राहणें शक्य नाहीं. कर्म लय पावतांच एकच अद्वय चैतन्य शेष राहातें. सारांश, परशुरामा, व्यवहारामुळें ज्ञात्यांना भ्रांति

होण्याचा अगदीं संभव नाहीं."

यावर पुनः ब्राम्हण राजपुत्राला म्हणाला, " अहो राजकुमार! हें कसें काय? ज्ञान्यांचें कर्मच मुळीं संभवत नाहीं! ज्ञानाग्नीचा स्पर्श झाल्यावर कर्मरूप कापूस राहील कसा?"

राजपुत्र हेमांगद म्हणाला, " ऐक, सांगतों. सर्व ज्ञान्यांचें कर्म तीन प्रकारचें असतें. एक अपक्क, दुसरें पक्क व तिसरें हतोदित. त्यांत ज्ञानाच्या योगानें पक्क कर्म शिवाय करून बाकीचीं दोनहि नष्ट होतात. काल हा कर्मांना पक्क करणारा आहे. अशी नियतीची योजना आहे. त्या काळानें जे परिपाकास म्हणजे फलास आणलें आहे त्याला पक्क कर्म म्हणतात. ज्याचा परिपाक केला नाहीं म्हणजे जें फळास आणलें नाहीं, तें अपक्क कर्म होय. आणि ज्ञानोत्पत्ति झाल्यावर जें कर्म केलें जातें त्याला हतोदित कर्म म्हणतात. कारण तें कर्म उदयास येते वेळींच ज्ञानाग्नीनें हत म्हणजे नष्ट होतें. यांतील पक्क म्हणून जें कर्म आहे त्याला प्रारब्ध असेंहि म्हणतात. तें धनुष्यापासून सुटलेल्या बाणाप्रमाणें आपलें फल—सुखदुःखादिक परिणाम—करण्याला अगदीं सिद्ध झालेलें असतें. हा जगद्भास त्याजमुळें निर्माण झाला आहे. तो भ्रांतिरूप आहे. आतां—ज्ञानामध्यें तरतमभाव असतो; यामुळें हा प्रारब्धकर्मजन्य जगदाभास ज्ञान्याला सुखदुःखात्मक निरनिराळीं फळें देतो, पण भ्रांति उत्पन्न करूं शकत नाहीं. आतां तीं निरनिराळीं फळें कोणतीं तें सांगतों, ऐक. मंदज्ञान्यांना प्रारब्धकर्माचें फळ तत्काल अनुभवास येतें. मध्यम ज्ञान्यांना त्याच्या फळाचा साधारण भास होतो. आणि उत्तम ज्ञान्यांना त्याचा

स्पष्ट भास होतो, तरी तें फळ—सुखदुःखादि परिणाम—सशाच्या शिंगाप्रमाणें असत्य असा त्यांचा निश्चय असल्यामुळें त्या त्यांच्या भासाला 'सुखदुःखांचा अनुभव' असें म्हणतांच येत नाहीं. अज्ञानी जनांचें, कर्मांच्या सुखदुःखादि फलाकडे सारखेंच लक्ष लागून गेलें असल्यामुळें त्यांचें कर्मफल चांगलें अनुभवास येणारें, अर्थात् पुष्ट असतें. परंतु ज्ञान्यांचें लक्ष नेहमीं आत्मानुसंधानाकडे लागलेलें असल्यामुळें त्यांचें या बाह्य कर्मफलांवरून मन उडालेलें असतें. त्यामुळें मंद ज्ञान्यांचें सुद्धां कर्मफल अज्ञान्यांप्रमाणें विशेष पुष्ट—स्पष्ट अनुभव देण्यास समर्थ—असत नाहीं. मध्यम ज्ञान्यांना तर हें प्रारब्धजन्य फल, साधारण झोंपेंत असतांना मशकादिकांनीं केलेल्या पीडेप्रमाणें अत्यंत सूक्ष्मपणानें भासतें; आणि उत्तम ज्ञानी असतात त्यांना तें त्यांच्या आत्मज्ञानाच्या प्रभावामुळें जळलेल्या दोरीप्रमाणें अगदीं निरुपयोगी होतें. त्या फळाच्या वेळेस आणि त्याच्या पूर्वीं दोन्ही वेळां त्यांची स्थिति सारखीच. रंगभूमीवर दुसऱ्याचा अभिनय करून दाखवितांना जसा कोणी मनुष्य आनंद करितो, खेद करितो, परंतु आंतून तसा विकृत होत नाहीं, त्याप्रमाणें हा ज्ञानी सुखदुःखादि प्रसंगांत पूर्ण व्यग्र असतांहि त्याला त्यांचा आंतून स्पर्शहि होत नाहीं. म्हणून त्याला होणारें प्रारब्धफल शशशृंगवत् विफल होतें. अज्ञानी लोकांना आत्म्याचें शुद्ध स्वरूप कळलेलें नसल्यामुळें ते देहालाच आत्मा म्हणतात, व त्यांच्या समजुतीप्रमाणें दृश्य हें सत्य असतें. मंद ज्ञान्याला आत्मा शुद्ध चित्स्वरूप आहे हें विदित झालेलें असून जगताची असत्यताहि त्यानें जाणलेली असते. परंतु त्याचा

अभ्यास अपुरा असल्यामुळें पूर्व वासना त्याच्या ज्ञानाला विरोध करितात. त्यामुळें त्याला मधून मधून देहावर आत्मत्व व जगाची सत्यता भासते. मग तो ज्ञानविचारानें त्या भ्रामक दृष्टीला स्वच्छ करितो. सत्य आणि मिथ्या या दोन भावना अशा तऱ्हेनें मंद-ज्ञान्याच्या ठिकाणीं एकत्र राहत असल्यामुळें त्याला या फलाचा स्पष्ट अनुभव येतो. पण त्याच्या या दोन्ही भावना सारख्या शक्तीच्या नसतात. त्याच्या सत्पदार्थाच्या, आत्मस्वरूपाच्या भावनेनें, असत् पदार्थाची, जगताची भावना पराभव पावते. असत् जगद्भावनेनें, झालेल्या ज्ञानाला कांहीं धक्का बसत नाहीं. असत् भावनेच्या संसर्गानें केवल आत्मस्वरूपाचें विस्मरण होतांच, 'ती व्यर्थ भ्रमात्मक आहे' असा विचारानें निश्चय करून तो सत्यभावनेचें अवलंबन करितो. मध्यम ज्ञान्याला स्वरूपाची विस्मृति किंवा जगताचा भास दोन्ही नसतात. तो प्रयत्न केल्यास कधीं कधीं स्वरूपानुसंधान सोडून देह-भानावर येतो. ही त्याची सिद्धावस्था सांगितली. पण मध्यम ज्ञानी जेव्हां साधकावस्थेंत असतो, तेव्हां तो जसजसा क्रमानें आपला अभ्यास वाढवितो, तसतशी त्याची स्वरूपाची विस्मृति कमी होत जाते. आणि पूर्णावस्थेंत तर तो प्रयत्नानेंहि देहावर येत नाहीं. उत्तम ज्ञान्याच्या समाधींत व व्यवहारदशेंत लेशमात्रहि भेद नसतो. त्याचें स्वरूपानुसंधान अखंड राहतें. नेहमीं समाधींत राहणारा जो मध्यम ज्ञानी त्याचें स्वरूपानुसंधान व्यवहारप्रसंगांत कांहींसें मलिन होतें. पण जो उत्तम ज्ञानी आहे, तो स्वच्छंदपणें किंवा प्रारब्धवशात् जेव्हां समाधि सोडून व्यवहार करूं लागतो, तेव्हां त्याचें अनुसंधान स्वस्व-

रूपापासून मुळींच च्युत होत नाहीं. वसुमंता! वस्तुतः पाहतां तुझ्या म्हणण्याप्रमाणें मध्यम आणि उत्तम या ज्ञान्यांना त्यांच्या हृदयस्थ अनुभवावरून पाहिलें असतां कर्म मुळींच नसतें हेंच खरें. कारण ते पूर्णतेस गेलेले असतात. ते संविदात्म-स्वरूपाशिवाय कांहींच पहात नाहींत. मग त्याचें कर्म कोठून राहणार? ज्ञानाग्नीनें सारें भस्म केल्यामुळें त्यांचें कर्म शेष उरतच नाहीं. जादुगाराच्या खेळाप्रमाणें तें फक्त इतरांच्या नजरेस येतें. वसुमंता, तुला थोडक्यांत याचें रहस्य सांगतों, ऐक.—शिवाची दृष्टि तीच या ज्ञानी पुरुषांची दृष्टि. काडी-मात्र फरक नाहीं. तस्मात् ज्ञान्यांना कर्म यत्किंचितहि भासमान होत नाहीं. ते कर्म करितात आणि न करतात, हा विचार लोकदृष्ट्या आहे; व त्याचें रहस्य तुला प्रथमतः सांगितलेंच आहे."

याप्रमाणें हेमांगदाचें निरूपण श्रवण केल्यावर त्या वसुमान ब्राम्हणाचे सर्व संदेह नष्ट होऊन त्याचें अंतःकरण ज्ञानतेजानें अत्यंत विशुद्ध झालें. त्यानंतर राजपुत्रांनीं त्याचा सत्कार केला व तो स्वीकारून तो आपल्या स्थानाला निघून गेला. राजपुत्र रुक्मांगद व हेमांगद हेहि त्यानंतर आपल्या नगरास परतले.

यावर परशुराम पुनः दत्तात्रेयांना म्हणाला, " श्रीगुरो! आपल्या तोंडून निघालेलें हें विज्ञान मीं ऐकलें. माझा संदेह नष्ट झाला. तें आत्मस्वरूप मला समजलें. माळेच्या सूत्राप्रमाणें सर्वांत अनुस्यूत असणारें संवेदन तोच आत्मा; व तोच सर्वत्र भासत आहे, हेंच खरें आहे. आतां आपण आरंभापासून सांगितलेला सर्व विषय साररूपानें मला सांगा, म्हणजे तो मला नित्य ध्यानांत वागवितां येईल."

तेव्हां दत्तात्रेय पुनः ह्मणाले—परशुरामा, ऐक; तुला आतां शेवटीं सर्वांचें सार काढून सांगतों. जी परम समर्थ व पूर्णाहंता धारण करणारी देवी चिति ती आपल्या इच्छेनें किंवा स्वातंत्र्यनामक मायाशक्तीच्या अद्भुत घटना करणाऱ्या विलक्षण प्रभावानें आदर्शावरील प्रतिबिंबाप्रमाणें आपल्याच स्वरूपावर जगत् भासित करिते. प्रथमतः ती पूर्ण परम चिति पूर्णाहंतेमुळें मोठी विस्तृत असतां, आपल्या इच्छेनें किंवा स्वातंत्र्यानें तिनें आपणाला दोन रूपांनीं प्रकट केलें. त्यांत एका अंशामध्यें जेव्हां अपूर्ण अहंभाव प्रकट झाला, तेव्हां अर्थातच त्याचा प्रतियोगी ह्मणून दुसरा भाग त्या अहंभावांतून बाहेर पडून, म्हणजे अहं-स्फूर्तिरहित—अचेतन—होऊन, त्या पहिल्या अंशाच्या दृष्टीनें बाह्य आणि अव्यक्त असा होऊन राहिला. परशुरामा! या अपूर्ण अहंभावात्मक प्रथमांशाला ‘ सदाशिव ’ असें नांव आहे. नंतर हें अव्यक्त आणि सत् तत्त्व आपणांहून भिन्न आहे असें पाहत असतांनाहि हा सदाशिव ‘ हेंच मी ’ असा एकतेचा अध्यास त्यावर सतत करूं लागला. त्यालाच पुढें इच्छा होऊन विविध जगत् उत्पन्न करावेंसें वाटलें; तेव्हां तें अव्यक्त तत्त्व ह्मणजे जो याचा देह, त्यावर ‘ तो माझा देह नव्हे, तो मीच आहें ’ असें समजून त्यानें तसेंच चिंतन दृढ केलें. तेव्हां हा अहंभावनेनें अव्यक्त तत्त्वांत समाविष्ट झालेला ईश्वरच ब्रम्हा, विष्णु व शंकर अशा तीन प्रकारचा झाला. नंतर दृश्य आणि द्रष्टा यांच्या मोठ्या राशींचा समुदायच अशीं ब्रम्हांडें भासमान करणारे पुष्कळ ब्रम्हदेव झाले; त्या ब्रम्हांडांची संस्थिति ठेवणारे विष्णु पुष्कळ झाले. तसेंच त्यांच्या संहार-

साठीं अनेक रुद्रहि निर्माण झाले. अशा तऱ्हेनें हें जग आकारास आलें. म्हणजेच परशुरामा! हें जग केवळ आरशांतील प्रतिबिंबाप्रमाणें भासत आहे; वस्तुतः कांहीं उत्पन्न झालेंच नाहीं. एक परम चिति पूर्ण अहंभावानें सर्वदा स्थित असून तीच अनेक अपूर्ण अहंकारांनीं स्वरूपांत विकसित झाली आहे. परशुरामा! तूं जसा सर्व देहभर अहंभावानें व्यापक असूनहि पुनः नेत्रादि निरनिराळ्या अंशांवर अहंकार धरून त्या त्या क्रिया करतोस, त्याप्रमाणें एक परम संवित् पूर्णाहंतारूपात्मक असतांहि ती ब्रह्मदेवापासून एखाद्या शुष्क काष्ठापर्यंत सर्वांच्या ठिकाणीं अपूर्ण अहंकारानें स्थित आहे. हें सर्व भासमान होतें ही ती एक चितिच होय. सर्व देहावर अहंभाव ठेवणाऱ्या तुला रूपरसादिकांचें ग्रहण करण्यास स्वतः सामर्थ्य नसल्यामुळें ज्याप्रमाणें तूं इंद्रियांशीं तादात्म्य पावून त्यांचें ग्रहण करितोस, तसाच हा सदाशिव स्वतः सर्व भेदरहित असतांहि ब्रम्हदेवापासून अगदीं क्षुद्र जंतूपर्यंत सर्व जीवराशीशीं आंतून तादात्म्य पावून, जाणणारा व करणारा होतो. परशुरामा! जसें तुझें निर्विकल्प शुद्ध स्वरूप सर्वांना आश्रय असूनहि तें स्वतः कांहीं जाणत नाहीं आणि करीतहि नाहीं, त्याप्रमाणें परम संवित् सर्व जगताला आश्रय असूनहि जगद्रूप भेद जाणतहि नाहीं आणि करीतहि नाहीं! हें सर्व जगत् दर्पणांतील प्रतिबिंबाप्रमाणें तिजवरच तिच्याच इच्छेनें भासमान होतें. त्यामुळें प्रतिबिंब पाहणें म्हणजे जसा आरसाच पाहणें, त्याप्रमाणें जगाचा भास हा तिचाच भास आहे. येथें असणारा तूं किंवा मी किंवा दुसरे सारे द्रष्टे केवळ दृङ्मात्र आहोंत. दृश्यसंबंधा-

च्या अभावीं चिति शुद्धच आहे, दुसरें काय? घटादि प्रतिबिंबांनीं युक्त असलेला आरसा घटाचा संबंध न धरला तर जसा स्वयंशुद्ध व केवलच असतो,—भेद काय तो प्रतिबिंबाचा; त्याप्रमाणें विकल्पानें उत्पन्न झालेल्या दृश्यभासाचें निरसन होतांच उरणारी परम संवित् केवळ एकीएक अद्वयच आहे. तिच्या ठिकाणीं दुःखाचा लेशमात्र स्पर्श नसल्यामुळें ती महा आनंदघन आहे. ज्या अर्थीं सर्वांना तिच्या प्राप्तीची इच्छा आहे, त्या अर्थींहि सर्व—आनंद हेंच तिचें स्वरूप होय. सुख हेंच आत्म्याचें स्वरूप आहे. कारण सुखच सर्वांना हवेंहवेंसें आहे. त्याच्यासाठींच देहादिकांची आवश्यकता किंबहुना लोभ उत्पन्न होतो. तें कोणालाहि नकोसें होत नाहीं. आणि विषयानंद हा त्याचाच लेश म्हणून ह्मणतात. तो आनंद सुषुप्तींत, तसेंच एखादें संकट वगैरे दूर झाल्यावर, अशा दोन प्रसंगीं सर्वांना अनुभवास येतो. एखाद्या सुखोत्पादक साधनावांचून म्हणजे केवल निर्निमित्त असा जो आनंद अनुभवास येतो तोच स्वरूपानंद. चित् हेंच सर्वांचें अभीष्ट असल्यामुळें चित् हाच आनंद होय. हें स्वात्मस्वरूपभूत महासुख मूढांना ओळखत नाहीं. हें सुख व्यक्त होण्याला जे अनेक बाह्य विषय कारण होतात, त्यावरून ते या महासुखाला बाह्य सुख म्हणून समजतात! ज्याप्रमाणें कारणवशात् आरशावर उमटलेलीं प्रतिबिंबें, तो आरसा आहे असें कळून आलें नाहीं तोंवर, ते निरनिराळे पदार्थच आहेत असें भासतें; मग त्यांचें प्रतिबिंबत्व माहित झालें म्हणजे पूर्ववत् तीं भासमान होत असतांहि दर्पणाहून भिन्न भासत नाहींत, आणि आरसा शुद्धच असतो, त्याप्रमाणें तत्त्व-

ज्ञान झालेल्या पुरुषाला जगत् भासमान होत असतांहि तें स्वस्वरूपभूतच असतें;—त्याहून निराळें नसतें. ज्याप्रमाणें मातीच्या ठिकाणीं घट, किंवा सुवर्णाच्या ठिकाणीं अलंकार किंवा पाषाणाच्या ठिकाणीं मूर्ति भासते, त्याचप्रमाणें चिद्रूप आत्म्यावर हें जगत् भासतें. मग तें निराळें कोठें आहे ? पण एवढ्यावरून परशुरामा ! जगत् मुळींच नाहीं, असा सिद्धांत तूं करूं नकोस. जगत् नाहीं ही भावना अपूर्ण होय. व नाहीं असा भलताच सिद्धांत सिद्धहि होत नाहीं. कारण सर्व जगाचा निरास केला तरी तें जग निरास करणाऱ्या आत्म्याच्या रूपानें पुनः राहतच असल्यामुळें ' जगत् मुळींच नाहीं ' अशासारखे शाप देऊन जगाचा लय कसा होणार ? आदर्शांतील नगर जसें वस्तुतः नाहीं, तरी आदर्शाच्या स्वरूपानें आहेच, त्याप्रमाणें जग हें जगद्रूपानें नसलें तरी चिदात्मरूपानें आहे, हें उघड आहे. याचेंच नांव पूर्ण ज्ञान. कारण येथें हें भासमान होणारें जगत् नाहीं अशी भावना धरून जो स्वरूपाचा संकोच व्हावयाचा, तो होत नाहीं. आदर्शच ज्याप्रमाणें बाह्य निमित्तानें नगररूपाला प्राप्त होतो, त्याप्रमाणें केवळ दृक् हीच आपल्या स्वरूपभूत माहात्म्यानें दृश्यस्वरूपाला प्राप्त झाली आहे. हेंच सर्व शास्त्रांचें सार आहे. बंध नाहीं आणि मोक्ष नाहीं; तसेंच साधक नाहीं आणि साधनहि नाहीं. अखंड, अद्वय, चिच्छक्ति त्रिपुराच एक सर्वथा भासत आहे. तीच अविद्या आणि तीच विद्या. बंधहि तीच व मोक्षहि तीच, आणि मोक्षाचें साधनहि पण तीच. परशुरामा ! एवढेंच काय तें ज्ञेय, दुसरें कांहीं नाहीं. हा विज्ञानाचा

क्रम तुला अगदीं मुळापासून सांगितला आहे. हें एवढें उत्तम रीतीनें जाणून घेतल्यावर पुरुषाला पुनः केव्हांच शोक करण्याचा प्रसंग येत नाहीं.

हारितायन ऋषि म्हणतात, " नारदा! असा हा श्रीदत्तभार्गव-संवाद सरळ व शुद्ध असून युक्तिवाद व प्रत्यक्ष अनुभव यांनीं भरलेला असल्यामुळें याचें श्रवण केल्यावर कोणाचाहि अज्ञानजन्य मोह निःसंशय नष्ट होईल! अथवा याचें श्रवण करूनहि जर एकाद्याचा मोह शमन पावणार नाहीं, तर तो पुरुष म्हणजे एक दगडाची मूर्तच म्हटली पाहिजे. मग त्याला दुसऱ्या तरी कशानें ज्ञान होणार आहे? नारदा! हें एकवार श्रवण केलें तरी दृढ ज्ञान प्राप्त करून देईल. क्वचित् एकाद्या मंदाला दोनदां किंवा तीनदां श्रवण केल्यानें देईल. याचें श्रवण अर्थातच ज्ञानदायक व पुण्यकारक आहे. हा ग्रंथ जवळ ठेवून आदरानें अवलोकन केल्यास दृष्टीचे दोष नष्ट होतील. आणि नेहमीं पूज्यभाव ठेवल्यास चित्त शुद्ध होईल. सर्वदा परिशीलन करीत राहिल्यास बुद्धीचें जाड्य नाहींसें होऊन, विचार उत्पन्न होईल व शेवटीं सर्वांतर्यामी आत्म्याचें निःसंदेह ज्ञान होऊन पुरुष सर्व बंधांतून मुक्त होईल!"

बापा ! गूढतमार्थ हा प्रगटला संवादरूपें पहा.
भाग्येच्छा, तरि तूं निजांतरगृहीं लावीं सदा दीप हा.
जो हे गूढ विचार नित्य विवरी एकाग्रचित्तें सुधी—
शीतें पावक, तेविं तो भवभयें आक्रांत नोहे कधीं.

—नवपुष्पमाला.

# आमचेकडे मिळणारीं पुस्तकें

| | | किं. रु. आ. |
|---|---|---|
| १ | देवीभागवत भाग १-२ ( मराठी भाषांतर ) | ८- ० |
| २ | योगवासिष्ठ भाग १-२-३ ( मराठी भाषांतर ) | १२- ० |
| ३ | अध्यात्म-रामायण ( मराठी गोष्टीरूप भाषांतर ) | १- ८ |
| ४ | वेदांत-प्रदीप | १-१२ |
| ५ | लंघन-चिकित्सा ( किनरेकृत ) | ३- ० |
| ६ | मिताहार-माहात्म्य ( किनरेकृत ) | ०-१० |
| ७ | खडे तात्त्विक बोल भाग १ ते ४ | २- ० |
| ८ | गीतापंचरत्न व नित्यपाठ-संग्रह | १- ० |
| ९ | श्रीदत्तभार्गव-संवाद | १- ० |
| १० | सार्थ अमृतानुभव | १- ८ |
| ११ | रामकृष्ण-वाक्सुधा भाग २ रा | १- ० |
| १२ | अध्यात्म-रामायण ( मराठी ओंवीबद्ध भाषांतर ) | २- ० |
| १३ | महाभारतांतील उपदेशपर गोष्टी | ०-१२ |
| १४ | श्रीमद्भगवद्गीता--आठल्येकृत आर्याबद्ध भाषांतरासह | ०-१४ |

टपाल खर्च निराळा. आगाऊ पैसे मनीआर्डरनें
पाठविल्यास ट. ख. माफ.

मुंबईचे एजंट—
परचुरे, पुराणिक आणि मंडळी
बुकसेलर, मुंबई नं. ४

भट आणि मंडळी,
बुकसेलर,
बुधवार पेठ, पुणें